UNIVERSAL LIBRARY
OU_192092
UNIVERSAL LIBRARY

M954 M5993
M91P
मोटे, कुसुमाबाई.
प्राचीन भाषरे. 1953.

OUP—67—11-1-68—5,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY


Call No. M954 M91P Accession No. M5993

Author मोटे, कृष्णाबाई.

Title प्राचीन मराठे. 1953.

This book should be returned on or before the date last marked below.

# प्राचीन माणसे



ॲन टेरी व्हाइट यांच्या
'द फर्स्ट मेन इन् द वर्ल्ड'
या पुस्तकाचा मराठी अनुवाद

कृष्णाबाई मोटे

# प्राचीन माणसे

मूल्य तीन रुपये

मॅजेस्टिक
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव, मुंबई ४

*Copyright 1953 by Anne Terry White*

THE FIRST MEN IN THE WORLD

*By Anne Terry White*

*Illustrated by Aldren Watson*

*Published by Random House, Inc.*

प्रकाशक :

केशव विष्णु कोठावळे

मॅजेस्टिक बुक स्टॉल

गिरगाव नाका, मुंबई ४

पहिली आवृत्ती १९६७

मुद्रक :

चिं. स. लाटकर

कल्पना मुद्रणालय

४६१।४ सदाशिव

टिळक रस्ता, पुणे २

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रवाहातील एक छोटीशी कुऱ्हाड | १ |
| २. | अशक्य! निव्वळ मूर्खपणा! | ९ |
| ३. | ही काय निसर्गाची लहर | १६ |
| ४. | 'नको असलेला पूर्वज ठिय्याच देऊन बसला' | २१ |
| ५. | हरवलेला दुवा मिळतो | २९ |
| ६. | मगरीची हाडे | ३६ |
| ७. | दाट अरण्याच्या अंतर्भागी | ४६ |
| ८. | चला पुढे! नव्या जागा शोधा | ५४ |
| ९. | मॅमथ विरुद्ध मानव | ६२ |
| १०. | हिमयुगाचा राजा | ७० |
| ११. | लातेला रेनडिअर मानव सापडतो | ७९ |
| १२. | छतावरचे बैल | ८६ |
| १३. | ती चोरी होती का? | ९४ |
| १४. | मातीचा गवा | १०० |
| १५. | नायकाचा शेवट | १०७ |
| १६. | मध्यरात्रीच्या प्रहरी गुहेत होणारा जादूटोणा | ११२ |
| १७. | मध्यन्तर | १२१ |
| १८. | शेतकऱ्याचे आगमन | १२७ |
| १९. | लाकडी खांबाचे रहस्य | १३२ |
| २०. | 'स्टोन हेन्ज'ची वास्तू उभी राहिली! | १३९ |
| २१. | नव्या मेक्सिकोतील गव्यांची शिकार | १४४ |
| २२. | हे सर्व काय त्यांनी कोणाच्या मदतीशिवाय एकट्यांनी केले? | १४९ |
| २३. | सादर वन्दन | १५७ |
| २४. | अश्मयुगीन मानवाच्या खांद्यावर | १६१ |



# १. प्रवाहांतील एक छोटीशी कुऱ्हाड

फ्रान्समध्यें ॲबेबी या नांवाचें एक लहानसें शहर आहे. सन १८२८ सालच्या उन्हाळ्यांतील एका संध्याकाळीं, त्या शहराच्या वेशीबाहेरच्या भागांत एक फ्रेंच गृहस्थ चालतांना दिसत होता. त्याच्या एकंदर चर्येवरून, हालचालीवरून ती व्यक्ति खूपच विचारांत गढली असावी, असें वाटत होतें.– इतकी कीं सहज पाहणाऱ्यालासुद्धां तो गृहस्थ स्वत: होऊन चालत नसून त्याचे पायच त्याच्या मनाला नेतील तिकडे त्याला आपोआप नेत असावेत, असें वाटे. शहराबाहेर आल्याबरोबर रोजच्या संवयीनें त्या व्यक्तीचे पाय तिला एका खड्ड्याकडे नेऊं लागले. पाण्याच्या एका सुकून गेलेल्या प्रवाहांतील दगडगोटे व वाळू यांनीं भरलेला तो एक खड्डा होता. तेथें आल्याबरोबर त्याचे पाय थांबले.

त्या गृहस्थानें त्या घळींत जरा वांकून पाहिलें. एक क्षणभर पाण्यानें गुळगुळीत झालेल्या तेथील असंख्य बारीकमोठ्या दगडगोट्यां-कडे तो पाहतच राहिला. एका क्षणानंतर त्यानें खालीं उतरायचा विचार केला. हळुहळू त्या दगडगोट्यांवरून घसरत घसरत, कांहीं गोटे, रेती

खालीं घरंगळवीत तो पार त्या घळीच्या तळाशीं पोहोंचला.

तेथे पोहोचल्यावर स्वारीनें वांकून हळुहळू, अलगद हातानें ते बारीकमोठे गोटे बाजूला करायला सुरुवात केली. बाजूला काढतांना फक्त फुटलेला गोटा दिसला कीं तो उचलून घेई व मोठ्या वारकाईनें पाहत असे. घळींत संध्याकाळच्या छाया पसरत चालल्या तरी त्याचे काम चालूच होते. अखेर अगदी दिसेनासें झालें तेव्हां स्वारीला थावावेच लागले.

'मॉसिअ् बूशे द पॅर्थ रोज रोज त्या गोटयानी भरलेल्या घळीत जाऊन करतो तरी काय ?' अॅबेबी गांवांतले लोक एकमेकांना विचारीत. तो रस्त्यानें गेला की, त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहत. 'अरे हा तर कर वसूल करणारा एक साधा माणूस ! रोज त्या दगडगोटयांच्या घळीत करतो काय ? काय पाहतो रोज तिथे ? त्याला तेथें, असें काय सांपडतें की तो त्यांत इतका रमून जातो ? '

पण त्याच्या रमण्याचें कांहींच कारण न कळल्यानें कांही लोक नुसत्या माना हालवूनच पुढे जात. काही आपली बोटें वर्तुळाकार नाचवीत अखेर कपाळावर टेकीत. जणू काय त्याचे डोके काहीसे विघडले आहे असे सुचवायचा त्याचा हेतु असे.

स्वत: बूशे द पॅर्थला मात्र आपल्यासबंधी लोक असे काही बोलत असतील याची यत्किंचितहि कल्पना नव्हती. तो सारखा आपल्या विचारात एवढा गढलेला असे की, वाकीच्या साऱ्या जगाचा त्याला पार विसरच पडलेला होता. त्याच्या डोक्यांत एक कल्पना अगदी घर करून वसली होती, असे म्हटले तरी चालेल. रात्रदिवस फक्त त्या कल्पनेच्याच मागे लागून तो वणवण भटकत होता.

'खरेंच असें काय होते तिथे ? त्या नदीच्या पात्रांतील सुकलेल्या दगडगोटयाच्या घळीत बूशे द पॅर्थची स्वारी धुडीत तरी काय होती ?'

हो. एका लुप्त झालेल्या युगाचा तो शोध घेत होता. त्या लुप्त युगाचे अवशेष कुठे सांपडतात की काय हे तो पाहत होता, आणि त्याला कारणहि तसेंच होतें.

त्याच्या वेळच्या विद्वान शास्त्रज्ञांनी पृथ्वीवरील मानवी जीवन फक्त दोनच कालखंडांत विभागले होते. त्यातील पहिल्या विभागाला त्यांनीं कांशाचें युग ( Bronze Age ) असें नाव दिलें होतें. हे नाव

देण्याचें कारण एवढेंच कीं, तोंपर्यंत अगदी प्राचीन मानवी जीवनाच्या म्हणून ज्या खुणा, जी हत्यारे, जी शस्त्रें त्यांना सांपडली होती, ती सर्व काशाची (Bronze) होती. दुसऱ्या कालखंडाला त्यांनी 'लोहयुग' असे नांव दिलेले होते. कारण आपल्या सर्वांना माहीत आहे की, त्या वेळी मानवजात आपली सर्व हत्यारें व शस्त्रे लोखंडाची करूं लागलेलीं होती.

बूशे द पॅर्थला मात्र या दोनच युगाची कल्पना पटत नव्हती. 'असे कसे शक्य आहे?' असा नेहमी त्याच्या मनांत विचार येई. त्याला सारखें असे वाटत असे की, 'या कांशाच्या युगापूर्वी (Bronze Age) दुसरें कसले तरी युग होऊन गेलें असलेच पाहिजे. तांब्यांत जस्त मिसळून कासे करण्याची कृति मानवाला काय एकदम सांपडली? ती सांपडण्यापूर्वी तो जगत असलाच पाहिजे. अशा वेळीं तो काय बरे वापरीत असेल? ते कांही नाही. या 'धातु-युगा'पूर्वी खासच 'धातु-पूर्व' असे एक युग होऊन गेले असलेच पाहिजे. बरे, तसे युग होऊन गेलें असे धरले तर त्या काळांत मानव आपल्या कुऱ्हाडी, सुऱ्या कशाच्या बरे करीत असेल? दगडाच्या तर नसतील? हा माझा तर्क खरा असेल तर मला त्या फार फार प्राचीन काळच्या कुऱ्हाडी किवा सुऱ्या कुठे तरी सांपडायला हव्यातच.' त्याने खूप खूप विचार केला. असे दगडाचे प्राचीन अवशेष कोठे तरी सांपडलेच पाहिजेत असे त्याला सारखे आंतून वाटे. पण ते पाह्यचे कुठे, कुठे शोधायचे, याचा मात्र त्याला पत्ता लागत नव्हता.

असे होता होतां, तो एक दिवस नव्यानेच खोदलेल्या एका रेतीच्या खड्डयापाशी आला. तेथे उभा असतांना चटकन् त्याच्या मनांत कल्पना चमकून गेली, 'न जाणो इथेच अशा सुकून गेलेल्या पाण्याच्या प्रवाहांत एखादे वेळी असे अवशेष सांपडण्याचा जास्त संभव. मग इथेच कां करूं नये शोधायला सुरुवात?' ही कल्पना मनात आली मात्र, त्याचे सर्व शरीर आनंदाने वहरून गेलें. त्या भरांतच तो त्या रेतीच्या खड्डयांत उतरला. तळाशी असलेला एकेक दगडन् दगड तो उचलून पाहूं लागला. शेकडों नव्हे, हजारों गोटे, त्याने अशा रीतीनें बाजूला केले. पण छे! त्याला पाहिजे ते त्यात गवसत नव्हते. जे काय मिळत होतें तें सारें निसर्गानें घडविलेले होतें. त्यांतील एकालाहि मानवी हाताचा कधीं स्पर्श सुद्धां झाला असावा, असें दिसत नव्हतें.

पण बूशे द पॅर्थ हा असा सहजासहजीं नाउमेद होणारा मनुष्य नव्हता. त्यानें आपलें संशोधन तसेंच चालू ठेवलें. किती तरी वर्षे तो त्या एकाच जागी नव्हे, तर अशा प्रकारच्या शेंकडों जागी दगडगोटे पाहत हिंडत होता.

सरतेशेवटी एक दिवस असा उजाडला कीं, त्याच्या आशेला पालवी फुटली. त्याच्या अगदी घराजवळच ॲबेबी गांवातील अपिताल ( Hopital ) नदी वाहत होती. तिची रेती वर्षानुवर्षे वाहत येऊन तिच्या कांठी जागोजाग उंचच्या उंच रेतीचे थर जमत गेले होते. त्या रेतीत शोध करीत हिंडतां हिंडतां, त्याला एक चांगला सहा इंच लांबीचा गारगोटीचा दगड सापडला. त्या दगडावर त्याला पाहिजे होत्या तशा खुणा मिळाल्या एकदांच्या. त्या दगडाच्या अगदी कडेच्या भागाला टोकाशी मुद्दाम घाव घालून कोणी तरी दोन कपच्या उडविल्या होत्या. मनुष्याशिवाय दुसरे कोणी त्या उडविणे शक्य नव्हते. म्हणून हे काम माणसाचेच यावद्दल बूशे द पॅर्थला खात्री होती. 'हें काम माणसाचेच-धातुपूर्व युगांत राहणाऱ्या मानवाचेंच' असे त्याला मनोमन वाटू लागलें.

तो आनंदाने अगदी बेहोष झाला. इतका की, तो दगड कोणाला तरी दाखवल्याशिवाय त्याला चैन पडेना. एखाद्या चांगल्या शास्त्रज्ञाला दाखवून घ्यावे इतकासुद्धां त्याला दम निघेना. तो सरळ सरळ, तडक जवळच असलेल्या एका शास्त्रज्ञाकडे गेला.

त्या शास्त्रज्ञाने तो दगड हातांत धरला, एकदोनदां या बाजूने, त्या बाजूने, असा फिरवून पाहिला आणि त्याला परत दिला.

त्याच्या तोडावर स्मित पसरले. 'महाशय, हा दगड तुम्हांला वाटतो तसा मानवी कारागिरीचा नाही. हें निसर्गाचे काम आहे. निसर्ग किती वेळां कसे चमत्कार करतो हे तुम्हांला तर माहीत आहे. त्यांतलाच हा प्रकार. छ्या: ! हें मानवाचे काम नव्हेंच मुळी.'

एके ठिकाणीं अशी संभावना झाल्यावर बूशे द पॅर्थला चैन पडेना. तोच दगड घेऊन, तो एका दुसऱ्या शास्त्रज्ञाकडे गेला. त्यानेंहि तो दगड नीट पाहून घेतल्यावर उद्गार काढले, 'खरें आहे तुमचें म्हणणें. असा दगड निसर्गात नेहमी आढळत नाहीं हें अगदीं खरें. पण योगायोगानें होतो एखादे वेळी असा दगड. त्याचा कांहीं नेम नाहीं सांगतां येत.'

इतकें झालें तरी बूशे द पॅर्थचा आत्मविश्वास कांहीं डळमळला नाहीं. आपल्याला मनोमन वाटते तें बरोबर आहे, अशी त्याची खात्री होती. 'आपल्याला वाटतें हे जर खरे, तर हे दोघे शास्त्रज्ञ असें कां सांगतात? या गारगोटीच्या दगडावर माणसाचा हात फिरला आहे हें इतकें उघड दिसत असतां, या दोघांहि शास्त्रज्ञांना ते कां पटू नये?' त्याचे विचार सुरू झाले. हळुहळू त्याच्या डोक्यांत प्रकाश पडू लागला. 'बरोबर. त्यांना माझे म्हणणे पटणे कठीण आहे.' युरोप व अमेरिका येथें असलेल्या इतर साऱ्या विद्वानांप्रमाणे त्यांचीहि अशीच समजूत असणार की, मानवप्राणी हा भूतलावर अनादि काळापासून वावरत नसून नव्यानेंच पृथ्वीवर वावरूं लागलेला आहे. या बाबतीत एका ख्रिश्चन धर्मगुरूने तर अत्यंत काळजीपूर्वक हिशेब करून असा निर्णय प्रसिद्ध केला होता कीं, पृथ्वीचा जन्म झाल्याला जरी लक्षावधि वर्षे झाली असली तरी मानवी प्राण्याची पृथ्वीवरील उत्पत्ति मात्र फक्त इसवी सनाच्या आधी ४००४ वर्षे झाली. दुसऱ्या एका मोठ्या वजनदार विद्वानाने तर ही उत्पत्ति नक्की कोणत्या दिवशी झाली तो दिवससुद्धां काढला होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे २३ ऑक्टोबर हा तो दिवस. त्या दिवशी सकाळी ९ वाजतां मानवी प्राण्याची पहिल्याने उत्पत्ति झाली.

त्या काळांत जवळ जवळ प्रत्येकाचाच असा विश्वास होता. त्यामुळे त्यांना ती तारीख खरी वाटे. दुसरीहि एक अशाच प्रकारची त्यांची समजूत होती. ती अशी : मनुष्य जेव्हां जगांत उत्पन्न झाला तेव्हां तो आपल्याबरोबर सारें व्यवहारज्ञान घेऊनच जन्माला आला. तें व्यवहारज्ञान म्हणजे थोडक्यात असे : नांगरायचें कसें, धान्य कसे पेरायचे, गुरेंमेंढरें कशी पाळायची, उंटावर कसे बसावयाचें, इत्यादि गोष्टीचें तो उपजतज्ञान बरोबर घेऊन आला अशी त्यांची समजूत होती. अर्थात् चोहोंकडील विद्वानांचीच ' अशी समजूत असल्यावर या दोघां शास्त्रज्ञांना आपलें म्हणणें कसे बरें पटणार?' अशा वेळी दगडावरील मानवी कारागिरीच्या बाबत त्यांनीं शंका दाखविली यांत कांहीच नवल नव्हते. त्यांच्या तत्कालीन मान्य असलेल्या कालगणनेत अश्मयुगाला कोठेंच जागा नव्हती. त्यांच्या समजुतीप्रमाणें इतकें सारें व्यवहारज्ञानाचें गांठोडें उपजतच जन्माला घेऊन येणाऱ्या मानवाला स्वतःचीं हत्यारें,

शस्त्रें, इत्यादीवावत साधनें तयार करण्याकरितां कधी काळी चकमकीच्या दगडाची गरज पडली असेल याची त्यांना स्वप्नांतसुद्धां कल्पना शिवत नव्हती.

बूशे द पॅर्थ हा गृहस्थ कांही स्वत: शास्त्रज्ञ नव्हता हे खरे. पण त्याच्या वापाने त्याला नीट कसा विचार करावा हें मात्र शिकवले होतें हे निश्चित. म्हणूनच दोघाहि शास्त्रज्ञांनी जरी त्या दगडाविषयी शंका प्रदर्शित केली होती, तरी आपला तर्क वरोवर आहे असा त्याचा विश्वास होता व त्यालाच तो चिकटून राहिला. त्याने नाउमेद न होतां आपलें सशोधन तसेच चालू ठेविले. असें संशोधन करीत असतां लवकरच एके दिवशी त्याला वाळूच्या थरात रुतून राहिलेला पूर्वीसारखाच आणखी एक चकमकीचा दगड मिळाला. त्यानंतर तिसराहि तसाच एक दगड मिळाला. त्या दोघानाहि पहिल्यासारखेच घाव ·ालून मुद्दाम आकार आणलेले होते.

हे तिन्ही दगड घेऊन बूशे द पॅर्थ फिरून त्या विद्वानांकडे गेला. त्याने हे तीनहि गारगोटीचे दगड त्याना दाखविले व म्हणाला, ' पाहा हे तिन्ही दगड. तिघांना कसा सारखाच आकार देण्याचा प्रयत्न केला आहे, ते तरी पाहा ! आणि आतां सांगा, अजूनहि तुम्ही याला योगा-योग–निसर्गाची कृति–असेच म्हणणार का ? असा आकार कोणी मुद्दाम दिल्याशिवाय येत नाही हे निश्चित. योगायोगानें किवा निसर्गचमत्काराने एखाद्या दगडाला आकार येईल पण तिन्ही दगडाना कसा येईल ? '

' नाही बुवा, आम्हाला तरी यांत योगायोगाशिवाय दुसरें कांहींच दिसत नाही. ' शास्त्रज्ञांनी फिरून एकवार ठामपणे सांगितलें.

बूशे द पॅर्थला मात्र तसे वाटत नव्हते. आपल्या मनाच्या साक्षीवर त्याची पुरी श्रद्धा होती. त्यानुसार तो अधिकाधिक शोध घेतच राहिला. त्याच्या संशोधनात एवढाहि खड पडला नाही. उलट मजुरी देऊन कांही मजुरांची मदत घेण्यास त्यानें सुरुवात केली. आपल्याला कशा प्रकारचें दगड पाहिजेत हे त्याने मजुराना समजावून सांगितलें; व तसे दगड आढळून आल्यास त्यांनी ते अलगद उचलून आपल्याकडे आणून द्यावेत. त्यासाठी आपण त्यांना कांही तरी पैसे देऊं असें त्यानें कबूल केलें.

दिवसामागून दिवस असा कांही काळ लोटला. एके दिवशीं

मजुरांपैकीं एकानें त्याच्याकडे जो दगड आणला त्याला लहानशा कुऱ्हाडीसारखा आकार दिलेला होता. तो आकार इतका स्पष्ट होता की, त्याला कोणीहि सहज कुऱ्हाड असेच म्हटलें असतें. नदीच्या कांठी सांचलेल्या गाळाच्या थरांतच अगदी खोल असलेल्या एका थरात ती कुऱ्हाड मिळाली होती. तो गाळाचा थर अनत काळ तेथें पडलेला दिसत होता. शिवाय वरच्या पृष्ठसपाटीपासून ३० फूट खाली खोल असलेल्या गाळाच्या थरांत ती कुऱ्हाड मिळाली होती. इतक्या खोलीवर, वरती गाळाचे थर असतांना—माणसाचा कधी स्पर्श सुद्धां होण्याचा सभव नव्हता, अशा थरांत रुतून बसलेली अशी ती कुऱ्हाड मिळालेली होती, ही त्या संशोधनांतील अत्यंत महत्त्वाची वाव होती. कारण नदीकाठी अशाच खोलीच्या गाळाच्या थरातून प्राण्यांची हाडे सांपडली असतां ती शास्त्रज्ञांनी काळजीपूर्वक गोळा करून पॅरिसला पाठविल्याचे त्याला माहीत होतें. तशी पाठविली असता विद्वान फ्रेंच तज्ज्ञशास्त्रज्ञ कुव्हिए ( Cuvier ) यांनी ती तपासून पाहून अधिकारवाणीने असे जाहीर केलें होते की, ही हाडे एखाद्या हत्तीची आणि गेंड्याची (Rhinoceros) आहेत. त्या विधानाच्या आधारानें पाहिले तर गाळाच्या त्याच थरात सांपडलेली ही कुऱ्हाड त्याच काळांतील असणार ! तो काळ ...म्हणजे ज्या वेळी फ्रान्सच्या भूमीवर हत्ती, गेंडे (Rhinoceros) वगैरे प्राणी हिंडत होते तो काळ ! त्या काळी त्या प्राण्यावरोबरच मनुष्यप्राणीहि वावरत होता तर ! त्यानेच ही कुऱ्हाड केली असावी. अबबबब ! किती हजार वर्षापूर्वीची ही गोष्ट ? शेकडोशे हजार वर्षापूर्वीची तर !

बूशेद पॅर्थ फिरून त्या शास्त्रज्ञांकडे गेला. हातांतील कुऱ्हाडीचा दगड मोठ्या आनंदाने त्यांच्यापुढे ठेवीत म्हणाला, 'आतां तरी हा दगड पाहून म्हणाल की नाही ही मानवाचीच कारागिरी म्हणून ?' असे म्हणून सरळ त्याने त्याच्या नाकापुढे ती दगडी कुऱ्हाड नाचवीत टेबलावर ठेवली.


'हो, हो. ही कुऱ्हाड दिसते खरी.' शास्त्रज्ञांना कबूल करणें भागच पडलें. 'पण ही खास तुम्ही म्हणतां त्या खोलीवरील गाळाच्या थरांतून आली ? शक्यच नाही त्या खोलीवर माणसाची कृति मिळणें.'

'हो, पण तिचा रंग पाहा की ! त्या काळच्या नदीकांठच्या

वाळूच्या थराचा जो रंग आहे तसाच हिचा रंग आहे. ही पाहा तिला चिकटून बसलेली वाळू, माती तशीच दिसते कीं नाहीं ? ' त्यांच्या विरोधाला त्यानें प्रत्युत्तर केलें.

पण ते शास्त्रज्ञ सर्वज्ञतेचा आव आणून एकमेकांकडे पाहून हंसूं लागले. :' जणुं काय तुम्ही असं म्हणणार हें आम्हांला माहीतच होतें ' असें दर्शविण्याचा त्यांचा हेतु असावा. ' छे बाबा, भलतेच भोळे आहांत तुम्ही ! अहो, ही कुऱ्हाड तुम्ही स्वतः काढली का त्या गाळांतून ? नाहीं ना ? बरं, मजुरांनीं तुम्ही सांगतां एवढ्या खोलीवरून तुमच्या देखत काढली का ? नाही ? हात्तिच्या ! मग काय हो ! तुम्हांला त्या मजुरानें चक्क बनविलें, दुसरें काय ? '

या संभाषणानंतर बूशे द पॅर्थ घराबाहेर पडला तो चांगल्या कुऱ्यांतच. ' थांबा, अजून तुम्ही विश्वास नाहीं ठेवीत ? मग दाखवतोंच तुम्हांला ' असे कांहीं तरी मनाशीं बडबडत तो जात होता.



## २. अशक्य ! निव्वळ मूर्खपणा !

बूशे द पॅर्थ यानें आदिमानवाच्या कारागिरीचा नमुना म्हणून दाखवलेले चकमकीचे दगड पुढें आल्याला आज उणी पुरी दहा वर्षे होत आलीं तरी अजून त्याने आपले संशोधन सोडले नव्हते. तशा दगडांचा शोध घेत तो अजूनहि सतत हिंडत होता. शास्त्रज्ञांनी त्याची दगडाची कुऱ्हाड पाहूनहि ही आदिमानवाची कामगिरी असावी असे म्हणण्याचें जेव्हांपासून नाकारले, तेव्हांपासून त्याला एकच ध्यास लागला होता. तशा कृतीचे गारगोटीचे दगड शोधून काढणे.

आतां नदीतील वाळू किवा रेती खोदणारे सारे मजर त्याला ओळखू लागले होते. पहिले कांही दिवस तो एक चक्रम म्हणजे वेडाच असा त्यांचा समज होता. त्यामुळे प्रथम प्रथम, त्याचे काम करायला ते कांकू करीत, पण हळूहळू त्यांनाहि समजू लागलें, त्यांत गोडी वाटू लागली. त्याला पाहिजे तशा प्रकारचा गारगोटीचा दगड मिळाला की, त्यांना खूप मजा वाटे, आनंद होई. कांही वेळां तो दूर दिसला कीं, ते त्याला

ओरडून सांगत, 'थांवा, बाबा, आज तुम्हांला दगडाची कुऱ्हाड काढून दाखवितों.'

बूशे द पॅर्थनें त्या सर्व मजुरांना 'काय पाह्यचें, कसे पाह्यचें' हें समजावून सांगण्याची पूर्ण खबरदारी घेतली होती. 'हें पाहा' असें म्हणून सुरुवात करून तो त्यांच्याशी बोलू लागायचा. 'हे या इथें लहानमोठे लाखों दगड पडलेले आहेत. पण त्यावरून नदीचा प्रवाह सारखा वाहत राहिल्यानें आपोआप त्याच्या कडा घांसून हे कसे गुळगुळीत झाले आहेत. पण हा गारगोटीचा दगड घ्या. पाहा, याला कसा वेगळा आकार आला आहे तो. या दगडाच्या या वाजूला आणि त्या वाजूला मुद्दाम कोणी तरी घाव घालून त्याच्या कपच्या उडविल्या आहेत. त्या दगडाला धार आणावी अशी त्या घाव घालणाऱ्याची कल्पना असावी; म्हणून या कपच्या उडविल्या. हे काम निसर्गाचे नाही. फक्त माणूसच अशा प्रकारचें काम करू शकतो. हें असे माणसाचे काम कोणते ते आपण नीट पाहिले पाहिजे.

त्याच्या या सतत चालणाऱ्या शिकवणुकीमुळे काम करणाऱ्या मजुरांना त्याला काय पाहिजे आहे हे कळून आले व तसा दगड दृष्टीस पडल्यावरोवर त्याचे तावडतोव लक्ष जाऊ लागले. त्याला पाहिजे होते तसे चकमकीचे दगड भराभर गोळा होऊं लागले. पहिले चार दगड सांपडायला, दगडाचा शोध घेत तो पुरी दहा वर्षे हिंडत होता. पण पुढच्या नऊ वर्षांत त्याच्याजवळ निरनिराळ्या मानवी कारागिरीचे इतके चकमकीचे दगड जमले की, ते ठेवायला त्याने आपल्या घराला एक गॅलरीच वाधली व त्यात तो ते ठेवू लागला.

खूपच आश्चर्यचकित करून सोडणारे आणि मजेचे होते तें त्याचें संग्रहालय! धातुपूर्व युगातील मानवाची जवळजवळ प्रत्येक गोष्ट तेथें पाहावयाला मिळे. आपल्या मनांतील कल्पनेप्रमाणें आपला तो अनमोल खजिना तो जेव्हां वर्गवारीने व्यवस्थित लावू लागला तेव्हां त्याचे अंतःकरण कसे फुलून आले. 'अश्मयुगांतील मानव पायरी-पायरीनें आपल्या हातांचा उपयोग कसा करावयाला शिकला, हें आतां सहज पाहणाऱ्यालासुद्धां कळून येईल,' त्याच्या मनांत विचार आला. चकमकीच्या कांही दगडांवरची कारागिरी फारच कच्च्या तऱ्हेची व ओवडधोवड होती. ते दगड कसे तरी तयार केल्यासारखे दिसत. पण

दुसऱ्या कांहीं दगडांना सुऱ्या, करवती, हातोडे यांचा अगदीं छान आकार देण्यांत आलेला होता. त्याच्या संग्रहांत दगडापासून बनविलेल्या छोट्या कुऱ्हाडीसुद्धां होत्या. त्यांना दांडा म्हणून काळविटाचें शिंग लावण्यांत आलें होतें. बैलांच्या गुडघ्याच्या कवटचांपासून तयार केलेल्या डब्या त्याला सांपडल्या होत्या. हाडापासून केलेल्या वरच्या पण त्याच्या संग्रहालयात होत्या. त्या चांगल्या टणक व्हाव्या म्हणून त्यांना विस्तवांत घालून टणक बनविण्यांत आलें होतें.

तो सारा वस्तुसंग्रह नीट लावायला त्याचे किती तास खर्ची पडले असतील, हें मोजणें फार कठीण होतें. तासन् तास तो संग्रह लावीत बसलेला दिसे. तेथील प्रत्येक वस्तूवर ती कुठें सांपडली, कशी सांपडली, याची वर्णनात्मक चिठ्ठी लावण्याचें बूशे द पॅर्थने ठरविलें होतें. त्याशिवाय जेथें ती वस्तु मिळाली तेथील भोंवतालच्या मातीचा थोडासा नमुना पण त्यानें त्या वस्तूबरोबर ठेवलेला होता.

सारा संग्रह त्याच्या मनाजोगता नीट लागल्यावर बूशे द पॅर्थनें आपले वस्तुसंग्रहालय सर्वांना पाहयला खुले केलें. रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या कोणीहि माणसानें खुशाल आत शिरावें आणि संग्रहालयांत काय ठेविलें आहे तें पाहावे असे त्याने जाहीर केलें.

पण या सर्वांत मुख्य अडचण एवढीच होती कीं, त्या रस्त्यानें फारशी माणसे जात येत नसत. त्यामुळें फारच क्वचित एखादा अनोळखी माणूस त्या संग्रहालयांत फिरकला तर फिरके. या गोष्टीचे बूशे द पॅर्थला फार वाईट वाटे. ‘आपण हा संग्रह खरोखर पॅरिसला पाठवून तेथेंच ठेवायला पाहिजे.’ त्याच्या मनांत कितीदां तरी विचार येई. तसे केले तर जगांतील कितीतरी लोक हा संग्रह पाहून जातील असें त्याला वाटे. या कल्पनेसरशी त्याने पॅरिसच्या सर्ववस्तुसंग्रहालयाला पत्र लिहिलें व आपण जमविलेला सारा संग्रह तेथें पाठवून देण्यास तयार असल्याचें कळविलें.

गंमत ही कीं, पॅरिसचें सर्ववस्तुसंग्रहालय त्याच्या त्या वस्तु घ्यायला तयार होईना. ‘तुमचे हे चकमकीचे दगड, इतर वस्तु, हाडें, हाडांच्या वस्तु यांशी आम्हाला कांही कर्तव्य नाहीं. अशा अर्थाचें त्याचें उत्तर आलें. पॅरिसला ‘अश्मयुगीन मानवा’ची कल्पनाच मुळीं अमान्य

होती. कांशाच्या युगापूर्वी मानवजात पृथ्वीतलावर अस्तित्वांत असून ती पृथ्वीवर वावरत होती, ही कल्पना तेथील विद्वानांना मान्य होत नव्हती. त्यामुळें त्याचा संग्रह म्हणजे उगीच कांही तरी ढोंग-धत्तुऱ्याचें प्रकरण आहे. तसें नसलें तर शुद्ध मूर्खपणा आहे, तेव्हां त्याचा संग्रह त्यानेंच आपल्याजवळ ठेवावा. 'आम्हांला तो नको' असें त्याला कळविण्यांत आलें.

या उत्तरानें बूशे द पॅर्थला चांगलाच धक्का बसला. कांशाच्या युगापूर्वी पृथ्वीवर माणूस अस्तित्वांत होता–जगत होता, याचा इतका भलाभक्कम पुरावा उपलब्ध असतांना हे लोक डोळे झांकून इतके आंधळ्यासारखे कसे राहूं शकतात, याची त्याला कल्पनाच करतां येईना. त्यांच्या एकांगी विचाराची त्याला मोठी गंमत वाटू लागली. एके काळीं जेथें नदीचा प्रवाह वाहत असावा अशा पात्रांत खोदीत असतां मिळा-लेल्या हाडावरून, फार फार पूर्वी – अनादिकाली पृथ्वीवर आतांपेक्षां अगदी वेगळे असे निरनिराळ्या प्रकारचे सस्तन प्राणी राहत होते, याची शास्त्रज्ञांना पुरी जाणीव होती. हे सारे एके काळीं आलेल्या पुरांत नष्ट झाले, यावद्दलहि त्यांना शंका नव्हती. आतां हे सगळे प्राणी नामशेष झाले असून पृथ्वीवर त्याचें अस्तित्व कोठेंहि शिल्लक उरलेलें नाही, हे सारें त्यांना मान्य होते. पण त्याच प्राण्यांवरोबर पृथ्वीवर एके काळी मानवही – जरा निराळा असेल तो मानव – पण तो राहत असावा आणि इतर प्राण्यांवरोबर ती मानवजातहि कदाचित पुरांत नामशेष झाली असावी, अशी कल्पना कोणी केली तर ती मात्र त्यांना पटत नव्हती. तसे पाहिले तर या कल्पनेत चुकलें कुठे ? तर्कशुद्ध नव्हती का ही विचार-सरणी ?

अखेर बूशे द पॅर्थनें स्वतःच बसून आपल्या कल्पना विशद करणारें एक पुस्तक लिहावयाचे ठरविलें व लिहिलेंहि. त्यानें ते पुस्तक पॅरिसच्या 'कला आणि विज्ञान शाळे'ला (Academy of Arts and Sciences) पाठविलें. वाचकांना स्पष्टपणे कल्पना यावी याकरतां त्यानें या पुस्तकांत त्याला सांपडलेल्या निरनिराळ्या वस्तूंची चित्रेंहि दिलीं.

'कला आणि विज्ञानशाळे'च्या विद्वानांनीं तो जाडजूड ग्रंथ हातीं घेऊन मुद्दाम काळजीपूर्वक चाळला. कांशाच्या युगापूर्वी (Bronze Age)

मनुष्याचें अस्तित्व होतें असें आपल्याला कां वाटतें यावद्दलचे त्याचे सारे विचार त्यांनीं वाचले. त्यानें दिलेलीं चित्रें पाहिलीं. तेव्हां मात्र ते थोडेसे अस्वस्थ झाल्यासारखे झाले. कारण प्रचलित विज्ञान-विचार व धर्म-विचार यांच्यांत उलथापालथ करून टाकणारा एक नवाच विचार त्यानें मांडला होता. तो ग्राह्य मानायला मात्र त्यांचें मन तयार होईना. म्हणून त्यांनीं उलटा कांगावा सुरू केला. ' कोण हा बूशे द पॅर्थं ? कुठला ? याला बोलायचा काय अधिकार ? काय म्हणतां अबेबीचा ? कुठें आहे ते खेडे ? आणि अशा खेड्यांत राहणारा हा टिकोजीराव तरी कोण ? काय खुळचट कल्पना ! काही अर्थ नाही त्यांत ! भलत्याच अचाट खुळचट कल्पना मांडल्या आहेत या वल्लीने ! यापलीकडे या पुस्तकांत कांही नाही. '

कांही लोकांनी ते पुस्तक वाचल्यावर लेखक स्वप्नाळू आहे असा त्याच्यावर शेरा मारला. काहींनी पुस्तक वाचून त्याला वेड्यांतच काढलें. ' स्वत: वेडा, तेव्हां त्याचे म्हणणे कुणाला पटणार ? म्हणून सारें जग तो वेड्यात काढू पाहतो आहे ' अशा रीतीनें ते त्याची सभावना करूं लागले.

सगळीकडून एका निराशेशिवाय दुसरें कांही त्याच्या वांट्याला येईना.

बूशे द पॅर्थचें पुस्तक वाचून त्याची वेड्यांत गणना करणाऱ्या विद्वान् लोकांत एमिअन्सचे डॉक्टर रिगोलो म्हणून एक विद्वान् शास्त्रज्ञ होते. त्याच्या जिव्हाग्रावर ' अशक्य ', ' निव्वळ मूर्खपणा, ' हे शब्द अष्टौप्रहर नाचत असत. जरा कांहीं त्यांना पटलें नाही की, त्यांनी मारलाच त्यावर शिक्का ! ' अशक्य, निव्वळ मूर्खपणा '. बूशे द पॅर्थच्या बाबतींतहि त्यांना त्यांचा एक मित्र भेटला नसता तर अखेरपर्यंत हाच शिक्का मारीत ते निजधामाला गेले असते. पण एक दिवस बूशे द पॅर्थच्या नशिबानें वारें वदललें व एक मोठी मजेदार गोष्ट घडून आली. डॉक्टरांच्या एका मित्रानें सहज म्हणून बूशे द पॅर्थच्या संग्रहालयाला एक दिवस भेट दिली. तेथून आल्यावर डॉक्टरसाहेबांची स्वारी रस्त्यांत दिसतांच त्यानें सरळ कोट पकडून त्यांना उभें केलें नी त्यांच्यांत पुढील संभाषण झालें.

' डॉक्टर, या बूशे द पॅर्थचें वस्तुसंग्रहालय तुम्ही स्वत: एकदां जाऊन

पाहवें अशी माझी फार फार इच्छा आहे. चला, आत्तांच आपण त्या संग्रहालयाला भेट देऊं ना. तुम्हांला नको असेल तर माझ्यावर मेहेरवानी म्हणून, पण एकदां चलाच तुम्ही आणि पाहा.'

मित्राचा शब्द मोडवेना म्हणून कसेबसे एकदांचें डॉक्टरसाहेव त्या वस्तुसंग्रहालयांत प्रविष्ट झाले.

आपण आंत गेल्यावरोवर एक फेरी चटकन् मारूं व लगेच बाहेर पडूं, अशी त्यांची अपेक्षा होती 'आतां आलोंच आहों, तों एकदां सारें जरा नजरेखाली टाकू, म्हणजे मग तर बूशे द पॅर्थची कल्पना अगदी 'अशक्य', 'निव्वळ मूर्खपणा' म्हणून लोकांना सांगायला आपल्याला, एक चांगलेंच कारण मिळेल, असा विचार करीत स्वारी आंत शिरली. आंत गेल्यावर साऱ्या वस्तूकडे नजर टाकू लागली. पण एकदां पाह्यला लागल्यावरोवर साराच रग पालटला. आश्चर्यचकित होत्साती डॉक्टर-साहेबांची स्वारी साऱ्या गॅलरीभोंवती वारकाईने पाहत पाहत चालू लागली.

'काय आश्चर्य ! मी एखाद्या नव्या जगांत वावरतों आहें असें मला वाटतंय् ! ' डॉक्टरांच्या तोंडून पावलोपावली उद्गार निघू लागले. त्या कुऱ्हाडी, त्या सुऱ्या, त्या हाडांच्या डब्या स्वारीनें काळजीपूर्वक तपासून पाहिल्या. 'अरे, या साऱ्या वस्तु माणसाने नाहीं वनवल्या तर कुणी बनवल्या ? या माणसाने केल्या नाहीत. असे म्हणणारा माणूस आंधळाच असला पाहिजे. एरवी अशक्य आहे असे म्हणणे.' त्यानीं उद्गार काढले.

संग्रहालयांतील साऱ्या वस्तू पाहिल्यावर डॉ. रिगोलो इतके खूष झाले की, बूशे द पॅर्थशी हस्तांदोलन करण्यासाठी त्यांनी आपण होऊन हात पुढे केला, 'महाशय, माफ करा मला. मी इतके दिवस आपल्या बावतीत फार अन्याय केला.' डॉ. रिगोलोंनी अगदी मनमोकळेपणे बशे द् पॅर्थपाशी कबुली दिली व पुढें म्हणाले, 'आतां मला एवढे बोलून स्वस्थ वसून नाही चालायचे ! महाशय, तुमची अश्मयुगाची कल्पना अगदीं वरोवर आहे. तिला विद्वानांची मान्यता मिळवून देणे हे आतां माझें पहिलें काम.'


डॉ. रिगोलो एमिन्सला परत गेल्यावर त्यांनीहि नदीच्या वाळ-

वंटांतील थर तपासायला सुरुवात केली. त्या नादांत ते बाकीच्या साऱ्या गोष्टी विसरले. बूशे द पॅर्थसारखे तेहि अश्मयुगीन अवशेषांचा शोध घेत चोहोंकडे हिंडूं लागले. अश्मयुगीन मानवाच्या कल्पनेनें त्यांना इतकें घेरलें कीं, त्यांच्याकडे येई त्या प्रत्येकाला ते चकमकीच्या दगडासंबंधीं, हाडांसंबंधीं, अश्मयुगीन मानवाच्या जीवनाविषयी सांगू लागले. ज्या युगांत फ्रान्समध्यें हत्ती, गेंडे, वावरत होते, त्याच काळी त्यांच्याबरोबर मानवप्राणी पण कसा वावरत होता, त्याचा पुरावा काय हे सगळ्यांना सांगावे असें त्यांना वाटे.

बूशे द पॅर्थला आतां डॉ. रिगोलोंची जोड मिळाली. तेहि अश्मयुगीन मानवासंबंधीं लिहूं, बोलू लागले. पण त्यांचेहि सारे प्रयत्न फारसे यशस्वी झाले नाहीत. कारण लोकांनाच अजून अश्मयुगीन मानवाची कल्पना पसंत नव्हती. त्याच्या मनात मनुष्य कांशाच्या (Bronze) युगात अस्तित्वांत आला हें इतके ठसून गेले होते की, त्यापेक्षां काही निराळे ऐकायलासुद्धा त्याची तयारी नव्हती.

लोक म्हणत, 'कबूल. या वस्तु माणसानें केलेल्या आहेत, हे एकदम कबूल. पण तुम्हाला तुमच्या त्या अश्मयुगातील माणूस आढळला आहे का कोठे ? नाही ना ? मग कशाला उगीच वाता ? तो माणूस सांपडू द्या, मग आम्ही कबूल करू तुमचें अश्मयुग ! त्या काळी पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या प्राण्याची हाडे मिळतातच ना ? मग तुमच्या म्हणण्याप्रमाणें मनुष्यहि त्या काळी अस्तित्वांत होता असे धरले तर त्याची हाडे नकोत का सांपडायला ! ती हाडे दाखवा आधी, मग पाहूं.'

यावर, बूशे द पॅर्थ त्यांना नेहमी, 'थांवा जरा, दमानें घ्या', असें उत्तर देई. तो म्हणे, 'सांपडेल, तो माणूस पण सांपडेल ! या पाहा त्याच्या किती असंख्यात कृति आम्हांला सांपडल्या आहेत ! यासारख्या मनुष्याने वनविलेल्या वस्तु पाहिल्या की, अश्मयुगांतसुद्धां मनुष्यप्राण्यांची संख्या वरीच असावी अशी नाही का खात्री पटत ? त्यावरून तरी असें वाटू लागते की, एकच काय पण त्या काळच्या माणसाचे कितीतरी सांगाडे सांपडायला पाहिजेत. आणि ते खास सांपडतीलहि.' बूशे द पॅर्थ मोठ्या आत्मविश्वासानें उत्तर देई.



## ३. ही काय निसर्गाची लहर ?

अश्मयुगीन मानव ! केवढें कोडें होऊन वसलें होते त्याचें ! अश्मयुगीन मानव होऊन गेला, असा विश्वास ठेवण्याऐवजीं बूशे द पॅर्थ आणि डॉ. रिगोलो यानी केवळ वर्तमानपत्रांत आपले नाव झळकावें म्हणून ही सारी वनवावनवी केली, असे म्हणणे किती सोपे होते ! अगदी थोडे का होईना, असे लोक होते की त्यांना या दोन्ही गृहस्थांच्या प्रामाणिकपणाविषयी विलकुल शंका नव्हती; तरी त्यांनामुद्धां अशा अश्मयुगीन मानवाची कल्पनाच कशीशी वाटे. खरोखरच असा मनुष्य सापडला तर ? किती लाजिरवाणी होईल ती गोष्ट ! अगदींच ओंगळ कल्पना ! छे, अशा मानवाची कल्पनाच मुळी करणे नको. पण समजा, या दोघांचें म्हणणें खरें ठरलें, तर काय होईल त्याचा अर्थ ? पहिल्यांदा एक गोष्ट कबूल करावी लागेल की, मानवमुद्धां निसर्गातील इतर प्राण्यांसारखाच अखेर एक प्राणी आहे. ' पशु, पक्षी व माणसें यांच्यावर अमल गाजविण्याकरतां म्हणून मुद्दाम मानवाची उत्पत्ति करण्यांत आली ' असे धरून चालावयाचें नाहीं.

एकंदर सर्वच लोकांना अश्मयुगीन मानवाची कल्पना मुळींच सहन होत नव्हती. म्हणून 'देवा, आतां या माणसाचीं हाडें तरी संशोधकांना न सांपडोत' अशी प्रार्थना करीत सर्वांनीं ती कल्पना ताबडतोब डोक्यांतून काढून टाकली.

पण त्यांची ही प्रार्थना देवानें ऐकली नाहीं ! पश्चिम जर्मनींत डुसेल नांवाची एक नदी आहे. ती आपलें पात्र नेहमीच बदलीत आली. सध्यां ती जेथें वाहत आहे तेथें तिचें पूर्वीचें पात्र नव्हतें. तिनें आतां आपला प्रवाह वेगळाच काढला आहे. पण तो काढीत असतां अजूनहि तिचा एक लहानसा प्रवाह सुंदर वनस्थलींतून एका बाजूला चुनखडीचे सुळके असलेल्या घळींतून वाहत येतो.

इसवी सन १८५६ मध्यें 'नीआंडरथाल'च्या या घळींत कांहीं मजूर चुनखडी खणून काढीत होते. खोदतां खोदतां, प्रवाहाच्या जवळ-जवळ साठ फुटांवर त्यांना एक लहानशी गुहा आढळली. या गुहेंत किती तरी फूट उंचीचा गाळ सांठून राहिला आहे, असें त्यांना आढळून आलें. तेव्हां दोन मजूर तो गाळ उपसण्याच्या कामावर लावण्यांत आले.

गाळ काढून टाकण्याचें काम जोरांत सुरू असतांना गुहेच्या तोंडाशींच चार पांच फूट खाली गेल्यावर त्या मजुरांना माणसाच्या कवटीचा वरचा भाग सांपडला. त्या कवटीला चेहेऱ्याचा कसलाच आकार नव्हता कीं जवडाहि नव्हता. कोणत्या बरें प्राण्याची ही कवटी असावी ? याविषयीं त्याना कांहीच कल्पना करतां येईना. शिवाय असल्या हाडावर वेळ घालवायला त्यांच्याजवळ वेळ कुठे होता ? इतर गाळावरोबरच त्यांनीं ती कवटीहि बाहेर फेकली व ते कामाला लागले. थोडयाच वेळानें त्यांना आणखीहि कांही हाडे सांपडली. डोक्याची कवटी सांपडली होती त्याच पातळीवर हीहि हाडें गाळांत रुतलेली होती. ती पण त्यांनी तशींच बाहेर काढून फेंकून दिली.

रात्रीं, आपसांत गप्पा करीत असतां त्या दोघां मजुरांनीं आज आपल्याला हाडें सांपडल्याची गोष्ट सोबत्यांना सांगितली. नंतर ती तशीच पसरत पसरत त्या खाणीच्या मालकाच्या कानांवर गेली.

लगेच 'अशीं कांहीं हाडें सांपडलीं तर तीं जपून ठेवा' असा माल-काचा हुकूम सुटला.

त्या हुकुमानुसार, दुसऱ्या दिवशीं मजुरांनीं मालकाला एक डोक्याच्या कवटीचा भाग व कांहीं मोठी हाडें मिळून एकंदर १४ हाडें आणून दिली. खाणमालकानें त्यांच्याकडे कांही वेळ पाहिल्यावर खांदे उडवल्यासारखें करून 'कोणाची बुवा ही हाडें?' अशी प्रश्नार्थक मुद्रा केली. त्याला ती हाडें कोणत्या प्राण्याची असावी याबद्दल कांहीच कल्पना करतां येईना.

सुदैवानें शेजारच्या एल्वरफेल्ड गांवात असे एक गृहस्थ राहत होते की, त्यांना सर्व प्रकारच्या गुहा आणि गुहात सांपडणाऱ्या साऱ्या गोष्टी, यांविषयी अत्यंत जिज्ञासा होती. चुनखडी खोदीत असलेल्या माणसावर त्यांचा डोळा होताच. इतक्यात गुहेत सापडलेल्या हाडाची गोष्ट त्याच्या कानी गेली, त्याबरोबर लगेच ते आले व त्यानी तीं हाडे पाह्यला मागितली. ते गृहस्थ या बाबतीत तज्ज्ञ असल्याकारणानें काही तरी नेहमीपेक्षा विलक्षण, वेगळे आपल्या हाती आले आहे हे ती हाडे पाहतांच त्याच्या लक्षांत आले. विशेषत: डोक्याची कवटी पाहून तर ते फारच खुषीत आले. त्या कवटीचा कपाळाचा आकार बराच खाली आणि उतरता असा होता. डोळ्याच्या खोवण्यावर, भिवयांच्या जागी, चागल्याच मोठमोठ्या भिवयाच्या हाडांच्या कडा होत्या आणि विशेष हे की, त्या उच कडा कपाळाच्या या बाजूपासून थेट दुसऱ्या बाजूपर्यंत अगदी अखंड होत्या. तो विचार करू लागला : 'कोणता बरं असा प्राणी आहे की त्याच्या भिवयाच्या जागी चागला उंचवटा असून तो कपाळाच्या या बाजूपासून थेट त्या बाजूपर्यंत जातो?'

एल्वरफेल्डहून आलेल्या त्या गृहस्थांनीं खाणमालकाजवळ गोष्ट काढली. 'हें पाहा, तुमची हरकत नसेल तर मी ही हाडे बॉन शहरी असलेल्या प्रोफेसर शाफ्हाउसेनकडे पाठवतों. तो हाडाचा तज्ज्ञ आहे, त्यांना ही हाडें पाहून खास आनद होईल. एवढेच नव्हे, ती कोणाची आहेत हे पण ते सागू शकतील.'

त्या गृहस्थाचा अंदाज खरा ठरला. प्रोफेसर शाफ्हाउसेनना ती हाडें पाहून खूपच आनंद झाला. 'आपल्या साऱ्या आयुष्यांत इतकी मजेदार हाडे आपण कधी पाहिली नव्हती' असे त्यानी उद्गार काढले. त्यांनी त्या हाडांची काळजीपूर्वक तपासणी सुरू केली. शक्य त्या निरनिराळ्या दृष्टिकोनांतून ते त्यांच्याकडे पाहत होते. अखेर त्यांनी एक लेखी फर्मानच

काढलें.

'ही हाडे दुसऱ्या कोणाचीं नसून माणसाचीच आहेत. पण हा मानव फार– फार– पूर्वीचा, अनादि कालांतील असावा.'

'काय माणसाची ? मग तें कपाळ ? आणि भिवयाच्या जागीं वाहेर उचलून आल्यासारख्या उंचच्या उंच कपाळावर थेट आरपार अशा हाडाच्या कडा, त्याचें काय ? आणि त्या पशूसारख्या दिसणाऱ्या फांसळ्या? त्यांचे काय ?'

'कांहीं झालें तरी ती माणसाची हाडें आहेत.'

ही वातमी वाहेर पसरल्यावरोबर तिचा लोकांत कमालीचा गाजा-वाजा झाला ! आपला पूर्वज दिसायला इतका बेढब होता हें लोकांना मुळी खरेच वाटेना.

एका शास्त्रज्ञांनी तर अखेर असें सुचविलें कीं, ही जी नीआंडर-थालला कवटी सांपडली, ती वहुतकरून एकांतवासांत राहणाऱ्या एखाद्या वेड्याची असावी. संसारांतील मोहापासून दूर पळून त्यानें त्या गुहेंत स्वत.ला कोंडून घेतलेले असावे. दुसऱ्या एकानें ती कवटी रशियांतील एखाद्या कोझॅकची असावी, असे सुचविले. अशी कोणतीहि कल्पना केली तरी लोक चकित होऊन पाहत राहत. अखेरीला एक फार मोठे विद्वान् शास्त्रज्ञ पुढे सरसावले. त्यानी ती कवटी एखाद्या वेड्याची असावी असा निर्णय दिला. तेव्हा लोकांना वरेच हायसे वाटले.

'अरे हो ! एखाद्या वेड्याचीच असली पाहिजे ती अशी कवटी !' लोक सुटकारा पावल्यासारखे होऊन एकमेकांना आनंदानें सांगू लागले. त्याच्या भिवयाच्या जागी उंचच्या उंच अशा आरपार अखंड कडा दिसतात त्या त्यामुळेच. त्या माणसाचा मेंदू रोगी होता, म्हणून अशा उंच कडा दिसतात.

या सर्वांना इंग्लंडमधल्या एका विद्वानानें गप्प केलें. ही कवटी वेड्याची समजणे म्हणजे मूर्खपणा आहे. त्यानें स्पष्ट शब्दांत साऱ्यांनाच ठणकावले. विनशेपटाच्या माकडांना भिवयांच्या जागी अशा उंच कडा असतात. म्हणून त्या सर्वांचा मेंदू नासला आहे असें तुम्ही समजणार कीं काय ?

इंग्रज विद्वानांच्या या विधानाने लोकांनीं जरा चमकून कच खाल्ली.

पण ती किती क्षणभरच. त्यांच्या मतें कोणीं एका विद्वानानें भला भक्कम पुरावा दाखवून जरी एखादें विधान केलें म्हणून काय झालें ? आतांपर्यंत ते जें सारें शिकले होते तें सारे लगेच चुकीचें होतें, असें मानायचें कीं काय ?

'तें कांहीं नाहीं. या एका कवटीवरून कांहीं निर्णायक सांगतां येणें अशक्य.' त्यांनीं उत्तर दिलें. 'मानवजातींत अशा भुवयांच्या उंच कडा असलेली अशी एक जात होऊन गेली, असें विधान एक कवटी सांपडल्या-बरोबर करण्याचा तुम्हांला कांहींएक अधिकार नाहीं. अशाच, भिवयांच्या उंच कडा असलेले आणखी कांहीं तरी अवशेष तुम्हांला सांपडले पाहिजेत. तोंपर्यंत उगीचच असें ठाम विधान करूं नका.' त्यांनीं प्रत्युत्तर दिलें.

या प्रत्युत्तरानंतर पुष्कळांना बरें वाटलें. आंतल्या आंत, आणखी असें कांहीं न सांपडो अशी हे इच्छा करीत होते. ही जी नीआंडरथालला कवटी मिळाली ती एक निसर्गाची लहरी चमत्कृति होय असें ठरलें तर काय छान होईल ! ते मनांतल्या मनांत आपली आशा फुलवीत बसले.



# ४. ' नको असलेला पूर्वज ठिय्याच देऊन बसला '

प्रोफेसर शाफ्हाउसेननें नीआंडरथालच्या गुहेंतील माणसाचीं हाडें फार—फार प्राचीन काळचीं असल्याचें विधान केलें होतें. पण फार-फार प्राचीन काळची म्हणजे किती जुनी ? हा प्रश्नच होता.

त्याचे उत्तर मात्र कोणाला माहीत नव्हतें. नीआंडरथालच्या गुहेंत सांपडलेली हाडे ही धातुपूर्व युगांतील मानवाची तर नसतील ?

हें शोधून काढणें जरूर होतें; व तें काम ह्यू फॉकनर नांवाच्या इंग्रज शास्त्रज्ञानें अंगावर घेतलें होतें. त्याला याबाबतींत कमालीची जिज्ञासा तर होतीच, पण त्याचा या विषयांतील अभ्यास पण फार दांडगा होता. पृथ्वीच्या पाठीवर आतां जे प्राणी उरलेलेहि नाहींत, अशा प्राण्यांच्या हाडांचा त्याचा अभ्यास इतका होता कीं, त्या बाबतीत त्याचा हात धरणारा जगांत दुसरा कोणी नव्हता असें म्हटलें तरी चालेल. नुसता एक दांत हातांत घेऊन तो कोणत्या प्राण्याचा दांत हें तो चटकन् सांगू शके.

त्याच्या पॅरिसला पुष्कळ खेपा होत. असाच एकदां तो पॅरिसला आला असतां त्याची आणि बूशे द पॅर्थची गांठ पडली होती. बूशे द पॅर्थनें

त्याला त्या वेळीं आपल्या पुस्तकाची एक प्रत पण दिली होती. मात्र ह्यू फॉकनरने बूशे द पॅर्थच्या प्रतिपादनाकडे आतांपावेतों फारसें लक्ष दिले नव्हते. एक दिवस असा उजाडला कीं, हाडांचा शोध घेत घेत प्रवास करीत असतां तो ॲबेबीला आला. त्या गांवाचे नांव कळताच, आलोंच आहोंत तो बूशे द पॅर्थचे संग्रहालयहि पाहून घ्यावें, या विचाराने तो संग्रहालयांत शिरला. तेथल्या साऱ्या वस्तु पाहिल्यावर मात्र त्याला अक्षरशः आश्चर्याचा एक धक्काच वसला.

तावडतोव त्यानें इंग्लंडमधल्या आपल्या मित्रांना पत्र लिहिलें. त्यांत त्याने 'तुम्ही ॲबेबीला जरूर जरूर या. तुमची भेट खूपच सार्थकी लागेल, तरी जरूर या' असे लिहिले होते.

त्याच्या पत्रासरशी त्याचे दोघे मित्र इंग्लिश खाडी ओलांडून ॲबेबीला येऊन धडकले. बूशे द पॅर्थचे संग्रहालय पाहत असतां एका तासाच्या अवधीतच त्या दोघांना व फॉकनरला स्वतःलाहि आपली मते आता वदलावी लागणार हें अगदी उघड स्पष्ट दिसले. इतरांप्रमाणे आतां-पावेतो त्याचाहि असा विश्वास होता की, पृथ्वी व तीवरचे प्राणी जरी फार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असले तरी मनुष्य हा अगदी शेवटी, वराच अलीकडे अस्तित्वांत आला. अगदी काल आल्यासारखा आला. पण या सग्रहालयातील प्राचीन अवशेषांवरून मानवाच्या अस्तित्वाचा काळ आता इतका पाठीमागें ओढला गेला की, मानव केव्हां अस्तित्वांत आला असेल याची कोणासच अटकळ वांधतां येईना.

विचार करतां करतां साहजिकच त्यांच्या विचारानीं नीआंडरथाल माणसाकडे झेप घेतली. बूशे द पॅर्थच्या संग्रहालयांत हे जे चकमकीचे दगड आणि दगडाच्या वस्तु दिसताहेत, त्या या माणसाने तर केल्या नसतील ? त्यांच्या डोक्यांत कल्पना चमकून गेली. असें जर असेल तर पूर्वीं, फार प्राचीन काळी, अनादि काळी, जे सस्तन प्राणी वावरत होते व आतां जे नामशेष झाले आहेत, त्याच्यावरोवर तो माणूस – म्हणजे कपाळाच्या आरपार भुवयाच्या जागी उचवटयाची कडा असलेला माणूस – त्या प्राण्यांच्या वरोवरच तर राहत नसेल ?

हे सिद्ध व्हायचे तर एकच मार्ग होता. तो म्हणजे नीआंडरथालच्या गुहेंत ज्या तऱ्हेचा हाडांचा सांगाडा सांपडला तसा सांपडणे. तोहि, त्या

काळच्या म्हणजे आतां नामशेष झालेल्या प्राण्यांच्या हाडांवरोबर ! म्हणजे मात्र निश्चित असें म्हणतां येईल की, ज्या अर्थी हे दोन्ही सांगाडे एकाच खोलीवर एकाच पातळीवर सांपडले, त्या अर्थी ज्या वेळी ते प्राणी राहत होते, त्याच वेळी असा माणूस पण पृथ्वीवर राहत होता, याचा हा पाहा निःसशय पुरावा !


पण हे कोणी तरी करायला पाहिजे होतें. करील का कोणी हे ? घेईल का असा शोध ?

आनंदाची गोष्ट म्हणजे अशा संशोधकांची कधींच उणीव पडली नाही. कितीतरी लोक ह्या शोधाच्या मागे लागले व प्रयत्न करू लागले. कितीतरी गुहा खोदून पाह्यल्या गेल्या. पण कांहीच हाती लागेना. वर्षा-मागून वर्षे लोटत गेली, पण भुवयाच्या उच कडा असलेली कवटी-सांगाडा कोणालाच मिळाला नाही.

असा सांगाडा न सांपडल्यानें खरें बोलायचे तर पुष्कळ लोकांना आनंदच झाला. कारण त्यामुळे नीआंडरथालमध्ये सांपडलेली माणसाची कवटी म्हणजे एक केवळ निसर्गाच्या लहरी निर्मितीचा खेळ होता असें म्हणायला जागा झाली. जवळजवळ तीस वर्षे लोटली, ही कल्पना पुढे आल्याला. पण कोणालाच कांही सापडले नाही. तेव्हां विरुद्ध बाजूचे लोक फारच आनंदून गेले. 'तरी आम्ही सांगत होतों तुम्हांला !' ते फिरून फिरून म्हणू लागले. पण एवढ्यांत अशी एक घटना घडली की, त्यांच्या शिडांतील सारा वाराच काढून घेतल्यासारखे झाले.

बेल्जममध्ये काउंट ड् वोफर्टची स्पाय (Spy) जिल्ह्यांत एक जहागीर होती. त्या जहागिरीतील जमिनीवर एक लहानशी गुहा होती. त्या गुहेकडे मधून मधून लोकांचे लक्ष वेधले जाई. त्या गुहेच्या अंवतीभोवती आंत वऱ्याच लोकांनी खोदून पाहिलेले होते. त्या खोदकामांत चकमकीच्या, दगडावर काम केलेलें आढळून आले होते, शिवाय हाडेहि सापडली होती. काउंटसाहेब मनाने मोठे दिलदार होते. त्यानी असल्या कामाला कधींच हरकत न घेतां सदैव आनंदाने परवानगी दिली. १८८५ मध्यें दोघां शास्त्रज्ञांनी त्या गुहेत खोदायची परवानगी मागितली. काउट साहेबांनी त्याना तावडतोब रुकार दिला.

खरें सांगायचें तर मार्से ड् पिट आणि मॅक्स लोहेस्ट या दोघांहि



शास्त्रज्ञांचा विचार गुहेत जाऊन खोदायचा कधींच नव्हता. त्या गुहेच्या बाहेर जी काय माती उकरलेली होती त्यांतच त्यांना पाहवयाचें होतें. कारण त्या गुहेच्या समोरच जो एक प्रशस्त उंचवटा होता, त्यावरच माणसांचा बराच वावर असला पाहिजे अशी शास्त्रज्ञांची जवळजवळ खात्री होती. म्हणून ते त्या मातीचाच शोध घेणार होते. हा उंचवटा गुहेच्या आंतील सपाट जमिनीपेक्षां किती तरी उंचावर होता. इतका की, गुहेच्या आत शिरायचे म्हटले की बरेच खालीं जावे लागे, तेव्हां कोठें गुहेंत शिरतां येई. 'गुहेसमोर इतका उंच उंचवटा असावयाचें कारण म्हणजे बहुधा गुहेच्या समोरच सगळी घाण, कचरा सांठवला गेला असेल, तो सांचत वर चढत चढत उंचवटा झाला असावा.' असे त्यांना नेहमीं वाटे.

या दोघां शास्त्रज्ञांनी या पूर्वींहि खोदून शोध घेण्याचें काम केलें होतें. त्यामुळें प्राचीन काळचीं माणसें आतांच्या लोकांसारखीं स्वच्छतेच्या बाबतींत इतकीं कांटेकोर नव्हतीं हें त्यांना अनुभवानें माहीत झालें होतें. एवढेंच काय, अनादि काळी कदाचित् लोक झाडीतसुद्धां नसतील किंवा घाण, कचरा एकदां फेंकला तर कधीं उचलण्याची तसदीहि घेत नसतील. अशा परिस्थितीत बहुधा सारा कचरा जेथें फेंकला असेल तेथें तसाच राही. पिढयान् पिढया तो ढीग तसाच सांचत राही. एवढेंच नव्हे, तर शतकानुशतकें त्या ढिगावरच लोक खुशाल राहत. त्या शास्त्रज्ञांच्या समजुतीप्रमाणें स्पायमधील गुहेपुढचा तो उंचवटा म्हणजे एक प्रकारचा असाच कचऱ्याचा ढीग होता. त्यामुळेंच हे त्या उंचवटयाकडे आकर्षित झाले होते. न जाणो, काय काय गोष्टी तेथे सांपडतील नि काय काय नाहीं, असा त्यांचा कयास होता.

अत्यंत काळजीपूर्वक त्यांनी त्या उंचवटयांत एक खड्डा खणण्यास सुरुवात केली.

त्या उंचवटयाच्या वरच्या थरांत कांही सांपडणार नाही अशी त्यांची खात्रीच होती. कारण त्या गुहेत किती तरी काळ मानववस्ती झालीच नव्हती. त्याना वाटले होतें त्याप्रमाणें मात्र वरचा थर माणसानें टाकलेल्या कचऱ्याचा नव्हता. वरच्या खडकातून सारखी बारीक बारीक चुनखडी पडत गेल्याने तो ढीग साचला होता. त्यात वाऱ्याने उडून आलेली खूप माती पण मिसळली होती. ते जसजसे खाली चालले, तसतसे त्याना असें आढळून आलें की, उंचवटयाचा हा वरचा रिकामा वाटणारा थरसुद्धां त्यांना पुष्कळच इतिहास सागतो आहे. कारण, वरचावरचा थर म्हटला तरी त्याची खोली ९ फूट भरत होती. गुहानिवासी मानवाने अगदी अखेरचें पाऊल येथें टाकल्यालासुद्धां लाखों वर्षे उलटलीं असावी.

धीमेपणानें खोदीत खोदीत त्यांनी वरचा ९ फुटांचा थर खोदला.

त्याखालच्या थरावर मात्र त्यांच्या कल्पनेप्रमाणें प्राचीन जीवनाचे अवशेष त्यांना दिसू लागले. मॅमथ नांवाच्या हत्तीसारख्या प्रचंड प्राण्याची हाडें मिळालीं. हरिणांचीं हाडें मिळालीं. लांब पण अरुंद असे चकमकीचे मानव-कृत दगड मिळाले. वा:, म्हणजे या वेळीं मनुष्याचे अस्तित्व होतें म्हणायचें! पण हें सारें किती काळापूर्वीं, त्याचा मात्र कांहीच अंदाज करतां येत नव्हता.

आतां ते खालचाहि थर खणू लागले. गडद लाल रंगाचा होता तो थर! आणि कमालीचा टणक! खोदायचें म्हणजे फारच कठीण काम होतें. पण संशोधनाच्या दृष्टीनें हा मधला थर ( Chock ) म्हणजे अनमोल खजिना होता. दुसऱ्या थरावर सापडले त्यापेक्षां कितीतरी चकमकीचे दगड येथे मिळत होते. किंवहुना हजारोंनी सांपडत होते, असें म्हटले तरी चालेल. पण हेच चकमकीचे दगड दुसऱ्या थरावर सांपडलेल्या दगडापेक्षां फारच ओबडधोबड कारागिरीचे होते. त्याचा आकार पण वेगळा होता. याच थरावर कांही कोळशाचे तुकडे मिळाले. तसेच हस्ति-दंताचे तुकडे, हाडांपासून तयार केलेल्या बाणांची टोके, कांही मातीच्या भाड्यांचे तुकडे, हे पण या थरावर मिळत होते.

याशिवाय किती तरी जनावराचीं हाडें पण मिळत होतीं. किती मजेची होती ती हाडे! त्यांतील थोडी हाडे पृथ्वीवर अजूनहि हिंडणाऱ्या जनावरांची होती. पण वरीचशी हाडें सध्यां भूतलावर अस्तित्वांत नसलेल्या जनावरांचीच होती. मातीशी मिळून, अगदी घट्ट रुतून बसल्याकारणानें त्या मातीचा व त्यांचा एक घट्ट असा पापुद्राच तयार झाला होता. तो इतका घट्ट होता की, त्या पापुद्र्याच्या थराखाली काय आहे हें सहजासहजीं कळत नव्हतें.

काय बरें होते त्या थराखाली?

मोठ्या कुतूहलानें हे शास्त्रज्ञ खणीतच राहिले. पण त्यांच्या नशिबीं निराशाच आली. कारण खालीं फारसें कांही दिसून आले नाहीं. हा मातीचा थर पिवळ्या रंगाचा होता. त्यांत कांहीच सापडले नाही. त्यांनी आणखी सहा इंच खणलें. त्या पिवळ्या मातीच्या थराच्या ते जवळजवळ तळाशीं आले. तेव्हां मात्र जीवनाच्या खाणाखुणा त्याना फिरून सांपडूं लागल्या. जळलेल्या लांकडांच्या राखेचा एक लांबलचक पट्टा त्यांना आढळून आला. हा पिवळ्या मातीचा थर उंचवट्यावर जमत असतां, त्या उंचवट्यावर

किंवा गुहेंत बहुधा कोणीच राहिलेलें नसावें.

मग काय इथेंच सारें संपलें म्हणायचें कीं काय? खणीत खणीत, ते वरून पांचव्या थरावर आले. तोहि खोदायला त्यांनीं सुरुवात केली. मातीच्या तिसऱ्या थरावर सांपडलीं तशीं नामशेष झालेल्या जनावरांचीं आणखी हाडें येथें मिळू लागलीं. आणि त्यानंतर त्यांनीं असें कांहीं पाहिलें की, क्षणभर आपण स्वप्नांत तर नाहीं ना, असा त्यांना संशय आला. त्यांनीं स्वतःला चिमटा घेऊन पाहिलें. त्यांच्यापुढें खरोखरीच हाडें पडलीं होतीं. पण आतांपावेतों मिळालेल्या जनावरांच्या हाडांपेक्षां तीं कितीतरी वेगळीं होतीं. त्यांच्या जाणत्या नजरेनें त्या हाडांचा अर्थ केव्हांच टिपला होता. ही माणसांची हाडें – 'माणसांची हाडे' असा त्यांच्या डोळ्यांनी केव्हांच पुकारा केला होता.

मानवी सांगाड्याचा चांगलाच मोठा अवशेष त्यांच्यासमोर पडलेला होता. तो सांगाडा जरा एका बाजूला कललेला होता. सांगाड्याचा हात खालच्या जबड्याला लागलेला दिसत होता. तेथून जवळच काहीं अंतरावर मनुष्याचा एक दुसरा सांगाडा पण दिसत होता.

आनंदातिशयाने थरथरतच त्यांनीं पहिल्या सांगाड्याची कवटी उचलली. चांगली जाडजूड व जड होती ती कवटी! कपाळाची पट्टी फारच अरुंद असून ती डोक्यांतून एकदम खाली घसरलेली, चांगलीच उतारावर अशी होती. डोळ्याच्या खोबण्यांवर, भिवयांच्या जागी, वर उचलून आलेल्या हाडांची कडा असून ती कवटीच्या या बाजूपासून त्या बाजूपर्यंत अखंड पसरलेली होती.

पिट आणि लोहेस्ट यांनी एकमेकांकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकला. कोणत्या जातीच्या माणसाचा तो सांगाडा आहे, हें त्यांनीं केव्हांच ओळखलें होतें. नीआंडरथालच्या गुहेंत हाच दोस्त त्यांना भेटला होता. जुनाच दोस्त होता तो.

या त्यांच्या संशोधनाने एक फार मोठा प्रश्न कायमचा निकालांत निघाला. नीआंडरथालला सांपडलेली माणसाची कवटी वेड्या माणसाची नव्हती किंवा ती एक निसर्गाची लहरी चमत्कृतीहि नव्हती. नीआंडर-थालला सांपडलेली आणि स्पायला (Spy) सांपडलेलीं हाडें मनुष्याचींच – मानवाचींच. पण जरा निराळ्या जातीच्या मानवाचीं

एवढेंच. अश्मयुगांतील मानव होता तो. फॉकनर आणि त्याचे दोस्त ज्या मानवाला पाहण्याकरितां आतुर होऊन सगळीकडे धुंडीत होते तीच मानवजात होती ही.

या शोधानंतर इतके रकानेच्या रकाने लिहिले गेले कीं, शाईचा नुसता समुद्र सांडला. किती तरी भाष्यें झालीं या शोधावर! सारे लोक कितीतरी काळ बोलतच होते. मोठा कठीण प्रसंग ओढवला होता. 'साऱ्या चराचर सृष्टीवर अधिकार गाजवायला परमेश्वरानें सध्यां आपण पाहत असलेल्या मानवजातीला उत्पन्न केलें या समजुतीला केवढा धक्का बसला होता! आजच्या घटकेला आपण पाहतों तो मानवप्राणी येण्यापूर्वी थोडासा वेगळ्या तऱ्हेचा मानवप्राणी भूतलावर वास करीत होता, हें आतां अगदीं स्पष्ट झालें होतें. पण त्याला आपला पूर्वज म्हणून कबूल करावयाचें! किती लाजिरवाणी वस्तुस्थिति होती ही! खासच असा पूर्वज आपण होऊन कोणीच निवडला नसता.

छेः, शास्त्रज्ञ या पूर्वजाविषयीं किती चित्रविचित्र गोष्टी बोलत होते! त्यांच्या मतें त्याला नीट सरळ ताठ उभें सुद्धां राहतां येत नसावें. तो गुडघ्यांत जरासा वांकलेला असावा, असें शास्त्रज्ञांचें म्हणणें होतें. आणि विनशेपटाच्या माणसासारखें त्याचें तें कपाळ, डोकें, आणि चेहेरा! सगळेंचाच नको असलेल्या गोष्टी होत्या. कोणालाच हा आमचा पूर्वज असा होता असें म्हणायला आवडणार नव्हतें. सत्य प्रकाशांत आलें, पण किती कठोर! किती विद्रूप! नीआंडरथालच्या गुहेंत ती कवटी सांपडलीच नसती तर? आपला पूर्वज असा होता असें म्हणण्याची कधींच पाळी आली नसती.



# ५. हरवलेला दुवा मिळतो

एवढें खरे होतें की, या संशोधनानंतर मागें जाणें शक्य नव्हतें. प्रथम नीआंडरथालला असा आदि-आदिमानव सांपडून प्रकाशांत आला आणि स्पायला (Spy) मिळालेल्या हाडांनंतर मानवी प्राण्याच्या इतिहासांत त्याचे स्थान निश्चित होऊन बसलें. नुसते हात झटकून अश्मयुगाची कल्पना बाजूस सारायचे हे दिवस आतां गेले. मनुष्यप्राणी पृथ्वीवर केव्हां अवतीर्ण झाला यासंबंधी घडाघडा वर्ष आणि दिवस सांगायचे ते दिवस पण पार संपले.

आतांपर्यंत झालेल्या संशोधनानंतर मानवप्राणी सर्वांमागून पृथ्वीवर एकाकी अवतीर्ण झाला, ही कल्पना बरोबर नाहीं, असें पुष्कळ विज्ञान शास्त्रज्ञांना आतां कळून चुकले होतें. उलट, नीआंडरथालला सांपडलेल्या माणसाच्याहि हजारों वर्षे आधीपासून बिनशेपटीच्या माकडासारख्या पूर्वजापासून मनुष्यप्राणी हळुहळू विकसित होत सध्यांच्या पायरीला येऊन पोहोंचला असावा, अशी त्यांची खात्री पटू लागली.

त्या अदृष्ट, गूढावगुंठित प्राण्याची आकृति त्यांच्या अंत:चक्षूसमोर नेहमी उभी राही. त्यावेळीं तो धड विनशेपटाच्या माकडासारखा नाहीं की, आतांच्या मनुष्याप्रमाणेंहि नाही, असें मधलें कांहीसें त्याचें स्वरूप होतें.

त्या मानवाबद्दल विद्वानांत कितीतरी खल चाले. ‘ हरवलेला दुवा ’ असें ते त्याला संबोधीत. कारण मानवप्राणी इतर प्राण्यांबरोबर पृथ्वीवर आला तेव्हांपासून आतांपर्यंतच्या त्याच्या उत्क्रान्त स्वरूपाची एक सांखळी त्यांच्या मनापुढें नेहमीं उभी राही. त्यांतील शेवटचा दुवा म्हणजे आज घटकेला दिसणारा मनुष्यप्राणी. मागें जाऊं लागलें की, मध्येंच कोठे तरी नीआंडरथालचा माणूस येई. त्याच्याहि मागें जाऊन अगदी पहिला दुवा शोधू लागले की, तो आजवर न सांपडलेला असा मानव समोर येई. तो मानव धड माकडासारखा नाहीं की अलीकडच्या मनुष्यप्राण्यासारखाहि नाहीं, असें त्याचें मधलेंच स्वरूप होतें.

या न सांपडलेल्या पहिल्या दुव्याबद्दल जे कोणी बोलत, त्यांत युजिन डचुबुआ ( Eugene Dubois ) चे नांव नेहमीं ऐकू येई. तो एक तरुण डच शस्त्रविद्याविशारद ( Surgeon ) होता. पण मनुष्यप्राण्याच्या या हरवलेल्या दुव्यासंबंधी त्याला कमालीची जिज्ञासा होती. इतकेच नव्हे त्याच्यासंबंधी कांही कल्पना ठामपणें त्याच्या मनांत घर करून बसलेल्या होत्या. पण त्याबद्दल नुसते बोलून किंवा विचार करून कांही सिद्ध होणार नाहीं, याची त्याला पुरी जाणीव होती. अखेर एक वेळ अशी आली कीं, या शस्त्रवैद्याला राहवेना. कोठे तरी जाऊन त्या हरवलेल्या दुव्याचा शोध आपण घेतलाच पाहिजे, असें त्याच्या मनाने घेतलें. आपण कोठें गेलों असता माकडाच्या जवळजवळ असलेला हा पूर्वज सांपडेल, याबद्दल त्यानें कांही आडाखे बांधले होते.

भारताच्या किनाऱ्यापासून दूर असा जो कांही मोठमोठ्या बेटांचा समूह आहे तेथे हा माणूस सांपडणार अशी त्याची अटकळ होती. त्याचीं कारणे तो अशा रीतीने नेहमी पुढे माडी – तो म्हणे :

‘ या बेटांवरच मनुष्यासारख्या दोन प्रकारच्या माकडांची वस्ती आढळते. त्यातील ‘ गिबन ’ ( Gibbon ) हा जावा, सुमात्रा आणि बोर्निओ या बेटांत आढळतो. शेवटच्या दोन बेटांत ओरँग (Orang)ची

वस्ती आढळते. तेव्हां या दोन्ही जातीची माकडें जेथें वरीच आहेत, तेथेंच कोठेंतरी जवळपास मला तो 'हरवलेला दुवा' सांपडण्याचा संभव अधिक नाहीं का ? '

शिवाय ही बेटें निश्चित करायचें त्याचें आणखीहि एक कारण होते. जावामध्यें नदीच्या पात्रांत खूप जनावरांचीं हाडें मिळत असल्याचें त्यानें वाचलें होते. 'न जाणो, अशा हाडांतच केव्हांतरी कुठेतरी, तो दुवा सांपडून जायचा' असा तो विचार करी.

त्यानें आपला बेत जेव्हां सर्वांना जाहीर केला, तेव्हां त्याच्या मित्रांना त्याचा सर्वच विचार शुद्ध वेडेपणाचा – चक्रमपणाचा वाटला. त्या सर्वांनी त्याला मोडता घालून रोखायचा प्रयत्न केला. पण तो कांहीं केल्या कोणाचेंच ऐकेना.

'छेः, माझी कांही काळजी करूं नका.' तो त्यांना सागे. अखेर त्यानें आपला हॉलंडमधील नोकरीधंदा सोडून डच सेनेच्या एका वैद्यक-तुकडीत आपले नांव नोदविले. बोटीतून तो सुमात्रा बेटाकडे निघाला. तेव्हां निरोप घेतांना 'मी तो हरवलेला दुवा आणायला जातों आहे' असे सागून त्याने सर्वांचा निरोप घेतला. तेव्हां सन १८८७ साल चालू होतें.

एखादी गोष्ट मनांत ठरविणे गोष्ट वेगळी आणि ती प्रत्यक्ष कृतीत आणणें ही गोष्ट वेगळी. सैन्यांत नाव दाखल करून सुमात्रांत गेल्यावर सैनिकी डॉक्टरांना खणून पाहण्यासारखी कामे करावयाला फारसा वेळ मिळत नाही, असें त्याला आढळून आले. दोन वर्षे तेथें राहूनहि थोड्याशा गुहांचें संशोधन करण्यापलीकडे त्याला कांहीच करता आलें नाही. 'आपण येथे येण्यांत मूर्खपणा तर केला नाही ?' त्याच्या मनाला वारवार प्रश्न पडू लागला. एवढ्यांतच त्याला मुख्य कचेरीतून बोलावणें आले. 'जावामध्ये नदीच्या पात्रांतून सांपडणाऱ्या हाडांबद्दल डच सरकारला अधिक माहिती पाहिजे आहे, तेव्हां तें काम तुम्ही अंगावर घ्याल का ?' अशी त्याला विचारणा करण्यांत आली.

तो अशा संधीची वाटच पाहत होता. ती आल्याबरोवर त्याला आनंद झाला. 'या हाडांचीं तर मी रात्रंदिवस स्वप्नें पाहत आहें' असें म्हणून त्यानें ताबडतोब ती संधि स्वीकारली.

त्याला सोलो नदीवर पाठविण्यांत आलें. त्या नदीकांठीं येतांच डयुबुआ ( Dubois ) नें स्वप्नांत सुद्धां कधीं कल्पना केली नसेल इतकें विलोभनीय दृश्य त्याच्या नजरेस पडलें. तो सोलो नदीत उभा होता. दोन्ही बाजूला खूप उंच उंच असा नदीचा कांठ होता. त्या कांठांतील गाळरेतीत असणाऱ्या सॅंडस्टोनमधून जागोजाग हाडें बाहेर डोकावत होतीं. त्याच्या आनंदाला उकळया फुटल्या. एक क्षण आपण स्वर्गात तर नाहीना असें त्याला वाटू लागले. वर्षानुवर्षे पुरेल इतकें त्याला आवडणारे काम त्याच्या अगदी समोर येऊन ठाकले होतें. ते उन्हाळयाचे दिवस होते. त्या दिवसात नदीचा प्रवाह दोन्ही कांठांपासून जवळ जवळ ४५ फूट खाली जाऊन वाहत असे. हें सारे सशोधन करून पाह्यलाच पाहिजे एवढेच नव्हे, आणखी किती तरी ! किती छान ? किती आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या साहस–चमत्कृतीतून मी जाईन ! न जाणो योगायोगच असला तर आतांपर्यंत जो दुवा शोधण्याकरितां मी धडपडत होतो तो हरवलेला दुवाच येथें मिळून जावयाचा. कोणी सांगावे !

त्याने खोदकामाला सुरुवात केली. दिवसामागून दिवस, महिन्या-मागून महिने तो सारखा खणीतच होता. चागली ४५ फूट खोली त्याला शोधून पाह्यची होती. तो खणीतच राहिला. १८९१च्या सुमारास कांठ खणतां खणता, तो नदीचा प्रवाह वाहत होता त्या सपाटीला आला. तेथें आल्यावर तर त्याचा आनंद गगनांत मावेना. आतापर्यंत पाहिले ते अवशेष कांहीच नाही, इतके आश्चर्यकारक अवशेष त्याला खालच्या पात्रांत मिळणार असे दिसत होते. त्या सपाटीला आल्यावर त्याने फक्त चारच फूट खाली खणले असेल नसेल तों सगळीकडे त्याला हाडेंच हाडे दिसू लागली. बेसनच्या लाडवांत खच्चून वदाम बेदाणे घातलेले असावे तशी रेतीत हाडें खच्चून भरली होतीं. त्यांतील प्रत्येक हाड म्हणजे नुसते एकेक रत्न होते. त्यांत आतां अस्तित्वांत नसलेले पाणघोडे (Hippopotamus) होते, गेंडे (Rhinoceros) होते, तरस (Hyena) होते, हत्ती होते, डुकरें होती, सिंह होते. थोडयाच अवधीत त्यानें नदीकांठच्या गाळाच्या त्या थरांतून २७ निरनिराळया सस्तन प्राण्यांचीं हाडे काढलीं आणि ती सुद्धा अशा प्राण्यांचीं कीं

ज्यांतील बऱ्याचशा प्राण्यांचें अस्तित्व आतां पृथ्वीवरून संपूर्ण नाहींसें झाले आहे. ड्युबुओ (Dubois) तेथें खणीतच होता. तो असें खणीत असला की, पुष्कळ वेळां त्याला आपण निसर्गाच्या एखाद्या ऐतिहासिक संग्रहालयांत उभे आहोंत असे वाटू लागे. तो पाहात असलेला काळ कदाचित अडीच लाख वर्षांपूर्वीचाहि असेल किंवा याहूनहि जास्त कालावधि तेथें लोटलेला असेल. त्या काळी या नदीला नांवहि दिलें गेले नसेल, पण प्रवाह मात्र येथेच वाहत असावा – हेच तिचे पात्र असावें. त्यानंतर भोवतालच्या साऱ्या भूभागाबरोबर हळुहळू नदीहि वर उचलली गेली. त्यानंतर मात्र समुद्राकडे धांव घेणाऱ्या त्या नदीला स्वतःच वाहून आणलेल्या गाळांतून, मातीतून, वाळूच्या थरांतून स्वतःचा मार्ग कापीत खाली यावे लागले. तोच वाहत आलेला गाळ, रेती आतां नदीचा कांठ म्हणून तिच्या दोन्ही बाजूला प्रवाहापेक्षां कितीतरी उंच उभा आहे. त्या सबंध काठांतील कणन् कण निसर्गाचा इतिहास कसा घडवला गेला याची अद्‌भुत कथा सागतो आहे. पण कोणाला ? निसर्गाची भाषा कळत असेल त्याला.

त्या नदीच्या पात्रातील हाडें तर त्या इतिहासाचा एके काळी जिवंत असलेला भाग ! त्यामुळे ती सारा इतिहास बोलका करीत होती. लाखो वर्षांपूर्वी नदीच्या काठी आसमतांत जे घनदाट जगल व प्राणि-जीवन नुसतें वहरून निघाले होते त्याची कल्पना देणारा फक्त तोच अवशेष आतां शिल्लक राहिला होता.

एखाद्या तारेच्या बाहुलीला कपडे घालून सजवावी त्याप्रमाणें ड्युबुआ (Dubois) त्याला सापडणाऱ्या हाडावर कल्पनेनें रुधिर-मासाचा साज चढवून त्याना सजवी – जिवंत करी. आणि मग त्या काळाचा एक चित्रपटच त्याच्या डोळ्यांसमोरून सरकू लागे. रानांतील गवत, झुडपे, पाला खाणारे प्राणी नदीवर येत, तेथे पाणी पिऊन बावरत, पाण्यात क्रीडा करीत, पोहोत. त्याच वेळी एखादा हिंस्र पशु हळूच दबा धरून प्राण्यांचा मागोवा घेत येई. तो दबा धरून बसलेला असा त्याच्या दृष्टीसमोर दिसू लागे. थोड्याच अवकाशांत तो त्या बेसावध प्राण्यावर त्याला ठार मारण्याकरितां झडप टाकी. अशा नाना शोकान्तिका तेथे प्रत्यहीं घडत होत्या. झडप टाकलेल्या प्राण्यांच्या करुण

हृदयभेदी आरोळ्यांनीं जंगलें निनादून निघत. कोणाच्या तरी शरीरांत कोणाचीं तरी तीव्र नखें व दांत शिरून मांसाचा लचकाच तोडीत. भळभळा रक्त सांडू लागे. मृत शरीरें कांठांवरून पाण्यांत पडत. तीरासरशीं हाडें प्रवाहांत येऊन धुऊन निघत. मग हळूहळू त्यांवर वाळूचा थर जमू लागे. ती सारीं झांकलीं जात. ज्वालामुखीतून वाहेर पडलेला गाळ वाहत येऊन त्याच्यावरून जाई, त्यानंतर फिरून पडलेला रेतीचा थर. असा प्रकार शतकानुशतकें चालत लाखो-कोटचवधि वर्षांचा कालावधि लोटे.

असा त्या काळाचा चित्रपट त्याच्या अंत:चक्षूसमोरून सरकत असतां, त्या डॉक्टरच्या मनांत एक प्रश्न वारंवार चमकन जाई. नदीकांठी येणाऱ्या एवढ्या प्राणिजीवनांत त्या वेळी कधी दोन पायावर उभे राहून चालणारा एखादा प्राणी येत असे का ? नदीच्या पात्रातील ती सारी हाडे तपाशीत असतां या प्रश्नाने त्याला नुसतें भंडावून सोडलें होतें. प्रत्येक दिवशी तो ' हरवलेला दुवा ' आज मिळेल, उद्या मिळेल, या आशेवर उत्साहाने काम करीत राही.

अखेर एक दिवस तो सोन्याचा क्षण उगवला. मिळालेल्या हाडांतून एक दांत उचलून त्याने आपल्या तळहातावर धरला. आतापर्यंत पाहिलेल्या दातापेक्षा तो किती तरी वेगळा होता! त्याची मुळे विनशेपटाच्या माकडाच्या दातांप्रमाणे एकमेकापासून चागलीच दूर होती, पण त्याचा दृश्य भाग - वरचा भाग - अगदी माणसासारखा होता. माकड-मानवाच्या पायरीवर असलेल्या मानवाचा दांत तसा असणे अगदी सभवनीय होते.

आपल्याला त्या माकड-मानवाचा तर दात सापडला नाही ना ? त्याच्या मनात एक कल्पना चमकून गेली व त्यासरशी क्षणमात्र आपल्या हृदयाचे ठोके थावले असे त्याला वाटलें. आतांपावेतों किती मोठमोठी हाडें त्याला सांपडली होती. त्यांच्यासमोर हा एवढासा दात म्हणजे किती क्षुल्लक. किती लहान. पण ड्युबुऑला मात्र त्या लहानशा दातापुढे आतांपर्यंत मिळालेली सारी हाडे तुच्छ होतीं. त्या एवढ्याशा दातानें त्याच्या आशेला अंकुर फुटून ते सरासर वरती जाऊन गगनाला गवसणी घालू लागले. ' अर, पाहतोस काय ? या हाडानी खचलेल्या नदीच्या कांठावरच या दांताचा मालक असलेला सांगाडा तुला मिळेल.' त्याचें

मन सांगू लागलें !

भराभर तो खणीतच चालला. दिवस गेले, आठवडे गेले. एके दिवशी सकाळीं जेथें त्याला दांत सांपडला होता त्या जागेपासून दोन तीन फुटावर त्याला एक बिनशेपटाच्या माकडासारखी पण बरीच मोठी असलेली डोक्याची कवटी मिळाली. त्यानें ती पाहिली नि चटकन् उचलली. हातात उचलल्यावर ती खूपच जड असल्याचें त्याच्या लक्षांत आले. तिचा रंग चॉकोलेटसारखा काळपट आमसुली होता. संगमरवरी दगडापेक्षांसुद्धां त्या कवटीचे हाड कठीण होतें. कपाळ एकदम खालीं घसरलेलें. शिवाय डोळ्यांच्या खोबण्यांवर गोरिला माकडांत सांपडते अशी भिवयाच्या हाडाची उंच कडा दिसत होती.

ही त्या ' माकड-मानवा'ची तर कवटी नव्हे ? कां पूर्वीं असलेल्या पण आतां पृथ्वीवर अस्तित्वांत नसलेल्या बिनशेपटाच्या ( Ape ) माकडाचीच ती कवटी आहे ? पण तसे असेल तर ती आकारानें बरीच मोठी दिसते, ती कशी ? छे, या कवटीत एके काळीं असलेला मेंदू बिनशेपटाच्या ( Ape ) माकडाच्या मानानें फार मोठा असला पाहिजे. कां ? मी तर म्हणतों या कवटीतील मेंदू साधारण माणसाच्या मेंदूच्या दोनतृतीयांश तरी खास भरेल.


ड्युबुओने ती कवटी गोरिला ( Gorilla ) आणि चिम्पॅन्झी (Chimpanzee), ओरॅंग उटान (Orang Utan), गिबन (Gibbon) आणि माणूस यांच्या कवट्यांबरोबर अगदी तुलनात्मक दृष्ट्या तपासून पाहिली. पण त्याचें मन निश्चित कांहीं सांगेना. कोणाची बरें ही कवटी ? मानवाची की माकडाची ? मानवाची ? माकडाची तर नव्हे ? त्याचें मन द्विध्यांत पडलें.

तो अधिकाधिक विचार करूं लागला. तेव्हां त्याच्या एक गोष्ट लक्षांत आली ती ही कीं, ' इतर सस्तन प्राणी आणि मानव यांत आणखी एक फार मोठा फरक आहे. मानव दोन पायांवर ताठ उभा राहूं शकतो, ताठ चालू शकतो. तेव्हां आतां या प्राण्याची जर पायाची हाडें सांपडली तर मी खास हा प्राणी ताठ उभा राहत होता की नाहीं हें सहज सांगू शकेन. '

आशेचा धीर घेत घेत त्याचें काम चालूच होतें. त्यानें फिरून खोदकाम सुरू केलें होतें. १८९२ च्या ऑगस्ट महिन्यांत जेथें त्याला

डोक्याची कवटी सांपडली होती त्या जागेपासून जवळजवळ चाळीस फुटांवर त्याला मांडीचें एक सरळ हाड मिळालें.

तें पाहिल्यावर आतां मात्र त्याला एवढें कळून चुकलें कीं, या असल्या मांडीच्या हाडावर चालणारा प्राणी सध्यांच्या मनुष्यप्राण्या-इतका उंच असून तो खास ताठ चालत असला पाहिजे. ती पूर्वीं सांपडलेली कवटी पण आदिमानवाचीच असली पाहिजे. पृथ्वीवर अवतीर्ण झालेल्या मानवप्राण्याच्या विकाससांखळींत या नव्या सांपडलेल्या दुव्याला काय बरें नांव द्यावें ? तो विचार करूं लागला. पिथेकॅन्थ्रोपस इरेक्टस ( Pithecanthropus Erectus ) ताठ चालणारा माकड ( Ape ) मानव असें म्हटलें तरच त्याचें यथार्थ वर्णन होतें नाहीं का ?



# ६. मगरीचीं हाडें

नीआंडरथालचा मानवप्राणी सापडला तेव्हा चोहोंकडे खूपच बोलबाला झाला होता. पण ड्युबुआने जावामधून म्हणजे विनशेपटाच्या माकड-माणसाच्या अगदी मध्यभूमीतूनच त्याची हाडे आणली त्यावेळी अगदी विलक्षण बोलवाला झाला. तो इतका होता की, त्याच्यासमोर तो पहिला बोलबाला अगदींच फिक्का पडला. वर्तमानपत्रातून चोहोकडे ठळक टाइपांत मोठमोठे मथळे झळकले व जनतेला ओरडून सागू लागले की, ' सांपडला, मानवजातीचा अखेर तो हरवलेला दुवा सापडला. ' विजेच्या वेगाने साऱ्या जगभर ती वातमी पसरली. लोक आक्तरक्त-नेत्र होत्साते ती वातमी वाचू लागले. पण खरे सागायचें तर ते सारे मनांतून अगदी वरमून गेले होते.

' छेः, हें काय एकेक भलतेंच पुढे येतें आहे.' नीआंडरथालचा मानव हा आपला आदिपूर्वज, या बातमीनें दिलेला धक्का जरा ओसरतो

आहे नाही तोंच ही नव्या आदि आदिपूर्वजाची त्याहूनहि चमत्कारिक ब्याद कुठून एकदम नव्याने उपटली! बापरे, आता ही आमच्या मानगुटीला बसणार! 'किती किती वर्षांपूर्वींची स्वारी आहे ही. अडीच लक्ष किंवा पाच लक्ष वर्षापूर्वींची असावी असें म्हटलें जातें!' लोक गडबडूनच गेले. त्यांनी या आदि मानवाविषयीं तज्ज्ञांची मतें वाचलीं. 'जीवनविकासांत सध्यां दिसत असलेला मानवप्राणी हा अखेरीला विनशेपटाच्या माकडापासूनच (Ape) उत्क्रांत होत आला असावा याचा हा निश्चित पुरावा मिळालेला आहे' असें तज्ज्ञ म्हणतात. छे, अगदीच कांही तरी! म्हणे माकडापासून माणूस झाला. ऐकावे ती एकेक विलक्षण गोष्ट! लोक बोलूं लागले.

हां, जरा सबूर! अशी एकदम घाईगर्दी करूं नका. सर्वच तज्ज्ञांचें असें मत आहे, अशांतला मुळीच प्रकार नाही. इंग्लंडमधील तज्ज्ञांनी या माकड (Ape) मानवाचे मोठ्या मोकळ्या मनानें एकदम स्वागत केले. पण जर्मनीत जवळजवळ सर्व शास्त्रज्ञांना मात्र तीं हाडे मनुष्याची, असे वाटत नव्हते.

'मग काय माकडाची का ती हाडे? छे छे, माकडाची तर खास नाहीत' एक तज्ज्ञ म्हणे. लगेच दुसरा उसळून उठे व तावातावानें सांगे, 'ती हाडे मानवाची मुळीच नाहीत.' त्या हाडांच्या बाबतीत जर्मनीत एवढें वादग माजले की, बिचारा ड्युबुआ पाहतच राहिला. तो या तज्ज्ञाकडे गेला, त्या तज्ज्ञाकडे गेला. त्याने ती हाडे हॉलंडमधून फ्रान्समध्यें दाखवायला नेली. तेथून आयर्लंड, स्कॉटलंड, इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया, इत्यादि सर्व ठिकाणीं तज्ज्ञाना हाडे दाखवीत तो चोहोंकडे फिरला. पण त्याला चोहोंकडे एकच अनुभव येई. तज्ज्ञांनी तीं हाडे पाहिली कीं, वादळ उठे. कुणी म्हणत, 'ही माकडाचीच हाडें.' कुणी म्हणत, 'मुळीच नाहीं, हीं माणसाचींच हाडे.' दोन्ही पक्ष आपल्या मताचा आग्रह धरून तावातावानें उठत, अखेरीला तो शस्त्रवैद्य बिचारा वैतागून गेला. त्यानें तीं सगळी हाडे सरळ आमस्टरडामला आणली. घरीं आल्यावर एका मजबूत पेटीत ती बंद केली व ती पेटी सरळ आपल्या बिछान्याखालीं ठेवली. त्यानंतर तो कोणाला भेटेनासाच झाला. स्वतःच्या घरांतच कोंडून घेतल्यासारखा राहूं लागला. तीन वर्षें तो तसाच राहिला. पण या

अवधींत एकदांसुद्धां त्यानें कोणाला त्या हाडांकडे पाहूं दिलें नाहीं.

त्यानें हाडें बंद केलीं म्हणून लोकांची तोंडे थोडींच बंद होतात. त्यांची वादावादी चालूच होती. तीन वर्षांनीं ड्युबुओनें जेव्हां फिरून एकवार तीं हाडें बाहेर काढलीं तेव्हां सारें वातावरण फिरून गरम होत चाललें. अखेर अशी वेळ आली की, खुद्द ड्युबुओलासुद्धां काय म्हणावें हें निश्चित कळेना. तो अगदीं गोंधळून गेला. पिथेकॅन्थ्रोपस (Pithecanthropus) म्हणजे बहुधा माकडच असेल असें त्याला कधी वाटे तर कधीं नाही. तो बहुधा मनुष्यच असावा असेहि त्याला वाटू लागे.

या बाबतीत निर्णायक मत द्यायचे व एकदा कायमचा निकाल लावून टाकायचा असेल तर अशी आणखी हाडें सापडली पाहिजेत, म्हणजे नक्की काय ते ठरवतां येईल असें शास्त्रज्ञ म्हणू लागले.

पण ती शोधायची कोणी ? अखेर याच संशोधनाकरितां जावाला कांही तज्ज्ञांची तुकडी गेली. पण या तुकडीने इतका शोध करून माणसाचे हाड म्हणून काय आणलें विचाराल तर एक माणसाचा दांत. ड्युबुआला त्याचा पिथेकॅन्थ्रोपस सांपडला होता तेथून दोन मैलांवर हा दात मिळाला होता.

तज्ज्ञांच्या पथकाची ही फलश्रुति झाल्यावर सर्वच संशोधनाचा निर्णय अधांतरी हवेत कायमचा लोंबकळत राहणार की काय, असे वाटू लागले.

पण तसे व्हायचें नव्हते.

१८९९ मध्ये के. ए. हाबेरेर (K. A. Haberer) नांवाचा एक जर्मन सृष्टिशास्त्रज्ञ चीनच्या पार अंतर्भागात संशोधनासाठी म्हणून गेला. ही स्वारी कमालीची चौकस स्वभावाची होती. त्यामुळे ती चोहोकडे हिंडत राही. एक दिवस असेच हिंडतां हिंडतां श्रीयुत हाबेरेर चीनमधील एका औषध-विक्रेत्याच्या दुकानांत शिरले. तेथे दुकानातील मालाच्या कपाटाचा एक खण सहजपणे उघडा राहिला होता. गमतीची गोष्ट ही की, त्या खणांत पुष्कळ प्रकारची हाडे, दात दिसत होते.

'ही एवढी हाडे तुम्ही कशाला ठेवली ? ' हाबेरेरनें औषध-विक्रेत्याला प्रश्न केला.

'औषधी ' म्हणून दुकानदारानें उत्तर दिलें. 'ती मगरीची हाडें

आहेत. मगरीचे दांत आहेत. त्यांच्यांत फारच मोठी गुणकारी शक्ति असते. मी दळून याची पूड करीन. ती पूड दमा, वेडसरपणा, आणि मुतखडा यांवर अत्यंत गुणकारी आहे. मगरीचीं हाडें हिंवतापावर पण फार उपयोगी. लकवा, यकृताचे आजार त्यानें ताबडतोब बरे होतात."

चीनमध्ये राहिल्याकारणाने, चिनी लोक मगरीकडे कोणत्या भावनेने पाहतात हें हाबेरेरला माहीत होतें. मगर म्हणजे एक दुष्ट, भयंकर प्राणी म्हणून न समजतां उलट ती जनतेची मित्र, एक संरक्षक शक्ति अशी त्याची समजूत आहे. त्यामुळें मगरीचीं हाडें गुणकारी औपध म्हणून चीनमध्ये वापरली जातात हें ऐकल्यावर त्याला फारसें आश्चर्य वाटले नाही.

पण त्याच्या जाणकार नजरेने ती हाडे मगरीची नसून आतां पृथ्वीवरून नामशेष झालेल्या मोठ्या प्राण्याच्या हाडासारखी आहेत हे अचूक हेरले. त्याने त्या दुकानांतून थोडीशी हाडे विकत घेतली. नंतर तो एका दुसऱ्या औषध-विक्रेत्याच्या दुकानांत गेला. तेथेंहि त्याने त्या-सारखीच वरीचशी हाडे विकत घेतली. नतर ती सारी हाडे एका पेटीत बंद करून त्याने ती पेटी एका जर्मन शास्त्रज्ञाकडे पाठविली व त्या-बरोबरच त्याला एक पत्रहि लिहिले.

ती हाडे मगरीची नसून काही युगांपूर्वी चीनमध्यें जे सस्तन प्राणी वास करीत होते, त्याची ती हाडे आहेत. हे कळताक्षणी हाबेरेरला फारच आनंद झाला.

ही वातमी वाहेर पसरल्यावरोबर, ती हाडे मुळांत कोठून आली हे जाणन घेण्याची हाबेरेरला तर उत्सुकता होतीच, पण त्याच्याशिवाय इतरहि नाना लोकांत उत्सुकता निर्माण झाली. पण चिनी औषध-विक्रेते मात्र ती कुठून आणीत याचा विलकुल थागपत्ता लागू देत ना. कितीतरी वर्षे त्या अज्ञात ठिकाणाचा मागमूसहि लागेना. अखेर पेकिंगमधला एक दुकानदार फुटला. आपण चिचाऊ (Chichow) च्या वाजारांतून हीं हाडे आणतो, अशी त्यानें माहिती दिली.

या वातमीने फारच मदत झाली. त्या वातमीचा अर्थ असा होता की, 'पीतनदी'च्या आसपासच्या प्रदेशांतून हीं हाडें येत होतीं. चिनी सरकारला खाणी वगैरे बाबतींत सल्ला देणारे तज्ज्ञ गृहस्थ जे.

गुनार ॲन्डरसन यांना ही बातमी कळतांच त्यांनीं तावडतोब त्याचा मागोवा घेणें सुरू केलें. थोड्याच काळांत ते मगरीचीं हाडें चिक्कार सांपडत होतीं त्या भूप्रदेशांत येऊन दाखल झाले.

काय विलक्षण देखावा त्यांच्या डोळ्यांसमोर दिसत होता! या भागांत सगळीकडे नुसतीं हाडेंच हाडें दिसत होतीं. लोक भराभर तीं हाडें खणून नेत होते. सर्व खेडेगांवांत चि-चाय-काऊ (Chi-Chia-Kow) या खेडेगांवाचा देखावा तर फारच मजेशीर होता. या हाडांमुळें तें पुरें खाणीचें गांव झालें, असें दिसत होतें. चोहोंकडे एका जागेपासून दुसऱ्या जागी जाण्याकरितां जमिनीच्या आंतल्या आंत बोगद्यांचे रस्ते तयार केले होते. खाणीतील हाडे खणतां यावींत म्हणून कठड्याचे कट्टे बांधले होते. सगळीकडे बोगदे व सज्जे (Galleries) यांचे एक जाळेच्या जाळें त्या गावी पसरलें होतें. 'जगांतल्या साऱ्या वस्तुसंग्रहालयांना पुरून उरतील एवढीं हाडें ह्या ठिकाणीं आहेत! ॲन्डरसनांच्या मनांत विचार येऊं लागला. तावडतोव खाणकामगारानीं ती हाडें गोळा करावी, असा हुकूम त्यानी दिला.

मगरीच्या हाडाच्या मागे लागून ॲन्डरसन फारच आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या प्रदेशात येऊन पडला होता. पण हे काहीच नव्हे, खरीं आश्चर्ये अजून पुढेच होती. चि-चाय-काऊ ही केवळ त्यांची सुरुवात होती.

त्याकाळी पेकिंगच्या नैर्ऋत्येला जवळजवळ तीस मैलावर एक लहानशी चमत्कारिक टेकडी होती. तिला 'कोंवडीच्या हाडाची टेकडी' असें एक मोठे मजेदार नांव होतें. कोठेहि हाड असा शब्द आला की, ॲन्डरसन लगेच टवकारून बघू लागे. १९१८ मध्ये त्याला या टेकडीची माहिती कळल्यावरोवर, स्वारी टेकडी नजरेखालून घालायला म्हणून निघाली. तेथे जाऊन नजर टाकल्यावरोवर ही टेकडी म्हणजे एका गुहेचा आंतला भाग, असे त्याला आढळून आले! वरच्या भागाची सर्व चुनखडी लोकांनी काढून नेली होती. त्यामुळे गुहेच्या आतल्या भागांत सारी माती घाण एकत्र गोळा होऊन पडून राहिली होती.

'कोणी तरी ही टेकडी खणून पाह्यलाच पाहिजे.' त्याच्या मनांत विचार घोळू लागले. ते काम कसे काय करावयाचें याचे बेत रचीत तो परत आला.

इतर कोणत्याशा ठिकाणीं सांपडलेल्या मगरीच्या हाडांनीं ॲन्डरसनला इतकें गुतवून ठेवलें की, या 'कोबडीच्या हाडांच्या टेकडी'कडे फिरून लक्ष द्यायला त्याला तीन वर्षे लागलीं. तीन वर्षांनी एका अमेरिकन शास्त्रज्ञाला घेऊन तो ती टेकडी दाखवायला म्हणून आला. पण तेवढ्या अवधीत एका ऑस्ट्रियन संशोधकानें तेथें खणायला सुरुवात केलीच होती. त्याला किती तरी पक्ष्यांची हाडे तेथे मिळालीं होतीं. ॲन्डरसन व अमेरिकन शास्त्रज्ञ यांची भेट होताच त्यानें आपल्या संशोधनासंबंधी सारे सांगायला सुरुवात केली. ते तसेच तेथे बसून 'मगरी'च्या हाडाविषयी बोलत असतां, एकदम एकाएकी एक चिनी आवाज त्याच्या कानी आला. क्षणभर हे दचकलेच. त्याच्यासमोर एक चिनी माणस उभा होता.

'हे पाहा, यापुढे तुम्ही येथे खणणार असाल तर त्यांत कांही अर्थ नाही. तुम्हांला मगरीचीच हाडें पाहिजेत ना. येथून जवळच एक जागा आहे, तेथे तुम्हाला कितीतरी मोठी व चागली हाडे मिळतील. चला, मी दाखवतो तुम्हाला.'

तिघांनाहि कमालीची जिज्ञासा उत्पन्न झाली. ते तसेच त्या चिनी माणसाच्या मागोमाग निघाले. चौघेहि उत्तरेच्या बाजूने मार्ग आक्रमू लागले. वाटेत चुनखडीच्या आणखी टेकड्या लागल्या. त्यानतर, पुढे गेल्यावर चुनखडीची एक उंचच्या उंच तीस फुटाची भित त्यांना दिसली.

'ते पाहा तिथे!' भितीतील एका भगदाडाकडे अगुलीनिर्देश करून त्या चिन्याने जागा दाखवली. ते सर्वजण चढतचढत त्या भगदाडापाशी येऊन पोहोंचले. तेव्हां वरचे सारे छप्पर कोसळलेल्या एका मोठ्या थोरल्या गुहेंत आपण आलों आहोत असे त्याच्या लक्षांत आले. लगेच त्यानी खणायला सुरुवात केली. त्यासरशी डुकराच्या जवड्याचे एक हाड बाहेर आले.

'या गुहेंत हे डुक्कर काय बरें करीत असावे?' ॲन्डरसनपुढें एक मोठे कोडेच पडले. त्याला ती जागा सोडवेना. अखेरीला जितक्या तातडीने तेथें परत येतां येईल तेवढें यावयाचे असे मनाशी ठरवून ते गेले. आणि खरोखरीच लवकरच तो फिरून त्या जागेकडे आला.

परत आल्यावर मात्र त्या गुहेत दडून राहिलेल्या गुपिताची त्याला

थोडीबहुत कल्पना आली. त्याच्या गैरहजेरींत शास्त्रज्ञांनीं ती गुहा खणावयास सुरुवात केलेलीच होती. त्यांनी जमा केलेल्या हाडांची एक लहानशी रास झाली होती. त्यांत गेंडा (Rhino), तरस (Hyena), अस्वल यांची व आणखी किती तरी प्राण्यांची हाडे होती. ॲन्डरसन साहजिकच ती हाडे सूक्ष्म दृष्टीने पाहूं लागला. तों त्यांत चकमकीच्या दगडाचे (Qwartz) बारीक बारीक छिलके त्याला आढळले. त्याच्या कडा चांगल्याच तीक्ष्ण होत्या. त्याकडे ॲन्डरसनचे लक्ष वेधले. ते त्याने हातात, उचलून घेऊन पाहण्यास सुरुवात केली.

'कुठून बरं हे आले असावे ?' त्याने प्रश्न केला.

'हे सारे या हाडांवरोबरच मिळाले.' एका शास्त्रज्ञाने उत्तर दिलें.

ॲन्डरसन वराच विचारात पडला. हे चकमकीच्या दगडाचे— (Qwartz) छिलके गुहेत कसे आले ? ते कांही स्वभावतः गुहेतले नाहीत. मग ते येथे कसे आले ? खास कोणी तरी या तीक्ष्ण धारेच्या चकमकीच्या दगडाच्या कपारी बाहेरून गुहेत नेल्या असल्या पाहिजेत. आतां, जनावरांची हाडे हिंस्त्र पशूनी गुहेत नेली असतील हे सहज समजू शकते. पण या चकमकीच्या दगडाच्या कपारी ? या कोणता प्राणी बाहेरून उचलून गुहेत नेणार ? हे माणसाशिवाय झालेले नाही. न जाणो या गुहेंत फार फार प्राचीन काळी मनुष्यप्राणी तर राहत नसेल ? त्याने या तीक्ष्ण धारेच्या कपारी कांही कापायकरता तर आणल्या नाहीत ना ?

विचार करता करता एक आठवण त्याच्या मनांत कुठें तरी खोल दडी मारून बसलेली होती ती एकदम उसळून वर आली. हाबेरेरनें जर्मनीला पाठविलेल्या 'मगरीच्या हाडा'ची त्याला आठवण झाली. त्यातील एका दांतासंबधी शास्त्रज्ञाना मोठा विचार पडला होता. 'हा माणसाचा का दात ?" शास्त्रज्ञानी त्याला विचारले; पण त्याला कांहीच सागता येईना. तो दांत पुष्कळ अशी माणसाचा वाटे. पण मनुष्यप्राण्याचा तसा दात अजून त्याने कोठे पाहिला मात्र नव्हता.

ॲन्डरसनला त्या दाताची आठवण झाली. त्याने त्याच्यासमोर पडलेल्या चकमकीच्या धारदार कपारीकडे पाहिले. त्याची टक लागली. तसें पाहत असतांच एक विलक्षण कल्पना त्याच्या मनात चमकून गेली. त्याचें सगळें शरीर रोमांचित झाले. आपण एका शोधाच्या अगदी अखेरच्या

टप्प्यावर उभे आहोंत असेंच त्याचें मन सांगूं लागलें. मोठ्या गंभीरपणें गुहेच्या भिंतीवर बोटांनीं टक टक करीत तो बोलू लागला. ' मला तर असें वाटतें की, इथें या गुहेत आपला एखादा पूर्वज राहत होता. माझें मनच मला तसें सांगते आहे. त्याचे अवशेषहि इथे राहिलेले असावे. आपण शोध घेतला, तर हे खास इथेच सांपडतील. फक्त त्याला वेळ मात्र खूप लागेल. लागू द्या. कांही हरकत नाही. खुशाल तुम्हांला पाहिजे तेवढा वेळ घ्या. त्याकरतां सारी गुहा खोदून रिकामी करावी लागली तरी हरकत नाहीं. पण इथेच चिकटून राहून आपण खोदून पाह्यला पाहिजे. '

अॅन्डरसनचे हे बोलणे ऐकून, दोघांहि शास्त्रज्ञाच्या तोंडावर आंवट हांसू पसरले. ते म्हणाले, ' महाराज, सारी गुहा रिकामी करायच्या तुमच्या गोष्टी तोडाने बोलायला ठीक आहेत. पण आत्तांच इथें खोदणें किती कठीण आणि धोक्याचे झाले आहे तें तरी पाहा. गुहेचा वरचा राहिलेला भाग केव्हां खाली कोसळेल याचा नेम नाही. त्यामुळे केव्हांहि हे काम सोडावे लागेल.'

' फार तर उन्हाळा सपेपर्यंत येथे कसेवसे काम करतां येईल. पुढें नाही. ' शास्त्रज्ञानी उत्तर दिलें.

त्यांच्या उत्तराने अॅन्डरसनचा धीर पार खचून गेला. चकमकीच्या दगडाच्या (Qwartz) त्या तीक्ष्ण धारदार कपारीनी, त्याचें मन भारून गेले होते. या गुहेत त्या कशा आल्या याचा तलास लावल्याशिवाय त्याला चैन पडणार नव्हते. शास्त्रज्ञांनी आणखी खोदून पाह्यचे नाकारल्यावर त्याचे मन अनदी तडफडू लागलें. दोन वर्षेपर्यंत तो अगदी बेचैन झाला.

' जा, असे काय करतां ? जरा आणखी खोदून पाहा ना.' अशा तो शास्त्रज्ञांच्या विनवण्या करूं लागला.

अखेरीला ऑस्ट्रिअन शास्त्रज्ञ तें काम पुढें चालवायला एकदांचा कबूल झाला. अखेर, त्यानें जेव्हां गुहेचें काम फिरून सोडलें, तेव्हां त्याला मनुष्यप्राण्याचे दोन दांत मिळाले होते.

आतां मात्र अॅन्डरसनला काम थांबवणें कठीण होऊन गेलें. मगरीच्या हाडां 'च्या त्यांच्याजवळच्या एवढ्या मोठ्या संग्रहापेक्षां या मनुष्यप्राण्यांच्या सांपडलेल्या दोन दांतांनीं तो अगदीं हुरळून गेला होता. त्याचा कयास खरा आहे असें हे दोन दांत सांगत होते. जो पूर्वज या गुहेंत

खास मिळेल असें वाटत होतें, त्याचें खरोखरीच तेथें अस्तित्व सांपडलें. मानवजातीच्या उत्क्रांतींत या पेकिंगच्या मानवप्राण्याची नवी भर पडली व मानवजातीचें कुटुंब वाढूं लागलें.



# ७. दाट अरण्याच्या अंतर्भागी

दोन दात सांपडले खरे, पण त्यावरून मानवी अस्तित्वासंबंधी मजल गांठायची म्हटले तरी अशी किती गांठणार ? जगांतील सारे शास्त्रज्ञ या चाऊ-काऊ टाईनच्या गुहेतून आणखी एकेक बाहेर काय पडतें याची वाट पाहत होते. थोडयाच दिवसांत त्यांची ती अपेक्षा सफल झाली.

पहिल्याने तेथेच आणखी एक मानवी दात मिळाला. त्यानतर माणसाच्या हाडांचे एक जाळे मिळाले. त्यात वीस दात होते व कवटीचे काही भाग होते.

अगदी सरतेशेवटी ते ज्याची एवढ्या उत्सुकतेने वाट पाहत होते ते विलक्षण दृश्य त्याच्या नजरेसमोर दिसू लागलें! प्रथम मेंदूची एक कवटी सांपडली. ती कवटी जवळ जवळ सबंध, जशीच्या तशी होती म्हटले तरी चालेल. जरासा इकडचा तिकडचा तुकडा नव्हता एवढेच.

पण आतां एवढी गोष्ट मात्र निश्चित होती की, अॅन्डरसनने स्वत: वनून हासे करून घेतले, असे म्हणण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. कारण त्याने शोधून काढलेल्या पेकिंग मानवावद्दल शंभर टक्के पुरावा मिळाला होता. फक्त त्याला आता नवीन नांव देण्यांत आले होते. शास्त्रज्ञांनी त्याला सिनाथ्रोपस म्हणजे ' चीनचा मानव ' असे नाव दिले होते.

' हा तुमचा चीनचा मानव होता तरी कसा ? कसा दिसत असे ?' याविषयी सामान्य लोकांना विलक्षण कुतूहल होते. तज्ज्ञ मात्र त्याच्या

हाडांविषयी खूप गवगवा करीत. त्याचा कमरेवरचा भाग तरी कसा दिसत असावा यासंबंधी ते जुळणी करीत होते.

त्या जुळणीनंतर ते उत्तर देत, 'बरें, त्याचें स्वरूप थोडक्यांत सांगायचें तर असे : त्याच्या डोळ्यावर भिवयांच्या जागीं हाडांची चांगली उंच कडा, पुढें आलेली अशी होती. त्याला कपाळ जवळजवळ नव्हतेंच म्हटले तरी चालेल. मानवाच्या उत्क्रांतींतील बऱ्याच खालचा तो दुवा असावा. तो पुष्कळसा जावांतील 'एप' माणसासारखाच होता. डचुबुओच्या 'एप' माणसासारखा तो कितपत दिसत होता हे जरी आम्हांला सांगतां आले नाही, तरी पाच किंवा अडीच लाख वर्षांपूर्वी दोन्ही प्रकारच्या मानवजाती एकाच वेळी पृथ्वीवर नांदत असाव्यात.'

'काय तुमचा हा माणूस डचुबुओच्या 'एप' माणसासारखा होता असे म्हणतां? म्हणजे डचुबुओला सांपडलेला माणूस माकड नव्हता तर?'

'नक्कीच नाही. त्याला जे मांडीचें हाड सापडलें होते ते माकडाचें होते. दांत पण माकडाचे होते. पण त्याला जी डोक्याची कवटी सांपडली होती ती खात्रीनें माणसाची होती, यांत संशयच नाहीं. जावात सांपडलेल्या 'एप' माणसाचा मेंदू हा चीनमध्ये सापडलेल्या सिनॅनथ्रोपस (Sinanthropus) चिनी माणसासारखाच होता. आणि तो नक्की माणसाचाच मेंदू होता.'

'हे सारे तुम्ही म्हणतां, पण डचुबुओला स्वत:लाच त्याला सांपडलेला मानव पिथेकॅन्थ्रोपस (Pithecanthropus) हा माकड असावा असे वाटत होतें त्याचें काय?'

'तुम्ही म्हणतां हे अगदी खरे. पुढे पुढें डचुबुओचे स्वत.चेच मत वदललें होते. त्याला सांपडलेली हाडें माणसाची यावर त्याचा विश्वास उरला नव्हता.'

पण मग लोकांनी काय समजायचें? या सतावून सोडणाऱ्या प्रश्नाला कधी उत्तर मिळायचेच नव्हते की काय? आतां १९३७ साल उजाडले होते. डचुबुओला हाडें सांपडल्याला जवळजवळ ५० वर्षे झालीं होतीं. तरी अजून शास्त्रज्ञांमध्यें वादावादी चालूच होती. 'कोण होता तो? मानव की माकड?'

पण आतां मात्र या प्रश्नाचें उत्तर अगदीं जवळ दिसू लागलें होतें. त्याच वर्षी दुसऱ्या एका डच माणसाला जावांत इतकीं एप मानवाचीं हाडें मिळाली की, सारा वाद एकदम नाहीसाच झाला. फॉन कोइनिंग्ज-वाल्डला (Von Koenings wald) हाडांनी भरलेल्या नदीच्या पात्रांतून जीं कांहीं हाडें मिळाली त्यानंतर ड्युबुओचीं हाडें 'एप' माणसाचीं नसून माकडाची होती असें म्हणण्याचें कोणाचेंच धारिष्ट होऊं शकलें नाहीं.

खरें बोलायचें तर हीं जीं नव्यानें सारीं हाडे सांपडलीं त्यामुळें, ताठ चालणारा माकडमानव (Pithecanthropus) हा खरोखर मानव होता हें तर सिद्ध झालेच, पण त्याशिवाय लहान मुलाच्या परी-कथेतील तीन अस्वलांप्रमाणे ही मानवजात तीन निरनिराळ्या शरीरा-काराची असून या तिन्ही जाती भूतलावर वास्तव्य करून गेल्या, असें आढळून आले होते. या एप मानवात तीन प्रकारच्या एप मानवजाती होत्या. एक ठेंगू-लहान आकाराचा एप-मानव. दुसरा मध्यम शरीरा-काराचा एप-मानव आणि तिसरा खूप मोठा राक्षसी एप-मानव. त्यांतील मध्यम शरीराकृतीचा एप-मानव पूर्ण वाढलेल्या नर-गोरिला इतका तरी मोठा असावा आणि त्याहून मोठा असलेला 'एप' मानव मात्र खरोखरी राक्षसासारखाच प्रचंड अवाढव्य असावा, असे त्याच्या हाडां-वरून दिसत होते.

राक्षसाइतका म्हणतां? म्हणजे किती मोठा?

खरोखरीच हा राक्षसी एप-मानव आकाराने फारच धिप्पाड असावा. त्याच्या खालच्या, मागील बाजूच्या दाढेचा दात मिळाला होता, त्याची नुसती रुंदीच सातअष्टमाश इंच होती. त्याचा सबंध जवडाच एवढा मोठा होता की, सध्यांच्या मानवाच्या जवड्याचे हाड त्याच्यापुढे एका कोवळ्या अर्भकाच्या हाडाएवढे वाटे. त्या 'राक्षस एप' मानवाची उची सात फुटा-वरच होती. आणि शरीराने तर तो चांगलाच धिप्पाड, अवाढव्य होता. त्याचे वजन अदमासे ७५० पौंडाच्या जवळपास भरले असते.

बरं पण ही तिन्ही एप-मानव जातीची माणसे एका काळी एकत्रच राहत होती की काय?

खासच नाही. तीं एकत्र तर राहत नव्हतीच. पण त्यांचें तिघांचें वास्तव्यहि बहुधा एका काळांतले नसावें. तो राक्षसी देहाचा एप माणूस

पहिल्यानें झाला असावा. शिवाय एकंदर संशोधनावरून तो पहिल्यानें चीनच्या बाजूनें आला असण्याचा संभव दिसतो. निदान शास्त्रज्ञाना तरी असें वाटते. कारण त्याची हाडे चीनमध्येच मिळाली. तेथील औषध-विक्रेत्याच्या दुकानांत मगरीच्या हाडांवरोबरच हॉगकॉगला त्याचीहि हाडे मिळाली. फॉन कोइनिग्जवाल्डलाहि अशाच दुकानात त्या राक्षसी एप मानवाचे तीन दातहि मिळाले होते. मध्यम आकाराचा ' एप ' मानव हा त्याच राक्षसी मानवाच्या उत्क्रातीची पुढची पायरी असावा. कांही असो एवढे खरे की, हा एप मानव दिवसानुदिवस शरीराने लहान लहान होत चालला. अखेरीला त्याची उची पाच फुटाच्या जवळपास येऊन ठेपली. असो. चीनचा आदि मानव असा प्रचड उंचीचा, प्रचंड देहाचा होता. जावामधला त्याचा बाधवहि जवळपास त्याच्याच उचीचा असावा. ठेंगू, लहान एप मानव शरीराने फार मोठा नव्हताच. एवढेच नव्हे तर तो फारसा चलाख-तरतरीत नसावा असेहि म्हणण्यास जागा आहे. पण एक गोष्ट मात्र निश्चित की, त्याची मानवीप्राण्यात निःसशय गणना होत होती. आणि ही गोष्ट म्हणजे काही कमी नव्हती.

त्याच्याकडे दृष्टिक्षेप फेकला तर दोन पायावर सरळ ताठ उभा राहत असलेला असा तो दिसतो. सारा दिवसभर आपल्या दोन पायावर चालत असतांहि तो थकून जात नसावा असेच आढळते. एप माकडे जशी चालता चालता, मधूनच जमिनीवर हात टेंकून हातांच्या मदतीनेहि मार्ग आक्रमण करताना दिसतात तसे हा कधीच करीत नसे. त्याचे हात मोकळे, अगदी मोकळे असत. काय छान हात होते ते ! त्या हाताचा अंगठा असा बोटावर मोडता येई. त्यामुळे कोणतीहि वस्तु पकडणे सोपे जाई. शिवाय माकडाच्या अंगठ्यापेक्षा ह्या एप–मानवाचा अगठा कितीतरी लाब होता. त्यामुळे कसल्याहि गोष्टीची सहज पकड घेता येई. हातांत जड दगड घेऊन तो जोराने घाव घालू शके. चांगला धारदार दगड मिळाला की आपल्या हाताने, तो दगडाच्या धारेने सहज कापू शके. किवा एखादी काठी घेऊन त्याच्या साह्याने तो आपल्या हाताने चागलाच सण-सणीत टोला लगावू शके. असे होते त्याचे हात !

आतां जरा त्याच्याकडे कान द्या! तो पाहा तो बोलतो आहे. निरनिराळ्या वस्तूची, पदार्थांची नांवें घेत आहे. त्याने त्या वस्तूना नांवें

दिली आहेत. एवढेंच काय, त्याला काय पाहिजे आहे, त्याला काय माहीत आहे, त्याच्या मनात काय कल्पना येत आहेत, हेसुद्धा तो दुसऱ्याला बोलून सागू शकतो. इतर सस्तन प्राणी निरनिराळे आवाज काढतात, पण ते एकमेकाशी बोलू असे शकत नाहीत. कधीच नाही. एखादे वेळी जंगलात त्याचा दूरचा बाधव ओरॅग त्याला भेटतो. हा ताठ चालणारा माकडमानव ( Pithecanthropus ) त्याच्याशी बोलू पाहतो. पण तो माकड याच्याकडे पाहून नाना वेडेवाकडे चेहेरे करतो, पण एकहि शब्द बोलू शकत नाही. का बरे त्याला उत्तर देतां येत नाही ?

का बरे असे ? या प्रश्नाला काहीच कारण सागतां येत नाही. एवढेच फार तर म्हणता येईल की, त्याच्या मेंदूत ती शक्तीच नाही तर तो बोलणार तरी कसा ? त्याच्या कठात स्वरनलिका आलेली आहे. त्याला पाहिजे असेल तो स्वर त्या स्वरनलिकेतून काढता येईल. पण असे कांही स्वर काढावे, शब्द काढावे, असे वाटण्याइतके सामर्थ्य त्याच्या मेंदूत आलेलेच नाही म्हणून तो फक्त निरनिराळे आवाज काढतो. वेडीवाकडी तोडे करतो. रागावला तर खालीवर उड्या मारतो. पण यापलीकडे तो बोलू शकत नाही.

पण एप-मानव जगलांत वावरताना फारच सावधगिरीने वावरतो. कारण त्याच्या अंवतीभोवती चोहीकडे धोकाच धोका भरलेला असतो. सिहासारखे मोठे हिंस्र प्राणी आणि तरस त्याचा लचका केव्हा तोडतां येईल याची सदैव वाट पाहत असतात. असा भीतिदायक आवाज येऊ लागला की, कधी हा माकडमानव झाडावर चढतो. कधी हातात एखादा दगड नाही तर काठी घेऊन तो स्वतःचे रक्षण करूं पाहतो. पण बहुधा तो पळूनच जातो. 'यः पलायते स जीवति' हे तत्त्व त्याला माहीत झालेले दिसते. कारण इतर प्राण्यांसारखे त्याच्याजवळ नैसर्गिक असे कोणतेच शस्त्र नाही की अस्त्र नाही. दुसरी शस्त्रे त्याला अद्याप सापडलेली नाहीत. पण हळुहळू एक दिवस असा येईल की, त्याचे वशज एक काठी घेऊन तिचे टोंक अगदी तीक्ष्ण करतील. ते टोंक चागलें टणक व्हावे याकरतां विस्तवात भाजून चागले टणक करतील व भाला म्हणून वापरतील. पण तो विचार अद्याप तरी त्याला सुचलेला नाही.

मात्र त्याला विस्तव म्हणजे काय याची पूर्ण कल्पना आलेली आहे.

आतां विस्तव म्हणजे एक भयंकर शत्रु असे समजून तो त्यापासून पळून जात नाही. त्याला कसे हाताळावे हे त्याला आतां चांगलेच माहीत झालें आहे. विस्तव अधिक प्रज्वलित करावयाचा असेल तर तो त्यावर सुकलेल्या काटक्या, लाकडे घालतो. विझवायचा असला तर पाणी फेकावें, हे पण त्याला आता कळले आहे. खरे बोलायचे तर अग्नि हा त्याचा अगदी सखा झालेला आहे. अग्नि प्रज्वलित झाला की, त्याच्या मनात अजूनहि आश्चर्याची भावना खेळू लागते. तोच अग्नि त्याचे सरक्षण करीत असल्यानें अशी अद्‌भुत शक्ति केवळ अग्निकृपेनें आपल्याला प्राप्त झाली, यामुळे त्याला अग्नीवद्दल अत्यत कृतज्ञता वाटते.

एखादे दिवशी मासाचा तुकडा एखाद्या काटकीवर टोचून तो जेव्हां का विस्तवावर भाजतो, तेव्हा अगदी पहिल्याप्रथम त्यानें अग्नि कसा हस्तगत करून आणला त्याची त्याला आठवण येते. त्या दिवशी का कोण जाणे सारे जगल पेटले होते. मोठमोठ्या ज्वाळा जिभल्या चाटीत वाहेर नाचत होत्या. वहुधा कोठे तरी वीज पडली असावी, नाहीतर ज्वालामुखीने तरी पेट घेतला असावा. त्यामुळें चोहोंकडे वणवा पेटला होता. सारे पशु, प्राणी विचारे घावरून पळायला लागले. तो अग्नि पण जसा काही त्याचा पाठलाग करीत त्याच्या मागोमाग पळत येऊं लागला.

अरण्यांतील सारी श्वापदें, पशु, पक्षी भराभर नदीकाठी धांव घेऊ लागले. एवढ्या मोठ्या प्रचंड ज्वाळा, पण पाणी त्याच्यापेक्षा वरचढ होते. त्याने अग्नीला मारले.

त्यानंतर जगलातील हवेत चोहोकडे कसा खमग वास सुटला होता. जळून, अगदी कोळपून निघालेल्या जगलात तो हळूच घावरत घावरत परत आला. तेथे एके ठिकाणी गरम राखेचा लहानसा ढीग पडला होता. त्या धुमसत असलेल्या राखेत एक 'टापीर' ( दक्षिण अमेरिकेत आढळणारा एक रानडुक्कर ) भाजून पडला होता. काय खमंग, अगदी तोंडाला पाणी सुटणारा होता तो वास. त्या गरम राखेत भाजल्या गेलेल्या डुकराचा त्याने काय आवडीने फडशा पाडला! 'कशामुळे वरें हे मास इतकें चविष्ट लागते ?' खाता खाता त्याच्या मनात विचार सुरू झाले. 'हे विस्तवाचें काम' त्याच्या मनाने घेतले. हळूच एक जळते लाकूड मोठ्या सावधगिरीनें उचलून तो घरी घेऊन आला. आणि तेव्हांपासून अग्नि त्याचा अगदी

सोबतीच बनला. आतां तर तो त्याचें सारें मांस भाजतो, कडाक्याची थंडी पडली कीं, त्याला ऊब देतो. मात्र तो अग्नि पळून जाऊन फिरून सारें जंगल पेटवणार नाही याची तो मानव चांगलीच दक्षता बाळगतो.

आतां त्याने जंगलाच्या अगदी आंत आंत, स्वतःकरितां एक आसऱ्याची जागा पण तयार केली आहे. त्याला अजून घराचें असे फारसें स्वरूप आलेले नाही. कारण नुसतें छप्परच आहे तेथे. त्याने चारी बाजूला जमिनीत घट्ट अशा काठ्या रोवल्या आहेत व झाडाची मोठमोठी पाने गवताने आणि वेलीच्या तणावाने कशीबशी एकत्र बाधून हे छप्पर तयार झालेले आहे. चारी बाजूला ते अगदीच उघडे आहे, पण आकाशातून पाणी पडू लागले की, तो त्याच्याखाली बसतो. आणि मग फारसा पाऊस लागत नाही. आकाशांतून भळाभळा पाणी गळून चोहोंकडे लहानमोठे प्रवाह वाहूं लागले की, तो आणि त्याचे कुटुंब त्या छपराखाली बसतात. आणि किती बरे वाटतें त्या वेळी. पुष्कळच कोरडें राहतें अंग.

असा पाऊस पडू लागला की, एकमेकांच्या गळ्यांत हात टाकून दाटीदाटीनें तें कोडाळे करून बसतात. तसे बसले की, जरा ऊब येते. पण अशा वेळी खायचें काय, याचे नुसते स्वप्नच पाहत बसावे लागते. मग एकदम सूर्य बाहेर येतो, की सारे ठिबकणारे जगल सुकून कोरडे होऊं लागते. असे झाले की, मग त्याना फळे, शेंगा गोळा करायला बाहेर पडता येते. कधी कधी झाडांची मुळे खणून त्यावर ते ताव मारतात. हळूच पक्ष्यांच्या घरट्यातून त्यांची अंडीहि चोरतात. एखादे वेळी हा ‘एप मानव’ आपल्या हातांतील काठीने एखादा पक्षी झाडाच्या फांदीवर निष्काळजीपणे बसलेला असला तर चागला हाणून त्याला खालीहि पाडतो. पण नेहमीच नाही तें जमत. कांही वेळेला त्याचे शत्रु असलेल्या हिंस्र पशूनी ठार मारलेले व अर्धवट खाऊन टाकलेले एखादे जनावर पण याच्या दृष्टिपथात येते. त्याच्या तोंडाला एकदम पाणी सुटते. वाः मांस! किती छान लागतें मास! पण ते नेहमीच मिळत नाहीं.

हे मोठे प्राणी पाहा! कसे एकमेकांवर हल्ला करून ठार मारतात. तसें आपल्याला मारता आले असते तर! आपण रोज मांस घरी आणलें असतें. पण काय करायचे! त्याला हिंस्र पशूसारख्या, कोथळा बाहेर काढणाऱ्या तीक्ष्ण नख्या नाहीत कीं जनावराचा एकदम लचकाच तोडतां

यावा अशा भल्या भक्कम तीक्ष्ण दाढा पण नाहींत. एवढेंच काय पण नुसत्या खुरांनीं तुडवायचें म्हटलें तर तुडवून गारद करणारे खूर नाहींत. भोंसकणारीं शिंगें नाहींत. हत्तीसारखे सुळके नाहींत कीं सोंड नाहीं, कीं जेथें सुळक्यांनीं फाडून खातां येईल किंवा सोंडेनें उचलून सहज लीलेनें फेंकून देतां येईल. असें निसर्गसिद्ध संरक्षणाचें एकहि साधन याजजवळ नाहीं. ऊबदार लोकरीचें कातडेंसुद्धां नाहीं. खरोखर निसर्गानें स्वत:चें संरक्षण करण्याचें एकहि साधन मानवाला दिलेलें नाहीं. तीक्ष्ण नख्या, तीक्ष्ण दाढा, याऐवजीं आतां तरी त्याला सोटा किंवा दगडच वापरावा लागतो. सदैव मेंदू तल्लख ठेवून त्याला स्वत:चें संरक्षण करावें लागतें. पण हे इतर प्राणी किती मोठे आहेत, किती भयंकर आहेत! हत्ती, गेंडा, म्हशी, पाणघोडा, सारे सारे हे प्राणी एवढे मोठे आहेत कीं, त्यांना ठार करणें त्याच्या शक्तीबाहेरचें आहे. हा टापीरच पाहा, जवळ जवळ घोड्याएवढा मोठा प्राणी आहे हा.

अशा या साऱ्या परिस्थितींत त्या एप-मानवाला त्याच्या डोक्यावर, मेंदूच्या तल्लखपणावरच, अवलंबून राहावें लागतें. तो त्या डोक्याचा नि:संशय चांगलाच वापर करतो. त्याच्या डोक्यांत सारखे विचार चालतात. आणि त्याला विचार करायला आवडतेंहि. एप माणसानंतर लाखों वर्षांनीं जन्मलेल्या मनुष्याला जसें घरांत शेकोटीपाशीं बसून निवांतपणें डोक्यांत विचार करून गोष्टी करायला आवडतें, तसेंच याला पण आवडतें. माकडाप्रमाणें प्रत्येक गोष्टीकडे तो मोठ्या चौकस बुद्धीनें काय आहे काय नाहीं हें सारखें पाहत असतो. पण माकडाच्या पाहण्यांत कांहीं हेतु नसतो. हा माकड-मानव मात्र सर्व गोष्टी हेतुपुरस्सर पाहत असतो.

याचें कारण विचाराल तर एकच. तें म्हणजे तो मानव आहे. त्याला देवानें मेंदू, बुद्धि दिलेली आहे. तिच्या जोरावर त्याला सारें माहीत करून घ्यावयाची इच्छा आहे. सारें स्वत: करून पाह्यचें आहे. सारें स्वत:जवळ असावयाला पाहिजे आहे. एवढेंच नव्हे तर तसें सामर्थ्य अंगीं आणायची त्याची मनीषाहि आहे.



## ८. चला पुढें ! नव्या जागा शोधा !

चाऊ-काऊ-टाईनच्या गुहेतून एकामागून एक अशा आणखी किती तरी आश्चर्यकारक गोष्टी बाहेर पडत होत्या. १९४५ पर्यंत जवळ जवळ चाळीस निरनिराळ्या माणसाची हाडे त्या गुहेतून बाहेर काढली. त्यांत काही लहान मुलाची होती. काही मोठ्या माणसाची होती. त्या गुहेतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर शास्त्रज्ञांची सक्त नजर होती. आदि मानवाने टाकलेला कचरासुद्धा तपासून पाह्यला त्यानी कमी केले नाही. त्यावरून तो कोणत्या वनस्पती अन्न म्हणून खात असे याची त्याना कल्पना येऊ लागली. एकंदरीत या सर्व मृत अवशेषावरून त्याच्या मनात त्या काळच्या मानवाचे एक सुदर सजीव चित्र तयार होऊ लागले. जेव्हां आदि-मानव जगलाबाहेर पडू पाहत होता, त्यावेळचे चित्र, नव्हे चित्रपटच त्याच्यापुढे उभा राहिला.

मग कशी बरे चालली होती त्या मानवाची जीवनकथा ?

जगलात राहणारा हा मानव वारंवार जंगलाच्या कडेला येऊन उन्हांत तळपत असलेल्या पलीकडच्या सपाट मैदानाकडे, झाडा-झुडुपांतून,

टक लावून पाहत असे. किती सुदर, खूप प्रकाश होता तिथें. नेहमी दाट जंगलांत राहत असल्याकारणाने त्याला एवढा प्रकाश पाह्यची संवय-सुद्धां नव्हती. इतकी मोकळी सपाट जागा पाहून तो अगदीं वेडावून जाई. त्या दर्शनानें त्याच्या आत कांही तरी वर गेल्यासारखे होई. वाटे, जावे असेच पुढे. धावत जावे त्या मैदानाकडे. खूप मोठ्याने ओरडावें. जगलात असताना त्याला प्रत्येक पाऊल कमालीच्या सावधगिरीने टाकावे लागे. चोहोंकडे वेली वाढलेल्या ! कशाचीं तरी मुळे पायाला लागतच आहेत. याशिवाय प्रत्येक झुडुपामागे कोणता शत्रु लपून वसलेला असेल याची कधी कल्पना येत नसे. पण या समोरच्या मैदानात सारा खुला कारभार होता. सर्व गोष्टी सूर्याच्या प्रकाशात नुसत्या झगमगून निघत होत्या.

कधी कधी, जरा कचरतच, घाबऱ्या घाबऱ्या, तो खुल्या मैदानात येई. तेथें आल्यावरोवर त्याला कसे मोकळे मोकळे छान वाटे त्याच्या उघड्या शरीरावर सूर्याचा प्रकाश पडला की, कशी छान ऊब येई. पण जरा कुठे खुट्ट आवाज झाला की, चटकन् धावत जाऊन तो जगलाचा आश्रय घेई. जगलात पावलोपावली धोका असला, तरी अखेर तें त्याचे घर होते— आश्रयस्थान होते. आतापर्यंत तो नेहमी तेथेंच नव्हता का राहत ?— जगलातील झाडे म्हणजे त्याचे खरे सुरक्षास्थान नव्हते का ?

एकदा हा आदिमानव असाच जगलाच्या कडेशी येऊन ऊन खात वसला होता. समोर मैदानात पायाला खूर असलेला एक प्राणी चरत होता. त्यावर एकाएकी मृत्यूची मगरमिठी कशी पडली हे त्याला पाह्यला मिळाले. तो प्राणी आपल्या सोबत्यापासून जरा दूर उंच गवतात सथपणे चरत चरत शात उभा होता. इतक्यात एक पिवळी लावलचक विजेसारखी रेखा जणू काय आकाशातून येऊनच त्याच्या शरीरात शिरली. त्या प्राण्याच्या पाठीवर वाघाने सरळ, अलगद उडी मारली होती. त्याचे ते भयकर पजे त्याने त्याच्या शरीरात रोवले होते. तरवारीच्या पात्यासारखे आपले तीक्ष्ण धारदार दात वारंवार त्याच्या शरीरात भोंसकून तो सारखे त्याचे लचके तोडीत होता. मैदानावरच्या त्या प्राण्याने मागच्या दोन पायां-वर उभें राहून वाघाला खाली पाडण्याचा प्रयत्न केला. पण पाठीवरचे ते भयंकर ओझे त्याला फेंकून देतां येईना. थोड्याच वेळांत त्या प्राण्याची सारी तडफड बंद झाली. सारा कारभार आटोपला. ठार केलेल्या त्या

प्राण्याच्या मांसावर वाघानें चांगलाच ताव मारल्यावर वाघ वामकुक्षी करावयाला गेला. वाघ गेल्यावर काही वेळानें हा आदिमानव हळूच चोर-पावलानी त्या मारलेल्या जनावरापाशी आला. धारदार दगड घेऊन त्या दगडाने त्याने त्या प्राण्याच्या मासाचा एक मोठा तुकडा पाडला. तो तुकडा अन् दोन लांबलचक मोठी हाडे घेऊन तो घरी गेला.

अशाच आणखी एका दिवशी, त्याची जिज्ञासा इतकी शिगेला पोहोचली की, त्यामुळे मनातील भीति काही काळ बाजूलाच सरली. समोरच्या सूर्यप्रकाशाने तळपत असलेल्या नदीच्या प्रवाहाने त्याचें मन वेधले हळूहळू भोवतालच्या उच उंच वाढलेल्या गवतातून लपतछपत येत, तो नदीकांठी येऊन पोहोचला. नदीच्या काठावर पडून तो तिच्या प्रवाहाकडे किती तरी वेळ पाहत होता. त्या प्रवाहात किती तरी लहान लहान गमतीचे प्राणी शेपट्या हालवीत पोहत हिंडत होते. त्याने नदीच्या पात्रातील एका उथळ जागी प्रवाहात हात घालून त्या गमतीदार प्राण्याना पकडण्याचा प्रयत्न केला पण ते कसे ते हातीच लागेनात! अखेर एक भडकशा रगीत पट्ट्याचा मासा त्याच्या हातात आला. हातांत घेतल्या-बरोबर तो मासा किती वळवळला. त्याने सारखी आपली शेपटी हालवली. पाखे फडफडवली व सुटण्याचा प्रयत्न करू लागला. पण हा आदिमानव पक्का वस्ताद होता. एकदा हाती लागल्यावर तो कसचा सोडतो त्याला. त्याने त्याला चटकन् मटकावूनच टाकला. तसाच कच्चा मटकावला. यानंतर तो मानव वारवार नदीच्या काठावर जाऊन असें संथपणे पाण्यात विहरत असलेले मासे पकडता येतात का पाही. त्याचा तो एक छदच झाला होता.

कधी तो नदीच्या प्रवाहाच्या काठाशी बसून पलीकडे पाहूं लागे. त्याला नदीच्या दुसऱ्या तीरावर सारगाचा कळपच्या कळप चरत असलेला दिसे. तो उड्या मारीत येई. सपाट मैदानात त्याना असे धावत जातांना पाहिले की, त्याला हेवा वाटे. आपणहि त्याच्यासारखे उघड्या मैदानांत जाऊन खूप लांववर उड्या मारीत धांवत जावें असे त्याला वाटे. हळु-हळू त्याला सारखे अस्वस्थ वाटू लागले. एक प्रकारचे असमाधान त्याच्या मनात घर करून वसले. घनदाट जंगल हें त्याचे घर खरें, पण त्यात वृक्षवल्लरीच्या घनदाट छायेमुळें सूर्यकिरणांची तिरीप सरळ येत नसे.

पानाफांद्यांवरून घरंगळत खाली येऊन पोहोंचे. त्यामुळे कसे सारखा काळोख असल्यासारखे उदास वाटे. कंटाळा आला होता त्याला या सारख्या उदासीनतेचा—काळोखाचा. जगलांतील अर्धवट अधेर, त्यानें येणारी उदासीनता पाहिली की, त्याला अगदी दडपल्यासारखे होऊ लागलें. सारखे घावरत वावरायचे, न जाणों कोण कुठून येईल ही भीति—सारखी भीति. कटाळा आला त्याला या सर्वांचा—या भीतीचा.

सूर्यप्रकाशात चमचम करणारे वाहेरचे मैदान त्याला सारखे ' ये ये ' म्हणून खुणावीत आहे असे वाटे. पण त्याला जगलाची सवय झाली होती तशी मैदानाची नव्हती. ते त्याला अनोळखे होते. म्हणूनच ती सवयीची जागा सोडून कोठे तरी वाहेर पडायचे; अज्ञात, अनोख्या ठिकाणी जायचे धैर्य अजून त्याला होत नव्हते. मैदानात जावे असे किती तरी वेळा त्याच्या मनात येई. पण पावले पुढे जात नव्हती. जाऊं की नको, अशा द्विधा मन:स्थितीत तो असता एक दिवस जगलात वणवा पेटला आणि त्या वणव्याने त्याला जगलावाहेर ढकलले. धांवत धांवत, धापा टाकीत तो आपल्या सरावाच्या प्रवाहाजवळ आला. तेथे त्याने कितीदा तरी येऊन मासे पकडले होते. वणव्याला घावरून तो जो आला, तो सरळ नदीच्या प्रवाहातच शिरला. प्रवाहातून चाचपडत जात, मार्ग काढीत त्याने दुसरा तीर गाठला. त्याचे कुटुंब त्याच्या पाठोपाठच होतें.

अशा रीतीने एकदा धीर करून जगलावाहेर पडल्यावर तो फक्त एकदाच मागे आला. सगळ्या वाजूनी जिभल्या काढीत पेटणारा तो वणवा विझल्यानतर जळून काळेकुट्ट झालेल्या त्या जगलात तो गेला व एक पेटलेले लाकूड हातात घेऊन तो परत आला. नव्या जागी, नवें जीवन! नवे साहस! वस्स. त्याकरिता हा एक अग्नि जवळ असला की वस्स! तो आता तसाच सारखा पुढे जाणार. मागे म्हणून पाऊल नाही. सारखा पुढे पुढे!

कां बरे ही पुढे जायची आस! कारण तो माणूस होता ना! मनुष्यप्राण्याच्या आत खोल कुठे तरी काय असते कोण जाणे! पण ते सारखें त्याला पुढे ढकलीत असते. त्याच्या आतून कसली एवढी निकडीची ऊर्मि येते कोण जाणे. पण तिचे ऐकल्याशिवाय त्याला गत्यंतरच नसते. तिचा एकच मंत्र सारखा त्याच्या कानी येतो. ' जा ', ' पुढे जा ', ' नवें

जग शोध !

कोणास ठाऊक हा नवा प्रदेश कसा असेल तो. एखादे वेळी तेथें गेलों नी पहिलीच जागा होती ती बरी होती असेहि म्हणायची पाळी यायची ! कोण जाणे तेथे अन्न मिळते की नाही. मग भुकेनें व्याकुळ व्हावे लागेल. सर्व बाजूनी धोकाहि असेल तेथे. थंडी असेल. त्याला या जागेची काहीच माहिती नाही. नसूदे. त्याला आता काहीच विचार करावयाचा नाही. त्याच्या डोक्यात आता सारखा एकच आवाज घुमतो आहे. ' पुढे जायचे ' ' पुढे जायचे ' आणि तसे त्याला गेलेच पाहिजे. आतूनच त्याला कोणी तरी पुढे ढकलीत आहे.

या सपाट मैदानात हरणे तर आहेतच, पण आणखी किती तरी नवीन प्राणी दिसताहेत. जलद धावणाऱ्या प्राण्याचे कळपच्या कळप त्याच्या दृष्टोत्पत्तीस पडतात. त्याना काय म्हणावयाचे हे अजून त्याला माहीत नाही. ते कळप दिसले की, कुतूहलाने तो त्याच्याकडे पाहत राहतो. त्याना गवत खाताना पाहिले की, याला एक प्रकारे बरे वाटते. हे गवत खातात म्हणजे हे प्राणी आपल्याला खाणार नाहीत एवढे त्याला नक्की कळते व त्याला एक प्रकारे समाधान वाटते. पण येथेहि ती तीक्ष्ण दाताची करवत अधून मधून त्याला दिसतेच. बापरे, येथेहि वाघ येतात का ? कोठे तरी नीट आसरा शोधला पाहिजे, त्याच्या मनात येते.

भटकता भटकता आदिमानवाची स्वारी आता टेकडीवर आली आहे. त्या टेकडीवर उच जागी कोठे एखादे मोठे बीळ, भेग, विवर दिसते का, हे तो बारकाईने पाहतो आहे. असे चागले बीळ मिळाले तर त्यांत सरपटत जाऊन बसता येईल, असे त्याच्या मनात येते. टेकडीचा भिती-सारखा उचच्या उच दिसणारा कठीण पहाड त्याच्यासमोर उभा असतो. पण त्या भितीतच वरच्या भागी एक विवर असावे, अशी त्याला शका येते. खालून फक्त त्या कठीण फत्तरात एक भेग पडली आहे, असेच त्याला दिसते. मोठ्या कष्टाने तो वर चढतो. त्या भेगेजवळ जातो, तो त्याच्या नजरेला एक छान मोकळी गुहा दिसते. ती सुद्धां रिकामी. बहुधा तरस तेथे राहिले असावेत. पण आता तर ते नाहीत तेथे. पण न जाणो ते परत आले तर ?

तो त्या गुहेच्या प्रवेशद्वारापाशी जाऊन फिरून एकदां वारकाईने पाहतो. दगड, गोटे किंवा लहान झुडुपे घेऊन तिचें तोंड चागलें बंद करतां येईल असें त्याला आढळतें. असे केलें की, कोणतेंहि जनावर किंवा चोरीच्या उद्देशाने येणारा त्याच्यासारखा दुसरा मानवप्राणी आत येऊं शकणार नाही. त्याच्यासारखाच दुसरा मानवप्राणी ? हो, त्याला त्याच्या बांधवांचीसुद्धा भीति वाटते. किंबहुना मनुष्य खाणाऱ्या हिंस्र प्राण्यापेक्षा त्याला मानवाचीच जास्त भीति वाटते. जंगलांत राहत असता, मनुष्यप्राण्याविषयीचा त्याचा अनुभव कांहीं फारसा चांगला नाही. आपल्यासारखाच असणारा हा मानवप्राणी हा सगळ्यात धूर्त आणि कपटी शत्रु आहे असे त्याला पुरे समजून चुकलेले असते. तुम्ही झोपलां असे पाहून तो येतो व एखादा सोटा किंवा दगड तुमच्या डोक्यात घालून तुम्हांला ठार करतो. हे सगळे त्याला माहीत असायचे कारण म्हणजे तो स्वत:देखील तसाच वागत असतो. तो पण दुसऱ्या माणसाची शिकार करतो. आणि तो दुसराहि याची शिकार करूं पाहतो. त्याना मानवी मांस पाहिजे असते. हो, तें तरी इतर मासासारखेच मास. त्याची चव मोठी छान असते. शिवाय ते सहजपणे मिळवतां येतें.

तो आणि त्याची सहधर्मचारिणी दोघेहि गुहेचे तोंड कसे बंद करावे या कामांत गुग असतात. अशा वेळी त्याचीं पोरे मात्र भूक लागल्याकारणाने जवळपास त्यांनीं काही बोरासारखी फळे पाहिलेली असतात तिकडे धांव घेतात. ती आदिमानवाची स्त्री मोठेमोठे दगडधोंडे उचलून आणीत असता तिला खूप कष्ट होतात, ती अगदी धांपा टाकू लागते. कारण ते दगड खूपच जड असतात. पण तिची कुडी कुठे एवढी मोठी असते. शरीराने ती जेमतेम चार फूट आठ इंच उंच असेल नसेल; शिवाय ती खूप सशक्त अशी पण नसते. कामाची तर तिला फारशी सवयच नसते. जंगलांत काम असे ते काय असणार ? तसे पाहिलें तर माणसात तरी कुठे सफाई असते. तो सुद्धा तिच्यासारखाच अडाणी व धसमुसळ्या असतो. एवढेच की, तो तिच्यापेक्षां थोडासा उंच आहे. पण तोसुद्धां खूप दांडगा, सशक्त आहे, अशांतील प्रकार नाही. जंगलात त्याच्या साऱ्या स्नायूंना चांगला व्यायाम असा कधीच झालेला नाही. पण आतां आपल्याला खूप मेहेनत करावी लागणार हे त्याला चांगले कळून चुकले आहे.

येथे शत्रु आला तर त्याच्यापासून लपायला आतां झाडेझुडुपें नाहीत. सरळ पळावेच लागेल ते सुद्धा खूप झपाटयाने.

झाले, गुहेच्या तोडाचे काम तर ठीक झाले. आतां ती गुहा निश्चित राहण्याजोगी झाली. सुरक्षितच म्हणा ना. त्या गुहेचे तोड त्यानी जवळजवळ सारे झाकून टाकले आहे. फक्त जायला यायला लहानशी मोकळी वाट ठेवली आहे तेवढीच. पण रात्रीच्या वेळी, एखादा मोठा दगड ठेवून ते तीहि वाट बद करून घेतील, नाही तर तेथे शेकोटी पेटवतील. शेकोटी पाहिली की जनावरे घावरतात. आता राहायला घर झाले. तशी स्त्री वाहेर फळे गोळा करायला निघाली. पुरुष मात्र टेकडीच्या माथ्यावर जाण्याकरिता टेकडी चढू लागला. त्याला वरून खाली सपाट मैदानांत काय दिसते आहे ते पाह्यचे आहे .

काय विलक्षण सुदर दिसते आहे खालचे मैदान ! पाहता पाहता त्याचे डोळे विस्फारू लागतात. एक लहानशी नदी वाहते आहे. तिच्या काठी वृक्षराजी उभी आहे. वाकीचे सारे मैदान कसे कोरडे आणि मोकळे. त्याला हरणे आणि मृगशावके नदीकाठी पाणी पीत असलेलीं दिसतात. भुकेल्या नजरेने तो त्याच्याकडे पाहू लागतो त्याला हरणाला मारता येत नाही निदान अजून तरी नाही. अतरावरून ठार करता येईल असे कोणतेच शस्त्र त्याला अद्याप माहीत झालेले नाही. खोल खड्डे खणून त्यात जनावरे पडतील असे करावयाचे ही युक्ति पण त्याला अजून सुचलेली नाही. सुचेल, तीहि सुचेल, पण त्याला अजून अवकाश आहे. सध्या तरी तो दुसऱ्या कोण्यातरी हिंस्रपशूने म्हणजे वाघ, सिह, किवा लाडगा यापैकी कोणीतरी एखादे जनावर मारण्याचीच वाट पाहत असतो. खरे म्हणजे हे प्राणी स्वत:ची भूक शमवण्याकरताच इतर जनावराना मारीत असतात. पण ते मारतात तेवढा सगळा प्राणी फस्त करू शकत नाहीत. त्यापेक्षा किती जास्त मास उरते, म्हणूनच पहाटेच्या प्रहरी तो एखाद्या जनावराची--हरणाची प्राणातिक आरोळी येते की काय अशी वाट पाहत वसतो. ती आरोळी आली की, जनावराचे मास मिळणार हे निश्चित झाले असे त्याला कळते. तरवारीच्या पात्यासारख्या तीक्ष्ण दाताच्या. पशूपासून सधि साधून तरस मास चोरील. आणि मग त्याच्यापासून हा आमचा आदिमानव. टेकडीच्या माथ्यावर

उभें राहून खालच्या सपाट मैदानाकडे तो किती तरी वेळ पाहात होता. मग तोहि स्वारी रानफळें गोळा करायला गेली. खरें म्हणजे बोरासारख्या लहान लहान फळांनीं त्याचें पोट विलकूल भरत नाहीं. पण तो कधीं तक्रार करीत नाहीं. भूक तशीच अंगावर काढायची त्याला संवय झालेली आहे. जेव्हां मिळेल तेव्हां खायचें. तोंपर्यंत वाट पाह्यची, ही गोष्ट आतां-पर्यंत त्याला चांगलीच शिकावी लागली आहे. भुकेनें व्याकुळ होऊन वाट पाहतां पाहतां त्याच्या डोळ्यांपुढून नाना मनश्चित्रें सरकत जातात. एखादें हरीण मरून पडलेलें आहे. त्याची मान हिंस्र घावानें फाटून निघाली आहे. त्यांतून भळाभळा रक्त वाहतें आहे. असें चित्र डोळ्यांसमोर आलें कीं, त्याच्या तोंडाला अगदीं पाणी सुटू लागतें. भटकतां भटकतां, त्याला जेव्हां एखादी तीक्ष्ण चकमकीची कपार दिसते तेव्हां तो चटकन उचलतो आणि आपल्या गुहेंत घेऊन जातो. 'बरा आहे हा धार-दार दगड. वाघ, सिंह, तरस यांचें खाऊन संपलें कीं जें मांस राहील तें फाडून घ्यायला चांगला उपयोग होईल याचा.' त्याच्या मनांत चटकन विचार येऊन जातो.



# ९. मॅमथ विरुद्ध मानव

चाऊ-काऊ-टाईनच्या गुहेतून निघालेल्या अवशेषांनीं जें आदिमानवाचे चित्र शास्त्रज्ञासमोर उभे होत होतें ते काही मोठें लोभसवाणे नव्हते. पण सत्य ते सांगणे शास्त्रज्ञाना प्राप्त होते. तो ताठ उभा राहणारा चिनी माकडमानव (Sinanthropus) नरमांसभक्षी असावा अशी वऱ्याच शास्त्रज्ञाना दाट शंका होती. कारण त्या गुहेत मनुष्याच्या तंगडीची जी हाडे सापडली होती ती कोणीतरी मुद्दाम फोडली असावीत, असे दिसून येई. त्याचप्रमाणे तेथे सापडलेल्या कवटयावर पण मुद्दाम घाव घालून फोडण्याचा प्रयत्न केलेला असावा, असे दिसे. या साऱ्या प्रकारावरून एकच तर्क करणे संभवनीय होते आणि तो म्हणजे तंगडीच्या हाडातील अगरस चोखण्यासाठी त्या मुद्दाम फोडलेल्या असाव्यात त्याचप्रमाणे मेंदू खाण्याकरता कवटयावर पण घाव घालून त्या फोडण्यात आल्या असाव्यात

एका शास्त्रज्ञाची मजल तर फारच पुढे गेली होती. तो म्हणे ' हा ताठ उभा राहणारा चिनी माकडमानव (Sinanthropus) केवळ आपल्या शत्रूलाच खात असावा असे नसून, कधी कधी खुद्द त्याचीं वायकापोरे मनासारखी वागली नाहीत किंवा त्याचा त्याला भयंकर राग आला तर त्यांच्यावरहि तो ताव मारीत असावा.'

सर्वसामान्य लोकानी आपल्या पूर्वजाचे जेव्हां हे वर्णन वाचलें तेव्हा त्याचें मन भीतीने व घृणेने थरारून गेले. एक मानव सदैव दुसऱ्या मानवाला खायला टपलेला असावा, ही कल्पनासुद्धा त्यांना सहन होईना. अशा भयंकर घृणास्पद आदिपूर्वजापासून शहारून त्यांचे मन माघार घेऊं लागलें. नीआडरथालच्या मानवाची कल्पना त्यानी अशीच झिडकारली होती. आपला पूर्वज असा विद्रूप माकडासारखा माणूस असावा, ही कल्पना त्यांना सहन होत नव्हती. पण आतां हा पेकिंगला सापडलेला मानव लक्षात घेतला की, नीआडरथालला सापडलेला मानव म्हणजे अगदी एक सभ्य गृहस्थ असे म्हणायची पाळी आली. ताठ उभा राहणाऱ्या या चिनी मानवाची (Sinanthropus) जसजशी त्याना अधिकाधिक माहिती मिळू लागली तसतसे त्यांचे मन त्यावरून उडत चालले. कदाचित् त्याचा परिणाम म्हणून असेल, नीआडरथाल मानवाविषयी जसजशी माहिती मिळत गेली, तसतसा त्याना एक प्रकारचा आदर वाटू लागला तो दिसायला सुरेख नव्हता हे निश्चित. पण ज्याबद्दल आदर वाटेल असा होता हेहि तितकेंच खरे. त्याला सुरेख कसे म्हणायचे? त्याच्या भिवयावरची ती माकडासारखी उचललेली कडा, ते खोलगट उतरलेले कपाळ, मागे सरकलेली हनुवटी, मोठे डोके, एखाद्या पिपासारखी छाती, आखूड पाय, लाव हात, मोठे मोठे पजे आणि मोठमोठे पाय. छे, हे लक्षात घेतले तर तो दिसायला अजिबातच सुरेख नव्हता. पण त्याची करणी वाईट नव्हती. उलट चागलीच होती. अखेर सुदर कृति करणाराच सुदर नसतो काय? सारा पाच फूट चार इच उंचीचा माणूस पण हिमयुगाच्या कडक बर्फासारख्या चावणाऱ्या थंडीत शेकडों हजार वर्षे कशी काढली हे लक्षात घेतलें की, त्याचे कौतुक वाटते. कसें काढले असेल त्याने जीवन! त्याच्यासारख्या लहान पांच फुटी माणसानें मॅमथसारख्या प्रचड हत्तीसारख्या प्राण्याची शिकार करायची नुसते धाडस करणे — केवढे जबरदस्त साहस होतें ते!

१९०१ मध्ये, हजारों–लाखों वर्षांपूर्वी बर्फात गोठून राहिलेल्या मॅमथ (एक प्रचंड हत्तीसारखा पूर्वकालचा प्राणी) जेव्हा सैबीरियांत प्रथम सांपडला तेव्हां लोकांना मॅमथ म्हणजे केवढा प्रचंड प्राणी होता याची पहिल्याने कल्पना आली. राक्षसीच प्राणी होता

तो. त्याला नीआंडरथालमध्ये सापडलेला मानवप्राणी मारीत असे, ही गोष्ट कळल्यापासून त्या मानवाविषयी लोकांचा आदर चांगलाच वाढला. मॅमथ म्हणजे काय लहान का 'धूड' होते ? अत्यंत शक्तिमान असलेल्या बदुकीनेसुद्धां त्याला मारणे जमले नसतें. अशा वेळीं नीआंडरथालच्या मानवाने त्याला मारावे ! असे काय होते त्याच्याजवळ मारायला ? दगड ? कमाल आहे बुवा या मानवाची !

हा मॅमथ सांपडला, तेव्हा चोहोंकडे फारच मोठा गाजावाजा झाला. पृथ्वीवरचे हिमयुग म्हणजे काय होते याची त्यामुळे लोकाना पुरी पुरी कल्पना आली. हिमनदीच्या (Glacier) माथ्यावर पाय देऊन चालणारा प्राणी होता तो. याच प्राण्याच्या हाडाची हत्यारे व शस्त्रें नीआडरथालकालीन मानव वनवीत असे, असे सशोधकाना आढळून आले होते. हा सैबीरियात सापडलेला मॅमथ म्हणजे त्याचा नुसता सांगाडा नव्हता, तर खूप खोल वर्फात तो गोठून राहिल्याकारणाने रक्त, हाडे, मास, सारे जसेच्या तसे म्हणजे तो जिवत असताना जसा दिसत असेल तसा राहिला होता. हिमनदीची मोठी भेग वर्फाने झांकलेली असता किती हजार वर्षांपूर्वी विचारा त्या भेगेत गडप झाला आणि हिमनदीच्या प्रवाहात गोठून तसाच्या तसा राहिला हे सागणे महा कर्म कठीण होते.

सैबीरियाच्या हिमाच्छादित जमिनीतून हत्तीचे डोकें आणि पाय वाहेर डोकावतो आहे ही वार्ता जेव्हा पहिल्यादां रशियन शास्त्रज्ञाना कळली तेव्हा ते अगदी हुरळून गेले. हा हिमयुगीन मॅमथ असावा असा त्यानी तावडतोव कयास वाधला निसर्गाच्या या हिम-आगराने काय चमत्कार घडवून आणला होता. वर्फात पुरला गेल्याकारणाने तो अगदी जसाच्या तसा सांपडला होता. हा अनादि पूर्वकालचा ठेवा किती अनमोल होता तावडतोव शास्त्रज्ञानी सरळ तिकडे धाव मारली. त्याला वाहेर काढून सर्व-वस्तुसंग्रहालयात ठेवण्याची त्याची इच्छा होती.

पण ते काही सोपे काम नव्हते. महान् कठीण कर्म होते. वर्फातून वाहेर पडलेला त्याचा भाग वर्फावाहेर आल्याकारणाने सडून त्याला दुर्गंधी सुटली होती. ती इतकी की, तेथे जवळ जाणे दुरापास्त होते. खरें सांगायचे तर या दुर्गंधीमुळेच लोकांचें लक्ष त्याच्याकडे गेले.

भोंवतालचे कित्येक मैलांवरचे कुत्रे हत्तीच्या मांसावर तुटून पडायला जमले होते. त्यांच्या भुकण्यानेच लोकांचे तिकडे पहिल्यांदां लक्ष गेले.

या सर्व गोधळामुळे प्रत्यक्ष तेथे गेल्यावर आपल्याला या प्राण्याला वाहेर काढणें कसे जमायचे ? सोडावा लागतो की काय सारा बेत, असे त्या काळच्या शास्त्रज्ञांना वाटू लागले. पण तो प्राचीन अवशेष इतका वहुमोलाचा होता की, आपला बेत तर त्यांना सोडवत नव्हता. त्यांनी खणायला सुरुवात केली. त्याला बर्फापासून सुटा केला व वाहेर काढला. अखेरीला त्याचे सर्वच्या सर्व शरीर बाहेर निघालें.

वरें, एवढे सांगतां तुम्ही तर तो प्राणी होता तरी कसा ? शरीराच्या आकाराने पाहिले तर त्याना माहीत असलेल्या हत्ती या प्राण्यापेक्षां काही तो फारसा वेगळा नव्हता. त्याचे कान मात्र नेहमीच्या हत्तीच्या कानाएवढे नसून लहान होते. त्याच्या मानेवर चरबीचे एक मोठे वशिड होते. शिवाय आपण नेहमी पाहतों त्याप्रमाणे त्याचे शरीर शेपटाकडे हळुहळू खाली खाली न जातां एकदम खाली उतरले होते. पण याहून गमतीची गोष्ट ही की, त्याच्या शरीरावर पिवळ्या लोंकरीचे एक आवरण होते. या लोकरीच्या आवरणावर फिरून त्याला गजासारख्या पिगट रगाचे चांगलेच लाब लांब केस होते. या केसांची लांबी तर कांही ठिकाणी १४ इच भरली. त्याच्या डोक्यावर लांव लांव जटाची टोपी असावी, असे दिसत होते. मानेवरहि चांगलीच आयाळ होती; पण त्याशिवाय त्याच्या गालावर, हनुवटीवर, खांद्यावर, दोन्ही वाजूना आणि पोटावर केसाचे चांगलेच झुवके होते.

हे सर्व केसाळ व लोकरीचे आवरण पाहिल्यावर हिमयुगांत हा प्राणी कसा गरम राहत असावा याचे शास्त्रज्ञांना कोडे उलगडले. पुढें त्याला वाहेर काढल्यावर त्याचे कातडे जेव्हां हे लोक काढू लागले तेव्हां त्याच्या सर्वांगावर असलेल्या या दोन आच्छादनानंतर असलेल्या कातडीच्या खाली ४ इंच जाडीचा सर्व गभर चरबीचा थर आहे असे त्यांना आढळून आले. 'अरेच्चा, तरीच हा हिमयुगाच्या एवढ्या थंडीत राहू शके,' शास्त्रज्ञांना कोडे उलगडले.

गोठून गेलेल्या मॅमथचें सारे मांस कापून काढून त्यांनीं जेव्हां त्याच्या पोटाचा कोथळा वाहेर काढला तेव्हां त्याच्या आंतड्यात

त्यानें जीव जाण्यापूर्वी जें काय खाल्ले होते ते तसेंच न पचतां राहिलेलें होते असे आढळले. जवळजवळ २७ पौड ते अन्न भरलें. त्यांत फरचे कोन, झाडाचा पाला आणि फर व पाईनचा पाला—तुकडे असे आढळून आले. शिवाय दलदलीच्या प्रदेशात उगवणारें कांहीं गवतहि होते. जंगली थाईम ( एक प्रकारची वनस्पति ) होते. दोन प्रकारची शेवाळे पण त्यांत आढळली. किती तरी जाडशी फुले पण त्यात मिसळली होती. मॅमथच्या पोटातील या पदार्थावरून नीआडरथालकालीन माणसाच्या वेळी भोवतालचा देखावा एकदर काय असावा याची शास्त्रज्ञाना चांगलीच कल्पना येऊ शकली.

तरी पण सगळचात आश्चर्य वाटत राहिले ते मात्र मानवप्राण्या-सबंधी. तो या भोवतालच्या हिमयुगात भयकर थडीत कसा बरे जगला असेल ? कारण अशा थडीत झाडे देखील, जी चागलीच टणक व दमदार होती तेवढीच टिकाव धरीत मॅमथची तर देवाघरीच अशा वादळी हवेत टिकाव करून राहील अशी घडण झाली होती. पण मानवाजवळ काय होते ? त्याचे उघडे शरीर व त्यावर इकडे तिकडे जरा केसाचे झुवके यापलीकडे जन्मत: अशा थडीपासून वचाव करणारे असे काहीच सरक्षण त्याच्याजवळ नव्हते.

हा वर्फात गोठून गेलेला मॅमथ सापडल्यानतर नीआडरथाल-कालीन मानवावद्दलचा लोकाचा आदर वाढतच चालला. आणखी दुसऱ्या एका सशोधनानतर तो आदर अधिकच वाढत जाऊं लागला.

फ्रान्सच्या दक्षिण भागात ला शापेल ओ मां ( La Chapella-auk-Saints ) या नावाच्या खेडेगांवाच्या वाहेर एका टेकडीच्या अंगाला एक गुहा होती. १९०५ साली तिघा धर्मोपदेशकानी ती गुहा खणून पाहवयाचे ठरविले. अगदीच उथळ होती ती गुहा. तिची सर्वात जास्त असलेल्या ठिकाणी उची मोजली तरी ५ फुटापेक्षा जास्त नव्हती. मात्र गुहेच्या माथ्यापर्यंत सर्वत्र घाण भरली होती. न जाणो यातील घाण त्या नीआडरथाल मानवानेमुद्धा टाकलेली असायची ! त्याच्या मनांत आले.

सुदैवाने त्याचा कयास अगदीं वरोवर ठरला. पुरीं तीन वर्षे ते त्या गुहेत खणीत होते. त्यांतील एकेक गोष्ट ते माती वाजूला करून

पाहत होते. सर्वच माती नीट चाळून पाहत होते. सारी घाण बाजूला करून ते आता गुहेच्या अगदी तळजमिनीपर्यंत पोहोचले. त्याना त्या गुहेत नीआडरथाल माणसाच्या किती तरी गोष्टी मिळाल्या होत्या. त्याची चकमकीच्या दगडाची हत्यारे, त्याने खाऊन टाकलेल्या किती तरी प्राण्याची हाडे हीहि त्याना सापडली.

पण त्याच्या या प्रयत्नाचे सर्वात मोठे बक्षीस अजून हाती आलेच नव्हते.

त्या तिघाहि धर्मोपदेशकांनी आपले काम जवळ जवळ संपवीत आणले होते. आता फक्त गुहेची तळजमीन तपासावयाची होती. ती जमीन चागलीच कठीण व पाढरट रगाची होती. आता ती संपवली की, गुहेला रामराम ठोकावयाचा असा त्याचा बेत होता. तिघेहि ती तळजमीन मोठ्या बारकाईने पाहत होते. इतक्यात त्याच्यांतील एकजण एकदम चकित झाल्यासारखा होऊन उद्गारला, ‘ अरे हे काय, इथे तर जमीन मध्येच चागली तोडल्यासारखी हाताला लागते आहे.’

असे उद्गार काढून त्याने आपल्या हातातील दिव्याचा झोत त्या जागेवर पाडला. दुसऱ्या दोघानीहि त्याचे अनुकरण केले. विस्मित झाल्यासारखे ते त्या जागेवरून आपले हात फिरवू लागले.

तेथे कोणी तरी खड्डा खणून तो मागाहून बुजवून टाकला असला पाहिजे, हे उघड दिसत होते. नीआडरथाल माणसाशिवाय कोण बरे करणार हे. खास हे त्याचेच काम. पण हे भोक त्याने कशाला पाडलें ? कुणाला पुरले तर नाही इथे ? आपल्या पायाखाली एखाद्या प्राचीन मानवाची हाडे तर नाहीत ना ? कुणाची बर ती असतील ? अर्थात् नीआडरथाल मानवाची !

ही कल्पना मनात येताच ते मोठ्या उत्साहानें ती जमीन खणू लागले. थोड्याच वेळात आपला तर्क खरा असल्याचे त्याना आढळून आले. त्याच्यासमोर एक सागाडा पडलेला होता. सर्व जगातील अत्यत प्राचीन असें तें दफन ते पाहत होते.

तो सागाडा पाठीवर पडलेला होता. त्याचे डोके पश्चिमेला होतें. त्याचा डावा हात सरळ ताठ होता. उजवा हात वांकून डोक्याजवळ आलेला होता. दोन्ही पायाना जरासा वांक होता. डोक्याच्या सभोंवती दगडांची

एक रांग बसवली होती. शरीराभोंवतीं चकमकीच्या दगडाच्या तीक्ष्ण कपारी ठेवलेल्या होत्या. सांगाड्याच्या अंवतीभोंवतीं चपटीं व लांब अशी इतर प्राण्याची हाडे ठेवलेली होती. अश्मयुगांत या हाडांतील सत्त्व चोखून खायला त्या आदिमानवाला फार आवडे. डोक्याजवळ मोठ्या बैलाची किवा गव्याची हाडे होती.


त्या तिघाहि धर्मोपदेशकांनी तो सांगाडा अत्यंत काळजीपूर्वक तपासला. तो माणसाचा सागाडा होता याबद्दल शकाच नव्हती. पन्नास किवा पंचावन्न वर्षे वयाचा तो मनुष्य असावा. आकाराने ठेंगूच असावा तो माणूस. त्याला अगदी ताठ उभे राहतांहि येत नसावे. त्याचा तो मोठा चेहेरा इतका पशूसारखा दिसत होता की, तो पाहत असता तिघांच्याहि अगावर शहारे उभे राहिले. जबड्याच्या खालचा भाग जनावराच्या नाकातोंडासारखा जरा पुढे आलेला होता. डोळ्याच्या खोवण्या चागल्याच मोठ्या व खोल होत्या. त्यावर भिवयाच्या जागी उचच्या उंच हाडाची कडा तीहि कपाळावरून थेट या बाजूची त्या बाजूला गेलेली.

त्या अज्ञात व्यक्तीच्या कुरूप चेहऱ्याकडे ते किती तरी वेळ पाहत होते. सध्यांच्या मनुष्यप्राण्यापेक्षा वेगळ्या असणाऱ्या, वेगळ्या दिसणाऱ्या या मानवी प्राण्याने काय केले ? तो कसा होता ? ह्याची कोण सागणार कहाणी ? मात्र एक गोष्ट निश्चितपणे स्पष्ट होत होती. तो कदाचित् पुष्कळ अंशी पशूसारखा दिसत असेल, पण त्याच्या डोक्यात जे विचार चालत होते तसे जनावरांत कधीच आढळून येणे शक्य नाही. तो मनुष्य आणि ज्यांनी त्याला मोठ्या मानानें चिरविश्रांतीकरितां येथे झोपवून ठेवले ती माणसे, पशूपेक्षा कितीतरी वरच्या कोटीतील होती. त्याच्या मनात कल्पनेचा उद्‌गम झालेला होता. त्यांच्या विचारांना पंख फुटलेले होते. भारत व मिसर देशातील प्राचीन लोकाप्रमाणे नव्हे, खुद्द त्या तिघा धर्मोपदेशकाप्रमाणे मृत्यूनतर असणाऱ्या आत्म्याच्या अस्तित्वावर त्याचा विश्वास होता. त्याकरितां मृत व्यक्तीभोंवती उपयोगी पडतील अशी साधनें व अन्न ठेवण्यांत आलेलें होते. मृत्यूनंतरच्या अज्ञात प्रदेशांत त्याला तसेच हात हालवीत जायची पाळी येऊं नये म्हणून त्यानीं काळजीपूर्वक त्याची सगळी सोय पाहिली होती.

ला शापेल ओ सॉ खेडेगांवांत सांपडलेल्या या मृताच्या अवशेषांची

बातमी वर्तमानपत्रांत आल्याबरोबर शास्त्रज्ञ, सामान्य माणसें, प्रत्येकजण त्याबद्दल बोलूं लागला. नीआंडरथाल मानव अशा कोटींतील असेल याची त्यांना कधीं शंकासुद्धां आलेली नव्हती. तो उत्तम शिकारी होता ..... कबूल. थंडीपासून आपलें त्याला संरक्षण करतां येत होतें.... एकदम कबूल. पण त्याची विचारशक्ति याच जगाचा नव्हे तर मरणोत्तर जीवनाचा विचार करीत असे? छे:, ही अगदींच आश्चर्यचकित करून सोडणारी गोष्ट होती.

नीआंडरथाल माणसाबद्दल मिळालेल्या या माहितीनें तो कशानें का होईना, अगदीं सध्यांच्या मानवाजवळ येऊन उभा राहिला. दोघांतील या साधर्म्यानें हजारों वर्षांचा कालावधि क्षणांत विरून जावा असें झालें. जणूं काय तो कालच आपल्या जरा आधीं राहत असावा अशा आपुलकीच्या नात्यानें लोक त्याच्याकडे पाहूं लागले.



# १०. हिमयुगाचा राजा

नीआंडरथाल मनुष्य पृथ्वीवर वावरत असल्याला आता जवळजवळ १ लाख ३० हजार वर्षे होऊन गेली असतील.

'पण ध्रुव प्रदेशासारख्या या कडक थंडीत कोणाला बरे राहावेसें वाटेल आणि कशाकरता?' लोकाना या गोष्टीचे मोठे आश्चर्यच वाटत होते. 'शिवाय नीआंडरथाल माणसाला तो राहत होता ती जागा फारशी पसंत नव्हती असे क्षणभर मानले, तर मग तो चांगल्या उष्ण प्रदेशात का नाही गेला?'

अशा प्रश्नाला शास्त्रज्ञाचे उत्तर असे की, 'अगदी तुम्ही म्हणतां तसेच त्याने केले.' या आदिमानवाने पहिल्यादा युरोपात पाऊल टाकलें तेव्हा तेथे थंडी नव्हती. मध्या आहे त्यापेक्षा युरोपची हवा कितीतरी छान ऊबदार होती. हिमनदाच्या मधला (Glaciers) तो काळ होता

तीनदां हिमनदांचा (Glaciers) प्रादुर्भाव झाला आणि तीनदा ते पार वितळून गेले होते. नीआंडरथाल आला तेव्हां तर युरोपची हवा इतकी गरम आणि ऊवदार होती की, तेथल्या नद्याच्या प्रवाहातून पाणघोडे (Hippopotami) डुबत वसत. सरळ मुळके असलेले हत्ती, गवे, जगली घोडे आणि गुरे येथल्या कुरणांत चरत होती. युरोपची हवा सुदर असून शिकारहि खूप सांपडे.

'असो. हे जरी सारे असले तरी खरोखरी तो इकडे कां आला हे आम्हांला नाही सागता येत.' विचारानी गोंधळून गेलेल्या मुद्रेने शास्त्रज्ञ सांगू लागले. 'खरं म्हणजे पूर्वेकडे तो चागला सुखी होता. त्या दिवसात, मुळात, मनुष्यप्राणी सख्येने अगदीच कमी असल्याने तो कुठेहि असला तरी त्याचे छान चालत असे. रानात पाहिजे तेवढी शिकार मिळत होती. आणि खायलाहि भरपूर मिळे.'

तेव्हा काही विशेष कारण घडून तो इकडे आला असे नाही वाटत. निदान प्रत्यक्षात तरी तसे कांही कारण घडले नाही हें निश्चित. वरं, त्याला त्याच्या शत्रूनी पिटाळल्याने तो इकडे आला असेहि म्हणवत नाही. खायला मिळेनासे झाले म्हणून पोटासाठीहि तो इकडे आलेला नाही. त्याचें येण्याचे कारण कांही तरी अगदी वेगळेच असावे. इतके की, त्याचे त्यालासुद्धा ते सागता येत नसावे. त्याच्या अतरात खोल दडून बसलेले – त्यालाहि स्पष्ट समजत नसलेले असे काही तरी ते कारण असावें. बहुधा राहत्या जागी तो कमालीचा अस्वस्थ झाला असावा. 'कुठे तरी जावे, आहे त्या ठिकाणापासून दूर दूर' असे त्याच्या मनाने घेतले असावे. या सपाट मैदानापलीकडे काय आहे? या टेकड्या दिसतात याच्या पलीकडल्या बाजूला काय असावे? हे जाणून घेण्याची उत्सुकता त्याला लागली असावी. ही उत्सुकता, हे कुतूहलच त्याला आंतून पुढे ढकलीत होते. 'हो, तेथे पुढें गेले की, काय आहे हे नक्की कळेल. शिवाय खायलाप्यायलाहि भरपूर आहे की नाही हे पाहता येईल.' असे नेहमी त्याला वाटे.

खरोखर तो मनाने भटक्याच होता. खुल्या मैदानांची त्याला आवड होती. फार फार प्राचीन काळी त्याचे पूर्वज जसे मैदानांत जायला भीत तसा तो आता भीतहि नव्हता.

त्याच्यांत आतां किती तरी बदल झालेला होता. एक काळ असा

होता की, तो स्वजातीच्या मानवप्राण्याविरुद्धच हात उगारून उभा असे. पण आतां तेहि बंद झालें होतें. पूर्वीच्या काळी तरसानें, वाघ किंवा सिंह यांनी टाकलेलें मांस हा हळूच खाण्याकरितां चोरायचा. पण आतां त्याला तसे करावयाची गरजच उरलेली नव्हती. तो चांगला पट्टीचा शिकारी झाला होता. शिवाय आता तो एकटा-दुकटा जाऊन शिकार करीत नसे. त्याला कारणहि होते तसेंच. ज्या जनावराची तो शिकार करी ती इतकी मोठी असत की, स्वसरक्षणार्थ बऱ्याच जणांनी एकत्र जमून शिकार करणेंच त्याला सोयीचे होई. शिवाय त्यामुळे सर्वांची चगळ होई ती गोष्ट वेगळीच. एकत्र टोळी जमून शिकार करण्याच्या या पद्धतीमुळे बायको, मुले यासबंधापलीकडे त्याची आपुलकी गेली होती. त्याला मित्र, सवंगडी मिळाले होते. मनुष्य जेव्हा त्याच्या सवगड्यासह मैदानांत उभा राहतो तेव्हा त्याच्या मनाला भीति शिवत नाही.

त्याच्या अंगात एवढे धैर्य सचारायचें आणखीहि एक कारण आहे. आता त्याच्याजवळ शस्त्र आलेले आहे. गारगोटीच्या कपारीपासून आपलीं हत्यारे, अवजारे कशी करावी हे त्याला माहीत झालेले आहे. ती अवजारे वापरून त्याने आतां एक भाला केलेला आहे. एखादी लांब काठी घेऊन चकमकीच्या दगडाच्या धारदार कपारीने तो प्रथम ती चांगली गुळगुळीत करतो. त्याला अगदी एक तीक्ष्ण टोक आणतो. विस्तवावर धरून तो तें टोक असे चांगले कठीण व टणक बनवतो की, झाले त्याचे शिकारीचे हत्यार. ते इतके तीक्ष्ण असतें की, कोणत्याहि चामडीला भेदून तें शिरूं शकते हे त्याला आता माहीत झालेले आहे. कधी कधी तर तो कपारीचें तीक्ष्ण टोकच भाल्याच्या शेवटी बसवतो. तो भाला तर फारच छान होतो.

गारगोटीचा दगड ! काय मजेदार दगड आहे हा! तो काढायला कांही मोठ्या कातळाचा तुकडा पाडावा लागत नाही. या चुनखडीच्या जमिनीत तसल्या वेगवेगळ्या आकाराच्या गारगोटीच्या कपारी त्याला किती तरी मिळतात नेहमीं. किती टणक असतो हा दगड. जगात याच्या-एवढे टणक दुसरे कांही नसेल. हा दगड इतका टणक खरा, पण त्याचा तुकडाहि तसाच सहज पाडतां येतो. चमचम करणाऱ्या या दगडांपैकीं एखादा दगड हातांत घेतला, आणि दुसऱ्या चकमकीच्या दगडाने त्याच्या टोंकावर मारलें की कपच्या उडू लागतात. अशा खालच्या वरच्या बाजूच्या

साऱ्या कपच्या उडवून दिल्या की, आंतून जो गाभ्याचा दगड बाहेर पडतो तो चांगलाच टणक व जड असतो. तो हातांत नीट धरला की कांहीहि छान ठेचतां येते किंवा त्याने खणूनहि काढतां येते. तोच दगड चांगला निमुळता व तीक्ष्ण करून भाल्याच्या टोकालाहि तो बसवतो.

पण आतल्या या टणक गाभ्यापेक्षा तो वरच्या ज्या कपच्या उडवतो त्याच त्याला जास्त उपयोगी पडतात. त्या कपच्यांतून तीक्ष्ण धारेची किती तरी उपयुक्त हत्यारे त्याला बनविता येतात. त्या कपच्यांनी तो काहीहि खरडून काढतो. कपचीच्या टोंकाने तो कशालाहि भोक पाडू शकतो. त्याचे पूर्वज या कपच्याचा फारसा उपयोग करीत नसत. आतला टणक गाभाच काय ते घ्यावयाचे. पण आता हा आदिमानव टणक दगड, जड अवघड कामाला वापरतो. आणि त्याच्या इतर साऱ्या कामाला कपारीचा उपयोग करतो. सुरीसारखे काही कापायचे असेल, काही खरवडून काढायचे असेल, कुठे भोक पाडायचे असेल, तर तीक्ष्ण मोठ्या कपारीसारखे दुसरे काहीहि नाही.

त्याला त्याच्या या हत्यारांचे किती महत्त्व वाटते हें नुसतें सांगून समजणार नाही. खरे म्हणजे ही हत्यारे म्हणजे त्याचें जीवन आहे. ती नसतील तर त्याला शिकार करता येणार नाही. म्हणूनच जेव्हां तो खात पीत नसतो, निद्राधीन नसतो किंवा शिकारहि करीत नसतो, तेव्हां त्याच्या हाताचा एकच चाळा चालू असतो. तो खालीं बसतो आणि सारख्या कपच्या काढीत असतो. नवा चकमकीचा दगड कोठे मिळतो का ते पाहण्याकरिता त्याची नजर सारखी भिरीभिरी शोध घेत असते.

या कपारीचे अगदी लहान, बारीक तुकडे सुद्धा त्याच्या उपयोगी पडतात. त्याने विस्तव पेटवता येतो. हो, आता तो विस्तव कसा पेटवायचा ही गोष्ट शिकला आहे. त्याच्या पूर्वजांना अग्नि जसा सारखा जिवत ठेवावा लागे तसा ठेवण्याची त्याला आता जरूरी भासत नाही. पूर्वीच्या काळी एखाद्या जागी अग्नि पेटवावयाचा असेल तर ज्या ठिकाणी अग्नि जिवत असेल त्या ठिकाणचे एक पेटते लांकूड तिकडे नेऊन तो पेटवावा लागे. त्याचे पूर्वज असाच अग्नि तयार करीत. पण आतां हा आदि-मानव; एक चकमकीचा तुकडा हातांत घेतो व त्यावर जोरानें दुसरा

मारतो. की लगेच अग्नीची गरम ठिणगी उडते. वाळलेलें गवत, शेवाळ लाकूडचुरा त्याने आधीपासून गोळा करून ठेवलेलाच असतो. त्यात ही ठिणगी पडली की, अग्नि लगेच प्रज्वलित होतो. पाहिजे तेव्हां अग्नि समोर उभा कसा करायचा हें त्याला आतां माहीत झालेलें आहे.

नीआंडरथाल मानवाजवळ स्वतःची अशी आता शस्त्रें झाली असल्याकारणाने युरोपच्या प्रदेशात त्याला छानच शिकार मिळते. तो त आतां तेथला राजाच बनला आहे. आता जीवनांत आणखी काय हवें? आता त्याला निवाऱ्याला झाडाच्या फांद्या आहेत. पाघरायला हरणाजिन आहे, ते मोठ्या झोकांत तो आपल्या खांद्यावरून पाघरतो. जंगलांत छान शिकार मिळते ती तो घरी आणतो. त्यामुळे खायला मुबलक असतें शिकारीचे मास शिजवायचे म्हटले तर आतां त्याच्यापाशीं विस्तवहि आहे. सारे कसे मनासारखें! त्यामुळे त्याला समाधान वाटते. हजारो वर्षे तो जिकडे नजर फेंकील त्या प्रदेशाचा स्वामी होऊन बसला आहे.

पण आताशा तो भूभाग दिवसानुदिवस जास्त थड होऊं लागला आहे. थडीचा मोसम किती तरी लवकर सुरू होतो आणि दीर्घ काल टिकतो. पाण्यानें सजड झालेले ढग सारखे आकाशांत विहरत असतात. खरे म्हणजे दर वर्षीं पडत जाणारा हा फरक तसा चटकन् कळत नाही. फार काय, शतकानुशतकें तो चालत आला तरी लक्षांत येत नाही. पण होतो आहे खरा. गेली कित्येक हजारो वर्षे येथील सारेच वातावरण हळुहळू बदलत आलेलें आहे. जास्त खराब होते आहे. हवा दमट आणि ओलसर अशी होत आहे. दिवसानुदिवस अधिकाधिकच दमट होते आहे. थंड थड, पण होते आहे. छे, भलतीच थडी ही.

आकाशांतून पडणाऱ्या हिमसेकाच्या राशी दिवसानुदिवस उंचच्या उंच होत जात आहेत. एकमेकांवर सांचत गेल्याकारणानें त्या एकत्र घट्ट बसून त्यांचें टणक बर्फ होते आहे. उत्तरेच्या बाजूला हे टणक बर्फाचे थर हळुहळू खाली सरकू लागले आहेत. पृथ्वीच्या जीवनात हिमनद यायची ही चौथी पाळी. कांही काळाने, पुढे स्कॅन्डेनेव्हिया, फिन-लंड म्हणून ओळखले जाणारे हे भू-प्रदेश सारे हिममय झाले आहेत. जर्मनींतील साऱ्या दऱ्याखोरीं बर्फानें व्याप्त झाली आहेत. स्कॉटलंडमध्येंहि सर्व डोंगरदऱ्या या बर्फानें भरून गेल्या आहेत. थेम्स नदीच्या कांठा-

कांठानें उत्तर ध्रुव प्रदेशांतील झाडें उगवू लागलीं आहेत. पुढें एक दिवस येथे या जागीच लंडनचें अस्तित्व दिसून येणार आहे. सध्यां तरी इंग्लंडचा सारा भूभाग हिममय, ओसाड, एकहि झुडुप नसलेला असा दिसतो आहे. पिरॅनीज डोंगररांगाच्या उत्तरेकडील युरोपचा सारा भूप्रदेश आतां ध्रुव प्रदेशांतील थडीने झपाटला आहे.

नुसतें झाडावर किंवा त्याच्या फांद्यांवर वसून आता निवारा मिळत नाही. माणसाला त्यापेक्षां जास्त संरक्षणाची आतां जरुरी आहे. मग काय, सोडायचा का हा भूभाग ? जायचे का दुसरीकडे ? पण कसा सोडायचा ? आपले वाडवडील सारे पूर्वज येथे राहिले. त्यांचा हा प्रदेश कसा सोडायचा ? नीआडरथाल मानव असा भिऊन पळून जाणाऱ्यापैकी नव्हता. तो शरीराने धिप्पाड नसेल, पण भित्रेपणा त्याच्या ठायी खासच नव्हता. आपल्या जागी धीमेपणे उभे राहून त्याने श्वापदांशी लढत दिलेली आहे. तो काय नुसत्या थंडीला भिऊन पळून जाईल ? शिवाय दुसरीकडे उष्ण प्रदेशांत गेले नि तेथे चकमकीचा दगड मिळणार नसेल तर तेथे जाऊन तरी काय करायचे ?

नाहीं. तो 'इथेच' राहणार. येथे हत्यारे तयार करण्याकरितां वाटेल तितके चकमकीचे दगड मिळतात. हवेचे काय, पाहून घेतां येईल. शिवाय जंगलांत शिकारीकरितां श्वापदे पण फिरून भरपूर आहेतच. हे खरे की, उष्ण हवामानाची आवड असणारे सारे पशु आता निघून गेलेले आहेत. तरी पण उत्तरेकडून काही नवे नवे प्राणी खाली आलेले आहेत.

अशा परिस्थितीत असतां कांही कुटुंबे सुदैवी ठरली. भोवतालच्या चुनखडीच्या टेकड्यात त्याना राहण्याकरितां गुहा सांपडल्या. त्यांत वास्तव्य करून ती राहूं लागलीं. पण अशा गुहा फारशा नाहीत. आणि समजा, एखादी तुम्हाला दिसली तरी त्यात भयंकर मोठी आयाळ असलेला सिंह किंवा मोठे केसाळ अस्वल वस्ती करून असते. मोठे भयंकर असतात प्राणी हे ! मरेपर्यंत तुमच्या विरुद्ध उभे राहून लढतील. शिवाय कधीं कधी एकेका गुहेत दहा दहा, बारा बारा जणसुद्धा वस्ती करून असतात.

आतां प्रश्न आला, ही श्वापदें बाहेर कशी काढायची ? मोठा विकट प्रश्न. पण तो सोडवायला तर पाहिजेच. कारण आतां थंडीचा कडाका वाढत जाऊन अगदी सहन होत नाहीसा झाला आहे.

विस्तव पेटवून पाहतां येईल. समजा, टोळीतील सारेच्या सारे शिकारी भाले, चांगली गाठ असलेले सोटे आणि दगड घेऊन बाहेर उभे राहिले, नतर त्यांनी गुहेच्या तोडाशी खूप धूर केला तर ? जर वाऱ्याची दिशा बरोबर जमली तर सारा धूर गुहेत जाईल. जनावरे गुदमरू लागतील. बाहेर येण्याकरिता धडपडतील. त्या वेळी सारे शिकारी गुहेच्या अगदी तोडाशी उभे राहतील. धुराने दिसत नाहीसे होऊन खोकत खोकत आंतली जनावरे एकेक बाहेर येऊ लागली की, त्याना चटकन् ठार करता येईल. म्हणजे आपोआपच गुहा रिकामी होऊन माणसाना वापरता येईल. पण – पण श्वापदे परत आली तर ? अ. ! गुहेच्या तोडाशी जाळ करून त्याना पळवून लावणे कुटुबाला सहज शक्य होईल.

ही क्लृप्ति मनात येण्याचाच अवकाश होता. आल्यावरोबर लगेच अमलात आलीच. मानवाने श्वापदांची गुहा बळकावली काय विलक्षण फरक वाटत होता गुहेत आल्याने ! गुहेत स्वस्थपणे माडी घालून बसता येऊ लागले तुमच्या डोक्यावर छान छप्पर, मागून बाजूने कुठूनहि श्वापदे येण्याची भीति नाही कसे छान निर्भय वाटत होते ! गुहेच्या आत तसे मोठे ऊबदार होते अशातला प्रकार नाही. पण बाहेरच्या इतकें थंडगार नव्हते. शिवाय गुहेच्या तोडाशी नाही तर बाहेरच्या सपाट उच-बटाच्या बाजूला शेकोटी पेटवली की छान बसले खुशाल, शेकोटीपाशी ऊबदार हवेत.

हवा चागली असली की, गुहेपेक्षा बाहेरच्या सपाट ओटयावरच बसायला, राह्यला कुटुबाला आवडे. त्या उच ओटयावरच नीआडरथाल मानवाची सारी कामे चालत. स्वयपाक होई, छिलके पाडले जात. इथेच बसून त्याची बायको कातडे मऊ व्हावे याकरिता मारलेल्या जनावराची कातडी साफ खरडून काढी. हे खरवडून काढायचे काम खूपच असे. प्रत्येक वेळी तिचा धनी घरी आला की, त्याच्या अगावरची कातडी अगदी ओली आणि कडक होऊन जात. ती सुकत घालायची, वाळली की कडक होऊन अगाला घासू नयेत म्हणून पुन्हा खूप खरवडून काढायची, हे सारे काम तिचेच असे. तिचा तो धनी फारच चागला आहे. तिला व तिच्या पोरगना पोटाला लागते ते सारे आणून देतो. आणि घरी ती त्याला आरामात ठेवण्यासाठी जे काय करता येईल ते करीत असते.

"पण आता पूर्वीसारखी शिकार मिळतच नाही. शेकोटीपाशीं बसलेले तिच्या स्वामीचे वडील वारंवार उद्गार काढतात, 'माझ्या बापाच्या–बापाच्या–बापाच्या वेळेला ते लोक हत्तीचीसुद्धा शिकार करावयाचे तो सुद्धा कसा सरळ लांब सुळके असलेला! त्यावेळी येथे पाणघोडेसुद्धां असत आणि ते त्याचीहि शिकार करीत.

वडिलाचे उद्गार तरुण नीआडरथालला पटत नसत. जगलात अजूनहि खूप चागली शिकार आहे, असेच त्याला वाटे. कदाचित् पूर्वी होती ती श्वापदे नसतील, पण अजून किती तरी निराळी श्वापदे जगलात आहेत. मॅमथ आहे बाप रे! त्याची शिकार करावयाची म्हणजे कांही सोपे काम नाही. त्याच्याजवळ जाऊन भाला भोसकायचा म्हणजे महा-कर्मकठीण. केव्हा तो त्याची भयकर सोड वाटेल तशी वळवून तुम्हाला उचलील आणि उच हवेत धरून मग जमिनीवर आपटून अगदी बेशुद्ध करील, काही काही सागता येत नाही. शिवाय त्याच्या कातडीत भाला घुसता घुसत नाही. तुमची सारी शक्ति पणाला लावून जोर करा, पण त्याच्या कातडीत भाला काही सहजासहजी शिरतच नाही. त्याला हळुहळू अडवीत कड्याकडे नेऊन लोटायचे म्हटले तरी ते सुद्धा शक्य होत नाही. महान् धूर्त आणि कावेबाज आहे तो प्राणी. त्याला पकडायचा हे एकट्यादुकट्याचे काम नाही. इतर लोकाना बोलावून एक खूप मोठा खड्डा करून तो सुद्धा छपवावा लागतो. त्यावर झाडेझुडपे घालून तेथे काही दिसणार नाही असे करावे लागते. तेव्हा कोठें एकदाचा तो सापडतो. एकदा खूपखूप खोल केलेल्या खड्ड्यात तो पडला की, सतापाने तो इतक्या जोरजोराने आरोळ्या ठोकतो की, लगेच ते कळतेच तुम्हांला. मग मात्र खुशाल तेथे पळत जावे नि मोठमोठे दगड मारून त्याला ठार करावा.

हो, या प्राण्याची शिकार करावयाची म्हटले की, अगदींच वेगळें काम! मॅमथ आणि अगावर लोकर व दुहेरी शिग असलेला तो गेडा, याची शिकार करायची–भाला भोसकून मारायचे म्हणजे भयंकर कठीण काम. तुम्हाला त्याना असे सापळ्यातच पकडावे लागते. तसें नसेल तर ते जेव्हा दलदलीच्या जागी फसून बसतात तेव्हाच त्याना ठार करायची संधि गाठावी लागते.

दुसरीं सारीं श्वापदें मारायचें काम सोपें. गवे, जंगली घोडे, गुरें, तो राक्षसी हरीण, रेनडिअर यांना कड्याच्या बाजूला नेऊन फसवून तुम्हांला सहज लोटतां येतें, नाहीं तर भाल्यानें सहज भोसकतां येतें. दुरून कातडी गोफणीनें दगड मारले तरी ते खालीं पडतात. एकदां पडले कीं तुमच्या जवळच्या सुरीनें त्यांना पार संपवून टाकणें सोपें असतें.

असें एखादें जनावर खालीं पडलें कीं, या बेट्याला काय चेव चढतो ! तें पडलें असेल तेथल्या तेथें तो भराभर सोलून काढतो. त्याची कातडी काढून घेतो. त्याच्या मांड्या, खांदे भराभर कापून टाकतो. नंतर भराभर त्याचें डोकें दगडांनीं फोडतो. आंतला मेंदू काढून घेतो. सारें झालें कीं, तुम्हांला पाहिजे ते छान छान मांसाचे मोठे मोठे तुकडे कातड्यांत घालून घरीं विस्तवावर भाजायकरतां नेतो. हवा छान असली तर बाहेरच्या उंच ओट्यावर विस्तव पेटलेलाच असतो. हवा चांगली नसेल तर मात्र गुहेंत विस्तव पेटवून त्यावर मांस भाजावें लागतें.



## ११. लातेला रेनडिअर मानव सांपडतो

शंभर वर्षापूर्वी फ्रान्सच्या दक्षिण भागांत ओरिनाक् नामक खेडे-गांवात बॉन्मेझाँ (Bonnemaison) या नांवाचा एक शेतकरी राहत होता. एके दिवशी चागली कुडकुडणारी थंडी पडली असतां तो बंदूक घेऊन जवळच्या टेकड्यांच्या भागांत शिकारीला गेला. त्याला एक ससा आढळला. त्यावर नीट नेम धरून मारतां येईल अशी संधि येण्याची तो धडपड करीत असतां तो ससा उतरणीवर उड्या टाकीत जो पळाला तो एका बिळांतच घुसला. शिकारी मनांत कमालीचा चरफडत सरळ त्या बिळाकडे त्याच्या मागोमाग गेला.

ससा मिळवायचा झाला तर शिकारीचा एकच मार्ग आहे असें थोडेंच आहे! दुसरेहि अनेक मार्ग आहेत. असें म्हणून ससा पकडण्या-

करता त्याने बिळात हात घातला. त्याला वाटलें, ससा बहुधा तेथे बसलेला असेल, त्याला सरळ कानाला धरूनच आपण ओढून काढू. पण मजा ही की, त्याच्या हातात सशाचा लाब कान येण्याऐवजी कठीण असे काहीं तरी त्याच्या हाताला लागले. ते बाहेर काढून पाहतो तों माणसाचें हाड.

'काय बरं याचा अर्थ ? इथे कोणाचा खून तर नाही झाला?' बॅान्मेझॉने भराभर खणून माती दूर केली त्यासरशी खाली त्याला एक शिळा दिसली. त्यावरची माती बाजूला करताच ती शिळा बहुधा एखाद्या गुहेच्या तोंडात गुहा बद करण्यासाठीं बसवलेली आहे, असे त्याला दिसून आले. खूप ठोकून ठाकून ढिली करून अखेर त्याने ती शिळा गुहेच्या तोंडांतून बाजला ढकलली.

शिळा ढकलल्यावर त्याच्यासमोर जे दृश्य दिसले ते पाहताच त्याचे डोळे सरळ कपाळातून बाहेर निघाले. सारी गुहा अगदी छपरा-पर्यंत माणसांच्या हाडानी भरली होती. ते दृश्य पाहताच तो ससाबिसा सारे विसरला व टेकडीच्या उतारावरून जो पळत सुटला तो थेट गावच्या मुख्याच्या घराकडे येऊन थाबला. त्याने ते सारे दृश्य व ती भयकर बातमी त्याला सागितली.

ओरिनाक् गावचा मुख्य म्हणजे अत्यत धीम्मा व थड प्रकृतीची व्यक्ति होती. तो काही या बातमीने अस्वस्थ होऊन गेला नाही. शिवाय तो अत्यत व्यवहारी असून आपले कर्तव्य तेवढे करावयाचे, मग सारा वेळ आपले काम बरे की आपण बरे असा त्याचा खाक्या होता. त्यामुळें त्याने 'कुठे सापडली तुला हाडे ? कुणाची आहेत ? कुणी बरे तेथे ठेवली असतील ?' इत्यादि काहीएक प्रश्न विचारले नाहीत. 'तुम्हाला अशी हाडे दिसली का ? बर, आता आपण धर्माप्रमाणे योग्य अंत्यविधि करून त्याना पुरून टाकू म्हणजे झाले.' एवढेच थडपणे उत्तर केले आणि आपले ते कर्तव्य करावयाच्या मागे तो लागला. त्या गुहेतून पुरुष, बायका, मुले मिळून एकदर सतरा सागाडे निघाले. त्या सर्वाना शातपणे योग्य धार्मिक विधि करून खेड्याच्या कबरस्तानात पुरण्यांत आले.

या गोष्टीला आठ वर्षे उलटून गेली. त्या गांवांतले लोक तर हाडां-संबंधी आतां सारेच विसरले होते. इतक्यांत एके दिवशी एक गृहस्थ

ओरिनाक् या गावीं आला आणि त्या गुहेंतील हाडांसंबंधीं विचारूं लागला. त्याचे नांव एडुआड लातें ( Edouard Lartet ). व्यवसायानें तो वकील होता. पण एमिन्स ( Amiens ) च्या डॉ. रिगोलोप्रमाणें बूशे द पॅर्थच्या 'अश्मयुगीन मानवा'च्या सिद्धान्ताला जगन्मान्यता मिळावी म्हणून तो प्रयत्न करीत होता.

'येथें कोठेसे गुहेमध्ये सांगाडे मिळाले असे मीं ऐकलें ते कुठें आहेत ?' त्यानें ग्राममुख्यालाच विचारले. 'मला ते तपासून पाह्यचे आहेत. शास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने त्याचे फार महत्त्व आहे.' त्याने खुलासा केला.

'काय, शास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीनें ?' ग्राममुख्य अगदीं गडबडून गेले. 'हाय, हाय !' त्यांच्या तोडातून उद्गार निघाले. 'किती तरी वर्षें झालीं ते सागाडे सापडल्याला ! शिवाय आम्हीं ती हाडे कवरस्तानात पुरलीदेखील. पण त्याची नक्की जागा कशी तुम्हाला सागणार आणि दाखवणार ?' या उत्तरासरशी वकीलसाहेवाचा चेहेरा फारच पडला. तो पाहिल्यावर ग्राममुख्य म्हणतात, 'पण थावा. एवढे मात्र मी निश्चित सांगतो हं की, आम्हीं ती हाडें कांहीं नुसती पुरली नाहीत. चांगली विधिपूर्वक पुरलीं. त्या वावतीत तुम्ही अगदी निश्चित राहा.'

यापुढे त्या मुख्याशी बोलण्यांत फारसा अर्थ नाही हे लातेला कळून चुकले. त्या हाडाकरता गावच्या कवरस्तानची थडगी उकरण्यांत काही अर्थ नव्हता.

'वरं मग मला ती गुहा तरी दाखवा, मी तिचा अभ्यास करीन', असें तो म्हणाला.

ग्राममुख्यांनीं तावडतोव त्याच्यावरोवर वाटाड्या दिला. थोड्याच वेळात आठ वर्षांपूर्वीं जी गुहा फक्त सशालाच माहिती होती त्या गुहेपाशी येऊन लाते थडकला. त्या गुहेच्या तळजमिनीवर चांगला वरेच फूट जाडीचा कचरा, घाण यांचा थरच्या थर साठलेला होता. त्याने त्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले व आपला कोट काढला. त्यावर व्यवस्थित काळजीपूर्वक आपलें घड्याळ ठेवलें. वेळ पाहिली. हे सारें करीत असतां, अश्मयुगीन मानवाच्या जीवनकथेंतील कांही महत्त्वाच्या क्षणांशीं आपण येथें येऊन धडकलों आहोंत ही त्याची त्यालासुद्धां कल्पना नसावी.

त्या गुहेच्या बाहेर, विशेषतः गुहेकडे जाणाऱ्या उतरत्या सपाटीवर

त्यानें आपल्या कुदळीनें खणण्यास सुरुवात केली असतां एकेक आश्चर्य-जनक गोष्टी बाहेर पडायच्या होत्या. त्या खणण्यांत अशीं हत्यारें व अवजारें मिळत गेली की, तशी आतांपर्यंत तरी फ्रान्समध्यें कोणाच्याच दृष्टिपथांत ती आली नव्हती. चकमकीच्या कपारी, हाडे, हस्तिदंत यांच्या शानदार वस्तु तयार करून त्या गुहेत राहणारें अस्वल, मॅमथ, गेंडा यांच्या लाव-लचक हाडाना भेग पाडून त्यात बसवल्या होत्या. शिप्या, दांत यांना भोकें पाडून त्यातून दोऱ्यासारखें कांहीं तरी ओंवून माळा तयार केल्या होत्या. हाडाच्या पिना आणि मोठ्या कौशल्याने बटनासारखे आकार दिलेल्या वस्तु अशा एक ना दोन नाना तऱ्हेच्या वस्तु तेथे मिळत होत्या.

सगळ्यात चमत्काराची गोष्ट म्हणजे ही की किती तरी अवजारें, हत्यारे व इतर वस्तु रेनडिअरच्या शिंगापासून तयार केल्या होत्या. यावरून एकच गोष्ट उघड होत होती ती ही की, ह्या वस्तु ज्या काळांत ज्या कोणीं तयार केल्या असतील त्याना फ्रान्समध्ये रेनडिअर विपुल उपलब्ध असले पाहिजे. पण मग हा काळ तरी कोणता? वीस हजार वर्षांपूर्वींचा कीं पंचवीस हजार वर्षापूर्वीचा? तो काळ कोणताहि असो. एवढे खरे कीं, धातुयुगापूर्वीं हा 'रेनडिअर मानव' होऊन गेला असावा. त्या वेळी दगड, हाडे, शिंगे, इत्यादि पदार्थ वापरूनच मनुष्य आपल्या व्यवहारोपयोगी व इतर वस्तु तयार करीत असावा. त्या सपाट उचवटयाच्या जागेतून हाडाच्या पिना, बटने, काटेरी हत्यारे, इत्यादि गोष्टी जेव्हां बाहेर काढल्या तेव्हां लातेचे मन कमालीचे गहिवरून आले. धन्य माझे नशीव की मलाच या वस्तु सांपडल्या. या उघडया उचवटयाच्या जागेवरून कितीक तरी माणसे आली गेली असतील, पण वरच्या थरावरील मातीत उगवलेल्या गवताखाली व रानफुलाखाली असा अनमोल खजिना दडलेला असेल हें कोणाच्याहि मनाला कधी शिवले नसेल. पार विसरलेल्या रेनडिअर युगातील मानवाचा शोध लावण्याचें भाग्य त्याच्या नशिबी लिहिले होतें खरें. हो, पण या रेनडिअर काळांत वावरणाऱ्या मानवाला काय नाव द्यावयाचे हेंसुद्धां त्यालाच शोधायचे होतें. त्या काळांतील मानवाच्या जीवन-कहाणीची त्याला कल्पना येत होती. पण तो मानव कसा दिसत असेल, त्याचा चेहेरा कसा असेल, याबद्दल मात्र त्याला कांहींच अनुमान करतां येत नव्हतें की कल्पनासुद्धां येत नव्हती.

दैवानेंच एडुआड लातेला रेनडिअर मानव हुडकण्याकरितां ओढून नेलें. पुढे अशी एक वेळ आली कीं, ती माणसे कशी दिसत असतील हे हुडकून काढण्याचें कामहि दैवाने त्याच्या मुलावर सोंपविले गेले.

१८६८ सालीं, दक्षिण फ्रान्समध्ये एक रेल्वेचा रस्ता तयार होत होता. रस्त्याचे काम क्रोमॅग्नान या खेडेगांवापर्यंत आले. एके दिवशी ते कामगार तेथील डोंगराच्या एका सुळक्याभोंवती काम करीत असतां योगायोगानेच ते त्या सुळक्याच्या पायथ्याशी असलेल्या खडकातील एका गुहेसारख्या असणाऱ्या जागी उतरले. उतरतां क्षणी त्यांना समोर जे काय दिसले, त्याने आश्चर्यचकित होऊनच ते त्या दृश्याकडे पाहत राहिले. त्या गुहेच्या आंत मनुष्याच्या हाडांची चांगली रासच्या रास दिसत होती. तळजमिनीवर पांच सांगाडे पडलेले होते.

कोठेहि मनुष्याचे सांगाडे सांपडले की, ती बातमी म्हणून वाऱ्यासारखी फैलावते. थोड्याच अवधीत ती बातमी चहूंकडे पसरली व जातां जाता फ्रान्सच्या शिक्षण मंत्र्याच्या कानावर गेली. सुदैवाने मंत्रीसाहेबांनी ओरिनाक् गांवी सांपडलेल्या गुहेसबंधीं व त्यातील वस्तूसंबंधी सारे वाचलें होते. तेथे सांपडलेले सागाडे केवळ लोकाच्या अज्ञानामुळे कसे पुरले गेले व त्याचा मागमूसहि नंतर लागेना, त्यामुळे शास्त्रीय ज्ञानाची कशी हानि झाली इत्यादि सारी हकीकत त्यांना माहीत होती. त्यांच्या माहितीप्रमाणें एडुआड लाते हा आता वृद्धत्वामुळे क्रोमॅग्नान गुहेत जाऊन कांही तपासून पाहण्यास असमर्थ होता. अशा परिस्थितीत त्याचा मुलगा लुई हें काम करील का ? अशी त्यानी विचारणा केली.

लुई लातेला जेव्हा विचारण्यात आलें तेव्हां त्याला फारच आनंद झाला. रेनडिअर मानव कसा दिसत असावा यासंबंधीं लुई आणि त्याचे वडील यांच्यांत कितीदां तरी बोलणे झालेलें होते. न जाणो हे पांच सांगाडे कदाचित् ते शोधीत असलेल्या पूर्वजाचेच निघायचे. म्हणून अत्यत उत्सुकतेनें तो क्रोमॅग्नान गुहेकडे घाईघाईनेच जाऊन पोहोंचला.

त्या सांगाड्यांपैकीं दोन पुरुषांचे होते, दोन बायकाचे होते व शेवटचा सांगाडा एखाद्या लहान अर्भकाचा असावा. ते सारे लोक अगदीं एकाच वेळीं नसले तरी जवळ जवळ एकाच वेळी, थोड्याफार कालावधीनें पुरले गेले असले पाहिजेत, असे लातेला वाटत होतें. त्या पांचापैकी एकाचा–

बहुधा बाईचा – खून झाला असावा. कारण तिच्या कपाळाच्या हाडाला मोठे भोक होते. बहुधा ती बाई तिच्याजवळ जो अर्भकाचा सांगाडा पडला होता त्याची आई असावी, अशी लातेची कल्पना होती.

भोवती गूढतेचे आवरण पसरलेले हे लोक कोण होते कीं ज्यांना एकाच वेळी एकाकी असा भयकर मृत्यु आला ? या गूढाची उकल मात्र भोवतालच्या खडकाशिवाय कोणाला करतां येणे शक्य नव्हते.

लुई लातेने ती सारी हाडे अत्यंत काळजीपूर्वक उचलली व बाहेर आणली. शिवाय त्याने ती तळजमीन तपासायला सुरुवात केली. ओरिनाक्-सारखेच येथे होते. तशाच चुली, तशीच चकमकीच्या दगडाची व हाडाची हत्यारे आणि अवजारे, रेनडिअरची शिंगे, सारे तसेच होते. मॅमथ आणि गेंडे आणि गुहेत राहणाऱ्या अस्वलाची पण तशीच हाडे येथे सांपडली. त्यातील काही आतील सत्त्वरस चोखण्याकरता फोडलेली होती.

मनुष्याच्या सांगाड्याकडे वळण्यापूर्वी लातेने त्या गुहेतील इंच नि इंच जमीन काळजीपूर्वक तपासली, व नंतरच तो सांगाड्याकडे वळला. हे सांगाडे 'रेनडिअर माणसाचे'च अशी त्याची स्वत:ची खात्री पटली होती. कारण त्याच्या वडिलानी 'रेनडिअर माणसाची' म्हणून जी जी त्या कालची अवजारे व हत्यारे पूर्वीच्या ओरिनाक्च्या गुहेतून काढली होती तशीच येथे होती. पण ही माणसे, ही मानवजात किती तरी आताच्या माणसासारखी दिमत होती याचे त्याला आश्चर्य वाटले. त्या मानवाच्या सांगाड्यात आणि आताच्या मनुष्यप्राण्याच्या सांगाड्यात काहीच फरक नव्हता. एवढेच की रेनडिअर मानव उंच, दिसायला देखणा व मेंदूने थोडा मोठा असा असावा.

एका म्हाताऱ्याची कवटी तर त्याच्या देखणेपणाची इतकी साक्ष देत होती की, तो किती तरी वेळ त्या कवटीकडे पाहतच राहिला. निघेनात तेथून त्याचे डोळे. ही कवटी गुहेच्या कोपऱ्यांत पाणी ठिबके तेथें पडली असल्याने चांगल्या स्थितीत राहिली होती. त्याचा चेहेरा चांगला रुंद होता. उंच-भव्य कपाळ होते डोळ्याच्या खोबण्या चांगल्या मोठ्या आणि उथळ. अरुंद, बारीक धरधरीत नाक चांगली उठावाने दिसत असलेली हनुवटी. सारे अगदी आताच्या मनुष्यप्राण्यासारखें. त्याला मोठा आनंद झाला. काय देखणी ही मानवजात होती, त्याच्या मनांत विचार येऊन

गेला. असा– थेट आतांच्या माणसासारखा दिसणारा मानवप्राणी हजारों वर्षांपूर्वीच फ्रान्सच्या भूभागावर वावरत होता अं !

अर्थात् शास्त्रज्ञांची तऱ्हा त्याला माहीत होती. हे सांगाडे पाहिल्यावर ते काय म्हणतील हें त्याला आधींच कळून चुकलें होतें. ज्या काळांत रेनडिअर प्राणी फ्रान्सच्या प्रदेशांत आनंदानें हिंडत फिरत होता, त्या काळीं आपल्या-सारखी मानवजात वावरत होती व ती आतां नामशेष झाली आहे, हें त्यांना पटण्याजोगें नव्हतें. 'तुम्हांला सांपडले हे सांगाडे पुढच्या काळांतील माणसाचे. त्या माणसांनीं हजारों वर्षांपूर्वीं मृत झालेल्या रेनडिअरांचीं शिंगें खणून काढलीं व तीं वापरांत आणलीं असें ते म्हणणार हें तो पूर्णपणें जाणून होता.

त्यांचें म्हणणें असें असेल तर खुशाल असू दे. पण अशीं शिंगें वापरणारी रेनडिअर मानवजात फक्त ओरिनाक् व क्रोमॅग्नान येथेंच होऊन गेली असें मानण्यास तो तयार नव्हता; कारण तें अशक्य होतें. फ्रान्सच्या दक्षिण भूभागांतील अनेक गुहांतून ही 'रेनडिअर मानवजात' वावरली असली पाहिजे. पण हें खरें कीं नाहीं हें फक्त काळच ठरविणार होता. अशा रीतीच्या दगडाच्या, हाडांच्या, रेनडिअरच्या शिंगाच्या आश्चर्यजनक वस्तु करणाऱ्या या कारागिरांची कुशल कृति काळच प्रकाशांत आणण्यास समर्थ होता. तोंपर्यंत वाट पाहणें भाग होतें. काळच त्याच्या म्हणण्याची सत्यता पटविणार होता.



# १२. छतावरचे बैल

क्रोमॅग्नान गुहेतील मानवप्राणी व रेनडिअर हे फ्रान्समध्यें एकाच काळी बरोबर वास्तव्य करीत होते हें जेव्हां अखेर सिद्ध झाले, तेव्हां लोक 'हं, ही मानवजात मात्र आहे वर आपल्यासारखी' असें बोलू लागले. उचा-पुरा, देखणा, बुद्धिमान् असा क्रोमॅग्नान गुहेतील पूर्वज प्रत्येकाला आवडला. हजारो वर्षापूर्वी, तो एखाद्या विजेत्यासारखा साऱ्या युरोपभर वावरत होता ही कल्पनाहि त्याना गोड वाटली. त्यामुळें त्याचे गुणगान किती करावे अन् किती न करावे असे त्यांना होऊन गेले.

'ही अशी काटेरी त्यानें केलेली शस्त्रे पाहा, या पिना पाहा, हें माळेनल्ले पदक, हीं बटने, हे मणि ही सारी त्या क्रोमॅग्नान मानवाची कृति.' लोकांनी उद्गार काढले. 'किती कुशल कारागीर असली पाहिजे ही मानवजात!'

पॅरिसला भरलेल्या आतरराष्ट्रीय प्रदर्शनांत 'क्रोमॅग्नान मानवा'चें चागलेच प्रदर्शन करण्यात आले. पण एवढं खरें की, त्याला मिळालेले यश त्याच्या गुणवत्तेच्या मानाने फारच कमी होते. त्याची पुष्कळशी कारागिरी योगायोगानेच उजेडात आली होती. पण आतां अशी वेळ आली होती की,

त्या मानवाची एक असाधारण आश्चर्यजनक अशी कृति उजेडांत येऊं पाहत होती. पण तिचें स्वरूपच इतकें असामान्य होतें कीं, लोकांना तें सांगूनसुद्धां खरें वाटत नव्हतें.

ज्या वर्षी लुई लातेला 'रेनडिअर मानव' सांपडला त्याच वर्षी स्पेनमध्यें एक शिकारी जहागिरीच्या जमिनीवर शिकारीला म्हणून गेला. त्याच्याबरोबर त्याचा कुत्रा होता. कुत्रा पण स्वतःच थोडीबहुत शिकार करीत चालला होता. कोणा तरी प्राण्याच्या मागें लागून तो एकाएकीं दिसेनासा झाला. थोड्याच वेळांत त्याचें दीनवाणें कॅकाटणें शिकाऱ्याच्या कानी पडलें.

शिकारी इकडे तिकडे पाहूं लागला. कुत्रा टेकडीवरून खालीं घसरलेल्या दगडांत अडकून पडला आहे, असे त्याला दिसले. जवळ जाऊन त्याला सोडवू पाहत असतां त्या शिकाऱ्याला चांगलेच मोठमोठे दगड आधी बाजूला करावे लागले. ते दगड बाजूला सारले जातांच आपण एका बंद गुहेचे तोंड नकळत खुले केलें आहे, असे त्याला आढळून आले.

तो आंत शिरला. सभोंवती चोहींकडे त्यानें एकवार नजर फेंकली. गुहेच्या आंत थंड असून सारी गुहा अगदीं निःशब्द होती. तेथे अंधारहि होता. गुहेच्या तोंडाशी असलेला थोडा भाग सोडला तर साऱ्या गुहेत दाट सांवल्या पडल्यासारखा किंचित् प्रकाश येत होता. त्या प्रकाशात, गुहेतील जमिनीवर, वरून टेकडी ढासळल्यानें सगळीकडे दगडगोटे पसरलेले आहेत, एवढे त्या शिकाऱ्याला सहज दिसत होते. गुहेंतील नि.शब्द| शांतता, किंचित् प्रकाश, व न जाणो आणखी कांही तरी, यामुळे त्या गुहेंत एक प्रकारचें अद्‌भुत गूढ रहस्यमय असे वातावरण तयार झाले होते. त्या वातावरणानें आदरपूर्वक विस्मित होऊन तो शिकारी एक दोन क्षण तेथे थांबला. पण लगेच गुहेबाहेरच्या प्रकाशांत आला. ती गुहा म्हणजे एखाद्या क्रोमॅग्नान मानवाचे घर होती ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाही, कारण त्या मानवाबद्दल त्याला कांहीच माहिती नव्हती.

आतां, स्पेन हा एक असा देश आहे की, जेथें गरीब माणसें चांगल्या निवाऱ्याच्या जागेच्या अभावीं पुष्कळ वेळां गुहेचा आसरा घेतात. तेथेंच आपलें घर करतात. पण 'अल्तामिरा' जहागिरीत असलेल्या या गुहेमध्यें तिचें तोंड बंद केलेलें असल्यानें कोणी कधींच राहत नव्हतें. त्यामुळें



क्रोमॅग्नान मानवाच्या काळापासून ही गुहा तशीच वाजूला पडलेली होती. तिकडे कोणी फिरकलेसुद्धा नव्हते. पण आता मात्र सान्तान्देर (Santander) या शहरात राहणाऱ्या एका सरदाराने ती गुहा शोधून पाह्यची ठरविले.

असे त्याने ठरवायला एक कारण घडले होते. डॉन मार्सेलिनो द् साउतोला (Don Marcellino d Soutuola) या सरदाराने पॅरिस-मधील आतरराष्ट्रीय प्रदर्शनांत फ्रान्समधील निरनिराळ्या गुहांतून प्राचीन मानवी जीवनाचे आश्चर्यचकित करून सोडणारे अवशेष ठेवलेले पाहिले होते. त्यामुळे उत्तेजित झालेले त्याचे मन त्याला अगदी चैन पडू देत नव्हते. सारखे त्याच्या मनात येई 'न जाणो, स्पेनच्या गुहांतूनसुद्धा असे अवशेष असतील !' या कारणाने प्रदर्शन सपवून तो स्पेनमध्ये परत येताक्षणीच त्याने 'अल्तामिरा'ची गुहा खणून पाहवयाचे ठरविले.

एक दिवस त्याने आपल्या लहान मुलीला म्हणजे मार्यालाहि वरोबर आणले. त्याने तिलाहि आपल्यासारखीच एक मेणवत्ती दिली आणि 'नीट जपून जा अं', असे सांगून तो स्वतः कुदळीने खणू लागला. ती लहान मुलगी मेणवत्ती घेऊन भितीवर इकडे तिकडे छाया पडतील त्या पाह्यच्या या खेळाला लवकरच कंटाळली व त्या गुहेत इकडे तिकडे हिंडायचा प्रयत्न करू लागली. कुठें दगडातून अंग चोरून, कुठे हळूच रांगत, इकडून कुठें दुसरीकडे जातां येतें का असें ती पाहूं लागली. वराच वेळ इकडे तिकडे जायचा प्रयत्न करीत असतां, ती एका ठिकाणीं हळच आंत शिरली ती



एकदम निराळ्याच ठिकाणी. पाहते तों आपण एका दुसऱ्याच मोठ्या दालनांत आलों आहोंत असे तिच्या लक्षांत आलें. हे दालन गुहेच्या तोडाशी असलेल्या दालनाच्या डावीकडे मागल्या बाजूला असे होतें. तिने आपल्या हातांतील मेणबत्ती उच धरली व चोहोबाजूच्या भितीकडे पाहिले. नंतर आपल्या हातांतील मेणबत्तीचा तिने छतावर उजेड पाडला. तेथील दृश्याने एक क्षण तिच्या हृदयाची धडधड थावलीच असे तिला वाटले. छतावरून दोन भयंकर डोळे तिच्याकडे रोखून पाहत होते.

'बाबा, बैल' घाबरून जाऊन त्या मुलीने किचाळीच ठोकली.

मुलीची किचाळी ऐकतांच तिचे वडील दगडातून अडखळत, ठेचाळत तिच्याकडे धावले. मुलीनें कांही न बोलताच छताकडे बोट केले. त्याबरोबर त्याने आपली मेणबत्ती उच धरून गुहेच्या वरच्या छताकडे पाहिले. काय विलक्षण दृश्य होते तिथे ! गुहासशोधन करणाऱ्या कोणालाच इतके विलक्षण दृश्य आढळले नव्हतें. पाहतां पाहतां त्याचे गुडघे कापू लागले.

गुहेच्या त्या छतावर तांवडा, पिवळा, तपकिरी, जाभळा ( Violet ) काळा आणि पांढरा हे सारे रंग वापरून अठरा गव्यांचा– रानबैलाचा– एक कळपच्या कळप रंगविला होता. कल्पना करतां येईल एवढ्या निर-निराळ्या अवस्थांतील हरत-हेच्या त्यांच्या शरीराकृतीचे त्यांत चित्रण केलेलें होतें. कांही शांतपणें उभे होते, कांहीं झपाट्यानें पुढें दौड करीत

चालले होते. कांहीं अगदीं संथपणें हळुहळू पावले टाकीत होते. कांहीं आपले पाय जवळ घेऊन वसले होते. त्यांनीं आपल्या माना वळवून अंगावर टाकल्या होत्या आणि निद्रिस्त झाले होते. कोणत्याहि अवस्थेंतील ते सारे बैल अगदीं जिवंत असल्यासारखे हुबेहूब दिसत होते. त्यामुळें आपली मुलगी घावरली याचे त्याला आश्चर्य वाटले नाही. त्या चित्रांतील टवकारून पाहणाऱ्या बैलांच्या डोळयांकडे पाहत असतां त्याच्याहि मनांत चमत्कारिक भावना तरळू लागली.

गुहेच्या छताचा भाग जेथें बराच खाली आला होता, तेथपर्यंत जाऊन त्याने त्या रंगविलेल्या भागावरून हात फिरवला. त्या चित्राचे रंग अगदीं काल भरावे इतके ताजे होते. हे इतके अप्रतिम आश्चर्यचकित करून सोडणारे काम प्राचीन मानवाने केले तरी कसे ? हे गुहेचे दालन गुहेच्या मुख्य तोडाच्या प्रवेशद्वारापासून इतके दूर होते की, तेथे सूर्याचा प्रकाश कधी आलासुद्धां नसेल. अशा वेळी कोणत्या प्रकाशात या अज्ञात कलावंताने ही चित्रे रेखाटली आणि त्यात रंग भरले ?

द साउतोलाने भिंती तपासल्या. पण त्या भिंतीला कुठे एवढीशी-सुद्धा काजळी दिसून आली नाही. मग कोणता वरं दिवा त्याने वापरला असेल ?

आणि हे रंग ? वनस्पतीपासून मिळालेल्या काजळी आणि कावेच्या रंगानी त्या कलावंताला तांबडा, पिवळा व तपकिरी हे रंग सहज करता येणे शक्य होते, पण हा जांभळा रंग— हा त्याने कुठून आणला ?

द साउतोला त्या चित्राकडे वघतच राहिला. ती कलाकृति इतकी सुंदर व अप्रतिम होती की, आजच्याहि एखाद्या चित्रकाराने तशी कलाकृति निर्माण केली तर तो नाव मिळवील. खरं बोलायचं तर ती कलाकृति आश्चर्य वाटण्याइतकी अद्यावत् दिसत होती. फ्रेंच गुहामधून मिळालेल्या अवशेपामध्ये इतके सुंदर व विलक्षण असे काहीच नव्हते. अशी कांही कलाकृति गुहातून सापडेल अशी कधी कोणाची कल्पनासुद्धां नव्हती. जणु काय अशी कलाकृति प्राथमिक अवस्थेतील मानवाच्या हातून निर्माणच होणें अशक्य. त्याची कलाकृति त्याच्यासारखीच ओवडधोवड, बालिश असली पाहिजे. दांत, शिंपा, यांच्या माळा करणाऱ्या मानवाच्या हातून अशा सुंदर कलाकृतीची निपजच होणार नाही, असे सर्वांना वाटत होते.

पण ही क्रोमॅग्नान मानवाची कृति होती हें मात्र निश्चित. कारण ज्या कोणा कलावंतानें हीं चित्रें काढली होती, त्यानें या प्राण्यांना प्रत्यक्षात नेहमीं जवळून पाहिलें होतें; निरखलें होतें. त्याशिवाय इतके सगळे त्यांचे वारकावे नेहमीं नेहमी निरखल्यानें, हेरल्यानें, त्या चित्रात जो हुबेहूव जिवंतपणा आला होता तो आला नसता. पण हे सारें केव्हां शक्य होतें? गवा ( Bison ) हा प्राणी तर स्पेनमधून हिमयुगाच्या शेवटीच नाहीसा झाला – मेला.

आपल्या स्वतःला लागलेल्या शोधाने द साउतोला अगदी हुरळून गेला. त्याचें सारे शरीर कंपित झाले. तरी पण एवढ्यांतच ही वातमी कोणाला सागणे इष्ट नाही अशी त्याची भावना झाली. आधी सर्व गुहा नीट तपासून घ्यावी व मग बोलावे असे त्याने ठरविले. पण 'लोकाना गुहेत दडलेले हे माझे गुपित सागेन तेव्हां सगळे कसे खाडकन् जागे झाल्यासारखे होऊन कशी हालचाल करतील' याची तो स्वप्ने पाहूं लागला.

पण आश्चर्याची गोष्ट ही की, त्याने आपले गुहेतले गुपित फोडले तेव्हां एवढासुद्धा गाजावाजा झाला नाही. ही क्रोमॅग्नान काळच्या कलावंताची चित्रे या गोष्टीवर विश्वास ठेवायला कोणीच शास्त्रज्ञ कबूल होईना. काय? ही असली अनुपम सुदर कलाकृति क्रोमॅग्नान मानवाची? शक्यच नाही. शिपल्याच्या आणि दाताच्या माळा करून गळ्यांत घालणाऱ्या मिसर लोकाच्याहि आधी हजारो वर्षे पृथ्वीतलावर वास्तव्य करणाऱ्या त्या क्रोमॅग्नान मानवाने ही असली सुदर कृति निर्माण केली म्हणता? काय उगीच मूर्खासारखे बोलता? कलेचा उगम असा झालेला नाही. त्या काळी कला किती वाल्यावस्थेत होती! हजारों वर्षे तिची वाढ होत गेली तेव्हां कुठे तिचा आताचा विकास व वाढ झालेली आहे. कुणी तरी लुच्च्या माणसाने द साउतोलाला चांगलेच वनवायचे ठरविले आणि त्या गुहेत जाऊन चित्रे काढली झाले. द साउतोला स्वतःच म्हणतो ना की, त्या चित्राचे रंग काल रंगवावी इतके ताजे दिसतात म्हणून? पंधरा किवा वीस हजार वर्षापूर्वी रगवलेल्या चित्राचे रग इतके ताजे कसे वर राहतील?

डॉन मार्सेलिनोने अगदी जीव तोडून, यात वनवावनवीचा प्रकार नाही, अशी वनवावनवी कोणाला करायची मनांत आलें असतें तरी ते कसे अशक्य होते हे सांगायचा खूप प्रयत्न केला. 'अहो, इतक्या दाट अंधेऱ्या

दालनांत जाऊन गुहेच्या छतावर कोण कशाला चित्रें काढीत बसेल ? कोणीं पाहिली असतीं तीं चित्रें ? एवढेंच काय, माझी मुलगी गेली नसती तर मी किंवा आणिक कोणीहि कशाला तेथे जात होतें ? खुशाल तें दालन तसेंच अंधारात पडून राहिले असते. मग असली बनवाबनवी करण्यांत अर्थ तरी काय होता,' असें म्हणून यांत बनवाबनवी नाही हे आपलें म्हणणे पटविण्याचा त्यानें प्रयत्न केला, पण ते कोणालाच पटलें नाही.

एवढेच काय, माद्रिद विश्व-विद्यालयांतील एका प्राध्यापकाखेरीज ती चित्रे पाहण्याचीसुद्धा कोणी तसदी घेतली नाही. त्या प्राध्यापकाने मात्र द साउतोलाला त्या चित्रांची विशेषत: त्या गव्याची प्राचीनता सिद्ध करण्याच्या कामी मदत केली.

पण दिवसानुदिवस त्यांचे बोलणे कोणी ऐकत नाहीसे झाले. अगदीं बहिऱ्या माणसांपुढे बोलावे अशी त्यांची स्थिति होत गेली. कारण एकदां एक चित्रकार ती चित्रे पाह्यला गेला. गुहेतून आल्यावर तेथल्या गव्याविषयी तो फारच वाईट बोलू लागला. त्याच्या मते, ' बहुधा, कांही जुन्या चित्रांची नक्कल करून, एखाद्या कलेच्या अभ्यासकाने ती चित्रें काढली असावीत. त्या माणसाने गवा हा प्राणी जिवत असतांना कधीच पाह्यला नसावा, इतके त्याचे आकार त्याने बेढब काढले होते ' असे त्याचें म्हणणें. ' तेथे नक्कल करणाऱ्या त्या चोरचित्रकाराचा आधुनिक चित्रकलेशी थोडाबहुत परिचय असावा. पण तशी आधुनिक चित्रकलेची माहिती मात्र त्याला फारशी दिसत नव्हती.' थोडक्यात त्याच्या साऱ्या टीकेचा मथितार्थ एवढाच होता की, तेथं काढलेले गवे फारच बेढब असून हुबेहूब म्हणणे कठीण होते. शिवाय त्यांतील रंग इतके ताजे होते की, प्राचीन काळचे ते चित्र मानणे म्हणजे शुद्ध वेडेपणा होता.

'फार वाईट. . .फार चागलें. . .!' सारें एकाच दमांत अं: ! पाहून गेलेल्या चित्रकाराच्या भाष्याचा विचार करण्यांत डॉन मार्सेलिनो गढून गेला. 'कदाचित मीच लोकांकडून फार अपेक्षा करीत असेन' तो स्वत.शीच पुटपुटला. 'कलेचा उद्रेक झाला तेव्हांपासूनच कलेचें स्वरूप असे संपन्न, आश्चर्यचकित करून सोडणारें, आणि अगदी आधुनिक आहे हें लोकानी समजून घ्यावें एवढेच मी लोकांना म्हणतो आहे. पण ते त्यांना पटते कुठे ? त्यानें कलेच्या विकासाचा त्यांचा सारा सिद्धांत खोटा

पडतो ना !'

सिद्धांत खोटा पडत असेल तर वस्तुस्थितीच्या प्रामाण्याप्रमाणें वदलून घ्या, इतकेंच मी म्हणतों, दुसरें काय ? खरी वस्तुस्थिति दृष्टिआड करणारा सिद्धांत कसा टिकणार ? पण हें सारें घडून येईपर्यंत मीच मेलों तर ? मी मेलों तर मेलों. हीं चित्रें, या कलाकृति तर राहतील ! आणि अखेर एक अशी वेळ येईल कीं, क्रोमॅग्नान मानवाचें कौशल्य लोकांना कबूल करणें भाग पडेल. त्याच्या कौशल्याची पुरी बूज होईल. नाहीं तरी आजवर हजारों वर्षे तो अज्ञातांत पडून होताच कीं. मग काय झालें आणखी कांहीं तसाच पडून राहिला म्हणून ? कोठें विघडलें त्यांत ? '



# १३. ती चोरी होती का ?

खरोखर योगायोग म्हणूनच, नाही तर क्रोमॅग्नान मानवाच्या गुणाचे चीज न होता आणखी किती वर्षे तसाच अज्ञातात तो दडून राहिला असता कोण जाणे ! ज्या योगायोगाने त्याची अज्ञातात दडलेली कलाकृति बाहेर आणली, त्याच योगायोगाने त्याला आणखीहि मदत करावयाची असे ठरविले होते असे दिसते. दक्षिण फ्रान्समधल्या ला मूथ या खेड्यात एक शेतकरी राहत असे. त्याच्या हाती जी गोष्ट सापडेल तिचा उपयोग करून घ्यावयाचा असा त्याचा स्वभाव होता. त्याच्या मालकीच्या जमिनीवर एक गुहा होती. तिचाहि त्याने उपयोग करून घेतला. त्याने गुहेतील सारी घाण बाहेर काढून ती स्वच्छ केली. गुहेत काही हाडे, दात, वगैरे गोष्टी सापडल्या त्या आपल्या शेतांत खत म्हणून टाकून ठेवल्या. त्या गुहेच्या तोंडाशी त्यानें एक दगडाची मोठी भित बांधली. त्याला मध्ये दरवाजा ठेवला. त्यामुळें त्याला आपोआपच बीट, बटाटे सांठवायला एक आयते छान कोठार-घर मिळालें.

पन्नास वर्षे ती गुहा कोठार म्हणून तो शेतकरी वापरीत होता.

त्यानंतर एके दिवशी त्याच्या शेतजमिनीवर एक डॉक्टर आला व कोठार म्हणून त्यानें केलेली गुहा 'मी शोधून पाहूं का ' असें विचारूं लागला. तो दक्षिण फ्रान्समध्ये असलेल्या साऱ्या गुहांचे संशोधन करीत होता, पण हीच एक गुहा काय ती राहिली होती. तिचें कोणींच केव्हांच संशोधन केले नव्हतें.

एमिल् रिव्हिएरानें गुहेंत प्रवेश केल्यावरोवर कोठार म्हणून वापरली जाणारी ती गुहा किती स्वच्छ ठेवली आहे हें पाहिलें. ते पाहताक्षणीच या वापरल्या जाणाऱ्या पुढच्या भागांत खोदून पाहण्यांत कांही अर्थ नाही हे त्याला कळून चुकले. कारण तेथें काहीच राहिलेले नव्हतें. तेव्हा या गुहेचे सशोधनच करावयाचे असले तर गुहेच्या अगदीं आंत जाऊन ती गुहा पाहणे प्राप्त होते. तसे केले तरच कांही महत्त्वाचे अवशेष मिळाले असने.

म्हणून त्याने गुहेच्या खूप खोल, आंत शिरून तेथील भाग पाह्यचें ठरविले आणि तो तेथे आंत जाऊन खोदू लागला. थोडयाच वेळात त्याला पाहिजे तशी माहिती मिळू लागली. गुहेच्या त्या खोल अतर्भागात रेनडिअरचे दांत, गव्याची हाडे, अगदी तीक्ष्ण व धारदार केलेल्या चकमकीच्या कपारी आणि छिद्र पाडलेला एक शिपला अशा वस्तु त्याला मिळाल्या. या साऱ्या वस्तु म्हणजे क्रोमॅग्नान मानवाच्या तेथे झालेल्या वास्तव्याच्या निदर्शक होत्या, हे त्याच्या अनुभवी नजरेने तावडतोव हेरलें. रिव्हिएरानें तावडतोव त्या शेतकऱ्याशी व्यवहाराचीं बोलणी सुरू केलीं. आपण परत येऊन सर्व गुहा पूर्णपणें खणून पाहीपर्यंत शेतकऱ्याने तेथल्या साऱ्या गोष्टी जशा आहेत तशाच ठेवावयाच्या, त्यांना हात लावावयाचा नाही याची त्याने त्याला चांगली स्पष्ट समज दिली व तो गेला.

तो गेल्यावर शेतकऱ्याच्यानें राहवेना. गुहेची सारी जमीन नीट खणून सारखी करावी या कल्पनेने त्याला घेरले. आणि तो जमीन खणून सारखी करूं लागला. एवढयांत एक अशी गोष्ट घडून आली की, त्याचा सारा बेत फसला. तो असें खणीत असतां, एके दिवशीं सकाळीच गुहेच्या मागली भिंत एकाएकीं कोसळली व त्या जागी भिंतीतच एक मोठें विवर असलेलें दिसून आलें.

आश्चर्यचकित होत्साता तो शेतकरी पाहतच राहिला. अर्धचंद्राकार

आकाराचें अरुंद असे तें विवर एखाद्या भट्टीसारखें दिसत होतें. त्यानें आपला सबंध हात आंत घातला व कांहीं हाताला लागतें का हें पाहण्याचा प्रयत्न केला. पण त्या विवराचा अंत त्याच्या हाताला लागेचना. गुहेच्या मागल्या भितीशी गुहा संपते अशी त्याची आतांपर्यंत समजूत होती. पण ती खरी नसून येथे तर उघड एक वाट दिसत होती व ती पार टेकडीच्या पोटात जात होती, असे त्याच्या लक्षांत आले !

थोड्याच दिवसांनी एमिल् रिव्हिएरा जेव्हां एक दोन माणसाना मदतीला घेऊन परत आला, तेव्हां भितीत असलेली ही नवी वाट त्याच्या नजरेला पडली. पण या नव्या लागलेल्या शोधाने शेतकऱ्याने केलेल्या साऱ्या उपद्व्यापाबद्दलचा त्याचा राग ओसरला. भित कोसळून ही नवी वाट दिसून आल्याकारणाने तोहि एकदम उत्साहित झाला. ही वाट जाते तरी कोठे हे समजून घेण्याची प्रत्येकाला जिज्ञासा उत्पन्न झाली होती. त्यासरशीं त्या अरुंद विवरातून रांगत रागत एकामागून एक असे ते आत शिरले.

आधी वाट अरुंद, तीहि दगड-माती-ढेकळांनी भरलेली, शिवाय हातांत कदील असे सारे असल्याने त्याना सरळ रागत रागतच त्या वाटेने जावे लागले. कदील पुढे धरून तिघाच्या स्वाऱ्या चागल्या ऐंशी, नव्वद नव्हे शंभर यार्ड पुढे गेल्या असतील नसतील तोंच रिव्हिएरा आनंदाने बेहोष होऊन एकदम ओरडला. आपल्या हातातील उजेड त्याने वर टाकला. तो सर्वात पुढें होता. त्याचे ओरडणे ऐकतांच मागले दोघेहि भराभर रांगत पुढे आले व त्यानीहि आपल्या हातातील उजेडाची तिरीप वरच्या बाजूला टाकली. तेथील दृश्यानें त्या तिघाचेहि श्वास क्षणभर रोखल्यासारखे झाले. आपण काय पाहतो आहों हे खरे का, यावर त्यांचा विश्वास बसेना. तेथल्या साऱ्या भितीवर ते आले त्या विवराच्या वरच्या छताच्या बाजूवर, इकडे सगळीकडे निरनिराळ्या प्राण्याच्या अप्रतिम सुदर आकृति कोरून सारे चितारलेले होतें. किती प्राणी होते तेथे ! त्यांत गवा होता, ‘ इबेक्स ’ नावाचा डोंगरी बकरा ( हा आल्प्स व अपेनाईन डोंगरात सापडतो, याची शिगें मोठीं असून वांकलेली असतात ) होता, रेनडिअर होता व एक प्रकारचा रानघोडा पण आढळून येत होता ! आश्चर्यानें, आनंदाने थरथर कांपतच ते त्या भुयारी वाटेनें रांगत रांगत

पुढें जाऊं लागले. ते पस्तीस एक यार्ड गेले असतील, तेवढ्यांत सारीं चित्रें संपलीं. पण तेवढ्या अवधीत, पृथ्वीवरून आतां नष्ट झालेल्या पण फार प्राचीन युगांत राहणाऱ्या प्राण्यांची, एकामागोमाग एक कोरलेलीं, अशी चित्रें त्यांना जातां जातां दिसलीं होतीं. पस्तीस एक यार्डानंतर मात्र ही चित्रे संपलीं. ते तसेच आणखी शंभर यार्ड पुढे गेले. पण हजारों वर्षे पागोळ्या गळून गळून सांचत आलेल्या चुनखडीपासून झालेल्या एका द्रव्याचा खांब वाटेंत पुढें आल्यानें त्यांना आणखी पुढें जाता येईना आणि परतावें लागले.

ते तिघेहि गुहेच्या बाहेर येऊन सूर्यप्रकाशांत उभे राहिल्यावर आपण गुहेत जें काय पाहिले तें खरे का, असा सारखा त्यांना भ्रम पड लागला. जे काय त्यांनी आंत दृश्य पाहिले होते तें इतके अद्‌भुत होते की, क्षणभर तर त्यांना एकमेकांशी बोलायची इच्छाच होईना. आपण जणु काय एका निराळ्याच जगांत जाऊन परत आलों असें त्यांना वाटू लागलें. शेवटी त्याच्यातील एकाला वाचा फुटली. 'इतक्या अरुंद जागेत त्यांनी एवढी चित्रें कोरली तरी कशीं? खरोखर आश्चर्यंच म्हणायचें ते!' त्याच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले.

'मला वाटते ती भुयारी वाट आता आहे तितकी नेहमी अरुंद नसावी' रिव्हिएराने किंचित् विचार करूनच उत्तर केले. 'त्या वाटेत आता जी चिखलमाती दिसते ती ही चित्रे कोरली तेव्हां नसावी. तुमच्या एक गोष्ट लक्षांत नाही का आली? त्या कोरलेल्या प्राण्याच्या खालच्या बाजूचे सारे भाग चिखलाच्या थराखालीं दडलेले होते. याचा एकच नाही का अर्थ होत की हा सारा चिखल, ही माती त्या गुहेंत मागून आली म्हणून. ती आधीं नव्हती.'

पण या इतक्या गडद अंधेऱ्या जागेंत क्रोमॅग्नान मानव चित्रें कोरायला कशाला आणि का बरें गेला? गुहेच्या राहत्या भागांत कां नाही त्यानें तीं चित्रे कोरली? तशीं कोरली असती तर प्रत्येकाच्या नजरेला तरी तीं पडती!

रिव्हिएराला यावर काय उत्तर द्यावें हें कळेना. त्यानें फक्त आपले खांदेच उडवले. कारण तोच प्रश्न त्याच्या मनांत सारखा उठत होता.

त्या भुयारी वाटेवर कोरलेल्या साऱ्या चित्रांची तेथेच अवघडत

बसून त्यानें आपल्या वहीवर नक्कल करून घेतली. पण ती नक्कल करीत असतां, हीं चित्रें येथें कां? हा प्रश्न सारखा त्याच्या मनांत घोळत होता. 'अल्तामिरा'च्या गुहेंत पण जनावरांची चित्रें पुढच्या भागांत न काढतां अगदीं आंतल्या अंधेऱ्या दालनांतच काढलेली होती हीहि गोष्ट त्याला आतां आठवली. काय बरे या साऱ्या कृतीचा अर्थ असावा?

पण तें कोडे कांहीं केल्या त्याला सुटेना. क्रोमॅग्नान मानवाची कला म्हणून त्यानें आपली चित्रवही सारी भरून टाकली व ती काढलेलीं चित्रें घेऊन तो 'विज्ञानशाले'त आला, तरीहि त्याला तें कोडें सुटलें नव्हतेंच.

एकापाठीमागून एक अशी त्यानें काढलेली चित्रें तो शास्त्रज्ञांसमोर ठेवू लागला. गवा, डोंगरी बकरा ( Ibex ) रेनडिअर, रानघोडा सारीं चित्रें तज्ज्ञांच्या हातांतून फिरूं लागली. हे सारे महान ऋषितुल्य शास्त्रज्ञ एकेका चित्राकडे फिरून फिरून बघत होते. पण कोणीच कांही बोलेना.

अखेरीला रिव्हिएराच्याने राहवेना. 'मग काय म्हणणे तुमचें?' असा त्याने प्रश्न केला.

तेव्हा कोठे एका वयोवृद्ध तज्ज्ञाने 'ही सारी कोरलेली चित्रे इतकी अप्रतिम कौशल्याने कोरलेली आहेत की ती क्रोमॅग्नान मानवाने काढली असतील असे नाही वाटत. ती इतकी सुदर व इतक्या कौशल्याने कोरलेली आहेत की इतक्या हजारों वर्षापूर्वीच्या मागल्या काळांत ही चित्रे कोरली गेली असतील यावर विश्वास टाकणे अशक्य होते.' असें मत प्रदर्शित केलें. लगेच इतरहि तज्ज्ञांनी त्याचेच ध्रुवपद सुरू केले. फार, फार, फारच सुदर! फारच अप्रतिम कौशल्याने कोरलेली! पण...

तें कांही नाही, हे कोणाचे तरी चौर्यकर्म आहे. ते वृद्ध तज्ज्ञ बोलूं लागले. 'तो भुयारी मार्ग मोकळा झाल्याबरोबर कोणी तरी आंत शिरलें आणि तुम्ही यायच्या आंत ती चित्रे तेथें कोरली असावीत, महाशय.'

या उद्‌गारांनी रिव्हिएरा एकदम भडकून गेला. 'काय बोलतां तुम्ही? किती अरुंद जागा आहे ती. आता धड तेथें उभेंसुद्धां राहतां येत नाही. अशा जागी जाणार तरी कोण आणि चित्रे कोरणार तरी कोण?' उघड उघड त्याने वृद्ध तज्ज्ञांच्या उद्‌गारांचा निषेध केला. 'बरें, एक वेळ तशी ती चित्रे आता कोणीं तरी कोरली म्हणून कबूल केलें, तरी प्रथम इतकी चित्रें कोरायची आणि मग त्या चित्रांचा खालचा भाग चिखलानें

लिपावयाचा आणि ती सारी भुयारी वाट चिखलानें, ढेकळांनीं भरावयाची ; एवढा उपद्व्याप कोणी आणि कां करायचा ? आणखी असें पाहा. हीं सगळीं चित्रें नुकतीं कोणीं कोरलीं असतीं तर गुहेंतील इतर दगडांचा व त्यांचा रंग वेगळा नसता का दिसला ? पण येथें असा वेगळेपणा विलकुल दिसत नाहीं. भोंवतालच्या इतर दगडांसारखाच इथलाहि दगड दिसतो आहे त्याचें काय ?'

पण त्याच्या त्या सांगण्याचा कांहींएक उपयोग नव्हता. 'अल्तामिरा'च्या गुहेंतील रंगीत चित्रांवर विश्वास ठेवण्याचें जसें तज्ज्ञांनीं पूर्वी नाकारलें तोच नन्नाचा पाढा आतांहि या कोरीव चित्रांच्या बाबतींत त्यांनीं वाचला.

पण काळाचीं पावलें पुढें पडत होतीं. ती बैठक संपली. बैठक संपल्यावर मात्र एकेक, दोघे दोघे असे हे शास्त्रज्ञ ला मूथ ( La Mouthe )च्या गुहेकडे गेले व स्वत: तीं कोरीव चित्रें त्यांनीं पाहिलीं. तेथून परत आल्यावर मात्र त्यांची खात्री पटली असें दिसत होतें.

'अल्तामिरा'च्या गुहेंतील गव्याबद्दल आपण काय एकेक वेड्यासारखे उद्गार काढले, याची त्यांनाच आठवण होऊन आतां लाज वाटूं लागली.

'कला व विज्ञानशाले'ची पुढची बैठक भरली असतां एका मोठ्या विद्वान शास्त्रज्ञानें आपण होऊनच प्रथम आपण फारच वेडीवांकडी चूक केल्याचें कबूल केलें. 'माझी ती चूक होती', असें खुशाल जाहीरपणें सांगायला आपण कबूल असल्याचें त्यानें सांगितलें. 'माझी त्या वेळीं भलतीच चूक झाली. आतां मी डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहून आलेलों आहें. तेव्हां, सद्गृहस्थहो, क्रोमॅग्नान मानव केवढा मोठा कलावंत होता हें आपण जगाला जाहीरपणें सांगितलेंच पाहिजे.'



# १४. मातीचा गवा

आपला आवडता पूर्वज सुंदर सुंदर चित्रें काढून रंगवणारा व कोरणारा कलावंत होता ही वातमी ऐकून घ्यायला लोक अगदी तयार होते.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी शास्त्रज्ञांनीं जेव्हां असें जाहीर केलें कीं क्रोमॅग्नान माणसाला वरच्या दोन कला तर येत होत्याच, पण त्याहि-वर जाऊन दगडाचें किंवा मातीचें सुंदर शिल्पहि तो तयार करीत असे; तेव्हां हे ऐकून प्रत्येकाला आनंद झाला.

त्यानंतर मॅक्स बगुऑ(Max Begouen)ची गोष्ट आली.ती तर अरेबियन नाईटम्‌मधील गोष्टीसारखी अद्‌भुतरम्य होती. तिने सारेच खूष होऊन गेले.

फ्रान्समधील पिरॅनीज डोंगररांगांच्या उत्तरेला मॅक्सच्या वडिलांची म्हणजे काउन्ट बगुआँची जहागीर होती. तेथें निसर्गसिद्धच एक लहानसा चमत्कार होता. एक लहानशी नदी नेहेमींसारखी डोंगरावरून वाहत न येतां डोंगराच्यामधून अगदीं खालून वाहत येत असे. काय बरं ही गंमत असावी ? कोठून येते ही लहानशी नदी ? याचें मॅक्स व त्याचे दोघे भाऊ

यांना एक मोठें गूढच वाटे. ती जेथून वाहत येई त्या जागेपासून थोड्याच अंतरावर दोन पाण्याचे प्रवाह एकाएकीं डोंगराच्या पोटांत गडप होत. मग तेच दोन प्रवाह डोंगराखालीं एकत्र होऊन नदी म्हणून बाहेर नाहींना येत ? त्यांना नेहमी प्रश्न पडे.

हें कोडे सोडवायचा एकच मार्ग होता; तो म्हणजे त्या टुक डोडुबेटच्या (Tue d' Audoubert) बोगद्यांत शिरायचें आणि त्या पाण्याच्या प्रवाहाचें काय होतें तें पाह्यचे. १९१२ च्या उन्हाळ्यांत त्या भावांनी एक लहानशी नाव तयार केली व ती घेऊन पाण्याच्या प्रवाहाबरोबर ती डोंगराच्या पोटातील काळोखांत ढकलली.

अगदी हळुहळू व फारच सावधगिरीनें ते नावेंत बसून पुढें जाऊं लागले. आंतल्या त्या बोगद्यांत चोहोंबाजूला मध्यरात्रीचा काळोख दाटला होता. त्यांच्याजवळच्या गॅसच्या दिव्यानें त्याचा जेवढा भंग होईल तेवढाच; बाकी सारा काळोख. त्यांच्या डोक्यावर डोंगराचा घुमट होता. तो निसर्गसिद्ध झालेल्या पिवळ्या चुनखडीच्या कमानीवर उभा होता. चोहोंबाजूला पिवळ्या चुनखडीचे असे थर होते कीं जणु काय त्यांच्या भितीच उभारल्या होत्या. त्यांत कुठेहि भंग झालेला नव्हता. प्रवाहाबरोबर दोनशें एक यार्ड डोंगराच्या पोटांतून गेल्यावर मात्र बाजूची ती चुनखडीची भिंत पडून तेथे खिडार झाल्यासारखे दिसलें. काय बरें आहे हे ? एखादी वाट आहे की काय ? असली तर कुठे बर जाते ?

डोंगराच्या पोटांत असलेल्या त्या प्रवाहांतील गाळाच्या किनाऱ्यालाच आपली नाव त्यांनी नांगरली आणि ते खिडाराकडे गेले. गेल्याबरोबर त्यांच्या नजरेला एक मोठी प्रशस्त गुहा दिसली. डोंगराच्या अगदी पोटांत, जगाला अज्ञात अशा भागी केवढी प्रशस्त छान गुहा निद्रिस्त पडल्यासारखी दिसत होती. त्या गुहेतील रहस्यपूर्ण अशीं दालने एकामागोमाग एक अशीं त्यांच्या नजरेपुढें येत होतीं. डोंगराच्या खालवर आलेल्या बांकानुसार, वळणानुसार ते खालींवर करीत होते. अगदीं अवघड अशा खडकांवरून चढून ते गुहेच्या वरच्या सज्ज्यासारख्या भागांत आले. तेथें येतांच मात्र त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. या जागीं प्रवेश करणारे कांही आपण पहिलेच नाहींत, आपल्या आधीं येथें कोणी तरी येऊन गेलेले आहे असें त्यांना आढळलें.

त्या गुहेच्या एका भिंतीवर घोड्याची अगदीं स्पष्ट आकृति कोणीं तरी कोरलेली होती. लहान रानघोडा होता तो. त्याच्या मानेवरची दाट आयाळ उठन उभी राहिलेली होती. कान ताठ उभे होते. नाक पुढें घुसलेलें होतें. आणि त्याच्या एका बाजूला तीक्ष्ण बाणासारखें कांहीं तरी रुतलेलें होतें. जवळच दुसऱ्या एका भिंतीवर दुसरा पण एक घोडा काढलेला त्यांना दिसला. त्यानंतर एका गव्याची नुसती रूपरेखा. त्यानंतर खूप मोठीं शिंगे असलेलें रेनडिअरचे नुसतें डोकेंच. त्याच्याहि डोळा व कान यांच्यामध्ये खोल गेलेला एक एक चमत्कारिक घाव काढलेला आहे, असें त्यांना दिसू लागलें. काय बरें याचा अर्थ? सोटयाचा घाव तर नव्हे हा?

ज्या कोणीं हीं चित्रे काढलीं ते खास आपण आलों त्या मार्गानें आलेले नाहींत. सर्वात वडील असलेल्या मॅक्सने उद्‌गार काढले, 'आतां पाण्याचा प्रवाह खूपच खाली आहे. पण जरा पाणी वर चढलें की येथें अडकूनच बसायची धास्ती सदैव राहीलच की. हा धोका कोण पत्करील? खास येथें येण्याची दुसरी कोणती तरी वाट असलीच पाहिजे.'

'असेल रे, पण ती शोधायच्या मागे आत्तांच नाही अं जायचें. आधी असेच पुढे जाऊं आणि बाकीची सारी गुहा शोधून काढूया.' झॅक म्हणाला.

आतां नदीला ते पार विसरले. त्याचें गुहेचें संशोधन चालू झालें. त्या दिवशी आणि त्यानंतर कित्येक आठवडे तरी ते मुलगे गुहेचा शोध घेत होते. पुष्कळ वेळां काउन्टसाहेबहि मुलांबरोबर येत. कधी त्यांच्या खासगी तैनातींतील नोकर फ्रान्सुआ कामेल हाहि येऊन त्यांना मदत करीत असे.

गुहेचे संशोधन करायला लागून त्यांना तीन महिने झाले होते. एके दिवशी म्हणजे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यांत फ्रान्सुआ व मुलगे एवढीच गुहेंत होतीं. वरच्या सज्ज्यासारख्या कट्ट्यावर बसून मॅक्स भिंतीवर कोरलेल्या चित्रांच्या स्वतःच्या वहीत प्रतिकृति करून घेत होता. झॅक व लुई त्याच्याच जवळपास आणखी कांहीं दिसतें का, सांपडतें का म्हणून पाहत होते. एवढ्यांत फ्रान्सुआ गुहेच्या दालनाच्या अगदीं दूरच्या टोंकाला जाऊन तेथें टोकरून पाहूं लागला. आतांपर्यंत सज्ज्यासारख्या

त्या कट्ट्याचा शेवट एका लहानशा, छप्पर अगदी खाली आलेल्या खोलीच्या टोकाशीं झाला, अशी त्या सर्वांची समजूत होती पण आतां फ्रान्सुआ आपल्या हातांतील दिव्याचा उजेड भोंवतालच्या गुहेंत पडलेल्या चुनखडीच्या थरांवर मजेखातर टाकीत हिंडत असतां 'अरेच्चा, इथें तर पलीकडे आणखी एक दालन दिसतें आहे' असे एकदम ओरडला.

सगळी पोरें आपले हातांतलें काम टाकून त्याच्याकडे पळत आलीं. खरोखरीच त्या लहानशा खोलीपलीकडे आणखी एक दालन असल्याचें दिसत होते. मध्ये पडलेल्या चुनखडीच्या खांबांनी त्याचा रस्ता अडवला होता. म्हणून हाती येईल ते आंत ढोसून ढोसून त्यांनीं तेथें एक लहानसें भोक पाडले व तें हळुहळू एकाला शिरतां येईल इतके त्यांनी मोठे करून घेतले. कसेबसे ते एकेक त्यांतून आंत शिरले व तेथल्या भितीवर आजबाजूला हातांतील दिव्यांचा प्रकाश पाडू लागले हजारों वर्षांपूर्वीं भित पडून बंद होऊन गेलेल्या गुहेंत ते शिरले होते.

अगदी पहिल्याने एक अस्वलाचें डोकें त्याच्या नजरेस पडले. त्याच्यापलीकडे एक हाडांचा सांगाडा होता. त्यानंतर आणखी एक व त्यानंतरहि आणखी एक सांगाडा दिसत होता. खरं म्हणजे त्या दालनांत चोहोंकडेच सांगाडे पडलेले होते. हजारों वर्षांपूर्वी ते भयंकर प्राणी येथे पडून मेले असावेत. मॅक्स आणि फ्रान्सुआने जवळच पडलेली एक डोक्याची कवटी उचलली आणि त्याचा जबडा उघडला. तेव्हां दोघांच्याहि एकदम एक गोष्ट लक्षांत आली की त्या अस्वलाच्या दांताचे वरचे सुळके जागेवर नाहीत. दुसऱ्या कवटीत पाहिले, तिथेंहि ते नव्हतेच. तिसरीतहि तोच प्रकार !

'कोणी तरी हे दांत उपटून काढले असावेत' मॅक्स अगदीं खात्री असल्यासारखें बोलू लागला. 'शिवाय इथे बघा की मी जिथें उभा आहे तिथे. या पाहा, माणसाच्या गुडघ्याचे कसे खोल ठसे उमटले आहेत ते. त्याला हे दात काढून घ्यायला चांगलाच त्रास पडलेला दिसतो आहे. या प्राचीन मानवाच्या स्वारीनें माळांकरितां काढले असावे हे सारे दात.'

'मला तर वाटतें आदिमानव या गुहेंत शिरण्यापूर्वीं खूपखूप वर्षे आधीं, इथें अस्वलें राहत असावी आणि तीं सारीं मेलीं असावीं', फ्रान्सुआ उद्गारला. पण हें सारें किती बरं वर्षांपूर्वीं घडलें असावें याची कल्पना

येतांच त्याचा आवाज एकदम घोगरा येऊं लागला.

त्यांचें हे बोलणे चालले असतां झॅक आणि लुई केव्हांच पुढें निघून गेले होते. पहिल्याने दिसली ती अस्वलांची खोली. पण ती एकच नसून तशा आणखी कितीतरी खोल्या, तसेच वरच्या मजल्याचे सज्ज्यासारखे कट्टे पण त्यांना आढळून आले. ते सारे पाहत पाहत गुहेच्या एका खोलीतून दुसरीत असे जात जात ते हिंडू लागले. मॅक्स आणि फ्रान्सुआ पण त्यांना गांठायकरता घाईघाईने पावले टाकीत येऊन पोहोंचले.

ते असे चालले असतां, एका अगदी पाढऱ्या खोलीतून दुसऱ्या तशाच खोलीत जात असतां, त्या चौघांच्याहि मनांत एक वेगळीच चमत्कारिक भावना स्फुरूं लागली. चौघाचीहि मने एका प्रकारच्या उच्च धार्मिक भावनेने भाल्यासारखी होऊन ते एका खोलीतून दुसरीत पावले टाकू लागले. नकळतच ते सारे एका मोठ्या साहसाच्या जवळ जात होते.

येथल्या सगळ्या खोल्यातून जात असता त्यांतील भितीवर कोठेहि चित्रे कोरलेलीं नव्हती. पण आता फिरून त्याच्या डोक्यावर छताच्या जागी आजूबाजूला जनावरे कोरलेली त्यांना दिसू लागली. या नव्या नव्या गोष्टी सारख्या मिळत गेल्याने ते अगदीं खूष होऊन पावले टाकीत जात असतां अगदी शेवटच्या खोलीत आले. मॅक्स सर्वांच्या मागे होता. त्याच्या तोंडून एकाएकी एक मोठा आश्चर्योद्गार वाहेर पडला. त्यासरशी सारे मागे वळून त्याच्याकडे पाहूं लागले.

अगदीं योगायोगाने त्याच्या पायाशी असलेल्या दगडावर त्याच्या हातांतील दिव्याचा उजेड पडला होता आणि तेथें त्याला असें कांहीं विलक्षण दिसलें की तो टंवकारून त्याच्याकडे पाहत अगदी अवाक् होऊन गेला. त्या दगडावर गव्यांच्या दोन प्रतिकृति कोणी तरी जणुं काय वळी देण्यासाठीं वेदीवर ठेवाव्या तशा वनवून ठेवलेल्या दिसत होत्या. त्यांपैकीं एक नर होता, दुसरी प्रतिकृति मादीची होती. ती प्रत्येक प्रतिकृति जवळजवळ एक यार्ड लांबीची होती. मादी पुढे होती, नर तिच्यामागें जात होता.

त्या प्रतिकृति अगदी जिवंत असल्यासारख्या दिसत होत्या. ते दोन्ही गवे फारच कुशलतेनें घडविले होते. त्यांच्याकडे पाहतां ते इतक्या

हजारों वर्षापूर्वी केले गेले असा भाससुद्धां न व्हावा इतके ते अद्ययावत् कलेच्या नमुन्याप्रमाणें दिसत होते. त्यामुळें कांहीं हजारों वर्षापूर्वी ते घडविले गेले, कदाचित् जगांतील सर्वात प्राचीन अशा त्या शिल्पकृति होत्या, या गोष्टीवर एकदम विश्वास बसत नव्हता. ते सारे तरुण संशोधक त्या शिल्पकृतीभोंवती अगदीं जागच्या जागीं खिळून गेल्यासारखे उभे राहिले. कांही वेळाने झॅकने आपली नजर त्यावरून काढली व दुसरीकडे लावण्याचा प्रयत्न केला.

'अरे, इकडे बघा की' त्याच्या तोंडून आलेले शब्द सर्वांनी ऐकले. तेथल्या जमिनीवरच्या चिखलांत दुसऱ्या एका गव्याची खोल अशी रूपरेखा काढली होती. तो शिल्पकार त्यावर नुकताच काम करायला लागला असावा. आणि आता चिखलांतून उचलून त्याला उभा करायचा व मग इतरांसारखा नीट घाट द्यावयाचा असा त्याचा बेत असावा. निदान या पायरीपर्यंत त्याचे काम आलेले होतें. कदाचित् बाकीचे त्याने उभे केले त्यातलाच हाहि एक गवा असेल का? पण– पण मग तो त्यानें पुरा कां नाही केला? तो परत कां नाही आला? सगळ्याच्या मनांत ही एकच शंका चमकून गेली.

मॅक्सने हळूच हात पुढे करून त्या शिल्पाकृतीला स्पर्श केला. अजूनहि ती माती हाताला ओलसर लागत होती. कलावताने मानेवर जेथे आयाळ काढली होती तेथील त्याचे बोटांचे ठसे अजूनहि स्पष्टपणे दिसत होते. उघडचा पायांनी तो चालत असल्याकारणाने गव्याच्या भोंवती त्याच्या पावलांचे चोहोंकडे ठसे उमटलेले दिसत होते. पलीकडच्या लहानशा खोलीतून तो माती आणीत असावा. कारण ज्या ठिकाणीं बसून त्यानें माती खणायला सुरुवात केली तेथेंच त्याच्या टांचांचे खोल ठसे उमटलेले दिसत होते.

हे ठसे उमटल्याला पंधरा हजार वर्षे उलटून गेली हें खरेंच वाटत नव्हते. त्या जमिनीवरचे पावलाचे ठसे पाहिले की जणु काय कालच तो शिल्पज्ञ येथें येऊन काम करून गेला असें वाटावें इतके ते ताजेतवाने होते.

कशाला बरें त्यानें हे गवे उभे केले? दालन सजवायला तर खास नाहीं. कारण डोंगराच्या पोटांत अगदीं इतक्या अंधेऱ्या जागी कोण राहत

असणार ? एवढेंच काय, पण त्या आदि कलावंतानें जेवढें काय काम करून अर्धवट सोडलें त्यानंतर या गुहेंत कोणी फिरकलेलेंसुद्धां दिसत नाहीं. त्या कलावंताच्या पायाच्या ठशाशिवाय त्याशीं न जुळणारा असा दुसऱ्या पावलांचा एकहि ठसा येथें उमटलेला दिसत नव्हता.

'खरंच हा कलावंत आपलें काम पुरें करायला कां बरं आला नाहीं ?'

'कदाचित् त्याला या गुहेंत येतांच आलें नसेल पुन: !' मॅक्सनें सुचविलें. 'न जाणो टेकडीचा एखादा भाग ढांसळून पडल्याकारणानें गुहेचें तोंडच बंद झालें असेल. त्यामुळें ही गुहा कुठें होती याचा पत्ताहि त्याला बिचाऱ्याला लागला नसेल. हेंच असावें त्याचें न येण्याचें कारण. त्यामुळें तें प्रवेशद्वार आपल्यालाहि मिळालें नाही.'



# १५. नायकाचा शेवट

आपला हा आदिमानव नायक कांही पहिल्यापासूनच सदैव शिल्पाकृति करणारा शिल्पकार नव्हता की पहिल्यापासूनच चित्रकारहि नव्हता. कोरीव आकृति काढण्याचेंहि त्याला सदैवच माहीत होतें अशांतला प्रकार नाहीं. पहिल्यांदां आपण जेव्हा त्याला पाह्यला तेव्हां त्याच्या ठायीं असलें कौशल्य मुळींच आलेलें नव्हते. चकमकीच्या तीक्ष्ण कपारी करण्याइतकें कसब त्यानें पहिल्यानें मिळवलें. थोडयाच काळांत हाडें, शिगें, हस्तिदंत यांवर कोरीव काम करण्याइतपत कसब त्याला प्राप्त झालें. बाकी तसें पाहिलें तर त्याला वेळ तरी कुठें होता ? त्याला सारखें भटकावें लागे. त्यामुळें बाकी गोष्टी करावयाला त्याला फारसा वेळच होत नसेल. त्याला आधीं शिकार करण्याकरितां श्वापदांच्या मागें जावें लागे, इकडेतिकडे सारखें फिरावें लागे. खरें म्हणजे तो सदैव भटकत होता.

अगणित शतकें त्याची भटकन्तीच चालू होती. हजारों, लाखों वर्षें तो सारखा येथून दुसरीकडे, दुसरीकडून तिसरीकडे, तेथून आणखी कोठें तरी असा भटकत होता. तो आशियाखंडांतून येथपर्यंत पायींच

भटकत आला. पण कां? असें विचारलें असतें तर त्याला सांगतां आलें नसतें. 'शिकार मिळेल तिच्या मागोमाग मी जातों', असें कदाचित् त्यानें सांगितलें असतें. पण तें खरें नव्हे.

खरें कारण काय, हें त्याचें त्याला तरी कुठें कळत होतें? एके ठिकाणीं कांहीं दिवस झाले की त्याला चैन पडेनासें होऊन तो अगदीं अस्वस्थ होई. ती अस्वस्थता भुग्यासारखें त्याचें मन सारखें पोखरून काढी. त्याला विलकुल चैन पडू देत नसे. असे झालें की त्याला भटकायची, कुठें तरी निराळ्या ठिकाणी जायची इच्छा होई, ती अंतःप्रेरणाच त्याला पुढे नेई. सारखें ढकलीत, सारखे पुढे ओढीत. त्याच्या आधी कितीतरी हजारों वर्षापूर्वी मीआंडरथाल मानवाला, तो गुहेचा आश्रय घेण्यापूर्वी ही अंतःप्रेरणा अशीच नव्हती का ओढीत नेत! या क्रोमॅग्नान मानवालाहि ती तशीच पुढें खेंचीत होती. त्यालाहि सारखें पुढें जावेंसें वाटे. आहे त्या ठिकाणापासून दूर, दुसऱ्या ठिकाणी! नव्या जागी त्याचे डोळे विसावत! त्या दाट अर्धेऱ्या जंगलानें भरलेल्या टेकड्यांपलीकडे काय वरें असेल? चोहोंबाजूनी टेकड्यांच्या कुशीत सुरक्षितपणे वसलेल्या या खोऱ्यापलीकडे काय वरें असेल? ही पाण्याच्या प्रवाहाने फुगत जाणारी नदी कुठें वरें जात असेल? तिचें हें थडगार पाणी ती कुठे वरे नेऊन ओतीत असेल?

त्याला सगळें कांही माहीत करून घ्यायला पाहिजे आहे. म्हणून त्याला सगळ्याचा शोध घ्यावयाचा आहे, तो भटकत सारे पाहणार आहे. त्याचे भटक्याचे, शोधकाचे जीवन तर आहेच, पण आतां तो मोठा जवरदस्त शिकारी पण झाला आहे. एक काळ असा होता की जंगलांतील श्वापदाना भिऊन तो त्याच्यापासून पळे. पण तो काळ आतां गेला. आतां जनावरांनाच त्याची भीति वाटावी अशी वेळ आली आहे. दोन पायावर चालणाऱ्या व अंगावर केस नसलेल्या या प्राण्याचा वाससुद्धां त्यांना आतां सहन होत नाही. या प्राण्याला शिगे नाहीत, तीक्ष्ण विदारक नख्या असलेले जवरदस्त पंजे नाहीत की सोंड नाही. अगदी निःशस्त्र, असाहाय्य असलेला हा दोन पायांचा प्राणी, पण सिहापेक्षांसुद्धा त्याची भीति वाटते. श्वापदांना ठार करायच्या दरवेळी व्या नव्या युक्तया त्याच्याजवळ असतात. आतां त्यानें हाडापासून काटेरी दांताची एक बरची केली आहे.

ती अगदी वांकडी तिकडी रुततच शरीराच्या मांसांत शिरते. कांटेरी बरचीचें टोंक ज्या काठींत बसवलेलें असतें ती काठी काय झाडाला, झुडुपाला अंग घासलें कीं पडून जाते. फार तर जमिनीवर लोळावें लागतें. पण हें पुढचें कांटेरी हाड हें शरीरांत खोल रुतूनच बसतें; बाहेर निघत नाहीं. तें काढून टाकतांच येत नाहीं.

क्रोमॅग्नान मानव अजूनहि श्वापदांच्या मागें जात शिकार करीत असतो. पण तो पहिल्यांदा दिसतो. त्या वेळी त्याचें भटकें जीवन संपुष्टांत आलेलें असतें. त्याला मात्र या गोष्टीची जाणीव झालेली नसते. त्याला सापडलेली ही सुदर भूमि म्हणजे भूप्रदेशाची सीमाच. त्याच्या दृष्टीनें तरी भूमीचा हा शेवट आहे. याची त्याला विलकुल अटकळ झालेली नसते. या येथल्या चुनखडीचे सुळके असलेल्या प्रदेशाला पुढे एके काळीं फ्रान्स हें नामाभिधान प्राप्त होईल, येथेच आपण अखेर नेहमींचें वास्तव्य करून राहणार आहोंत याची त्याला एवढीशीसुद्धां कल्पना आलेली नसते. त्याला आतां थोडीथोडकीं नव्हे, पंधरा हजार वर्षे घालवावीं लागणार आहेत.

येथलीं झाडापानांनीं भरलेलीं दऱ्याखोरी श्वापदांनी गजवजलेलीं होती. शिवाय एका सुदरशा उन्हाळ्यात तो त्यांच्या मागे लागून येथे आला होता. त्या वेळी सगळीकडे फारच छान, सुंदर वातावरण होतें. विलो आणि बर्चची झाडें हिरवीगार दिसत होती. म्हातारीं माणसें भयंकर गोठवून टाकणाऱ्या थंडीच्या ज्या गोष्टी सांगत ती थंडी आतां राहिलेली नव्हती. आतां हिमप्रदेश, हिमनद, फक्त डोंगरांतच काय ते आढळत. त्या हिमप्रदेशानें व हिमनद्यांनी इतकें कांही पाणी आपल्यांत सांठवून धरले होते की समुद्रसपाटी पार खाली गेली होती. जागोजाग असलेले जमिनीचे पूल ओलांडून आफ्रिकेतून युरोपांत खुशाल चालत जातां येत होतें. इंग्लिश खाडी तर अस्तित्वांतच नव्हती. त्यामुळें फ्रान्स-मधून इंग्लंडमध्यें पायी सरळ जातां येत असे. त्यावेळीं ब्रिटिश बेटें हीं युरोपच्या जमिनीचा एक सलग भागच होतीं. इंग्लंड व आयर्लंडमध्यें पण समुद्र नव्हता. त्यावेळी बाल्टिक समुद्र म्हणजे एक गोडया पाण्याचें सरोवर होतें.

सगळे हिमनद व हिमप्रदेश डोंगरांत गेले ही गोष्ट जरी खरी

होती तरी भर उन्हाळ्यांत त्यांच्यांतून वाहत येणाऱ्या नद्यांना त्या हिम-नदांपासून बर्फासारखें थंडगार पाणी मिळे. येथली हवा उन्हाळ्यांतसुद्धां छान थंड होती. पण हा जो भटक्या नवा मानवप्राणी आला त्याला हजारों वर्षे ध्रुव प्रदेशांतील थंडीची संवय झाली होती. त्यामुळें त्याला या थंडीचें कांहींच वाटत नव्हते. उलट सूर्यप्रकाशांत चमकणारी ही हिरवीगार जमीन त्याला फार आवडली होती. स्प्रूस आणि फरचीं अंधेर पाडणारीं दाट जंगले त्याला पसंत होती. दऱ्याखोऱ्यांतून दिसणाऱ्या डोंगराच्या उतरणी झाडांनीं कशा झांकून गेलेल्या होत्या. रेनडिअरला पाहिजे असलेलें शेवाळ चोहोंकडे भरपूर होतें. त्यामुळे त्यांचे कळपच्या कळप तेथें हिंडतांना दिसत. त्याशिवाय मॅमथ, केंसाळ गेंडा, मस्कबैल ( हा बैल अमेरिका ग्रीनलंडमध्यें सापडतो ) सारीं कांहीं स्वादिष्ट मांसाचीं श्वापदें या जंगलांत होती. शिकारीच्या श्वापदांनी भरलेली खूप संपन्न अशी ही भूमि होती. पण लवकरच त्या श्वापदांची शिकार करणारे आपण एकटेच येथे वावरत नाही, चकमकीच्या दगडाच्या तीक्ष्ण कपारी टोंकाला लावून लांकडी भाल्यांनी शिकार करणारी आणखी पण एक ठेंगू मानवाची जात येथे वस्ती करून आहे, हे त्याच्या लक्षांत आले. त्या मानवजातीची डोकी चागलीच जड होती. भिवयाचा भाग खूपच पुढें आलेला होता. त्याचे हात व पावलें मात्र खूप मोठी होती. पण पाय आंखड असून त्यांना ताठ उभें राहताहि येत नसावे. त्यांच्या निवाऱ्याच्या जागेसमोरच अरुंद पण उंच असलेल्या सपाट कट्ट्याच्या जागी संध्याकाळीं ते विस्तव पेटवीत तो त्याला दिसे.


हो, उन्हाळ्यांतसुद्धां ती चमत्कारिक माणसे गुहांतून राहत. क्रोमॅग्नान मानवाला त्याचे मोठे आश्चर्य वाटे. कारण खडकावरून, झाडांच्या बुध्यांवरून धवल हिमसेकाच्या राशीच्या राशी दिसू लागे-पर्यंत कोठलीहि निवाऱ्याची जागा पहावयाची जरूर आहे हें त्याच्या डोक्यांत येत नसे. असो म्हणा. येथें अशी जागा खूप मिळेल, अडचण पडणार नाहीं. तो ठेंगू शिकारी ! त्याच्या त्या गुहेंतून–बिळांतून त्याला पळवून लावायचें म्हटलें तर फारसे जड जाणार नाहीं. त्याच्या मनांत एक विचार येऊन गेला.

अखेर तो दिवस एकदांचा उगवला. नीआंडरथाल मानवावर त्या

दिवशीं चांगलाच प्रसंग ओढवला होता. फार काळापूर्वीं, तुम्हांला आठवतंय्, काय बेडरपणें त्यानें गुहेंतील अस्वलें, सिंह, यांना बाहेर पिटाळून लावलें होतें. आतां त्या श्वापदांचीच पाळी त्याच्यावर आली. आतां त्याला त्याच्या घरांतून पिटाळलें जाणार होतें. पण अशा थंडींत बाहेर पडावयाचें म्हणजे मरायचेंच. दुसरें गत्यंतरच नाहीं. म्हणून तो त्याला बाहेर पिटाळायला आलेल्या शत्रूशीं मोठ्या धैर्यानें उभा राहून तोंड देतो, त्याच्याशीं चांगलीच लढाई करतो. त्याची अखेरीचीच वेळ असते ती. कारण लढतां लढतां तो अखेर मरून पडतो.

एवढ्या शौर्यानें लढून आपला नायक अखेर धारातीर्थीं पडला म्हणून त्याला शाबासकी देणारें कोणीच नसतें तेथें. हे गोरेगोरे, देखणे, नवीन आलेले चढाईखोर, यांना त्या मानवाशीं आपला कांहीं संबंध आहे असें कधींच वाटत नसतें. तो खालीं पडल्यावर ते सरळ त्याचा देह उचलतात, फेंकून देतात व त्याची गुहा वळकावतात. आपण येण्यापूर्वीं लाखों वर्षें हा छोटा मानव युरोपचा राजा म्हणून वावरत होता याची त्यांना कल्पनाहि नसते. हिमयुगाच्या भयंकर थंडींतहि त्यानें टिकाव धरून दिवस काढले हेंहि त्याला माहीत नसतें. हा नवा जो मानव आला तो शत्रू म्हणनच. त्यानें विचाऱ्या नीआंडरथाल मानवाचा पार निकाल लावला.

पण त्याची बायको ? तिची मात्र अशी वासलात लागली नाहीं. राहूं दे कीं तिला. कातडी खरवडून काढील ती. विस्तवाकडे पाहील. उपयोगी पडेल ती. शिवाय ज्या कोणाला बायको नाहीं त्याच्याबरोबर ती राहूं शकेल कीं; असें म्हणून तिला मात्र ठेवण्यांत येतें.



# १६. मध्यरात्रीच्या प्रहरीं गुहेंत होणारा जादूटोणा

आता क्रोमॅग्नान मानव वर्षाचे बाराहि महिने गुहेत राहूं लागला होता. आतां उन्हाळ्यांतसुद्धां उघड्यावर निजायचे थंडीमुळें त्याच्या जीवावर येई. पण कांही हजारों वर्षापूर्वीं तो ज्या भूप्रदेशांतून आला–( एक दिवस असा येईल की त्या भूभागाला चेकोस्लोव्हाकिया या नांवानें लोक ओळखतील )–त्या भूभागात राहणारे त्याचे बांधव मात्र उन्हाळ्यांत, अजूनहि मोकळ्या जागेत वस्ती करून राहत. ते मॅमथची शिकार करण्यांत फारच पटाईत होते.

येथें अर्धवर्तुळाकार पसरलेल्या टेकड्यांच्या कुशींत सुरक्षितपणें वास करणारें असें एक खोरें आहे. हें बेक्वा ( Becva ) नदीचें खोरें. भविष्यकाळांत या खोऱ्यांतून वार्सा ते व्हिएन्ना असा जाणारा एक रेल्वेचा मार्ग होईल. पण आतां या प्राचीन काळीं, मात्र हजारों मॅमथांचा जायचा यायचा तो एक राजमार्ग आहे. तेथें वनघोडे, रेनडिअर, इत्यादि प्राण्यांचे कळप हिंडत असतात. त्यांची शिकार करून खाणारे सिंहहि येथें अपरिचित नाहींत. पोलंड व सायलेशिया यांच्या सपाट मैदानावर

उतरावयाचा त्या काळी हाच एक मार्ग होता. याच खोऱ्यांत उतरून सारीं जनावरें पुढल्या गवताळ मैदानांत जात. म्हणूनच मॅमथची शिकार करणाऱ्या पारध्यांनीं सरळ त्या जनावरांच्या जायच्या-यायच्या मार्गावरच आपला तळ ठोकला.

हिमयुगाच्या अखेरीला थंडीचे दिवसांत पराकोटीची थंडी पडे. सर्वकडे हिमसेकाचे डोंगरच्या डोंगर होऊन राहत. त्यांतून वाहणारा वारा अंग कापून काढतो आहे असे वाटे. ज्या दरडीचा आश्रय घेऊन किंवा ज्या गुहेच्या तोंडापाशी तुम्ही शेकोटी पेटवून वसला असाल त्या शेकोटीला घट्ट अगाशी धरून कवटाळावे असें तुम्हाला वाटे. उन्हाळा कधी येईल व या गोठवून टाकणाऱ्या थंडीच्या कडाक्यांतून आपली मुक्तता कधी होईल याची आतुरतेने वाट पाहण्याची तुमच्यावर वेळ येई. उन्हाळा येई पण किती थोडे दिवस. जरा वितळलेलें वर्फ काढून सगळे साफसूफ तुम्ही करतां तोंच फिरून हिमवर्षाव होऊं लागे. कांही असलें तरी उन्हाळा एकंदर प्रिय वाटे ही तर गोष्ट खरीच. त्या वेळी सपाटून काम करता येई. जीवन कसे छान आनंदाने भरलेलें राही. सगळ्यांनी जमून खूप खावे, मजा करावी, अशी रंगत भरे जीवनांत.

या दिवसात या मोकळ्या खोऱ्यात रांगेने लावलेल्या इतर पाला-वरोवर तुम्ही पण आपले पाल ठोकून देत असां. समोर भल्या मोठ्या शेकोट्या पेटलेल्या राहत. त्यानंतर तुम्ही आपली खोदायची सारी हत्यारे वाहेर काढून ठेवीत होतां. कारण तुम्हांला मॅमथला पकडायचे असे. त्याकरिता त्याच्या जायच्या मार्गावर एक खूप मोठा खड्डा खणावा लागे. शिवाय त्याला मारायला पेअर फळाच्या आकाराचे लांबट व पुढें जाड गोल असलेले गोटेपण तुम्हांला गोळा करून तयार ठेवावे लागत. पहिल्यांदा एका लहानशा घट्ट कातड्याच्या तुकड्यांत त्यांना चांगले घट्ट बांधून घ्यावें लागे. त्यानतर दगडाच्या अरुंद जरा निमुळत्या वाजूला एक लांबलचक कातडी पट्टा जोडायचा की झाले तयार तुमचे हत्यार. पट्ट्यानें तो दगड मॅमथच्या डोक्यावर मारायचा, उचलायचा, परत मारायचा, असे दगडाचे घाव घालावे लागत मॅमथच्या डोक्यावर.

मॅमथला मारायचे हे काम कांही सोपें नव्हतें. त्यांत मोठेंच साहस होते. पण त्या साहसाशिवाय का लोक तुम्हांला मॅमथची शिकार करणारे

म्हणून ओळखूं लागत ? तीं पाहा तुमच्या पालें ठोकलेल्या तळामागें असलेल्या कचऱ्याच्या खळींत शेंकडों, हजारों मॅमथांचीं हाडें पडलेलीं आहेत. तीं का उगीचच ? तुम्ही, तुमचे वडील, तुमचे आजे-पणजे या साऱ्यांनी ती खळी मॅमथच्या हाडांनी भरून टाकायला हातभार लावलेला आहे. हिवाळ्यांतील जळाऊ लांकडांप्रमाणें तीं पाहा कशीं नीट लावून ठेवलीं आहेत तुमच्या पालामागे ! त्या पाहा हत्तीच्या दांताच्या तीन मोठ्या राशि. आणि त्यांतून हिंडायला ठेवलेली ती लहानशी वाट. ही दुसरी प्रचड रास त्यांच्या मांडीच्या हाडाची. हीं हाडे विस्तवांत घातली की त्यांतूत चरबी गळू लागते आणि ज्योत कशी छान पेटतच राहते. या बाजूला मॅमथच्या पुठ्ठ्याची हाडे पडली आहेत. त्या राशीत पुठ्ठ्याच्या हाडाशिवाय कांही मिळणार नाही. आणि इकडे फक्त मॅमथच्या खालच्या जवड्याची हाडे. ती वेचून कशी बाजूला काढलीं आहेत आणि त्यांची पण रास केलेली आहे.

मॅमथचे मांस भक्षण करणारे हे लोक मोठे पट्टीचे शिकारी. पण क्रोमॅग्नान मानवाचे सारेच बांधव मोठे पट्टीचे शिकारी होते. येथून जरा अंतरावर असलेल्या फ्रान्समध्ये असलेले त्याचे बांधव घोड्यांची शिकार करीत. पुढच्या काळांत सोलुत्रे (Solutré) म्हणून ओळखल्या गेलेल्या एका गावी या लोकाचा असाच तळ पडलेला असावा. कारण लाखों टन घोड्यांचीं हाडे त्या जागेभोवती अजूनहि सांपडतात.

हे घोड्याचे मांस खाणारे लोक नुसतीच शिकार करणारे नव्हते. ते मोठे कसबी होते. विशेषतः चकमकीच्या दगडांच्या तीक्ष्ण कपारी बनवण्यांत त्यांचा हातखंडा होता. त्या कपारी अगदी पातळ करून त्यांनीं जशा त्यांच्या सुऱ्या बनवल्या तितक्या सुदर कपारींच्या सुऱ्या जगांत इतरत्र सांपडणें कठीण. त्या सुऱ्यांची पाती चांगलीं एक फूट लांबीचीं असून, इतकीं पातळ असत की त्यांतून जवळजवळ आरपार दिसे असें म्हणण्यास हरकत नाही.

हे सोलुत्रे (Solutré) गावचे लोक घोड्यांच्या हाडांचा पण चांगला उपयोग करीत. त्यांनी एक नवाच मजेदार शोध लावला होता. घोड्याच्या हाडाची एक बरीच अरुंद अगदीं तीक्ष्ण टोंकाची कपची ते काढीत. ती सर्व बाजूनी जितकी गुळगुळीत करतां येईल तितकी करून

घेत. अखेर ती आरीसारखी तीक्ष्ण टोंकाची होई. नंतर वरचा जो जरा रुंद भाग असे त्यामध्यें ते एक भोक पाडीत. तें डोळ्यासारखें दिसे. त्यांतून चांगला वाळलेला तांत किंवा कंडरा घातला की गंमतच होई. जेथें जेथें तुम्ही आरीनें भोंक पाडून ती आंत घालाल तेथे तेथें त्या टोंचणीमागे तांत पण आंत शिरे. गंमतच सारी ! पण या शोधाने टांके घालतां यायला लागले. त्यामुळे वाळून कुटून मऊ केलेली कातडीं एकमेकाला जोडतां येऊं लागली. हा शोध इतका अद्‌भुत होता की क्रोमॅग्नानला राहणाऱ्या त्याच्या बांधवांनी झटकन् त्याची नक्कल करून तो उचलला. आतां वापरायचीं वस्त्रे करावयाचीं म्हटलीं कीं बायकांचे सुईशिवाय अडू लागलें.

क्रोमॅग्नान मानव आतां खूपच शिकत चालला होता. आपल्यी इतर बाधवांनी जे जे नवे शोध लावले असतील ते ते सर्वच तो फार चटकन् उचलीत असे. अर्थात् त्याचें सगळे ज्ञान नेहमींच उसन्या शिदोरीचे नव्हते. तोसुद्धां कितीतरी गोष्टी करावयाचा. हाडापासून माशांना पकडावयाचे गळ, वरच्या त्यानें स्वतः बनविल्या. एवढेंच काय, हाडांपासून करवती, भोंक पाडण्याचा सामता (Drill) सुद्धां तो बनवी. आता तो आपल्या वस्त्रांना हस्तिदंताची बटणे करून लावीत असे. — हस्तिदंतापासून सुदर सुदर नकली कोरीव शिपा पण तो तयार करीत असे.

अॅटलाट् (Atlatl) हि शोधून काढला होता. त्यामुळे त्याला भाला बऱ्याच दूर फेकता येऊं लागला. हा अॅटलाट् ( Atlatl) म्हणजे एक दांडीच असून त्या दांडीवर भाल्याची मागची बैठक बसवावयाची. ती बसवली की ज्या हाताने तुम्ही भाला फेंकणार त्या हातांत ती घ्यावयाची. आणि भाला द्यायचा फेकून. त्यामुळे भाला मात्र दूर उडून गेल्यासारखा दूर जाई. पण ( Atlatl ) मात्र तुमच्या हातांत राही. या शोधानें तुमचा हात जणु काय लांब होऊन भाला चांगला दूरवर फेकतां येऊं लागला.

आपल्याला भाला चांगला दूरवर फेकतां यावा म्हणून तासन् तास तो फेकण्याची संवय करण्यांत घालवी. तो मांसाहारी होता. शिकार करून आणलें तरच त्याला खायला मिळे. पण अलीकडे मात्र कांहीं वेळां चांगली शिकार मिळे, पण सदैवच मिळे असे नाही. कांहीं वेळां मिऴतहि नसे.

अ झालें कीसें तो अगदीं गोंधळून जाई. असें कां व्हावें ? कांहीं वेळेला चांगली शिकार मिळावी आणि कांहीं वेळेला नाहीं, असें कां ? रानांत खूप श्वापदें नेहमीच राहतील व सदैव शिकार मिळेल असें नाहीं का कांही करतां यायचें ? काय करावे म्हणजे असें होईल, याचा तो खूप खूप विचार करीत बसे. अखेरीला त्याला एक मार्ग सुचला. कांही तरी जादूटोणा करून दैवी शक्ति वळवायला पाहिजे. त्याच्या मनानें घेतले. हो, हेच खूप शिकार मिळवायचें गुपित - जादूटोणा. निसर्ग काय करतो याची तुम्ही नक्कल करा की आपोआप तुमच्यामुळें निसर्ग तसा वागू लागेल. तुम्ही मॅमथ, घोडे, गवे यांची खूप चित्रें काढलीं, मुबलक प्रतिकृति केल्या कीं निसर्गातसुद्धां त्यांची मुबलक उत्पत्ति होईल.

या कल्पनेनें भारून त्या मानवाने चित्रे काढावयाला सुरुवात केली. तो कोठेहि भितीवर चांगली जागा मिळाली की तेथे चित्रें काढून ठेवू लागला. पण गुहेंत तर अंधार असे. अंधार असला म्हणून काय झाले? उलट अधारांतच जादूटोणा, मंत्रतंत्र जास्त प्रभावी होतात.

अल्तामिराला त्याने अगदीं गडद अंधेऱ्या खोलीतच वरच्या छतावरच्या सपाट जागी गवे काढले. ला मूथला त्याने भुयारी वाटेसारख्या भागांतच अशीं चित्रें काढलीं त्यांत गवे, डोंगरी बकरे (Ibex), रेनडिअर, रानघोडे सारे काढले. कोम्बारेल (Combarelles) ला तर त्याने त्यावेळी त्याला माहीत असलेलें सारे श्वापद जग, अगदी काळोखात ७२० फूट लांबीच्या सज्जाच्या भितीवर चिरून ठेवले. पॅसिएगाला– (Pasiega) आपल्या राह्यच्या गुहेच्या छान थडगार जमिनीखाली असलेल्या एका खोल धोक्याच्या जागेत जाऊन त्याने जनावरांची चित्रे काढण्याचें साहस केलें. ही चित्रे सुद्धा थोडीथोडकी नाहीत. ५० हरिणे, ५१ घोडे, १६ गुरें, १५ गवे, १२ काळवीट, ९ डोंगरी अल्पाईन बकरे, इत्यादि इत्यादि. अशी त्या तळजागेत त्याने एकंदर २२६ चित्रे रंगविलीं होती.

त्याला चित्रें काढायला चांगली सपाट भिंतीची जागा क्वचित् मिळे. त्यामुळे एका जनावराच्या डोक्यावर दुसरें जनावर असें कांहीं वेळां त्याला रंगवावे लागे. फॉद् ग्रोम येथील गुहेच्या सज्जांत तर त्यानें जनावरांचा एक जंगी चाललेला जमाव असाच एकाच्या डोक्यावर एक

असा ठेवून रंगविला. पहिल्यानें त्याने रेनडिअर आणि घोड्याची रांग काढली. नंतर तो फिरून परत आला. आणि त्यांच्या डोक्यावर त्यानें गव्यांचा थवा काढला. तेवढ्यानेंहि न भागतां त्यांच्या डोक्यावर त्यानें मॅमथांची एक जंगी स्वारीच्या स्वारी चालत असलेली काढली.

तो नुसती चित्रें काढून थांबत नसे. तीं रंगवी. कांही कांहीं वेळां तीं कोरून काढी. मात्र त्या साऱ्या प्राण्यांच्या प्रतिकृति किंवा छब्या तो अशा बनवी किंवा काढी कीं कोणी चटकन् पाहिलें तर जिवंत प्राणीच असल्याचा त्याला भास व्हावा.

तो जनावरांच्या लहान लहान प्रतिमा कोरून काढी. एखाद्या जनावराची मातीची प्रतिकृति कशी करावी हे पण तो शिकला होता. टुक् डोडुबेटच्या गुहेंत तर त्यानें दोन यार्ड लांबीचे एका गव्याचें जोडपें (नर आणि मादी) उभे केलेलें सांपडले. या त्याच्या साऱ्या खटाटोपा-मागे एकच हेतु असे.

तो जादू करी. जनावरांच्या रंगाकृति, कोरीव आकृति आणि प्रतिमा तो सारख्या सदैव करीत असे. असें केलें की निसर्ग रानांत मुबलक श्वापदे उत्पन्न करील अशी त्याची श्रद्धा होती. कधीं कधी एखादा भाला जनावराच्या अंगांत घुसला आहे असेंहि तो दाखवीत असे. कधीं कधीं त्याच्यावर सोटयाचा चांगला घाव बसला आहे असेहि तो दाखवी. आपण जनावराचें असें चित्र काढलें आणि त्यांत घाव बसलेला दाखवला की तिकडे त्या जिवंत प्राण्याला खरोखरी घाव बसेल असा त्याचा विश्वास होता. त्याच्या जादूने असें होते असें त्याला वाटे.

खरोखरीच ही कल्पना मोठी अद्भुत आहे. क्रोमॅग्नान मानवाच्या डोक्यांत पहिल्यांदा ती जेव्हां केव्हां आली असेल तेव्हांपासून ती कधींच नष्ट होऊं शकली नाही. हजारों वर्षे लोटली तरी आजचाहि मानवप्राणी अजून तिच्यावर विश्वास ठेवतो व ठेवीलहि. या काळांत शत्रूची एखादी मेणाची प्रतिमा करून तिला टांचण्या टोंचल्या जातात किंवा तिला विस्तवावर धरून वितळवलें जातें. कधीं शत्रूच्या प्रतिमेच्या कपड्यांत पेंढा भरून ती जाळायची किंवा तिला फांशी द्यावयाची असेहि प्रकार चालतात. तुम्ही एखाद्याच्या प्रतिकृतीला दुखापत केली कीं ती माणसाला होते अशी यामागची मुख्य कल्पना. आतां झालें स्पष्ट. यालाच – या

करणीलाच – जादू म्हणतात आणि ती अशा रीतीनें काम करीत असते.

बाहेर बर्फ पडू लागलें की शेकोटीपाशीं बसून विचार करावयाला क्रोमॅग्नान माणसाला हवा तेवढा वेळ मिळे. तेव्हां, नेहमी तो या जादूचाच विचार करीत बसे. काय जादू केली असता खूप शिकार मिळेल, यासंबंधी त्याचे विचार चालत. विशेषतः दुसऱ्या दिवशी शिकारीला जावयाचें असले कीं, आपल्याला खूप शिकार मिळण्याची निश्चिती व्हावी म्हणन तो आदल्या रात्री चागली भक्कम जादू करी.

बाकी त्याच्या बायकापोरांना यातले कांहीच माहीत होत नसे. कशाला बोलायचें ? अखेरीला कांही म्हटले तरी जादूमंत्र हें सारें पुरुषांचे कार्यक्षेत्र. त्यांत बायकापोरांचा काहीं संबंध नाही. ती गुहेच्या पुढच्या भागांत झोंपलेली असत. पण गुहेच्या अगदी आत, आंत, दूरवर, जेथें खप काळोख असे, तेथें पुरुषांचा जादूटोणा चाले. मोठ्या झालेल्या मुलांना त्यावेळी हजर राहूं देत. पण इतर लहान मुले, बायका, यांना अगदीं मज्जाव असे. मुलें हातांत दिवे धरून उंच खालवर जसा पाहिजे तसा उजेड पाडीत, त्यामुळे भालाईत चागलें पाहूं शके व जादू करीत असे.

बायकापोरे निजली असता जादूमंत्र केला जाई, हे एक प्रकारे चांगलेंच होतें. कारण शिकारीची पक्की महाजादू बघायला फारच भयंकर दिसे. जादू चालली असेल त्या दालनाच्या मध्यभागी एक मोठें अस्वल उभे केले जाई. हे अस्वल मातीचे असे. पाठीमागच्या दोन पायांवर उभी असलेली त्याची प्रतिकृति इतकी हुबेहूब करीत की क्षणभर जिवंत अस्वलच पुढे उभे आहे असे वाटून पाहणाऱ्याची छाती धडधडू लागे. जोरांत श्वास सुरू होई. डोके मात्र मातीचें न करतां मातीच्या त्या जाड मानेवर खऱ्याखऱ्या अस्वलाचें मोठें डोकें बसविले जाई.

एवढे झालें की खूप अंधेऱ्या जागेंतून तो वैदू – मांत्रिक हळूच, चोरून, पाऊल न वाजविता पुढें येई. त्याच्या साऱ्या अंगावर, मांड्यांवर, पायांवर जनावराच्या कातड्यासारखे पट्टे ओढलेले असत. त्याच्या डोक्यावर काळविटाची शिंगे बसवलेली असत. सबंध चेहऱ्यावर घुबडाचा मुखवटा असे. लांडग्याचे कान, हाताच्या जागी सिंहाचे पंजे व घोड्याचें शेपूट असा त्याचा थाट असे. त्याची दाढी व पाय हेच काय तेवढे माणसाचे राहत.

घोड्यासारख्या दुडक्या चालीनें तो पावलें टाकीत पुढें येई. ' अगदीं निर्धास्त राहा. उद्यांची कांही काळजी करूं नका.' असेंच तो जणू काय बजावीत आहे असें वाटे. ' पाहा तर खरं, मनुष्य आतां घोडा आणि काळवीट यांसारखा चपळ झालेला आहे. सिंहासारखा त्याचा घाव जबरदस्त बसतो. त्याचे कान लांडग्यासारखे तीक्ष्ण झालेले आहेत. घुबडासारखें तो अंधारात सुद्धा स्पष्ट पाहूं शकतो. जनावरांच्या या साऱ्या शक्ति आतां त्याच्यामध्यें एकत्रित झाल्या आहेत. शिवाय तो मनुष्य असल्यानें कोणत्याहि जनावरापेक्षां धूर्त, हुशार आहे. तेव्हां अगदी निर्धास्त राहा, विलकुल काळजी करूं नका.' असेच तो दर्शवित असे असें वाटे.

हळुहळू तो अस्वलाकडे येई. आपले दोन्ही हात खूप रुंद पसरी. सगळ्या शिकाऱ्यांना पुढें यायला खुणावी.

त्या खुणेसरशी ते सारे शिकारी पुढें झेप घालीत. भाले फिरवीत शिकारीच्या वेळी आरोळ्या ठोकीत तशा आरोळ्या ठोकीत, ते सरळ अस्वलाजवळ उडी घेऊन त्याच्याभोवतीं फेर धरून नाच लागत. तो मांत्रिक वैदूहि त्यांच्याबरोबर नाचे. हरणासारखा चपळ, सिंहासारखा शक्तिमान् आणि कोणत्याहि तरुणासारखा न थकणारा असा असतो तो मांत्रिक वैदू. हे सारे शिकारी व तो वैदू याचा मिळून नाच सुरू झाला की चुनखडीच्या त्या भिंतीवरहि त्यांच्या सावल्या भयंकर दिसत. त्यांचाहि नाच सुरू होई.

पण हे काय, एकाएकी फेर थांबला. बहुधा जादूची शेवटची करणी सुरू झाली.

त्या शिकाऱ्यांचा मुख्य नायक हातांत भाला घेऊन तो पाहा अस्वलासमोर उभा राहिला. ' फेको. फेको. ' त्याच्या मागचे सारे शिकारी अधीर होऊन ओरडू लागले. प्रत्येकाला आपले भाला फेकण्याचें कौशल्य दाखविण्याची खुमखुमी आली आहे. ' फेको, फेको. ' चोहोंकडून एकच आवाज येऊं लागला आहे.

मुख्य नायकानें तो पाहा भाला फेंकला. त्याच्या मागोमाग भराभर एकेक भाले त्या अस्वलाच्या शरीरांत घुसू लागले. भोंवतालचें सारे वातावरण शिकाऱ्यांच्या आरोळ्यांनी दुमदूमून गेले आहे. त्या मातीच्या अस्वलाच्या अंगांत ते पाहा तीस भाले घुसलेले दिसत आहेत. एकानें तर

त्याचें डोकेंच आपल्या भाल्यानें भोसकून खालीं चुनखडीच्या जमिनीवर पाडलें आहे.

'मेला, मेला. आतां खुश्शाल आनंद करा. अस्वल मरून पडलें आहे', एकच आवाज घुमूं लागला.

ही सारी करणी झाली कीं जादू संपली. आतां सर्व शिकाऱ्यांनीं खुश्शाल शांत मनानें घरीं जावें व झोंपा काढाव्या. हातांत दिवे धरलेले, ते वयांत येऊं पाहणारे पोरगे पाहा कसे थरथर कांपत आहेत. त्यांचेंहि काम आतां संपलें आहे. खुश्शाल त्यांनींहि घरीं जावें आणि येत असेल तर झोंप काढावी. पण हें सारें पाहिल्यावर त्यांना झोंप येईल कीं नाहीं कोण जाणे ! आतां उद्यांची शिकार तर चांगली होईल. खूप मांस मिळेल खायला, असा प्रत्येकाला विश्वास वाटू लागे.



# १७. मध्यंतर

अशा रीतीच्या जादूच्या करणीचा जेव्हा क्रोमॅग्नान माणूस उपयोग करूं लागला तेव्हां अन्नाचा प्रश्न आपण पुरा सोडवला, असाच त्याचा विश्वास होता. पण जनावरांची हुबेहूब जिवंत असल्यासारखी चित्रें रंगवून किवा ती भिंतीवर कोरून, अथवा त्यांच्या प्रतिकृति करूनहि त्याला पाहिजे तेवढी शिकार मिळेना. कारण त्याची निसर्गात निर्मितीच तेवढी होईना. शिवाय आतां तर जंगलांतून मॅमथहि दिसेनासे झाले. अंगावर लोकर असलेले गेंडे पण गेले. गवे तर कुठें गेले, काय झालें त्यांचे, कोणासच कांही कळेना. हीं सारीच जनावरें जंगलांतून नाहीशी झाल्यासारखीं झालीं, हें मात्र खरें. आणखी भरींत भर म्हणून की काय रेनडिअर सुद्धां दक्षिण प्रदेशांतून नाहीसा होऊन फक्त उत्तरेकडेच वावरूं लागला.

आतां काय करायचे, सगळ्यांच्याच पुढे प्रश्न पडला. त्या पट्टीच्या शिकाऱ्याला कमींत कमी रेनडिअर तरी मिळायचाच, या गोष्टीची इतकी संवय झाली होती कीं, तो त्याच्या शिकारीवर सर्वस्वी अवलंबून असे, असें म्हटलें तरी चालेल. पण रानांतले रेनडिअरहि अदृश्य होऊं .लागले तसतसें त्याला कांहीं सुचेना. आतां काय करायचें हा त्याच्यापुढें प्रश्न

पडला. रेनडिअरच्या मागोमाग उत्तरेकडच्या थंडींत जावें की काय याचा तो विचार करूं लागला.

पण वयोवृद्ध माणसांचा उत्तरेकडे जायला मोठा विरोध असे. ‘आपल्या वाडवडलांच्या या गुहा सोडणें वरें नव्हे.’ ते नेहमीं उद्‌गार काढीत. ‘उगीच शिकारीच्या मागे लागून नव्या जागा शोधीत जाण्यापेक्षां कांही दिवस इथेंच राहूं तसेच जरा उपाशी पोटानें’, असे ते म्हणत. नव्या पिढीतीलहि कांही जरा मनाने कमकुवत असलेले तरुण, वृद्ध माणसांना साथ देत व म्हणत ‘वरं आपण येथेंच राहूं. आणि जंगलांत काळवीट, छोटीं हरिणे मिळतील त्यांचीच पारध करूं. अजून रानडुकरे, रानमांजरे (लाल पिंगट वर्णाचा असतो. अमेरिका – दक्षिण कॅनडांत सांपडतो.) आणि ससे मिळतात ना, त्यांचीच शिकार करूं’, असे ते म्हणू लागले.

नव्या जागी जायचे प्रत्येकालाच रुचत नसे व तेवढें प्रत्येकाचे धाडसहि होत नव्हते.

‘अरे इतकी कसली काळजी करता? समुद्राच्या कांठी गेले तर खूप शिपल्यातले मासे मिळतात. ते समुद्रशिपले आणतात ना, ते लोक सांगत असतात की किती तरी जलचर प्राणी सापडतात तेथे! कालवे, खूप पाण्याचे खेकडे, शिवड असे कितीक तरी प्राणी मिळतात समुद्राकाठी. खायला मोठे चविष्ट असतें त्याचे मास. शिवाय समुद्र खवळला की कितीतरी मोठे मोठे मासे सुद्धा तो वाहेर फेंकतो. चला तेथे जाऊया म्हणजे नको अन्नाची काळजी.’ असेंहि काहीजण सागत. अशी बोलणी होता होतां अखेर काही रेनडिअरामागे उत्तरेकडे वळले, कांही गुहेतच राहिले, तर कांही समुद्राकांठी मासे खाण्याच्या बेताने गेले. अशा रीतीने गुहेत वास्तव्य करून राहणारें एक महान् मानवी जीवन सपुष्टांत आले. त्यावर पडदाच पडला. पट्टीचा शिकारी, उत्कृष्ट कलावत असणारा मानव जीवनाच्या रंगभूमीवरून निघूनच गेला.

मनुष्याचे आत्मिक सामर्थ्य ही काही अशी साधीसुधी गोष्ट नाही. त्याला एकच नसून अनेक वाजू आहेत. तें कधीच नाहीसें होत नाही, किंवहुना ते अमर आहे मानवी मनात – अगदी आंत – असे कांही तरी आहे की ते त्याला स्वस्थ वसूच देत नाही, की आहे त्या परिस्थितीत अखंड समाधान मानू देतच नाही. त्याचे ते मजेदार हात आणि त्याहूनहि अद्‌भुत

असणारा त्याचा तो मेंदू, त्याला स्वस्थ कसें तें वसू देत नाहींत. त्याच्या मागल्या जीवनावर हा जो पडदा पडला, त्या पडद्यामागील सारा देखावा आतां बदलू लागला होता. नवीन पात्रें जीवनाच्या रंगभूमीवर प्रवेश करण्याकरितां तयार होत होती. जुने अश्मयुग गेले, नाहीसें झालें. पण त्या जागीं नवें अश्मयुग सुरू होत होतें. पण या मधल्या काळांत मानवी आत्मसामर्थ्याचें तेज तीन वेळां खूप उफाळून वर आले.

आतां तो नद्यांच्या कांठचा चिखल घेऊन त्यांत वाळू मिसळीत असे. नंतर त्या मातीच्या गोळ्याला भांड्याचा आकार कसा द्यायचा हे तो शिकला होता. तसा आकार आला की तें मातीचे भांडें तो विस्तवाजवळ ठेवीत असे. आणि काय गंमत ! विस्तवाच्या त्या आंचेनें ते भांडें चांगले टणक होई. इतकें की त्याचे सहसा तुकडे पडत नसत कीं तें खाली वसूनहि जात नसे. त्यामुळें आतां पाणी सांठवणे, अन्न शिजवणें, इत्यादि गोष्टींकरितां, तो या भांड्यांचा उपयोग करूं लागला. शिवाय त्याच्या अंवतीभंवतीं उगवणाऱ्या किती तरी गोष्टी तो पूर्वीं खात नसे, पण आतां खाऊं लागला.

त्याचें ते मातीचे भांडें होतें असे ओबडधोबड. पण त्याच्याच डोळ्यांना मात्र काय छान दिसे ते ? आफ्रिकेत नाईल नदीच्या कांठीं आणि आशियांत युफ्राटीस आणि तैग्रीस नद्यांच्या कांठी कितीतरी काळा-पूर्वीं त्याच्या भांड्यापेक्षा कितीतरी सुरेख भांडी लोक कधीच तयार करूं लागले आहेत, याची त्याला कांहींच कल्पना नव्हती. त्याला स्वतःला आपलेंच आश्चर्य वाटत राहयचें. मातीपासून इतकी मजेदार वस्तु किती सहज करतां येते. पण हे आपल्याला आधींच कसे सुचलें नाही याचें त्याला नेहमी आश्चर्य वाटावयाचें. पण आतां ही कला तो आपल्या हातून कधीच जाऊं देणार नाहीं. त्याने जागोजाग करून सोडलेल्या या भांड्यांवरून भावी काळांत विद्वान् संशोधक त्याच्या पावलांचा मागोवा घेत जाणार आहेत याची त्याला काय कल्पना !

त्यांच्या अंतःसामर्थ्याची अशीच दुसरी उंच उडी म्हणजे धनुष्य-बाणाचा शोध. हा शोध म्हणजे त्याच्या बुद्धिसामर्थ्याचा विजय होता. त्याचा भाला अखेरीला एका काठीपासूनच तयार होई. अटलाट (Atlatl) नें तो दूर फेकतां येई, हें खरें, पण खूपखूप अंतरावर तो

जात नसे. जणु काय मनुष्याचा हात चांगला लांब व्हावा, इतकीच त्याची फेंक असे. पण हा धनुष्यबाणाचा शोध इतका स्वतंत्र, इतका मूलगामी होता की त्याला तरी तो आकाशांतून एकाएकीं आला असेंच वाटे. पण वस्तुस्थिति तशी नव्हती. प्रत्येक गोष्ट येते किंवा सुचते ती आधीं पाहि-लेल्या गोष्टीवरूनच. झाडाची वांकलेली फांदी ओढली कीं फिरून उशी घेऊन जागच्या जागी जातें, ती पाहून त्याला कदाचित् धनुष्याची कल्पना सुचली असेल. कदाचित् दगड फेकतांना होणाऱ्या हाताच्या हालचाली-वरूनहि त्याला धनुष्याची कल्पना सुचली असेल. किंवा कदाचित् पोरें खेळतांना लहानशी धनुकली करून त्याच्या दोरीचा टणत्कार करतात त्यावरूनहि त्याला कल्पना सुचली असेल. पण एवढें खरें की आतां त्याला धनुष्याची कल्पना आलेली आहे. त्याने बाणहि तयार केलेला आहे.

या धनुष्यबाणाच्या शोधाने शिकारीचे स्वरूपच पार बदलून टाकले. त्यामुळे शिकाऱ्याला पूर्वीइतके भय राहिलेले नाही. आतां खुशाल चार-पाचशे यार्ड अंतरावरून आपल्या लक्ष्यावर नेम धरला, तरी त्याला मारतां येते, हे त्याला कळून चुकले आहे. ही गोष्ट केवळ धनुष्याच्या शोधामुळेच शक्य झाली. शिवाय हातांत धनुष्यबाण असतांना तुम्ही श्वापदापासून इतके दूर असतां की तुमचा त्याला वास येत नाही, की चाहूल लागत नाही. श्वापद विचारें निर्धास्तपणें चरत असते. इतक्यात तुमच्या बाणाचा ट्वॅन्ग असा आवाज कानी येतो न येतो तोंच तुमचा बाण त्याच्या शरीरात घुसलेला असतो.

माणसाच्या बुद्धीची तिसरी अशीच अत्युच्च करामत म्हणजे तिनें कुत्र्याला माणसाळवले ती. यापुढे तो किती तरी असे प्राणी आपल्या कह्यात आणून त्यांना आपली कामे करावयाला लावणार आहे. पण त्या सगळ्यांत अग्रस्थान कुत्र्याचे आहे. तो माणसाचा पहिला मित्र.

एखादे चवदार हाडूक कुत्र्याला रोज टाकीत असल्यामुळें कुत्रा माणसाळला गेला की तो आपण होऊनच माणसाला चिकटला, हें कांही माणसाला आतां आठवणे शक्य नाही. पण एवढें खरें की या मैत्रीची सुरुवात झाली, तेव्हांपासूनच एकमेकांना पक्कें कळून चुकलें कीं, ही आपली मैत्री जन्मोजन्मी टिकायची आहे. कुत्र्याला कोणीतरी धनीच हवा होता, तो माणूस मिळाला. आणि माणसालाहि कोणीतरी चांगला

विश्वासू नोकर हवा होता तो कुत्रा मिळाला. आतां तर माणसानें त्याला आपल्यावरोबर नेऊन शिकारीला तयार केलें आहे. त्यामुळें त्या दोघांची अशी पक्की छान जोडी जमली कीं सांगणेंच नको.


• कुत्रा एकदां का काळवीटाच्या मागें लागला कीं मोठें पाहण्याजोगें असते. हरीण पायानें चपळ, तर कुत्राहि तसाच चपळ. काळवीट आपला जीव वांचवायला म्हणून पळू लागतो पण कुत्राहि त्याच्यामागे तितक्याच जोरानें लागतो. शिवाय तो दमत नाहीं चटकन्. आणि तो एकदां का शिकारीचा पाठलाग करूं लागला की विलकुल सोडायचा नाही त्याला. तो प्राणी दाट झाडाझुडुपांत लपू पाहतों काय ? कुत्र्याला त्याचा वास येतो कीं, तो त्याला स्वस्थपणें तेथें कधीच लपू देणार नाहीं की माग सोडणार नाहीं. अखेर नाइलाज होऊन त्रासून तो काळवीट त्याच्यावर चाल करून येऊं लागला कीं कुत्रा कितीतरी वेळ त्याला एकाच जागीं झुंज देत राहतो.

मनुष्याची आणि कुत्र्याची ही जोडी मोठी चमत्कारिक पण मजेदार होती. कुत्रा हा माणसाचा इतका इमानी व विश्वासू नोकर होऊन वसला की, त्याला जणु काय त्याच्या धन्याच्या इच्छेशिवाय वेगळी अशी इच्छाशक्तीच राहिली नाहीं. मनुष्य त्याला शेकोटीपाशी आपल्यासारखाच वसू देई. आपण खात असे त्यांतली हाडेंहि त्याला देई. पण धन्याची शाबासकी मिळाली की त्याला जेवढा आनंद होत असे, तेवढा या इतर गोष्टीनी होत नसे. तो आतां त्याचा इमानी नोकर झाला होता. पण अजून त्याच्या इमानदार चाकरीची कोठें सुरुवात होत होती. आज कुत्रा आपला धनी, त्याची बायको, त्याची मुले याची राखण करीत आहे. वेळ प्रसंग आला तर आपला जीव धोक्यांत घालून त्यांचें संरक्षण करीत आहे, पण उद्यां हाच कुत्रा माणसाची मेंढरें राखील, गुरें राखील, आणि त्यांच्या रक्षणाकरितां स्वतःचे प्राणहि धोक्यांत घालील.

अशा रीतीने मानवी जीवनाच्या पडद्यामागचे सारे देखावे आतां वदलले आहेत. सारी रंगभूमि आतां नव्यानेंच सजली आहे. आतां हिमनद, हिमप्रदेश कुठेंतरी डोंगरांत गेलेले आहेत. पूर्वीचीं घनदाट अरण्यें जाऊन तेथें गवताळ जमिनी, सपाट मैदानें आलीं आहेत. साऱ्या युरोपचा भूभाग आतां कोरडा झाला असून हवा बरीच ऊबदार झालेली आहे. आणि या

रंगभूमीवर पूर्वेकडून, दक्षिणेकडून नवीन पात्रांच्या लाटाच्या लाटा येत आहेत. उंच माणसें, ठेंगू माणसें, लांवट डोक्याच्या आकाराचीं माणसें, गोल डोक्याच्या आकाराचीं, कांहीं वर्णानें गोरीं (गोऱ्या कातडीचीं) तर कांहीं उन्हानें काळवंडलेलीं अशीं माणसें या रंगभूमीवर आलीं आहेत. येत आहेत. ते सगळे मानवप्राणीच आहेत, बुद्धिमान् आहेत. पण एवढें खरें कीं अजून ते तितके शहाणे झालेले नाहींत. वयानें अजून ते लहानच आहेत. तरुण अनुभवी आहेत. त्यांची जिज्ञासा जागृत आहे. त्यांना सगळें कळून घ्यायची इच्छा आहे. हीं अरण्यें, सरोवरें व नद्या यांनीं विभूषित असलेल्या सुंदर भूप्रदेशांत जें जें आहे किंवा होतें, त्यांत सगळ्यांनाच वांटा पाहिजे आहे.

फिरून आतां पडदा उघडला. आणि नवीन 'अश्मयुग' घांसून चकचकीत केलेल्या दगडांचें 'अश्मयुग' दिसूं लागलें.



# १८. शेतकऱ्याचें आगमन

आतां मानवाच्या दगडी परशूच्या घावाने सारें अरण्य निनादून जात होतें. परशूचे घाव भराभर झाडावर घालून तो झाड तोडू पाहत होता. त्या घावाचे निनाद मोठे ऐकण्याजोगे होते. आतांपर्यंत तरी असा निनाद त्या प्रदेशांत कधींच उठला नव्हता. युरोपांत सगळीकडे जंगलें वाढल्यावरच परशूचा वापर सुरू झाला. पण फोडायच्या टोंकाची बाजू घांसून चांगली गुळगळीत व तीक्ष्ण केलेली असा हा परशु आतांच कोठें सर्वत्र दिसू लागला होता.

ही कुऱ्हाड तो कशी वापरतो हें मोठे पाहण्याजोगें आहे. त्यानें त्या कुऱ्हाडीला काळविटाच्या शिंगाचा दांडा बसविलेला आहे. त्या दांड्यासकट ती कुऱ्हाड आधी तो चांगली उंच उचलतो व मग अंगांत जेवढें बळ असेल तेवढें लावून तो घाव घालतो. दगडाच्या केलेल्या कुऱ्हाडीनें झाड तोडायचें म्हणजे कांहीं सोपें काम नाहीं. त्यांतल्यात्यांत त्यानें एक सुरेख लहानसें ओक ( Oak ) झाडच तोडायला निवडलें आहे. त्याला घराचें छप्पर करायचें आहे त्या झाडाचें. घराकरितां एक

मोठा रुंद खड्डा त्यानें केव्हांच खोदून तयार केलेला आहे. तेंहि काम मोठें कष्टाचें होतें. कारण, जमीन खोदायला त्याच्याजवळ फक्त काळविटाचें शिंग बसवून केलेली कुदळ व जनावराच्या खांद्याचें हाड घेऊन तयार केलेलें फावडें, एवढींच साधनें होतीं. पण हा मानव आपलीं हत्यारें चांगलीं नाहीत म्हणून त्यांच्यावर राग काढणाऱ्यांपैकी नव्हता. शिवाय त्याच्याजवळ असलेल्या साधनांपेक्षां चांगलीं साधनें निदान युरोपांत तरी कोणाजवळ नव्हतीं. आपल्या वाडवडलांना दांडा नसलेल्या नुसत्या तीक्ष्ण धारांच्या कपारीच कशा वापरावयाला लागत याची आठवण तो अजन विसरलेला नाहीं. त्यापेक्षां ही दांड्याची कुऱ्हाड, दांड्याची कुदळ इतकीं छान अद्ययावत् हत्यारे मिळाल्याबद्दल तो स्वतःला धन्यच मानीत होता. पूर्वींच्या काळीं नुसत्या कपारीनें काम करावे लागे तेव्हां कमालीचे जड जाई. हाताला फोड येत काम करतां करता. पुढें पुढे कातडी अगदी शिंगासारखी कठीण होऊन बसे. पण आतां हा दांड्याचा शोध लागला, किती सोपें झाले त्याने काम. कधीं हा दांडा शिंगाचा असेल, कधी हाडाचा असेल, कधी लाकडाचा असेल — पण दांडा आला. आता दांड्यामुळे तुमची सारी शक्ति एकवटून घाव घालता येतो. किती छान झाले हे !

तो पाहा आपल्या कुऱ्हाडीला कसा जरासा हेलकावा देऊन तो झाड तोडतो आहे. एक घाव, फिरून जरासा हेलकावा देऊन कुऱ्हाड वर, फिरून सारे वळ एकवटून घाव असे चालले आहे त्याचे. ते पाहा अखेर तें झाड तुटले. झाड तुटल्यावरोबर आनंदानें त्यानें एक आरोळी ठोकून मुलांना बोलाविले. मुलें अगदीं धांवतच आलीं. कारण त्यांना सर्वांना मिळून आतां तें झाड घरी घेऊन जायचे होतें.

त्या सर्वांनी मिळून तें झाड तर घरीं आणलेंच, एवढेंच नव्हे तर, घराचा जो गोल खड्डा त्यानें केला होता, त्याच्या बरोबर मध्यभागीं तें उभें केले. आता फक्त छत्रीसारखें त्या घरावर छप्पर घालावयाचें. त्याकरितां त्या झाडांचे लावलांब वासे आणले. ते सर्व मधल्या खोडाला वरतीं टोंकाला वांधले. खड्ड्यांतून काढलेल्या मातीची त्या खड्ड्याच्या भोंवतालीं भिंत बांधलेलीच होती. त्या भिंतीवर ते मधल्या खोडाला बांधलेले वासे त्यांनीं एकमेकांपासून कांहीं अंतरावर असे गोलाकार पसरले.

त्या वाशांवर गवत-पानांचें एकमेकांला जोडून तयार केलेलें धावें शिवलें, आणि कसें छान छान घर तयार झालें. त्या घरांतून बाहेर जायचें म्हणजे दरवेळीं शिडी लागे. पण त्याचा एक मोठा फायदा तसाच होता. त्या खड्ड्यांत उडी मारून घरांत यायचें म्हणजे जंगली जनावराला चांगलाच विचार करावा लागे. सहसा तें धजावत नसे आंत उडी टाकून यायला.

उन्हांत तळपणाऱ्या त्या टेकडीच्या उतारावर हेंच कांहीं एक अशा तऱ्हेचें घर नव्हतें. त्याच्या अंवतींभंवती चांगली वीस पंचवीस घरें होती. शिवाय आपल्या या खेड्याचे संरक्षण व्हावें म्हणून त्या सर्वांनी मिळून त्या वस्तीभोंवती, अणकुचीदार टोक असलेल्या खांबांची चांगली दुहेरी भित बांधलेली होती. रात्री कोणी शत्रू किंवा जंगली श्वापद गुरांच्या मागावर राहून तेथें आलें कीं साऱ्या वस्तींतले कुत्रे जोरजोराने तावडतोब भुकू लागत.

आतां मानव कांही एकटा राहिलेला नाही, त्याच्याजवळ गुरें आहेत. हो, बकऱ्या, मेंढ्या, सारी आहेत. ही जनावरे त्याने फार दुरून आपल्याबरोबर आणलेली आहेत. फार फार प्राचीन काळी पूर्वेकडील जवळच्या भागांत जे मानवप्राणी राहत असत त्यांनी हे प्राणी केव्हांच माणसाळवले होते. आता निदान पृथ्वीच्या अर्ध्या भागावर तरी हे सारे माणसाळवलेले प्राणी नोकरांसारखें माणसाचे काम करीत होते.

ही जनावरे जवळ बाळगून त्याची चांगली वाढ करावयाची, किती छान मजेची गोष्ट होती ती ! जादूच म्हणाना ! आतां एखादे वेळीं शिकार मिळाली नाही तरी माणसावर उपाशी पोटी, भुकेलें राहण्याची पाळी नाहीं येत. त्याचें मांसान्न आतां त्याला अगदीं समोरच्या कुरणांत मिळू शकतें. पाहिजे तर बैल, नाही तर बकरी मेंढी काय पाहिजे असेल तें मारावें कीं कसें छान मांस मिळे. खूप जनावरे चरत असलेली तीं कुरणें क्रोमॅग्नान मानवाच्या दृष्टीस पडती तर त्या पट्टीच्या शिकाऱ्याचे, जातिवंत कलावंताचे डोळे आश्चर्यानें विस्फारित झाले असते. खरंच जादू झाली ही ! नव्या अश्मयुगांतील मानवाला त्याच्यापेक्षां फारच चांगली जादूची सिद्धि मिळाली असेंच त्याला वाटलें असतें. आतां तर मानवानें साऱ्या साऱ्या गोष्टी सरळ निसर्गाच्या हातून काढून आपल्या

हातीच घेतल्या होत्या. अन्नाकरितां तो आतां निसर्गावर अवलंबून नव्हता. स्वतःच आपलें अन्न उत्पन्न करीत होता. आणि खरें बोलायचें तर मानवाच्या हातांत आलेले उत्पादनाचें कार्य निसर्गापेक्षां कितीतरी चांगले होत होतें.

ती पाहा गहू, बाजरी, जोंधळ्याची लहान लहान शेतें! ती कांहीं आपोआप झालेली नाहीत. माणसानें तयार केलेली शेतें आहेत तीं. मानव आता शेती करतो. तो शेतकरी झाला आहे. पूर्वीं जेथें निसर्गानें एखादेच धान्याचे रोपटे उगवावयाचे किवा कधीं कांहीच उगवलेलें दिसत नसे, त्याच जागेत मानवाच्या प्रयत्नानें आता दहा रोपटी उगवलीं आहेत. काळविटाच्या शिगाचा नागर करून तो जमीन उकरतो—नांगरतो. त्यांत बी टाकतो. मग रोपटी जमिनीवाहेर येऊन त्यांना फुलें, दाणा लागून तीं तयार व्हावयाची वाट पाहतो. अजून त्याने कोयता वनवलेला नाही; त्याला माहीतच नाही तो. म्हणून ते पिकलेले धान्य तो ओवडधोवड पण तीक्ष्ण दांताच्या चकमकीच्या दगडाच्या कपारीने कापतो. नंतर तें एका सपाट दगडावर पसरतो व दुसऱ्या दगडाने खलून त्याचे तो पीठ करतो. नतर ते पाण्यात भिजवून त्याची भाकरी तयार करतो.

'भाकर' हा शब्द आता मोठ्या आदरानेच उच्चारला पाहिजे. ही घटना वाटते तितकी साधी नाही. फार मोठमोठ्या घटनांची बीजे साठवली आहेत त्यात! हा भाकरीचा शोध फार दुरून आलेला आहे. जेथे हा शोध प्रथम लागला त्या पूर्वेकडील जवळच्या प्रदेशांत मनुष्याला खायला भरपूर भाकरी मिळत असल्याने त्याने देवालयें, मोठेमोठे प्रासाद असलेली शहरें उठवली आहेत. पश्चिमेकडच्या या भागांतसुद्धां मानव-प्राणी जे जे काही साध्य करून घेईल, तें सारे या भाकरीच्या जोरावरच. भाकरीवर त्याचे सारे जीवन अवलबून आहे.


या साध्या घटनेने फारच मोठी क्राति घडवून आणलेली आहे. एवढेंच नव्हे; मोठमोठ्या ज्या घटना अजून गर्भावस्थेत आहे त्याच्यामागें ही भाकरी मिळण्याची घटना मुख्य आहे. पूर्वीं मानवप्राणी एकदां वस्ताद शिकारी म्हणून ओळखला जाई, पण आतां तो चांगला शेतकरी होण्याच्या मार्गाला लागलेला आहे. अजूनहि तो शिकार करतो, मासे पकडतो, आणि या गोष्टी तो नेहमी करीत राहीलहि. पण एवढें खरे कीं, तो आतां सर्वस्वीं

निसर्गावर अवलंबून नाहीं. आपलें नशीव त्यानें आतां आपल्या हातांत घेतलेलें आहे. नशिबाचा आतां तो धनी झाला आहे.

या सर्व घटनांनीं मानवप्राण्यांत फार बदल घडून आलेला आहे. पूर्वीसारखा ज्याला त्याला तो घाबरत नाहीं, नव्हे त्याची भीति अगदींच कमी होऊन त्याची जागा आत्मविश्वासानें घेतलेली आहे. आतां तो निरनिराळे बेत आंखतो. एक दिवस गेला, दुसरा कसा जाईल, कशी गुजराण करावयाची याची चिंता करण्याचें त्याला आतां कारण उरलेलें नाहीं. वर्षानुवर्षें तो खाऊं शकेल अशी परिस्थिति त्यानें घडवून आणलेली आहे. पुष्कळ पोरेंबाळें झालीं तरी आतां त्याला भीति वाटेनाशी झाली. कारण सर्वांच्या पोटाला पुरेल इतकें अन्न तो सहज उत्पादन करूं शकतो. या सुस्थितीमुळें त्याच्या अंवतीभंवती आतां पुष्कळ पोरेंच पोरें दिसतात.

हो, पृथ्वीवरची लोकसंख्या आतां झपाट्यानें वाढं लागली आहे. यांत संशयच नाहीं. एक काळ असा होता कीं पृथ्वीवर मानववस्ती अगदीं थोडी होती. इकडे कांहीं, तिकडे कांहीं अशी विखुरलेली होती. निरनिराळ्या मानवजातीची अशी तुरळक वस्ती इकडेतिकडे सांपडे. पण आतां मात्र पृथ्वीतलावर एकच मानव जात वास्तव्य करून आहे. पण तिची गणती केल्यास लाखांनीं मोजावी लागेल, इतकी ती वाढली आहे. एका भूभागांत मागें उल्लेखिल्यासारखीं आतां हजारों खेडी सांपडतील.

पण एवढें खरें कीं तीं सगळींच सारखीं नाहींत.



## १९ लांकडी खांबाचें रहस्य

१८५३ व १८५४ सालीं युरोपांत कमालीची कडक थंडी पडली होती. स्वित्झर्लंडमधील साऱ्या नद्यांचे अगदीं ओहोळ वनून त्या फितीसारख्या लांवच लांव व अरुंद अशा झालेल्या होत्या. सरोवरें व तळी तर एवढी आटली होती की जुन्यांतील अगदी जुन्या वयोवृद्ध नागरिकाला सुद्धां पाणी इतके कमी झाल्याचे कधी आठवत नव्हतें. तळ्याच्या कांठी राहणारे लोक खिडकीतून वाहेर पाहत तेव्हां त्यांना मोठे नवल वाटे. कारण समोर नेहमींसारखे पाणी दिसण्याऐवजी कधी दिसला नव्हता असा भूभागच उघडा पडलेला दिसे.

झुरीच सरोवराकाठीं ओवरमायलन ( Ober Meilen ) जवळ राहणाऱ्या कांही लोकांच्या मनांत एक कल्पना आली. एवींतेवीं पाणी आतां खाली गेलेंच आहे व जमीनहि उघडी पडली आहे; तर या जमिनीला आपलेकडे आंत घेऊन जर एक वांध वांधला तर पाण्याची पातळी पण जरा उंच होईल आणि प्रत्येकाला आपल्या घरासमोर वागवगीच्या

करायला जमिनीचा चांगला मोठा पट्टा मिळेल.

खरेंच कां करूं नये असें ?

कल्पना आल्याबरोबर रहिवाशांनीं कामाची उचल केली. लगेच दगडाच्या गाड्या आल्या, चुन्याची घाणी लागली आणि सरोवराकांठीं उंच भिंत होऊं लागली. तळ्याच्या उघड्या जमिनींतील पाण्याचा निचरा करायला रहिवाशांनीं सुरुवात केली.

काम सुरू झालें. मजूर गाळांत शिरले. आणि काय आश्चर्य, त्या गाळांत चोहोंकडे कुणी तरी, केव्हां तरी पुरलेले लांकडी खांबच खांब त्यांना दिसू लागले. एक दोन नव्हे, डझन नव्हे, तर हजारों खांब. सगळे आश्चर्यचकित होऊन पाहतच राहिले. 'किती खांब हे, कुणी वरें पुरले असतील इथें सरोवराच्या तळाशीं आणि कशाकरतां ?'

त्या चिखलांत चोहोंकडे खांबांच्या रांगाच रांगा लागलेल्या दिसत होत्या. दोन खांबांत सगळीकडे फूट दीड फुटाचें सारखें अंतर ठेवून ते पुरले होते. सरोवराच्या पाण्याच्या अगदीं आंत या खांबाच्या रांगा नेऊन भिडवल्या होत्या. गंमत ही कीं प्रत्येक खांब तळाशीं विस्तवानें भाजल्याकारणाने चांगलाच काळा झालेला दिसत होता. शिवाय त्याला पेन्सिलीसारखा निमुळता करण्यांत आला होता. निमुळता करण्यासाठीं त्यावर ओवडधोवड कुऱ्हाडीचे घाव अगदी स्पष्ट दिसत होते.

एवढ्यानेच संपलें नाही. त्या चिखलांत त्याना आणखी किती तरी कल्पनातीत गोष्टी मिळाल्या. काळविटाचीं शिंगें, बैलांची हाडें, त्याचप्रमाणें मेंढरांचीं, बकऱ्यांची आणि लहान लहान लांब पाय असलेल्या डुकराचीं हाडे पण त्याना तेथे मिळाली. शिवाय कोल्हे, लांडगे, मार्टेन ( युरोपांत सांपडणारा एक हिंस्र प्राणी ) आणि इतर कितीतरी जंगली श्वापदें यांचीं हाडेंहि तेथे सांपडत होती. तसेंच ओवडधोवड आकाराच्या मातीच्या भांड्यांचे तुकडे पण त्यांना मिळाले. शिवाय बाणांचीं टोंकें, घांसून गुळगुळीत केलेल्या दगडांचे नाना तऱ्हेचे तुकडे, कपारी त्यांना खूपच आढळल्या.

हें सगळें पाह्यल्यावर या सगळ्याचा अर्थ काय ? हा एकच प्रश्न सर्वांच्या डोक्यांत घोळू लागला.

ओबरमायलन (Ober-Meilen) गांवीं राहणाऱ्या इप्ली (Aeppli)

या नांवाच्या गृहस्थानें घांसून गुळगळीत केलेल्या कांहीं दगडांच्या कपारी, तुकडे, भांड्यांचे तुकडे, सारीं चांगली व्यवस्थित बांधन घेऊन तो झुरीचला गेला, तो थेट ऐतिहासिक अभ्यासमंडळाकडे. 'या पाहा साऱ्या वस्तू ! सरोवराच्या आता उघड्या पडलेल्या गाळांत मिळाल्या. फार फार काळापूर्वीच्या प्राचीन, अज्ञात लोकांनीं त्या केल्या असाव्यात. त्याच माणसांनी लांकडाचे असंख्यात खांब पाण्यांत पण पुरलेले आहेत. या सर्व गोष्टींवरून मलातरी असे वाटतें कीं शास्त्रज्ञांनीं जर त्या तळयाचा आणखी चांगला शोध घेतला तर त्यांना स्वित्झर्लंडमध्यें प्रथम वस्ती करणाऱ्या आदिरहिवाशाची कितीतरी माहिती मिळेल

अशा रीतीने शास्त्रज्ञांनी संशोधनाला सुरुवात केली. त्या वेळी त्यांना जे काय आढळून आलें त्यावर पहिल्यांदा तर त्याचा विश्वासच वसेना. त्याच्या रोजच्या परिचयांतील त्या झुरिच सरोवरांत जे खांब पुरण्यांत आले होते त्यांच्यावर फळ्या टाकून तक्तपोशीसारखें केलें होते. त्या लांकडी तक्तावर घरें वाधलेली होतीं. निदान चार हजार वर्षांपूर्वीतरी एखादी अज्ञात मानवजात त्या सरोवरांत घरे वाधून राहत असावी. पुढे वहुधा तिचा रहस्यमय रीतीने शेवट झाला असावा.

पण त्यांनी अशी सरोवराच्या पाण्यावर का घरे वाधली ? जवळजवळ एक खेडेंच वसले होतें तेथे. पण ते असे पाण्यात का ? ओवर-मायलनच्या (Ober Meilen) नागरिकांना हे समजून घेण्याची उत्सुकता उत्पन्न झाली

'स्वसंरक्षण.' शास्त्रज्ञांनीं उत्तर दिलें. 'अशीं घरें वाधण्याचें कारण दुसरें तिसरे कांही नसून स्वसंरक्षण हेंच होते. शत्रूपासून, जंगली श्वापदांपासून नीट बचाव व्हावा, एवढ्याचकरतां त्यानी पाण्यावर घरें वांधली. आतांसुद्धां लोक तसेंच करतात. तुम्हांला माहीत नाही ? पाहा, बोर्निओचेच लोक घ्याना. सारे बोर्निओ पाण्यावर वांधलेलें आहे.'

शास्त्रज्ञ पुढें सांगू लागले, 'तुम्हांला आणखी काय पुरावा पाहिजे ? हा हिराडोटसचा लेखी पुरावाच घ्या की. तुम्हांला माहीत आहेना, हिरा-डोटस हा एक फार मोठा ग्रीक प्रवासी होता. ऐका, त्यानें लिहून ठेवलेलें हें. त्यानें फार प्राचीन काळच्या पेओनिअन्स (Paeonians) लोकां-

विषयीं लिहिलें आहे. तो म्हणतो, 'त्यांचीं घरें पुढील रीतीनें तयार केलेलीं असत. तळ्याच्या मध्यभागी उंच उंच खांबांवर फळ्या बसवीत व मग त्यावर घरें बांधीत. त्या घरांना जायला फळ्यांचा एक अरुंद पूल असे. तो त्या घरांपासून थेट जमिनीपर्यंत आणून सोडीत.'

लोक या माहितीनंतर त्या खांबांकडे पाहूं लागले. तेथें मुख्य जमिनी-वर येण्याकरितां एक खांबांचा पूल बांधलेला असावा, अशा खाणाखुणा स्पष्ट दिसत होत्या. त्यावरून पाण्यावर वसविलेल्या त्या खेड्याचा एकंदर नमुना कसा असावा याची त्यांना कल्पना येऊलागली.

पण झुरिच सरोवरांतील ओवरमायलन (Ober Meilen) हें एवढेच एक खेडे होते का, जेथे या 'सरोवरनिवासी' लोकांची वस्ती होऊन गेली ?

त्यानतर शास्त्रज्ञांनी स्वित्झर्लंडमधल्या प्रत्येक तळ्याच्या पाण्याचा निचरा करून पाह्यला सुरुवात केली. तेव्हां तेथेहि एकामागो-माग प्रत्येक तळ्यांत पुरलेले खांब त्यांना आढळून येऊं लागले. मोठ-मोठ्या सरोवराच्या काठाकांठाशी वीस, तीस,चाळीसच नव्हे कितीतरी अधिक अशा वस्त्या विखुरलेल्या त्यांना आढळून आल्या.

त्यानंतर राज्याच्या सर्व वस्तुसंग्रहालयांत एकामागून एक अशा मोठ्या मजेदार वस्तु येऊं लागल्या. संशोधनात सांपडलेल्या त्या पुरातन अवशेषांची शास्त्रज्ञ नीट जुळणी करून पाहूं लागले. त्यांतले कांही अवशेष 'अश्मयुगां'तले होते आणि तशा प्रकारचे अवशेष युरोपांत कोठेंहि मिळाले नव्हते.

त्यांत कांही लांकडी फण्या सांपडल्या, कांही गोल आकाराची भांडीं सांपडली. डावहि मिळालें. शिवाय लांकडी सुऱ्या पण सांपडल्या. नंतर कांही कापडाचे तुकडे,दोरखंडाचे तुकडे, एवढेंच नव्हे गवताच्या विणलेल्या चटयासुद्धां त्यांत मिळाल्या. अर्थात् यांतील प्रत्येक वस्तूच फार पुरातन काळची – म्हणजे नवीन अश्मयुगांतील – होती असे म्हणतां येत नाही. हे 'सरोवरनिवासी' लोक चांगलें 'लोह युग' उजाडेपर्यंत तेथे राहिले असावे. पण जे जे अवशेष सांपडले त्यांतील बरेच अवशेष फारच पुरातन कालचे होते. त्यामुळें नव्या 'अश्मयुगां'तील मानवाचा सारा जीवनपटच त्या तळ्याच्या पाण्यांतून बाहेर पडतो आहे की काय, असें क्षणभर वाटले.



या साऱ्या अवशेषांवरून त्या फार प्राचीन काळाचा जो काय चित्रपट हळुहळू उलगडत चालला होता, तो पाहणें मोठें मनोरंजक काम होते. एखाद्या रहस्यकथेचा उलगडा होत राहवा तसेच तो बघताना वाटे. फार दूर कशाला ? पाण्यांत पुरलेले ते खांबच घ्याना. ते खालच्या बाजूला जाळलेले असे दिसत. कदाचित् एवढे मोठे सारें झाड तोडीत बसण्यापेक्षां बुध्यापाशी जाळणे हे त्या लोकांना सोयीचें वाटलें असावे.

त्या तळचांत जी काय हाडें सांपडली त्यांची तर स्वतःची अशी एक वेगळीच कहाणी होती. शास्त्रज्ञानी जेव्हा तीं हाडे बाहेर काढून वेग-वेगळी केली त्यावरून ते 'सरोवरनिवासी' लोक कोणती जनावरें जवळ बाळगीत होते, कोणत्या जनावरांची ते शिकार करीत, याचा उलगडा होऊं लागला. कारण बैल, मेंढ्या, बकऱ्या आणि डुकरें, यांचीं एकूण एक हाडें सांपडली. याचा अर्थ एकच होत होता कीं, ती जनावरें माणसाळलेलीं असून माणूस तीं स्वतःजवळ बाळगी. त्यामुळें तीं तेथल्या जागेवरच मारली गेली. पण काळवीट, हरणे, मार्टेन ( Marten ) आणि कोल्हा यांचीं मात्र कांहीच हाडें तेवढी वारंवार आढळून यावयाचीं. बाकीच्यांचा पत्ता नसे. यावरून एकच तर्क काढतां येणें शक्य आहे कीं हे प्राणी रानांत मारले गेल्यावर त्यांतील आवडते असे मांसभागच फक्त आणले जात व बाकी तेथल्या तेथें पडून राहत.



खाद्यपदार्थाचे जे काय अवशेप मिळाले त्यावरून ही ‘सरोवर-निवासी’ मानवजात काय खात असे, कशाचें उत्पादन करी, कोणत्या गोष्टी रानातून गोळा करून आणीत असे, काय शिजवी याची पुरी कल्पना येत होती.

वस्त्राच्या वावतीत तोच प्रकार होता. चोहोकडे कातड्याचे तुकडे तर मिळतच. शिवाय कित्येक वेळा विणायच्या सुया पण आढळल्या. एके ठिकाणी तागासारख्या वनस्पतीपासून धागा मिळाला, तर एके ठिकाणी लिननचा पण तुकडा मिळाला मातीच्या सूत काढायच्या चात्याच्या फिरक्या आणि एके ठिकाणीं तर दोरा गुडाळलेल्या स्थितीत एक टकळीहि मिळाली. त्याशिवाय कपडे एकत्र बांधण्याकरितां ते ज्या तऱ्हेच्या पिनाचा वापर करीत त्या पिना पण मिळाल्या.


या संशोधनाच्या काळांत हजारों अवशेष सर्व वस्तुसंग्रहालयांत जमा होत होते. ‘सरोवरनिवासी’ लोकांच्या गृहजीवनावर प्रत्येक वेळीं काही तरी नवा प्रकाश पडत होता. नाना लोक त्या वस्तु पाहून जात होते. एकंदर त्या साऱ्या वस्तूचें वातावरण विचित्र होतें यांत संशय नाही. तथापि तें जीवन एकप्रकारें परिचित असल्यासारखें वाटे. तें पाहतांना अगदीं वेगळेपणाची भावना होत नसे.

ख्रिस्ती शकापूर्वी दोन हजार वर्षे वावरणाऱ्या या मानवाचें

जीवन पुष्कळ अंशी परिचित असल्यासारखें वाटे. तो शेतकरी होता, शिकारी होता, मासेहि पकडीत असे. त्याला सुतारकी येत होती, नाव बांधता येत होती, एवढेंच नव्हे तर हत्यारेंसुद्धां तयार करतां येत असत. त्याची बायको धान्य दळायची, भाकरी भाजायची, सूत काढायची, वस्त्रें विणायचे कामहि तीच करीत असे. शिवायचें काम तर तिचेच होतें. पण त्याशिवाय, ती भांडीहि तयार करावयाची. या तिच्या सर्व कामांत आतांच्या मानवाला माहीत असलेल्या स्त्री-जीवनाचा परिचित भाग आढळे. या काळच्या मानवाचे घर शेतकऱ्याचे होते. त्याच ठिकाणी इतर कामाचा कारखानाहि असे. त्यामुळे वस्तुसंग्रहालयांतील दोन हजार वर्षापूर्वीच्या मानवाचा तो जीवनपट पाहत असतां, प्रत्येकाला लहानपणी परिचित असलेल्या, पाहिलेल्या, जीवनाची आठवण येई. अमेरिकेंत जेव्हा नव्या वसाहतवाल्यानी वस्ती केली, तेव्हांसुद्धां त्यांचे जीवन असेंच नव्हते का ?

अर्थात् ह्या ‘सरोवरनिवासी’ लोकांची घरे वसाहतवाल्या लोकापेक्षा एकमेकाना जवळ लागूनच असत. पण त्याना शेजाराचा उपयोग म्हणजे संरक्षण व सोबत एवढ्याचकरिता पाहिजे असे. कारण त्यांच्यातील प्रत्येक व्यक्ति हरहुन्नरी होती. एकाला जे येते ते दुसऱ्या कोणाला येत नाही असे त्यांत कोणीच नव्हते. त्या काळात जो तो आपलें काम करी. कोणी कुणाकरितां काम करायची प्रथा नव्हती. त्यामुळे प्रत्येक कुटुंब अगदी सपूर्णपणे स्वायत्त असे.

या काळात सहकार्याने काम करण्याची फारशी वेळच येत नसे. त्यामुळें सहकार्याची कोणी कोणाला हांकच देत नसत. याला अर्थात् अपवाद असे हे सांगणे नकोच. वणवा लागला तर आग विझवायला सारे मिळून धांवून जात. पण एकंदरींत सहकार्यानें काम करण्याच्या बाबतीत मानवजातीने एक पाऊल मागेच घेतलें होतें, असें म्हणण्यास हरकत नाही. आता तो शिकारीलासुद्धां पूर्वींसारखा टोळीटोळीनें न जातां एकटाच जात असे. कदाचित् पूर्वींसारखे मोठे प्राणी जंगलांत राहिलेच नव्हते हेहि त्याचे एक कारण असेल. शिवाय आतां त्याला कुत्र्यासारखा इमानी नोकर मिळाला होता. तो आणि कुत्रा दोघे असले कीं जमली शिकार !



## २०. 'स्टोन हेन्ज'ची वास्तु उभी राहिली !

इंग्लंडच्या दक्षिण भागात सॅलिस्बरी मैदानावर उभ्या केलेल्या दगडांचे एक मोठे वर्तुळ सांपडतें. प्राचीन मानवाचें हेकाम पाहण्याकरितां पृथ्वीतलावरील खूप दूरच्या कानाकोपऱ्यांतून लोक पाहूचला येत असतात. त्या दगडी वास्तूच्या अंवतींभंवतीं प्रदक्षिणा घालून ते आले की आश्चर्यानें विस्मित होतच त्या गोल वास्तूकडे पाहत राहतात.

हें एवढें प्रचंड शिलाखंड आणले तरी कोणी ? आणि आणून या निर्जन प्रदेशांत एवढ्या डौलाने उभे तरी कशाला केलें ? त्यांच्या मनांत साहजिक प्रश्न पडतो. कां वरें हे दगड आणले असतील ? शिवाय हें असें उभारून जें वर्तुळ करण्यांत आलें आहे त्याचा अर्थ तरी काय ?

द्रुईड नांवाच्या प्राचीन लोकांनी हें बांधलें असें लोक म्हणत.

पण ही दगडाची गोल वास्तु द्रुईड लोकांच्याहि आधींची आहे. ज्ञात असलेल्या इंग्रजी इतिहासकालाच्या निदान दुपटीनें तरी ही वास्तु बांधून काळ लोटलेला आहे. ही वास्तु उभी केल्याला कमींत कमी ४००० वर्षें तरी लोटलीं असतील. ज्या वेळेला स्वित्झर्लंडमध्यें 'अश्मयुगां'तील

'सरोवरनिवासी' मानव तळ्याकांठीं पाण्यांत आपले लांकडी खांब ठोकून उभे करीत होते, त्या काळीच ही दगडी वास्तु बांधली गेली असावी

मानवी प्राणी वाटतो इतका साधा प्राणी बिलकुल नाही. तो केवळ दगड, हाडे, शिंगे याची साधने वापरीत आहे यावर जाऊं नका. कावळ्याप्रमाणे मिळेल तो वलि खायचा—पोटांत अन्नाचा गोळा घालायचा आणि नुसते जगत राहायचे ह्यात त्याला कधींच समाधान होत नाही. स्वित्झर्लंडमध्ये तळ्यात राहणाऱ्या लोकांप्रमाणें केवळ स्वतःचें घर-दार पाहायचें व जगायचे असे साधें ठराविक चाकोरीचें जीवन घालवणें त्याला प्रत्येक ठिकाणीच मानवले आहे, असें मुळीच नाही. मानव मग तो कोणत्याहि काळचा असो, त्याचें मनच असे आहे की, एकदा का .जीवनाची नेहमीची रहाटी सुरू झाली की तो अस्वस्थ होऊ लागतो आंतल्या आंत असे काहीतरी सुरू होते की त्याचे मन बाहेर भटकू लागते, त्याच्या विचाराना पंख फुटून त्याचे मन अतराळी भरारी मारू लागते. इग्लडमधील या गोल दगडी वास्तूकडे नुसती नजर फेकली तरी या मानवी अत सामर्थ्याची प्रचीति येते. किवहुना मानवाच्या या आत्मिक सामर्थ्याचे ते एक प्रतीकच आहे असे म्हटले तरी चालेल

एक मोठी लक्षात घेण्याजोगी गोष्ट आहे. या ठिकाणी मानवाने सहकार्याने काम करावयाची प्रथा फिरून सुरू केलेली आहे. वास्तविक मॅमथ, गेंडे व रानगवे, याच्या शिकारीच्या वेळेला तो सहकार्यानेच काम करीत असे. आता शिकारीऐवजी तो या मोठ्या प्रचंड कार्यात आपल्या बांधवाचे सहकार्य घेऊन काम करीत आहे. स्पेनपासून तो थेट स्कॅन्डेनेव्हि-यापर्यंत आणि माऱ्या ब्रिटिश बेटातून त्याचे हे आत्मिक बल असे उंच विहरू लागलेले आहे, असे आढळते.

अनवाणी पायानी चोहोंकडे फिरणारा, कातड्याची वस्त्रे परिधान करणारा, हरणाच्या शिंगाची कुदळ व जनावराच्या खाद्याचे हाड फावडे म्हणून वापरणारा, असा हा त्या काळचा मानवप्राणी. त्याच्या डोक्यात, या कष्टमय जगात स्वतःला आरामाने कसे राहतां येईल यापलीकडे कांही विचार चालत असतील याची कोणाला कधी कल्पनाहि नसेल. पण याच काळांत ज्याचा त्याच्या शरीरसुखाशी सुतराम्‌सुद्धा संबंध नाही अशी कितीतरी कामे त्यानें केली आहेत, हे पाहिलें की मन थक्क होऊन जात.

पश्चिम युरोपांत जागोजाग अशा असंख्य प्रचंड शिला एकएकटचा अशा उभ्या केलेल्या चहूंकडे सांपडतात. हे त्या मानवाचेंच काम. त्यानें असे किती तरी दगड उभे केले आहेत. त्यांतले कांही कदाचित् आपले आवडते नातेवाईक जेथे शेवटची चिरनिद्रा करीत राहिले, त्या स्थळांचें स्मरण राहवें याकरितां उभे केलेले असतील; कांही कदाचित् त्याच्या जीवनांतील मोठमोठ्या प्रसंगांची शाश्वत स्मृति राहवी याकरितां उभे केलेले असतील. पण ज्याचा केवळ शरीरसुखाशी कांही संबंध नाहीं अशा वेगळ्याच भावनेने त्या शिला उभारल्या गेल्या हे खरें. शिवाय याच भागांत चोहोकडे मानवनिर्मित लहान लहान टेकड्या पण तुम्हाला विखुरलेल्या दिसतात. एवढ्या टेकड्या उभ्या करायला त्याला कितीतरी महिनोगणती खपावे लागले असेल, तेव्हाच या टेकड्या म्हणजे मोठमोठ्या लोकांची चिरंतन स्मृतिस्थानें उभी राहिली असतील.

या सगळ्यांत, त्या काळच्या मानवाची प्रचंड कृति म्हणजे अव्हवरीला ( Avebury ) चुनखडीच्या पठारावर उभी केलेली पवित्र गोल आकाराची वास्तु. आपल्या या अनवाणी चाललेल्या मानवाजवळ त्यावेळी शिंगाची कुदळ, हाडाचे फावडे, एवढीच साधने होती. पण तेवढ्याच साधनांनी एवढी मोठी वर्तुळाकार वास्तु उभी केलेली आहे, हे लक्षांत ठेवण्याजोगे आहे. तथापि त्याची खरी दिव्यता प्रत्यक्ष वास्तूत किंवा बांधण्यांत नसून ती वास्तु कल्पनेने उभी करणाऱ्या डोळ्यांत सांठवलेली आहे.

अंत:करणांत दिव्य ज्योत लागलेले हे कसबी कामगार, पाथरवट, गवंडी व शिल्पज्ञ तुम्हांला पाहायचे आहेत का ? पाहायचे असतील तेव्हां ही दगडी वास्तु सॅलिसवरीच्या पठारावर उभी राहत होती तेथे जायला पाहिजे. म्हणजे ते दिव्यतेज, ती ज्योत तुम्हांला त्याच्या डोळ्यांत प्रकाशत असलेली दिसेल.

तो पाहा, त्या सर्वांचा मुख्य कलावंत शिल्पज्ञ. तेथें खड्ड्यापाशीं हें भव्य, दिव्य, शिल्प उभे करण्याच्या साऱ्या आज्ञा देत आहे. त्याच्यांतील जबरदस्त आत्मविश्वास तुम्ही नुसते त्याच्याजवळ उभे राहिलांत तरी तुम्हांला जाणवू लागेल. एखादा दगड कसा बसवावयाचा याची बारीकसारीक तपशिलासकट माहिती आहे. हें ताठ शिल्प उभें करण्या-

करितां एखादी शिला नक्की किती खोल खड्डा खणून बसवावयाची याची त्याला पुरी कल्पना आहे; इतकेंच नव्हे तर दोन्ही बाजूच्या शिलांच्या बरोबरीनें नेमका हिचा आकार येईल अशीच शिला बसवावयाची तो आज्ञा देईल. जमिनीपासून प्रत्येक शिलेची उंची बरोबर साडेतेरा फूटच चोहोंकडे राहील; त्याचप्रमाणें दोन्ही बाजूच्या शिलाखांबापासूनहि तिचें अंतर बरोबर चारच फूट राहील. शिवाय बसवतांना पण प्रत्येक शिला नेमकी इतकीच मागें किंवा पुढे घेईल की, अशा तीस शिला जमीन खोदून बसविल्या की एक बरोबर बिनचूक असे वर्तुळाकार शिल्प तयार होईल.

किती चित्त थरारून टाकणारा तो क्षण असेल! वरून कांहीं माणसें अठ्ठावीस टन वजनाची एकेक प्रचंड शिळा तराफा लावून तशीच उभीच्या उभी पुढें ढकलीत आणीत आहेत खाली खड्डयांत काही माणसे ती तेवढी शिळा बरोबर तशीच्या तशी उभी उतरवून घेऊन तिला आधार देण्यासाठी खड्डयांत आणखी दगड व माती याची भर घालून तिला बरोबर नीट उभी करीत आहेत. ही शिळा बसवली की प्रचंड शिळांची बाहेरची भित पुरी होईल. त्यामुळे त्या सबध शिल्पाचा शिल्पकार, ती शिळा कशी काय बसते व बरोबर वर्तुळाकार कसा साधला जातो हे जरा चिताक्रान्त नजरेनेच पाहतो आहे. सगळ्याचे श्वास भराभर चालू लागले आहेत.

'हा, हा! तिथेंच तिथेंच! तशी तिथेंच राहूचला पाहिजे!'
'छान! छान! शाब्बास! झाले आपले बाहेरचे वर्तुळ किती छान बरोबर गोल गरगरीत! आतां, आंतल्या गोलाचे पवित्र निळे दगड बसवायचे अं.'

त्या शिल्पज्ञाच्या डोळ्यांसमोर असलेले त्याचे सारें स्वप्न पूर्ण झालेले दिसते आहे. तो आता इतका अधीर होऊन गेला आहे की प्रत्येक गोष्ट जागच्या जागी बसवीपर्यंतसुद्धा त्याला दम निघत नाही. बारंवार तो जेथे पवित्र वेदीचा दगड बसवावयाचा असतो तेथे पावलें टाकीत जातो व त्या जागेवर उभा राहून पुढच्या बाजूला कांही अंतरावर उभ्या असलेल्या दोन पुढच्या शिलांच्या बरोबर मध्यावर तो नजर टाकीत उभा राहतो. त्या दोन शिलांच्या मधून प्रवेशद्वाराचा रस्ता राहील. त्या प्रवेशद्वाराच्या रस्त्याच्या बरोबर मध्यें तो एकच एक शिळा उभी करील, त्यानंतर ग्रीष्म ऋतूच्या मध्यावर पहाट फुटत असतां

सकाळच्या प्रहरीं जो कोणी या वेदीवर असा उभा राहून पूर्वेकडे नजर टाकील, त्याला त्या मध्यभागीं असलेल्या शिळेच्या बरोबर डोक्यावर उगवणाऱ्या सूर्यबिंबाचें दर्शन होईल !

आपलें हें मध्यशिलेवर उगविणाऱ्या सूर्यबिंबाचें स्वप्न पाहण्यांत तो शिल्पज्ञ गुंग होऊन स्वतःला क्षणमात्र विसरला आहे म्हटलें तरी चालेल. पण त्याच्या भोंवतालचें काम मात्र तसेंच जोरांत चालू आहे. बांधकामाचा मुख्य नायक पहिल्या निळ्या दगडाकरितां खड्डा किती व कसा खणावा हें सांगत आहे. पाथरवट आपली हातोडी व छिन्नी घेऊन कामांत गुंग आहेत. कांहींजण वाळू व पाणी घेऊन कामाला लागले आहेत. शेंकडों माणसें त्या पवित्र गोल वास्तूभोंवतीं होणारा खंदक व त्याचा कांठ यांच्या कामाला कुदळीं आणि फावडीं घेऊन लागलीं आहेत, तर कांहीं प्रवेशद्वाराच्या रस्त्यावर काम करीत आहेत. सगळीकडे नुसती धमाल, गडबड उडाली आहे. चोहोंकडून सारखे आवाज येताहेत. काम करतांना येणारा घाम जोरजोरानें टिपून माणसें फिरून कामाला लागत आहेत. एकीकडे दगडावर बसणाऱ्या हातोड्यांच्या घावांची जोरजोरांत 'ठोकाठोक' चाललेली ऐकूं येते, तर दुसरीकडे भराभर दिल्या जाणाऱ्या आज्ञा कानांवर आदळत आहेत.

आज त्या जमातीच्या जीवनांतील सुवर्णक्षण उगवलेला आहे, याची काम करणाऱ्या सगळ्यांना पूर्ण जाणीव झालेली आहे. भोंवतीं सगळीकडे आनंद सारखा ओसंडून वाहतो आहे. प्रत्येकाच्या डोळ्यांत एका दिव्य ज्योतीचा प्रकाश चमकतांना दिसतो आहे. असा आहे तो दिव्य क्षण आणि ती गोल दगडी वास्तु !



## २१. नव्या मेक्सिकोंतील गव्यांची शिकार

'आतांपावेतों तुम्ही युरोप, चीन, जावा वगैरे देशांचे सांगितलेत. पण अमेरिकेंतील देशाचे काय ?' लोकानी शास्त्रज्ञांना छेडलें. या नव्याने सांपडलेल्या खंडातील मानवाची कथासुद्धां जुन्या जगांतील मानवकथे-सारखीच आहे का ? जीवनाच्या उत्क्रांतींत येथील मानवहि अशाच एखाद्या विनशेपटाच्या अमेरिकेंतील अज्ञात माकडापासूनच झाला व त्याचीहि तशीच जीवनकथा आहे का ?" लोक विचारूं लागले .

साऱ्या शास्त्रज्ञांनी एका आवाजांत 'नाही नाही' असेच त्यांना उत्तर दिलें. 'अमेरिकेंतील मानव हा नव्या जगांतील अज्ञात अशा विन-शेपटाच्या माकडापासून झालेला नाही. या एका गोष्टीची आम्हांला पक्की खात्री आहे', असें शास्त्रज्ञांचें म्हणणें पडलें. ते म्हणाले, 'दुसऱ्या खंडांत विनशेपटाची माकडेंच झालेली नाहीत, तर तेथला मानवप्राणी तशा माकडांपासून कसा वरं होईल ?'

'मग त्या मनुष्यानेंच अखेरीला अमेरिकेचा शोध लावला तर?' हो. तोसुद्धां कोलंबसाच्या आधीं, व्हायकिंग्स् ( Vikings ) च्याहि आधीं. असेंच ना? तर मग अगदीं पहिल्यानें मानवप्राणी या नव्या खंडांत आला तरी केव्हां? काय म्हणणें आहे तुमचें या बाबतींत?

या प्रश्नाला मात्र सर्व शास्त्रज्ञांचे एकमुखी उत्तर मिळेना. जवळजवळ प्रत्येकाचें कांहींना कांहीं वेगळें उत्तर होते. 'हें पाहा, त्याचें असें आहे', एक शास्त्रज्ञ सांगू लागले. 'तीस वर्षापूर्वी कोणी असा प्रश्न केला असता तर आम्हीं म्हटलें असते की, या नव्या खंडांत मनुष्यप्राणी हा कमीत कमी तीन हजार वर्षापूर्वी किवा जास्तीत जास्ती पांच हजार वर्षापूर्वी आला असावा. खरे म्हणजे अमेरिका खंडांत मानवप्राणी हा फार उशीरां आला ही कल्पना आपल्या डोक्यात जी कायमची ठांसून वसली आहे ती कांहीं जात नाहीं. आम्हीसुद्धां कितीतरी ठिकाणी खोद-खोदून पाहिले; पण फार प्राचीन काळच्या आदिमानवाचे येथे वास्तव्य झाले असावे असा काही पुरावा आमच्या हाती लागला नाही. पण १९२६ मध्ये, फिगिन्स या गृहस्थांनी या कल्पनेवर एक वज्राघातच केला. फिगिन्स आणि त्याला फोल्सम ( Folsom ) ला मिळालेले ते मानवाचे अवशेष, यांनी आमच्या सगळ्या कल्पना व सिद्धांत पार उडवून दिले....'

हें बोलणें ऐकताच सगळ्या शास्त्रज्ञांनी माना डोलविल्या. फोल्समनंतर त्यांच्या मानवाच्या आगमनासंबंधीच्या सगळ्या काल-गणनेचा पार पायाच उखडला होता.

खरी वस्तुस्थिति लक्षांत घ्यायची तर जेसी फिगिन्सचा असा कांहीं वज्राघात करावयाचा मुळींच बेत नव्हता. तसेंच पाहिलें तर तो आदिमानवाच्या शोधांतहि नव्हता. तो न्यू मेक्सिकोमधील फोल्सम गांवीं गेला तो कोलोरॅडो येथील सृष्टिविज्ञान इतिहासाच्या वस्तुसंग्रहा-लयासाठीं – पृथ्वीवरून आतां कांहीं नामशेष झालेल्या प्राण्यांचीं हाडें शोधण्यासाठीं म्हणून. ती तर त्याला सांपडलींच. शिवाय टेक्सॅस-मधील बैलासारखें खूप मोठे डोकें व पुष्कळ रुंद पसरट शिगें असलेला गवा त्याला मिळाला; पण त्यानंतर त्याला जें कांहीं आढळलें त्यानेंच हा वज्राघात बसला.

'अरे, जरा हें पाहा कीं.' एका शास्त्रज्ञानें त्याला मिळालेली वस्तु

वर काढून हातांत धरली. सर्वजण तिच्याकडे पाहूं लागले. पाहतात तों चकमकीच्या दगडाच्या छिललेल्या दोन कपारी.

त्या कपारी पाहतांच ते संशोधक क्षणमात्र मूढ होऊन मति गुग झाल्यासारखे पाहत राहिले. या तर चकमकीच्या दगडाच्या कपारी ! बापरे ! म्हणजे हिमयुगाचा शेवटचा काळ, क्रोमॅग्नान माणसाचा काळ. त्या कपारीनी त्याना शतकेच्या शतके सोडून एकदम हजारो वर्षे मागें ओढले. 'हो. पण या तुम्हाला वरच्या उकरलेल्या मातीत मिळाल्या ना ? तसे नाही उपयोगी. त्या मातीत रुतलेल्या–तिच्या त्या थरांतच रुतलेल्या–मिळाल्या तरच लोक विश्वास ठेवतील एरवी नाही', कसेवसे फिगिन्सने अखेर उद्‌गार काढले.

फिरून त्यांनीं सशोधनाला सुरुवात केली. थोड्याच वेळात. गव्याच्या फासळीत शिरून त्यामध्येच चिखलात रुतून वसलेली त्यांना दुसरीहि कपार मिळाली.

त्या सशोधकानी अखेर तेथील मातीचा तो सारा तुकडाच्या तुकडा कोरून अलगद वाजूला करून वर काढला. त्यात गव्याच्या फासळ्या, कपार, सारे काही जसे आढळले तसेच राहिलेले होते. त्यांनी तो जमिनीचा तुकडाच्या तुकडाच पदार्थसग्रहालयाच्या प्रयोगशाळेत पाठवून दिला तो तुकडा आल्यावरोवर एकच गडवड उडाली. जेव्हा भोंवतालच्या चिखलातून ती कपार सोडवून अलगद काढून घेतली तेव्हा ती मोडलेल्या एका कपारीचा भाग आहे हे सर्वांना दिसून आले. दोन्ही तुकडे एकत्र केले की दगडाचे एक निमुळते तीक्ष्ण टोंक होते आहे, हेहि स्पष्ट दिसून आले.

तरी सुद्धां गवा माणसाच्या हातून त्या तीक्ष्ण टोकानें मरण पावला या गोष्टीवर विश्वास ठेवावयाला मात्र शास्त्रज्ञ तयार होत नव्हते

'ही गोष्ट जर तुम्हाला कबूल नाही तर गव्याच्या फासळीत हें तीक्ष्ण टोक घुसलेले सापडते, याचा अर्थ काय धरायचा ?' वस्तुसंग्रहालयाचे लोक विचारूं लागले.

'ते नाही आम्हांला सांगता येत.' शास्त्रज्ञांनी उत्तर केले. 'वरूनहि पडले असण्याचा संभव आहे की तोहि टाळता येत नाही. एखाद्या प्राण्याने लहानसे बीळ केलें असेल त्यांतून ते वरून पडले."

शास्त्रज्ञांच्या या अविश्वासानें फिगिन्सचें डोकें भडकलें. 'थांबा जरा. तुम्हांला दाखवतोंच.' असें म्हणून फिगिन्स पुनश्च फोल्समला आला.

त्याच्या डोक्यांत एक कल्पना चमकून गेली. आपल्याला या एकाच जांगीं गव्यांचीं इतकीं हाडें मिळालीं याचा असा नाहीं का अर्थ होत कीं आदिमानव या ठिकाणी दबा धरून बसला आणि सगळ्यांना त्यानें या एकाच जागी फसवून, दबा धरून मारलें. हें फोल्सम ठिकाण प्राचीन माणसाच्या शिकारीचे जर खरोखरी एक स्थळ असले, तर त्याला गव्यांच्या हाडावरोबरच अशी आणखी कपारीची तीक्ष्ण टोंके सांपडतील, निदान सांपडायला पाहिजेत.

त्याचा तर्क अगदीं बरोबर ठरला. तो खोदीत असतां कांही वेळानें त्याला तसेंच मोडलेल्या कपारीचे आणखी एक टोक मिळाले. त्यानंतर आणखी तीन मिळालीं. पण नशीब असें कीं ती कपार नेमकी कोठें होती ती जागा नक्की व्हावयाच्या आतच उकरलेल्या मातीवरोबर ती बाहेर आली. शेवटी एक पांचवेहि कपारीचें टोंक मिळाले, ते मात्र चिखलांत अगदीं छानपैकी घट्ट रुतून बसलेले होतें.

फिगिन्सचे समाधान झाले. गव्याची हाडे मातीच्या ज्या थरावर मिळाली होती तेथेच नेमक्या थरावरच ही कपार सांपडली होती. शास्त्रज्ञांना पाहिजे तसा पुरावा येथे मिळाला होता. तावडतोब त्यानें प्रमुख संशोधक संस्थांना तारा पाठविल्या आणि शास्त्रज्ञ येण्याची तो वाट पाहत बसला.

तेहि आले. तीन मोठमोठ्या संशोधन संस्थांतील शास्त्रज्ञ, तारा पोहोचताच लगबगीनें फोल्समला आले. आतां मात्र त्यांना विश्वास ठेवणे भागच होते. त्यांनी ती जागा, सारे पाहिल्यावर, 'आमची आता खात्री पटली' असे उद्‌गार काढले. एवढेच नव्हे तर त्यांनी त्यानंतर उघडपणें जाहीर केलें की, 'फोल्समला सांपडलेला हा मानव हिमयुगाच्या शेवटीं येथे राहत असावा. शिवाय त्या काळी पृथ्वीवर जिवंत असलेल्या गव्यांची पण तो शिकार करीत असे असें दिसते.'

अर्थात् शास्त्रज्ञांची ही कबुली सहजासहजी मिळालेली नाहीं. कितीतरी दिवस ते या कल्पनेविरुद्ध चंग बांधून तिला विरोध करीत होते. पण अखेरीला इतका बळकट व उघड पुरावा मिळाल्यानंतर त्यांना सर्वांना

कबूल करणें भागच पडलें. पण हिमयुगाचा हा शेवटचा काळ म्हणजे कोणता काळ? पांच हजार वर्षांपूर्वींचा का? छे:! त्याला पांचानीं गुणायला पाहिजे. पूर्वीं त्यांच्या मतें या नव्या खंडांत, पांच हजार वर्षांपूर्वीं मानवानें पाऊल टाकलें असावें असें होतें. पण आतां तो काळ पंचवीस हजार वर्षें मागें ओढला गेला. फोल्सम मानव आणि क्रोमॅग्नान मानव एकाच वेळेला पृथ्वीवर वास करीत असून त्यांनीं ती आपल्यांत विभागून घेतली होती. अटलांटिक महासागराच्या दोन्ही बाजूंना असलेल्या भूखंडावर ह्या मानवजाती वास्तव्य करीत होत्या. त्या त्या भागांत त्या वेळीं वावरत असलेल्या मोठमोठ्या प्राण्यांची त्या शिकार करीत व जगत असत.



## २२. हें सर्व काय त्यांनीं कोणाच्या मदतीशिवाय एकट्यांनीं केलें?

अमेरिकेंत फार फार प्राचीन काळापासून—अनादि काळापासून—मानवजात राहत होती ही कल्पना शास्त्रज्ञाच्या गळी उतरवून रुळायला कांही दिवस लागले; पण एकदां ती रुळल्यानंतर मात्र त्यांना मागें जायला वेळ लागला नाही. हिमयुगाच्या अखेरीला मानवाची या खंडांत वस्ती होती अशी त्यांची खात्री झाली.

'खरें सांगायचे तर या नव्या खंडांत मानववस्ती झाल्याला सारीं तीन ते पांच हजार वर्षेंच होऊन गेलीं. असें धरून एवढ्या थोड्या काळांत या खंडांतील मानवी जीवनाची कथा बसवावयाची हें आम्हांला नीट जमत नव्हतें.' त्यांनी अखेर कबूल केलें. 'आशिया खंडांतील बेरिंगच्या सामुद्रधुनींतून पहिल्या मानवानें, आशियांतून येथें पाऊल टाकलें हें आम्हांला दिसून येई; त्याचप्रमाणें अलास्काच्या एका टोंकापासून तों दक्षिण अमेरिकेच्या दुसऱ्या टोंकापर्यंत तो कसा पसरत गेला असावा, हेंहि

आम्हांला कळून येई. पॅसिफिक महासागराच्या या बाजूपासून तो या खंडाच्या अटलांटिक महासागराच्या बाजूपर्यंत मानवप्राणी कसा पसरत गेला हेंहि आम्हांला दिसे. पण एवढे करावयाला त्याला पांच हजार वर्षे पुरेशी नव्हतीं. कितीतरी हजारों वर्ष लागली असली पाहिजेत.'

'या सर्व भागांत मानवजात पसरत जात असतांना त्याला मार्गांत कांही कमी अडथळे आले नसतील! याच मार्गांत त्याच्या जीवनांत कितीतरी गोष्टी घडून आल्या असतील! प्रथम इकडे येतांना कमालीच्या थंड हवेत वर्फातच राह्यची मानवाला संवय होती. पण या भ्रमणात पुढे पाऊल टाकीत जात असतां, निसर्गसिद्ध कशीहि हवा असली तरी त्यांत राह्यची त्याला संवय होत चालली. तिन्हीत्रिकाळ सदैव हिम राहणाऱ्या हिमप्रदेशांत जसे त्याने आपले घर केले, तसेच जेथे कधीच हिमवर्षाव होत नाही अशा अत्यंत उष्ण प्रदेशातहि तो घर करून राहूं लागला. ज्या ठिकाणी सारखा पाऊस पडत राहतो अशा ठिकाणी राह्यची जशी त्याला संवय झाली तशीच जेथे कधीच पाऊस पडत नाही अशाही प्रदेशांत राह्यची त्याला संवय झाली. समुद्रसपाटीवर जसा तो राह्यला शिकला, तसाच १४,००० फूट उचीवर असलेल्या पर्वतश्रेणीतहि तो राह्यला शिकला.'

'यामुळें त्याच्या शरीरांतहि थोडासा वदल झाला. श्वेतवर्णीय लोकापेक्षां येथल्या (अमेरिकेतील) इंडिअन्समध्ये उची, वर्ण आणि एकंदर नाकाडोळ्याची ठेवण यात फार फरक आढळून येतो. शिवाय या काळात मानवजातीची संख्या किती वाढत चालली! इकडे तिकडे विखरून राहणाऱ्या मूठभर मानवजातींतूनच लाखांनी मोजतां येईल अशी मानव-संख्या वाढली.

'शिवाय भाषा आहेच. सारेच अमेरिकानिवासी इंडिअन्स कांही एक भाषा बोलत नाहीत. बोली धरल्या तर त्याच्या भाषेचे १२०० प्रकार आहेत. हा सगळा विकास व्हावयाला किती हजारो वर्षांचा काळ लोटावा लागला असेल?

"आणि शेवटीं, मेक्सिको, मध्य अमेरिका आणि पेरू हे देश आहेतच की, त्या प्रदेशांत सांपडणारी आश्चर्यजनक संस्कृतीची वाढ पांच हजार वर्षांत होणें शक्य नाही असें आम्हांला नेहमीं वाटे. कारण

आशियांतून भ्रमण करीत जेव्हां पहिल्यानें मानवजातीनें येथें या खंडांत पाऊल टाकलें तेव्हां तो जणु काय नुसते हात हालवीत आला असावा, एवढेंच नव्हे तर त्यांच्या डोक्यांत कोणत्या गोष्टी कशा करावयाच्या याचे फारसे ज्ञानहि नसावें अशी आमची कल्पना होती. पण असे दिसतें की त्याच्याजवळ कशातरी प्रकारची, बहुधा कातड्याची वस्त्रें असावीत. त्याच्याजवळ भालाहि होता. भाला फेकून मारायची बैठकहि होती त्याला चकमकीच्या दगडापासून तीक्ष्ण कपारी कशा कराव्या हें पण माहीत होते. त्याचप्रमाणे त्याला विस्तवहि पेटविता येत होता. मानव-जातीच्या अशा टोळ्या एकवार आलेल्या नसून वारंवार येत असाव्या. कारण पुढे एकदां असे येत असता त्यांनीच धनुष्यबाण आणला. कुत्रा आणला. एवढेंच काय, ओबडधोबड नाव करायचे ज्ञान व तत्त्वहि आणलें. पण याशिवाय मात्र ज्या ज्या गोष्टी येथें दिसून येतात ती सारी प्रगति त्यांची त्यानाच, या नव्या खडात, स्वत.ची स्वत.च करावी लागली. तसे पाहिले, तर ही प्रगति कमी नाही. गारगोटीच्या धारदार टोकापासून तो पिरॅमिडसारखी देवळे बांधण्यापर्यंत मारलेली मजल फारच मोठी आहे यात सशय नाही.'

सगळ्याच शास्त्रज्ञाना मात्र, नव्या खंडातील मानववस्तीचा काळ आधी ओढला गेल्याने पुष्कळ प्रश्नाची उत्तरे मिळतात असे वाटत नव्हतें. त्याना ती कल्पनाहि पटत नव्हती. ते जुन्याच कल्पनेला म्हणजे फारतर इ स. पूर्वी तीन हजार वर्षे किंवा पाज हजार वर्षे आली असावी या कल्पनेला अजूनहि चिकटून होते व त्यावरच ते मल्लीनाथी करीत. पण प्रगतिशील शास्त्रज्ञ मात्र त्याच्याकडे लक्ष न देतां फोल्सम मान-वाच्या खाणाखुणावरून त्याचा मागोवा घेत ते निघाले. फिगिन्सनें आपल्या संशोधनाने शास्त्रज्ञांच्या जगांत जी प्रचंड वावटळ उडवून दिली, ती शमण्यापूर्वींच हे आघाडीचे संशोधक पुढें जाऊन कामाला लागले होते. त्यावेळी पूर्वी कधी अमेरिकेत झाले नव्हते किंवा कोणी पाहिलेसुद्धां नव्हतें, अशा तऱ्हेचें सर्वकडे संशोधन सुरू झाले.

त्या सशोधनानंतर शास्त्रज्ञांना लगेच असे आढळून आलें की हा फोल्सम मानव रॉकीज डोंगर रांगांच्या पूर्व उतरणीच्या उंच पठारावर सगळीकडे पसरला होता. त्याचे बांधवहि त्याच्या अगदी जवळच्या

प्रदेशांत राहत होते. कारण युमा, कोलोरॅडो या ठिकाणीं झालेल्या संशोधनांत खूपच छान छान अशा सुदर गारगोटीच्या कपारी मिळाल्या. फोल्सम मानवाच्या या बांधवांनीं तयार केलेल्या सुंदर सुंदर धारदार कपारी वऱ्याच दूरपर्यंत – म्हणजे कॅनडाच काय पण अलास्कापर्यंतसुद्धां सांपडल्या होत्या.

पण गंमत ही की फोल्सम मानवाचीं हाडें मात्र कोठेंच मिळत नव्हती. त्याच्या हाडांचा एक लहानसा तुकडासुद्धां अद्याप त्यांच्या नजरेला पडला नव्हता.

ही गोष्ट फारच निराशा करून सोडणारी होती.

'पण त्यात कांही मोठेसे आश्चर्य नाही' असे शास्त्रज्ञ नेहमी म्हणत. ते त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देत. 'फोल्सम मानव स्वभावानें शिकारी होता. तो गुहेत राहिला नाही. एवढेच काय, एकाच जागीच तो फारसा राहिला नाही. त्याची सारखी अशी भटकन्ती चालू असल्यानें आपली मृत माणसे पुरावी हे कधी काळी त्याच्या डोक्यांतहि आले नसेल. अशा वेळी फोल्सम मानवाचा सागाडा सापडला तर मोठ्या योगायोगानेच सापडेल आणि समजा सापडला तरी तो इतरांपासून वेगळा असें लक्षांत येणें महा कठीण.' एका शास्त्रज्ञानें उद्गार काढले.

'असें असेल तर या फोल्सम मानवाचा सांगाडा आपल्या नजरेला आलाहि असेल, पण तो त्या काळच्या मानवाचा हें आपल्याला ओळखताच आले नसेल.' दुसऱ्या एकानें पुस्ती जोडली.

शास्त्रज्ञांनी या गोष्टीवर एक क्षणभर विचार केला. नंतर ते म्हणाले, 'खरंच एक सांगाडा असा आहे तो इतक्या प्राचीन काळचा असावा असें म्हणावें लागते खरें.' अखेरीला त्यांनीं कबूल केलें.

त्या सर्वांच्या डोक्यांत त्यावेळीं मिनीसोटाला जीं माणसाचीं हाडें सांपडलीं ती घोळत होतीं. रस्ता दुरुस्त करतांना मजुरांना अशी एक जागा सापडली की ती फारफार प्राचीन काळीं एक वर्फाचें (Glacial) सरोवरच असावी.

'पण त्या मिनीसोटाच्या सांगाड्यावद्दल आपल्याला फारशी माहिती कुठें मिळालीय्?' एका शास्त्रज्ञानें सावधगिरीनें उद्गार काढले. 'आपल्याला तो सांगाडा एखाद्या पुरुषाचा नसून तरुण मुलीचा असावा,

एवढेंच काय तें कळलें होतें. ती कदाचित् फोल्समच्या काळांतील असेल, नाहीं असें नाहीं पण ती सिओक्स ( Sioux ) काळांतील असण्याचाहि तितकाच संभव आहे. शिवाय समजा, असा फोल्सम मनुष्याचा सांगाडा आंपल्याला जरी यदाकदाचित् मिळाला तरी तो त्या काळचाच हें कळणारहि नाही. आतांपर्यंत तरी नव्या खंडांत सध्यां आढळत असलेल्या मानवजातीच्या प्राण्यापलीकडे (Homosapiens) वेगळी अशी मानवजाति सापडलेली नाही. शिवाय आमची अशी खात्री आहे की, यापलीकडची मानवजाति येथें आलेलीच नाही. फार फार तर एखादी कवटी, भिवयाचा भाग जरा पुढें आलेला व अगदी गोल डोकें असण्याऐवजीं, डोक्याचा आकार किंचित् लांबट असलेला अशी सांपडेल. प्राचीनकाळचे म्हणून जे सागाडे सांपडतात ते बहुधा अशाच तऱ्हेचे असतात. त्यामुळे आमच्यापैकी कित्येकांना असें वाटू लागले आहे की अमेरिकानिवासी पहिली माणसें मुळी आपण समजतो त्याप्रमाणे अमेरिकानिवासी इंडियन नव्हतीच तर . . .'

'काय बोलतां इंडियन नव्हतीच....?'

'हो. ती इंडियन नसून ऑस्ट्रेलियातील ऑस्ट्रेलाईडस् असावींत.'

'ऑस्ट्रेलाईडस् ? हे काय आणखी नवीन काढलेत ?'

'युरोपीय लोकांना जेव्हा पहिल्याने ऑस्ट्रेलियाखंड सांपडले तेव्हां ज्या तऱ्हेची मानवजाति त्यांना त्या बेटावर सापडली त्यांना ऑस्ट्रेलाईडस् हें नाव दिले गेले. ऑस्ट्रेलियांतील हे 'झुडूपनिवासी' लोक ( Bushmen ) सगळे जरा लांबट डोक्याचे असून, त्याच्या भिवयांचा उठाव आपल्यापेक्षां जरा विशेषत्वाने दिसतो. कदाचित् नीआंडरथाल मानवाचे ते आपल्या-पेक्षांहि जवळचे वंशज असतील.'

खरें सांगायचे झाले तर फोल्सम मानव दिसत कसा होता, यापेक्षां-सुद्धां दुसरीच एक मोठी समस्या शास्त्रज्ञांपुढे उभी होती. एका बाजूला फोल्सम मानव तर दुसऱ्या बाजूला मय लोक. या दोन मानवजातींत उघडउघड इतके अंतर पडत होते की त्या दोहोंच्यामधील एक दुवा अजून सांपडला नसावा अशी त्यांना सारखी शंका येई. फोल्सम मानवाला मातीचीं भांडीं करतां येत नव्हतीं कीं धान्य पिकवतां येत नव्हतें. तो मानवतेच्या प्रथमावस्थेंतील अगदींच ओबडधोबड जंगली माणूस होता.

त्याला फक्त चकमकीच्या दगडाच्या धारदार कपारी व टोंकें तयार करणें, यापलीकडे कांहीं येत नव्हते. पण मध्य अमेरिकेंतील आणि युक्टान-मधील 'मय' लोक, मेक्सिकोमधील 'अझटेक्स' आणि पेरूंतील 'इन्का' लोक हे कितीतरी सुधारलेले असून त्यांची संस्कृति आश्चर्यचकित करून सोडणारी होती.

'पण या दोन मानवजातीच्या मधल्या काळांत काय झालें?' शास्त्रज्ञ सारखा विचार करूं लागले. 'फोल्सम मानवापासून तो मय वगैरे लोकांच्याजवळ येईपर्यंत मानव, विकासाच्या बऱ्याच पायऱ्या चढून गेला असला पाहिजे. पण त्या पायऱ्यांचा, त्या विकासाचा कसा कोठें मागमूसहि लागत नाही?' ते विस्मित होत स्वत:लाच सारखा प्रश्न करीत होते.

इतक्या थोडचा काळांत इडियन लोकांनी कोणाच्याहि मदती-शिवाय प्रगतीची एवढी मजल मारली यावर विश्वास ठेवायला कित्येक-जण नाकबूल होते. 'अशक्यातील आहे ही गोष्ट.' ते ठांसून सांगत. मानव-प्राणी कोठेंच इतक्या तल्लख बुद्धीचा नव्हता. तेव्हां बहुधा नावाच्या नावा भरून जुन्या जगातील माणसे येथे आली असतील ती वहुधा पॅसिफिक महासागराच्या वाजूने आली असतील. आणि त्यानी येथल्या लोकांना शिकवले असेल. एरवी शक्य नाही एवढी प्रगति करणे!'

काही शास्त्रज्ञानी मध्य अमेरिकेतील प्राचीन देवतांच्या चित्रांकडे अंगुलिनिर्देश करून 'ह्या देवता इडियन्ससारख्या दिसतात का?' असा सरळ प्रश्न केला. 'नाही, तशा दिसत नाहीत हे तर खरेंच. त्यांना दाढी आहे, पण इंडियन लोकाना दाढी नसे. यावरून गोरे लोक वहुधा येथें आले असावे व त्यांनी इडियन लोकांना शिकवलें असावे हेंच नाहीं का सिद्ध होत?'

'काय गोरे लोक आले म्हणतां?'

'हो गोरे लोकच आले.' एका शास्त्रज्ञाने उत्तर दिले व पुढें तो म्हणाला, 'हे गोरे लोक कोण होते हेंसुद्धां मी तुम्हांला पाहिजे असल्यास सांगतों. अलेक्झांडर दी ग्रेटचे ते खलाशी होते. तुम्हांला आठळते का? त्यानें आठशे नावांचे आरमार तयार केलें होतें तें? त्याच्या मृत्यूनंतर तें आरमार इराणच्या आखातांतून खालीं भारताच्या

किनाऱ्याच्या दक्षिणेस आलें. तेथून पॅसिफिक महासागरांतील बेटाकडे गेलें. तेथें त्यांनीं आपल्यावरोबर बऱ्याच पोलिनेशिअन लोकांना पण घेतलें आणि ते सगळे मिळून पुढें अमेरिका खंडांत आले.'

. ही जी कल्पना पुढे मांडण्यांत आली ती मोठी रोमांचकारी होती यांत संशय नाहीं. पण त्यांत कांही सत्य होतें का ?

'पण एवढें तर खरें ना कीं त्यानें पुष्कळच गोष्टींचा उलगडा होतो?' कांहींनीं हळूच सावधगिरीनें बोलणें सुरू केलें. 'छे: ! खरें नव्हे तें.' लगेच दुसऱ्यांनीं आपली बाजू मांडली. 'तुमच्या या कल्पनेनें कांही गोष्टींचा उलगडा होत असेल, पण कांही गोष्टीचा नीट उमज नाहीं पडत !' त्यांनीं आक्षेप घेतला. या खलाशांनी येथल्या रहिवाशांना भांडी कशीं करावयाची हे जर शिकवलें असें म्हणता तर मग त्यानी कुभाराचें चाक कसें करायचें हें कां नाही शिकवलें ? अलेक्झांडरच्या माणसांना कुंभाराच्या चाकाची तरी निदान खास माहिती होती. शिवाय अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू कसा करावा हेहि ते चांगले जाणत होते. या कसवाची पेरुव्हिअन लोकांना माहिती असावी असे दिसते. पण तीसुद्धां त्या काळीं झालेली नव्हे, बऱ्याच – बऱ्याच उशीरां !'

'आणि हो, लिहिणें ?' कांहींनी पुस्ती जोडली. त्या खलाशांनीं मय लोकांना लिहिणे, वाचणे, शिकवले असे म्हणावयाचें, तर त्यांनी त्यांना ग्रीकच लिपी शिकविणे साहजिक नव्हतें का ? निदान इजिप्तची मिसर लिपी तरी शिकवली असती. पण तसे न होतां त्यांनीं मुद्दाम बसून मयाची असलेली अगदी निराळीच लिपी शोधून काढली, असे म्हणणें सकृद्दर्शनी तरी पटत नाही. तोच प्रकार कालगणनेसंबंधी. मयांचे कालगणनेचें सारे गणित हे जुन्या जगांत काही शतकांपूर्वीं चालू असलेल्या कालगणनेपेक्षां कितीतरी अचूक होते. अशा वेळी ही कालगणना पद्धति ग्रीक खलाशांनीं आपल्यावरोवर आणली असे कसे म्हणावयाचें ? बरें खलाशानी वाटेत किंवा येथे आल्यावर, साऱ्या गोष्टी सोडून मुद्दाम तो मय कालगणनेचा अवघड उपद्व्याप ते करीत बसले, असें म्हणणे, हें खरोखर हास्यास्पदच ठरेल. तसेच शून्याचे ! जुन्या जगांत त्याकाळीं शून्याला खूण नव्हती. कोणालाच ती माहिती नव्हती. अशा वेळीं खलाशांनीं ती खूण बरोबर आणली हें म्हणणे अत्यंत धाष्टर्याचें आहे. मग काय,

त्यांनीं ही खूणहि शोधून काढली असें म्हणणार कीं काय ?

'छे! तें शक्यच नाहीं.' कित्येकांच्या तोंडून एकदम उद्गार बाहेर आले. शिवाय एकदां का तुम्ही मय लोकांनीं कालगणना पद्धति व शून्य या दोन अजब गोष्टी शोधून काढल्या हें कबूल केलें कीं, तुम्हांला ग्रीक खलाशांचा आतां जो आधार घ्यावा लागत आहे त्याची मुळींच जरूरी नाहीं. जे लोक शून्य व कालगणना पद्धतीचा शोध लावूं शकतात, ते दुसरें कांहींहि शोधून काढूं शकतील. जुन्या जगांत सांपडणारें किंवा न सांपडणारें असें कांहींहि शोधून काढणें त्यांना विलकुल अशक्य नाहीं. फार दूर कशाला, पाळण्याची झोळीच घ्याना. शिवाय सिगार, छोटी सिगरेट, चिलीम, रवराचे पोकळ चेंडू, लवचिक आंगठ्या, कठीण लांकडी तळाचें टोबोगन (Toboggans) वाहन आणि अशाच इतर आश्चर्यकारक गोष्टी !'

'हो, मका आणि वटाटे याच सदरांत येतील का ?'

'हो, मका आणि वटाटे हें पण त्यांचेंच खास संशोधन !'



## २३. सादर वन्दन !

साधारणतः खलाशांना शेती करण्याची कांहीं माहिती नसते. तरी न जाणों, अलेक्झांडरच्या खलाशांना ती होती असे आपण धरून चाललें तरी इंडियन मानवजातीला त्यांनी त्याबावत कांहीहि एक नवें शिकविले नाही या प्रश्नावर साऱ्या शास्त्रज्ञांचें एकमत होतें.

ते म्हणत ‘फार कशाला ? धान्यच घ्याना. इ. स. १४९२ साली जेव्हां कोलंबसाने अमेरिकेंत पहिल्यानें पाऊल टाकलें त्यावेळीं नुसत्या धान्याच्या ७०० निरनिराळ्या जाती ते पिकवीत होते. या साऱ्या जाती खास त्यांनी पहिलें जें काय एक रोप लावलें असेल त्यापासूनच तयार केल्या हें उघड आहे. अशा वेगवेगळ्या जाती तयार करावयाला त्यांना किती काळ घालवावा लागला असेल याची कांहीं कल्पना ?’

‘वीस हजार वर्षे.’ एका वनस्पतिशास्त्रज्ञानें उत्तर दिलें.

‘छेः! हा फारच दीर्घ काळ झाला.’ दुसरा उद्गारला.

'अरे, पण धान्य हें फार फार प्राचीन काळचें आहे.' तिसऱ्या एकानें मध्येंच विधान केलें. 'जगाच्या जीवनकलहांत स्वतःची काळजी घेऊन जगायचें ही त्या रोपटयाची संवय आतां पार नाहीशी झाली आहे. कोणी तरी लावावें, त्याची जोपासना करावी, तेव्हां तें आतां वाढतें. नाहीं तर वाढणारच नाहीं. पण धान्यापूर्वीं इतरहि पुष्कळ गोष्टी त्यांनी तयार केल्या होत्या की ! शेगा होत्या, भोपळा ( Squash ) होता. मॅनिओक (Manioc) [एक झाड. ज्याच्या मुळापासून पिष्टमय साबुदाण्यासारखें सत्त्व काढतात] होतें. बटाटे होते. कापूस होता.

अमेरिकेतील शेतीचा मागोवा घेत शास्त्रज्ञ मागे मागे जाऊं लागले. अमेरिकेतील सर्वच मानव टोळ्या निव्वळ शिकारीवर आपली उपजीविका करणाऱ्या नव्हत्या, असे त्यांना आढळून आले. फिगिन्सच्या वज्राघातानंतर प्राचीन मानवाच्या पावलांच्या खुणा घेत घेत शास्त्रज्ञ मागें मागें गेले. तेव्हां त्यांना एक फारच आश्चर्य करण्याजोगी गोष्ट आढळून आली. हिमयुगाचा शेवट होण्याच्या किती तरी आधी अमेरिकेंतील मानवजात दोन दगडांमध्यें खाद्यपदार्थ घालून दळीत होती !

'अर्थात् याचा अर्थ ते लोक धान्य दळीत होते असा करण्याचे कारण नाही.' घाईघाईने ज्या शास्त्रज्ञाला असे दगड सापडले होते त्या शास्त्रज्ञांनी स्पष्टीकरण दिले. 'आम्हांला एवढेंच म्हणावयाचे आहे की, अमेरिकेंतील प्राचीन मानवजातीत जसे शिकारी होते तसे काही अन्न गोळा करणारे पण होते. या लोकांतूनच पहिले शेतकरी लोक तयार झाले असतील ! '

'शिवाय एकदां का त्यांनी पिकविण्याचें तंत्र आत्मसात् केल्यावर मग कोण त्यांना थावविणार ?' प्राचीन मानवाच्या कृतीबद्दलचे कौतुक वाटून एका वनस्पतिशास्त्रज्ञानें उद्गार काढले. हें बटाटयाचे पीक. हें तयार करण्याकरतां त्यांनी काय काय प्रयत्न केले असतील ! नाईटशेड, जिमीसनवीड, तंबाखू आणि कितीतरी इतर रोपटीं, यांची त्यांनीं एकमेकांत भेसळ केली असेल ती देवच जाणे. पण इतक्या प्रयत्नांनंतर हें बटाटयाचें पीक त्यांना मिळू लागले !

'शिवाय बिनबीचा अननस पण त्यांनीं तयार केला की.' आणखी एकानें जोड दिली.

'छे: ! तें कांहींच नाहीं. मॅनिओका ( Manioca ) पासून टॅपिओका ( Tapioca ) काढण्याकरितां त्यांना जें जें करावें लागलें असेल तें याहिपेक्षां फार आश्चर्यचकित करून सोडणारें आहे. आणखी एकजण म्हणाला मॅनिओका (Manioca) ची एक जात विषारी असते असें त्यांना कळून आल्यावर त्यांनी त्यांतलें विषारी द्रव्य काढून घेण्याकरितां एका प्रकारचा चरक तयार केला. त्यांत घालून दावलें कीं मॅनिओक ( Manioc) मधील विषारी द्रव्य बाहेर पडे व चांगला खाण्याजोगा पिष्टमय साका तेवढा मागे राही.'


शेतीच्या बाबतीत अमेरिकेतील प्राचीन मानवानें जगांतील इतर कोणत्याहि भूभागातील लोकांपेक्षां फारच मोठी व स्वतंत्र कामगिरी केली आहे याबद्दल शंकाच नाही. प्रत्येकालाच ते कबूल करावें लागेल. त्यानें वीस वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीची रोपटी खाद्य पदार्थाकरितां शोधून काढली. शिवाय तीन प्रकारच्या शेंगा, भोंपळा, कोहळा (Pumpkin), मका, मॅनिओक आणि पांढरे बटाटे, इत्यादि खाद्यपदार्थाचीं रोपटी शोधून काढली. याशिवाय त्यानें रताळी, मिरची, मिरी, टोमॅटो, अननस, भुईमुगाच्या शेंगा, स्ट्राबेरी, अव्हाकॅडोज् ( Avacados ) फळे, जेससलेम, आर्तिचोकस् ( Artichokes ) ची पानें सूर्यफुलांच्या बिया, सीताफळ, कोको आणि अशीच किती खाद्यपदार्थाकरता रोपटी, झाडें तयार केली. नव्या जगांतील कापूस, तंबाखू ह्यांची झाडे त्यानेंच निरनिराळे प्रयत्न करून तयार केली. रानात आपोआप उगवणाऱ्या निरनिराळ्या जातीच्या धान्यफळांचा त्याने असा खाण्याकडे उपयोग करण्याकरितां त्यांची जोपासना करावयास सुरुवात केली.

त्याने पार्सिमॉन्स ( Parsimmons ), पापाव्हज् ( Papaves ), पपया, पेरू. निरनिराळी अलुबुखार, मनुकांच्या जातीची फळे, चेरी, काजू आणि रानतांदूळ यांचा हंगाम बरोबर साधून पिकें काढणें सुरू केले. आरारूटची मुळे व चहाच्या झुडुपाची पानें प्रथम त्यानेंच शोधून काढली. हेव्हिआ जातीच्या झाडापासून पहिल्यांदा त्यानेच चीक काढून रबर तयार केला. झाडांपासून किंवा प्राण्यांपासून निघणारे चिकट स्राव घेऊन त्यापासून वार्निश तयार केलें. डिंकापासून त्यानें गोंद तयार केला. सिकोनाच्या झाडाच्या सालीपासून हिंवताप बरा करण्याकरितां

त्यानें कोयनेल शोधून काढलें. कोकोच्या झाडाचीं पानें तोंडांत धरून चघळलीं असतां थकवा जातो, हें पहिल्यांदा त्यालाच कळून आलें. कोचिनाल नांवाचे कांहीं जातींचे किडे वाळवले आणि कुटले कीं त्यांपासून लाल रंग तयार करतां येतो, हें कळल्यापासून त्यानें त्या जातीच्या किडयांची पैदास सुरू केली.

'वापरे, या सगळ्या गोष्टी अमेरिकेंतील आदिमानवानें जगाला दिल्या आहेत.' ही कल्पना आल्यावरोबर सर्व शास्त्रज्ञ आश्चर्यचकित होत्साते आदरानें त्याच्यासंबंधीं बोलूं लागले.

एक अपवाद सोडून जगांतील प्रत्येक खंडांत आतां मक्याचीं रोपें वाऱ्यानें डुलत असलेलीं त्यांच्यासमोर येत होतीं. त्या मानवानें लावलेल्या वटाटयाच्या शोधानें आयर्लंडची उपासमार थांबवली हें त्यांना समजत होतें. त्यानेंच युरोपचें पोषण केलें, एवढेंच नव्हे तर आणखी उत्तरेकडे त्याचा प्रसार वाढत चाललेला त्यांच्या डोळ्यांसमोर नाचूं लागला. वाण्याच्या दुकानांतून फळयांवर नीट लावून ठेवलेले लाखो अननसाचे डबे, टोमॅटोचे डबे, घेवडयाच्या शेंगांतील शिजलेल्या दाण्यांचे डबे, त्यांच्या डोळयासमोर नाचूं लागले. सिगरेट, रवराचें टायर, नीळीचा रंग; त्याचप्रमाणें भुईमुगाच्या दाण्यांचें लोणी, चॉकोलेट, चघळायचा डिक ( Chewing Gum ) आणि स्ट्राबेरींचा मुरंवा या साऱ्या वस्तु भराभर त्यांच्या डोळ्यांसमोरून सरकूं लागल्या. हें सगळें पाहिलें कीं असें वाटूं लागतें कीं, 'कदाचित् मेक्सिको, मध्य अमेरिका आणि पेरू येथील इंडियनांनीं आपली प्रगति अलिप्तपणें केवळ एकटयाच्याच वळावर केलेली नसावी.' एका शास्त्रज्ञानें विचार करीत असतां मनांत आलेलें उघडपणें वोलून दाखविलें. 'पण खरोखरी त्यांनीं एवढी सारी प्रगति अलिप्तपणें स्वतःच्या वळावर केली कीं दुसऱ्याच्या मदतीनें केली, या गोष्टीला फारसें महत्त्व नाहीं, तर शेतकरी म्हणून जो त्यांनीं अन्नधान्य, फळें यांचा विकास केला, वाढ केली, तें काम खरोखरी तोंडांत बोट घालून पाहात राहवें इतकें आश्चर्यकारक आहे. तें पाहिलें कीं आदरानें मान



# २४. अश्मयुगीन मानवाच्या खांद्यावर

अमेरिकेंत मिसिसिपीच्या पूर्वेपासून तो अप्पालाचेन डोंगरांच्या रांगांपर्यंत. त्याचप्रमाणे विन्कान्सिनपासून तो मेक्सिकोच्या आखातापर्यंत चोहोंकडे मानवनिर्मित उंचवटे विखुरलेले दिसून येतात. निदान शेकडों-हजार तरी असे उंचवटे असतील. त्यातले काही चागलेच मोठे असून त्यांनीं कांहीं एकर जागा व्यापलेली दिसते, तर कांहीं अगदींच लहान असतात.

हे सगळे उंचवटे मानवनिर्मित आहेत; पण ते वाधणारा तो मानव कोणता हें मात्र कोणालासुद्धा आठवत नाही. ॲलेघेनिजच्या ( Alleghenies ) पलीकडे जाऊन गोरे लोक जेव्हां पश्चिमेकडे सरकू लागले, तेव्हांसुद्धां हे उंचवटे कोणी बांधले ह्यासबंधी लोकांना कांहीं एक माहिती नव्हती, इतके ते प्राचीन आहेत.


पण अगदीं बिनशेपटाच्या माकडापासून तों नव्या अश्मयुगापर्यंत झालेली आदिमानवाची एकंदर सारी वाटचाल लक्षांत घेतली कीं, त्या साऱ्या कालखंडाच्या अवधींत हे उंचवटे अगदीं काल बांधले गेले, असें वाटू लागतें मान वउत्क्रांतीच्या एकंदर कालौघांत हे उंचवटे बरेच अलीकडे येतात, हें त्यांच्याकडे पाहात एक क्षणभर उभें राहिलें तरी चटकन् लक्षांत

येतें. तेव्हां आदिमानवाच्या या वाटचालीचा साकल्यानें एक नकाशाच तयार करूं या. या पुस्तकाचें पान जितकें रुंद आहे तो रुंदी म्हणजे मानवाचें या पृथ्वोवरील अस्तित्व अस धरूं. हा कार कमींत कमी दहा लाख वर्षांचा घ्यायला कांहीच हरकत नाहीं.

हा पाहा. हा मानवाच्या वाटचालीचा मार्ग. म्हणजे दहा लाख वर्षांचा मानवी अस्तित्वाचा काळ. या साऱ्या काळांत मानवजात सारखे प्रयत्न करीत आहे. धीरेधीरे, कष्टानें, पाऊल उचलीत ही वाटचाल चालत आलेली आहे. याच्या अगदीं अलीकडच्या टोंकाला म्हणजे दहा लाख वर्षांच्या शेवटी हे मानवनिर्मित उचवटे बांधणारे येतात ते आजच्या मानवाच्या अगदी खांद्याला खांदा लावून सहज कसे बसू शकतात हें मोठें पाहण्याजोगे आहे.

आतां हाच रस्ता जुनें अश्मयुग व नवीन अश्मयुग असा विभागू या. जुन्या अश्मयुगाला किती वराच कालावधि द्यावा लागतो तो लक्षांत घ्या. जीवनाच्या या रंगभूमीवर मानव, शेतकरी म्हणून किती उशीरां प्रवेश करतो हेंही लक्षांत घेण्याजोगें आहे.


त्यानंतर हाच दहा लाख वर्षाच्या कालावधीचा मार्ग घेऊन आपल्या पुस्तकांत जे जे नायक त्या रस्त्याने आले ते दाखवू. आपल्याला कांहीं त्यांचा निश्चित कालावधि दाखवतां येणार नाही. साधारण अदाजानेंच त्यांना या रस्त्यावर स्थान द्यावें लागेल. कारण, आपल्याला एक अवस्था सपून



दुसरी कधीं सुरू झाली हें नेमकें कधींच सांगतां येणार नाहीं. त्यामुळें आपल्याला बरीचशी अंदाजावरच भिस्त ठेवावी लागेल. राक्षसी विनशेपटाचा माकडमाणूस होऊन गेला. त्याच्या आधीच्या काळावर आपल्याला प्रश्नचिन्हच घालावें लागेल. त्याचप्रमाणें जावांतील वटुमूर्ति किंवा पेकिंग-मानव या वाटचालीने नक्की कोठें बसतो याचीमुद्धा आपल्याला कांहीं खात्री देतां येत नाहीं. जसजसें आपण अलीकडच्या काळांत येऊं लागतों तसतशी कांहीं अंशीं तरी आपल्याला निश्चित माहिती देतां येते.

हा पाहा मानवजातीचा कालखंडपट. शेवटीं शेवटा त्यांत किती गर्दी होऊं लागली आहे हे तुम्हाला दिसतेंच आहे. आतां एवढी गर्दी होत चालली आहे कीं 'लोह, पोलाद युगांतील' मानव दाखवायला तेथें बिलकुल जागाच उरलेली नाही. जेथें ह्या रस्त्याचा शेवट दाखवला आहे ती रेषा आपल्याकरितां. आपण तेथें येतों. ४००० वर्षापूर्वी झालेले 'सरोवरनिवासी' लोक अगदी आजच्या मानवाच्या पायाला पावलें भिडवून उभे राहातात. त्याचें कारण एवढेच की आपल्या काळाच्या-जवळ जसजशी मानवजाती येत चालली तसतशी तिच्या जीवनावद्दलची आपली माहिती जास्त जास्त तपशीलवार होऊं लागली.


पेकिंग मानव आणि नीआंडरथालमान व यांच्यांत खूपच मोकळी जागा शिल्लक राहते; पण वस्तुत: ती मोकळी जागा तशी मोकळी पडलेली नसावी. त्या काळांत घालतां येतील असे एक-दोन मानवजातीचे नमुने



खास झालेले असतील. शास्त्रज्ञांना ते माहीत असून त्यांनीं त्यांना 'अॅबेव्हिलन मानव' आणि 'अचेउलिन मानव' अशीं नांवें सुद्धां दिलेली आहेत. आपण या पुस्तकांत त्यांचा उल्लेख न करण्याचे कारण म्हणजे त्यांच्या-विषयीं फारच थोडी माहिती वाहेर आलेली आहे.

ते कोणतीं साधनें वापरीत असत ते आपल्याला माहीत आहे. बुशेद् पॅर्थेनें तशीं त्यांचीं वरींच साधनें गोळा करून ठेवलेलीं आहेत. बहुधा गारगोटीच्या दगडांतून वनवलेल्या कुन्हाडीच त्या काळच्या मिळतात. या मानवाला उष्ण हवामान आवडत असे. कारण उष्ण हवामान आवड-णाऱ्या पाणघोडा—गेंड्यादि प्राण्यांच्या हाडांसमवेतच त्यांचीं तीं साधनें सांपडतात, पण ही मानवजाती कशी दिसत असे याची मात्र फारशी कल्पना येऊं शकत नाहीं. कारण ती कल्पना यायला पुरेशीं हाडेंच मिळालीं नाहीत. मिळाली तीं अगदीच मोजकी, अपुरी. फार तर पांच किंवा सहा कवटयांचा कांही भाग आणि एक जवड्याचे हाड मिळालें असेल. त्या जबड्याच्या हाडाच्या मोठ्या आकारावरून एकंदर तो मानवप्राणी चांगलाच मोठा असावा अशी कल्पना करतां येते; पण हा आधार अंदाजें वांधायला पुरेसा नाही हेच खरे.


असो. अशा रीतीने त्या त्या कालखंडाचे नायक तसतसे दाखविले आहेत खरे. क्रोमॅग्रान मानव युरोपांत आल्याला तसा फारसा कालावधी लोटलेला नाही; पण या थोड्या कालावधीतच म्हणजे २५००० वर्षां-



पूर्वी मानवानें जेवढी प्रगतीची वाटचाल केली तेवढी पूर्वीच्या साऱ्या ९७५,००० वर्षांत कधी झाली नव्हती.

पण आतां एक आणखी वेगळाच नकाशा करूं या. मानवानें जे कांहीं मोठमोठे शोध लावले ते या दहा लाख वर्षांच्या कालावधींत कोठें कोठें बसतात तें पाहूं या. तें पाहूं लागलों तर आपला नकाशा कांहींसा खालीलप्रमाणें येईल. काय म्हणतां? भाषा, विस्तव, शेती? हे काय मानवाचे महत्तम शोध म्हणावयाचे?

हो. त्यांना महत्तम शोधांतच गणलें पाहिजे. यांच्याशीं तुलना करूं जातां त्याची ती भाल्याची तो दूर फेकतां यावा म्हणून केलेली बैठक किंवा धनुष्यबाण हे कांहींच नव्हत. त्यानें शोधून काढलेल्या सुरया, भांडी, घर, नाव किंवा त्याचा विणण्याचा माग, हे सारे शोध या मुख्य महत्त्वाच्या शोधापुढें निव्वळ पोरखेळ आहेत. हेंच काम, मानवाच्या या तीन शोधांपुढें त्यानें केलेली वाफेनें चालणारीं जहाजे, मोटरी, जेटविमानें, दूरचित्र-दर्शन किंवा अगदीं अलीकडचा मोठा शोध म्हणजे अणुविभाजन, हे सारे त्यापुढें फारच फिके पडतात. हे तीन्ही शोध मानवाच्या प्रगतीचे पायाभूत शोध आहेत. यावरच त्याच्या पुढच्या प्रगतीची सारी इमारत बांधलेली आहे; पण ह्या तीन्ही शोधांचे कर्तृत्व 'अश्मयुगीन' मानवाकडे जाते.



त्याचें हें आपल्यावर ऋण आहे; पण सुमारें एक शतकापूर्वी अशी मानवजात पृथ्वीतलावर वास करीत होती कीं नाहीं याबद्दल आपल्याला संशयच होता; पण आतां त्याचें अस्तित्व सिद्ध झालेलें आहे. एवढेंच नव्हे तर आपलें सारें अस्तित्व त्या अश्मयुगीन मानवाच्या खांद्यावर उभें असल्यासारखे आहे.

उदाहरणार्थ भाषाच घ्या ना. भाषा नसती तर माणसाचें काय झालें असतें? मानव आतां कोठें असता ? भाषा नसती तर त्याच्या त्या कल्पक मेंदूचा, पायावर ताठ उभें राहण्याचा, कांहीं एक उपयोग झाला नसता. इतर प्राण्यांपेक्षां त्याचें सध्यां जें काय वेगळें अस्तित्व जाणवतें तें त्याला प्राप्तच झालें नसतें. इतर प्राण्यांपेक्षां तो वेगळा झालाच नसता. त्याला आपल्या इतर जातिबांधवांशी कोणत्याच प्रकारचें दळणवळण ( विचारांचें व इतरहि ) विलकुल ठेवतां आले नसतें. इतरांशीं सहकार्य करून तो जें कांहीं कार्य करूं शकतो तेंहि त्याला कधींच करतां आलें नसतें. एवढेंच काय त्याची विचाराची प्रक्रियासुद्धां बंद झाली असती. कारण शब्दाभावीं त्या विचारांना कोणते मूर्त रूपच आलें असतें. आपण शब्दांच्या साह्यानेंच विचार करूं शकतों. त्यानंतरचा शोध विस्तवाचा. विस्तव नसता तर अन्न शिजवणें माणसाला कधींच जमले नसते. विस्तव नसता तर ज्या ठिकाणीं हवेचें उष्णतामान चांगलें आहे, फक्त अशाच ठिकाणीं, अशाच हवेंत माणूस राहिला असता. विस्तव नसता तर दिवसाच फक्त तो काम करूं शकला असता. विस्तवाच्या अभावी अशुद्ध धातू वितळवून शुद्ध करणें त्याला कधींच जमलें नसतें. म्हणजे अजूनही तो लांकूड, हाडें, शिंपले व दगड एवढ्यांशीच जखडून राहिला असता. त्याची प्रगति फारफार तर दगडाची गोलाकार उभी केलेली वास्तु, येथपर्यंतच झाली असती; पण धातुयुगानें त्याचें पाऊल पुढें पडलें ते पडलें नसतें. आतां शेवटीं शेतीचा शोध.

शेती म्हणजे सुधारणेची माता असें नेहमीं समजलें जातें, तें उगीच नाहीं. शेती नसती तर कोणतेंही बांधकाम करणें अशक्य होतें. बांधकामाच्या अभावीं नागरी आयुष्याची नुसती कल्पनासुद्धां करतां आली नसती. शिवाय मुळांत नागरी आयुष्य नसेल तर सुधारणा तरी कशी होणार ? खरें पाहिलें तर शेतीमुळेंच मानवाचा अन्न-सांठ्याचा प्रश्न सुटला आहे.

अन्नधान्याचा सांठा होऊं शकतो हें एकदां निश्चित झाल्यामुळेंच मानवांची संख्या इतकी भरमसाट वाढत सुटली. लोकसंख्या वाढली कीं कांहींना आराम मिळतो. कारण बऱ्याच लोकांना लागणारें अन्न-धान्य पिकवायला कांही बरींच माणसें लागत नाहींत. थोड्या माणसांनी तें काम सहज होऊं शकतें. म्हणजे समाजांतील कांही माणसें दुसऱ्या गोष्टींचा विचार करा-वयाला किंवा दुसरें काम करून पाह्यला मोकळी होतात. त्यामुळेंच कांहीं जणांना त्यांच्या आवडत्या गोष्टीत विशेष प्राविण्य मिळवणें शक्य होतें. कांही लोक विचार करूं लागतात, निरनिराळ्या योजना करतात आणि इतरे जनांकरितां शोध लावण्याचें काम पण करूं शकतात. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतींमुळें मानवप्राणी पिढ्यान् पिढ्या एका जागीं स्थायिक होऊं शकतो. असा स्थायिकपणा आल्यानंतरच कलेचा प्रादुर्भाव होतो. मानवजात जोंपर्यंत शिकारीचें भटके जीवन जगत होती तोंपर्यंत आज इथें तर उद्यां तेथें असा प्रकार चाले. अशा अनिश्चित भटक्या जीवनांत सुंदर सुदर वस्तूची निर्मिती करणें केवळ अशक्य होतें. तुम्हांला आठवतच असेल, कलावंत असलेला क्रोमॅग्नान माणूस भटक्या नव्हता. तो एका जागीं राहात असे; पण जेव्हां का त्याच्यावर भटकायची पाळी आली तेव्हां त्याची कला साफ मेली. तुम्ही कांहीं काळ एके ठिकाणी राह्यला आणि पुढच्या काळांत जर दुसरीकडे जाणार असाल, तर प्रथम राहात असलेल्या ठिकाणी सुंदर सुदर चित्रें काढून रंगविण्यांत किंवा सुदर शिल्पाकृतीची निर्मिती करण्यांत काय अर्थ? आज माणूस येथें आहे आणि उद्यां तो सारें मागें सोडून दुसरीकडे जाणार आहे. असें जर व्हायचें असेल तर सुदर घर बांधून त्यांत सुंदर सुदर गोष्टी ठेवून तें सजविण्यांत तरी काय फायदा? आपल्या भोंवती अशा छान छान गोष्टी असाव्या अशी कल्पना सुद्धां भटक्या जीवनांत येणें कठीण; पण एकदां का गहूं, तांदूळ, मका या सर्वांचा किंवा यांपैकीं कोणत्याहि एकाचा साठा करून आपण त्यावर अवलंबून राहूं शकतो, अशा माणसाची खात्री झाली कीं त्याचें मन चिरकाल टिकतील अशा गोष्टी बांधण्याकडे वेधू लागतें. अशाच वेळीं कला-निर्मिति होऊं लागते व तिचा विकारहि होतो. अशा जीवनपरिस्थितीं-तच धर्माचा त्याच्या जीवनावर चांगलाच पगडा बसतो, देवालयें बांधलीं जातात, चित्रें रंगविलीं जातात, पुतळे उभे होतात. लेखन-

कलेचा शोध लागतो. नगरें जन्माला येतात.

शेतीचा शोध लागेपर्यंत मानवी प्रगतीचें पाऊल फारच धीरेधीरे पडत होतें; पण शेतीचा एकदां शोध लागल्यानंतर अन्नाची काळजी करण्याचें कारण उरलें नाहीं. त्यानंतर मानवाची प्रगति उड्या मारीत धांवूं लागली. पृथ्वीवरच्या अत्यंत पूर्वकालच्या आदिमानवाची, जगांतील पहिल्या माणसाच्या जीवनकथेची ही अशी गाथा आहे.

लाखों वर्षें, मानवाची ही वाटचाल हळूहळू चाललीच होती. तेव्हां त्याच्याजवळ असलेल्या कला म्हणजे फक्त त्याची ओबडधोबड रांगडी भाषा यापलीकडे कांहींच नव्हतें. अग्नि हेंच एक त्याचें एकमेव सुखस्थान होतें. पहिल्या प्रथम तो त्याला जेथें जेथें मिळाला तेथून तो उचलून घेत असे. हळूहळू तो शिकार करायला शिकला. मोठ्या कष्टानें तो गारगोटीच्या कपारी कशा तीक्ष्ण कराव्या तें शिकला. कांहीं लाख वर्षें तो तेवढेंच करीत राहिला. म्हणजे शिकार करी, कपारींना धार आणण्याचा प्रयत्न करी. नंतर कांहीं दिवसांनीं त्याला विस्तव पेटविण्याची कला साधली. खूपच उशीरां जवळजवळ शेवटींच म्हणा ना. त्यानें भाला फेंकून मारण्याचें साधन तयार केलें. त्यानंतर धनुष्यबाण आला. पुढें त्यानें कुत्राहि माणसाळवला. शिवाय तो भांडींहि करायला शिकला. इतकी वाटचाल झाल्यावर अगदीं शेवटीं त्याला शेतकीचें ज्ञान आलें. हें ज्ञान म्हणजे लहानसहान गोष्ट नव्हती. फार महान् मानवी प्रगतीची ती नुसती पहांटच झाली होती.

विज्ञान विश्व

## वैज्ञानिक विषयांचे सुबोध विवेचन करणारी पुस्तके

- विराट विश्वाची निर्मिति : ४·००
  —चिं. श्री. कर्वे
- आपल्या ग्रहमालेतील नवग्रह : ६·००
  —ना. वा. कोगेकर
- सूर्य : जन्म आणि मृत्यू : ६·००
  —चिं. श्री. कर्वे
- एक ग्रह, नाव त्याचे पृथ्वी : ६·००
  —प. म. बर्वे
- जीवन, विज्ञान आणि तत्त्वज्ञान : ६·००
  —चिं. श्री. कर्वे
- अंतराळात अग्निबाण : २·५०
  —भा. रा. भागवत
- जगाच्या कल्याणा : २·००
  —भा. रा. भागवत
- विज्ञानाशी हितगूज : २·००
  —रा. वि. सोवनी
- अणुगर्भातील अगाध शक्ती : ४·००
  —द. के. केळकर

# मॅजेस्टिक बुक स्टॉल

गिरगाव नाका, मुंबई ४

शनिपाराजवळ, पुणे २